पुणें मराठी ग्रंथालय
कादंबरी
क्रमांक — ६१५

# स्वर्गीय सौंदर्य.

श्रीयुत इनामदार.

सुरसग्रंथप्रसारक मंडळी,
पुणें.

अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख।

एका प्रसिद्ध आंग्ल कादंबरीच्या आधारें लिहिलेलें

सुरसग्रंथमालेचें विसावें पुष्प

# स्वर्गीय सौंदर्य!


लेखक,

**श्री० रामचंद्र नरसिंह इनामदार, B. A., LL. B.**

कापशी संस्थानचे कारभारी व 'ब्रिटिशांचा उदय', 'भयंकर स्वप्न'

या पुस्तकांचे कर्ते.



प्रकाशक,

**वालचंद रामचंद कोठारी, बी. ए.**

प्रोप्रायटर—सुरसग्रंथप्रसारक मंडळी, १४६४ कसबा पेठ, पुणें.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु प्रेस'

४३२ शनवार पेठ, पुणें शहर.



[ या पुस्तकाचे सर्व हक्क मंडळीनें स्वाधीन ठेविले आहेत. ]



जानेवारी १९१७.] किंमत १॥= रुपाया. [आवृत्ति पहिली.

# अशक्त लोकांकरितां आश्चर्यकारक उपाय !

## प्रो० जेम्स यांच्या

# इलेक्ट्रो टॉनिक पर्ल्स

(प्रो. जेम्स यांच्या विद्युत-शक्तिवर्धक गोळ्या.)

या गोळ्यांत विद्युत्शक्ति समाविष्ट केली गेली असून विसाव्या शतकांतल्या अगदीं अलीकडील शास्त्रीय शोधांच्या सहाय्यानें या गोळ्या सर्व प्रकृतीच्या माणसांना व कोणत्याही ऋतूंत केव्हांही घेतां येतील अशा रीतीनें बनविल्या आहेत. या गोळ्याच्या सेवनानें निद्रानाश, स्मृतिभ्रंश, मेंदूचे विकार, दुर्बलता, काम अगर अभ्यास करण्यास निरुत्साह, अशक्तपणा व अति श्रम व स्वेच्छाचरण यां मुळें आलेली हरएक प्रकारची क्षीणता खात्रीनें बरी होते. अकाल-वार्धक्य, वीर्यदोष, शक्तिपात, थोडेसें काम करतांच येणारा थकवा, डोळ्यांपुढें काळोख येणें, भोंवळ, कंबर दुखणें, हातापायांत वेदना होणें, एवंच मानसिक व शारिरिक हरएक प्रकारच्या विकारांवर ह्या गोळ्या आश्चर्यकारकच काय पण अद्भुत गुणदायी आहेत.

सर्व औषधें घेऊन थकल्यावर हा आश्चर्यकारक इलाज अनुभवून पहा.

२५ गोळ्यांचे बाटलीस रु. १-४-० }
४० गोळ्यांचे बाटलीस रु. २-०-० } व्ही. पी. खर्च ८४ निराळा.

सोल एजन्टस्:—

**धी अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कं०**

जुम्मामशीद, मुंबई.



# प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रस्तुत रम्य व चित्ताकर्षक कादंबरी आमच्या वाचकांना सादर करण्याची संधि आह्मांस प्राप्त करून दिल्याबद्दल आह्मी श्रीयुत इनामदार यांचे अत्यंत आभारी आहों. त्यांची ही कृति वाचकांच्या प्रेमास व आदरास पात्र होईल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

प्रकाशक.

ओटो दिलबहार सेंट.

असंख्य पुष्पांचा सुगंध एकत्रित केलेलें,

# ओटो दिलबहार.

खिशांत बाळगून खात्री करा. तुह्मी ज्या ज्या ठिकाणीं जाल त्या त्या ठिकाणीं तुह्मांला—

## मनोहर पुष्पांच्या उद्यानांत

येणाऱ्या असंख्य फुलांच्या सुवासाची आठवण येईल

# ओटो दिलबहार सेंट

जवळ बाळगल्यानंतर कोणतेंहि सेंट घेण्याची आवश्यकता नाहीं.

ओटो दिलबहारचें सुगंधी कार्ड एक आण्याचें तिकिट पाठवून मागवून खात्री करा.

| | | | |
|---|---|---|---|
| किंमत | लहान | बाटली | रु. ०---८-० |
| ,, | मध्यम | ,, | ,, ०--१२-० |
| ,, | ३ औंसाची | ,, | ,, २---०-० |
| ,, | सँपलची | ,, | ,, ०---२-० |
| सुगंधी कार्ड प्रत्येकी | | | ,, ०---१-० |

सोल एजंटसः—

धी अँग्लो इंडियन ड्रग अँड
केमिकल कंपनी,
जुम्मामशीद—मुंबई.

चार थेंबांत असंख्य फुलांचा सुवास देणारें अपूर्व सेंट.



# स्वर्गीय सौंदर्य!

## प्रकरण १ लें.

### बकुल–वृक्षाखालीं.

अशी संध्याकाळची वेळ. पर्जन्यकाळ नुकताच संपून गेला असल्यानें जिकडे तिकडे हिरवें गार दिसत होतें. जणूं सृष्टिसुंदरी हरितवस्त्र परिधान करून स्वैरवृत्तीनें इतस्ततः क्रीडा करीत होती. तिच्या त्या नवयौवनलीला पाहून मोहित झाल्यामुळें द्विधावृत्ति होत्साता भगवान् सूर्यनारायण तिच्या अनुपम सौंदर्याकडे टकमक पहात अस्ताचलपर्वतावर कांहीं वेळ स्तब्ध राहिल्यासारखा दिसत होता. तिकडे प्रतीचीदिग्वधू आपल्या प्रियवल्लभाचें प्रेमपूर्वक स्वागत करण्याकरितां उत्सुक होऊन मार्गप्रतीक्षा करीत उभी होती; आणि इकडे निसर्गदेवतेच्या त्या रम्य

मनोहर मूर्तीवर लुब्ध झाल्यामुळें, इकडे राहूं का तिकडे जाऊं, अशा घोटाळ्यांत सहस्ररश्मीची स्वारी पडल्यासारखी दिसत असून, आतां बारा तास वियोग होणार ह्मणून आपल्या आरक्त नयनांनीं सृष्टिदेवतेचें तें मोहक स्वरूप न्याहाळीत होती. संधिप्रकाशाच्या त्या सुवर्णसदृश शोभायमान किरणांनीं हरितवस्त्रभूषित सृष्टिदेवतेच्या सौंदर्यांत उत्तम प्रकारची भर पडल्यामुळें एकंदर देखावा फारच मजेदार व बहारीचा दिसत होता.

आशा वेळीं किल्ले चंद्रगड येथील जहागीरदारांच्या वाड्याची शोभा तर केवळ अप्रतिम दिसत होती. वाड्याची इमारत भव्य व टोलेजंग असून तींत एकंदर मोठमोठे सात चौक होते. जागजागीं उभारलेले ते उंच उंच मनोरे, हवा खाण्याकरितां मुद्दाम तयार केळेले प्रशस्त व सुंदर सज्जे आणि नाना प्रकारचे लहानमोठे दिवाणखाने ह्या योगानें वाडा फारच शोभिवंत दिसत होता. तशांत त्या इमारतींतील ठिकठिकाणच्या दरवजांतील कांचेच्या तावदानांवर संधिप्रकाशाचे किरण पडून ते परावर्तन पावल्यामुळें निरनिराळे रंग उत्पन्न होऊन तो वाडा इंद्रधनुष्याप्रमाणें अत्यंत रमणीय व आल्हादकारक दिसत होता. किल्ल्याच्या तटबंदीस लागून एक प्रशांत व नागमोडी आकृतीनें वहात जाणारी नदी होती. त्या नदीच्या पाण्यामध्यें वाड्याचें प्रतिबिंब पडल्यामुळें तो सर्व देखावा पाहून एखाद्या कुशल चित्रकाराची वृत्ति सुद्धां थक्क होऊन गेली असती, अगर चतुर कवीला देखील अशा या हृदयंगम देखाव्याचें यथायोग्य वर्णन करितां आलें नसतें !

आणि खरोखरच एका चित्रकाराची स्थिति अशा प्रकारची झाली होती. नदीच्या अलीकडील तीरावर एक लहानसें झोंपडीवजा घर असून त्या घराच्या समोंवर नानाविध सुवासिक पुष्पांची छोटीशी बाग होती. संध्याकाळच्या वेळीं नदी किनाऱ्यावरून वहात येणाऱ्या मंद सुगंधयुक्त व शीतल वायुलहरींचें सौख्य अनुभवीत व त्या वेळच्या त्या नयनमनोहर देखाव्याकडे तन्मय दृष्टीनें पहात साबाजी चित्रकाराची स्वारी एका खिडकीशेजारीं आराम खुर्चीवर पडून हवेंत धुराचे लोट सोडीत रीहली होती. एके बाजस एक फळा लावलेला असून त्यावर अर्धेमुर्धे

काढलेलें चित्र दिसत होतें. जवळच निरनिराळ्या रंगांच्या बशा व पेले ठेवलेले होते. साबाजीच्या उजव्या हातांत रंगाचें कलम होतें. यावरून चित्र काढतां काढतांच त्या वेळच्या सृष्टिसौंदर्यानें मोहित होऊन तें अनुपम दृष्टिसौख्य अनुभवण्याकरितां स्वारी आराम खुर्चीवर पडून राहिली होती हें उघड दिसत होतें.

साबाजी तो देखावा पाहण्यांत इतका तल्लीन होऊन गेला होता, कीं घराचें दार उघडून एक अत्यंत सुरूप व सुकुमार बालिका आंत येऊन त्याच्याशेजारीं उभी राहिली तरी त्याला समजलें सुद्धां नाहीं. थोड्या वेळानें 'काका, मी नमस्कार करतें' असे शब्द कानीं पडतांच साबाजी एकदम शुद्धीवर आला, व वळून पाहून "आँ! तारु, तूं इकडे कोणी-कडे!" असें ह्मणून त्यानें त्या मुलीला घट्ट पोटाशीं धरिलें. फार वर्षांनीं परस्परांची भेट झाल्यामुळें दोघांच्याहि हृदयांत प्रेमाचें भरतें येऊन कोणाच्याच तोंडातून शब्द निघेना, व मागची सर्व आठवण होऊन दोघेंहि थोडा वेळपर्यंत शोकसागरांत निमग्न होऊन गेलीं.

तारेचा बाप जिवाजी, हा साबाजीचा सख्खा धाकटा भाऊ. त्या दोघां भावांचें परस्परांवर विलक्षण बंधुप्रेम होतें. परंतु उदरनिर्वाहार्थ धंद्यासंबंधानें ते एकमेकांपासून बरेच लांब राहत असल्याकारणानें आतां कित्येक वर्षांत त्या दोघांची भेट झाली नव्हती. तारा रूपानें जितकी सुंदर होती, त्यापेक्षांहि कांकणभार जास्तच तिची आई होती. त्या पतिपत्नींचें एकमेकांवर निःसीम प्रेम होतें व तीं दोघें नवराबायको आपल्या एकुलत्याएक अपत्याच्या—तारेच्या—सहवासांत आनंदानें काल-क्रमणा करीत होतीं. परंतु त्या निर्घृण काळाला हें सुखी जोडपें फार दिवस पाहवलें नाहीं. तारेच्या आईला कांहीं आजार झाला व थोड-क्याच दिवसांनीं आपल्या प्रियपतीस व प्रियतम कन्येस दुःखसागरांत लोटून ती इहलोक सोडून परलोकास गेली. जिवाजीला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. सर्वगुणसंपन्न अशी आपली प्राणपत्नी आपणास सोडून गेल्याचें पाहून त्याला अत्यंत दुःख झालें. तशांत तारा त्या वेळीं अगदीं लहान. अशा सुकुमार मुलीचें लालनपालन योग्य प्रकारें कसें होईल, व

ही पोर आतां हातातोंडाला कशी येईल, याची फार मोठी काळजी जिवाजीस वाटूं लागली. त्यानें मुलीच्या संरक्षणार्थ चांगले उपाय योजून तिचें योग्य प्रकारें प्रतिपालन केलें व तिच्याकडून अभ्यासही चांगल्या तऱ्हेनें चालविला. पुढें ती कांहींशी मोठी झाल्यावर तिला बडोदें येथें माहिला विद्यालयांत ठेविलें, आणि तिच्या खाण्यापिण्याची वगैरे सर्व व्यवस्था बरोबर रहावी ह्मणून जिवाजीनें बरीच मोठी रक्कम त्या विद्यालयाच्या मालकाच्या हवालीं केली.

पण जिवाजीची तब्येत चांगली नव्हती. जिच्यावर त्याचें अत्युत्कट प्रेम व माया, ती त्याची प्राणपत्नी त्याला टाकून गेल्यापासून तो एकसारखा झुरत चालला होता. कोणत्याही गोष्टीपासून त्याला आनंद वाटेनासा झाला. त्याची चित्तवृत्ति नेहमीं उदास व चेहरा म्लान दिसे. पुष्कळ औषधें घेतली, पुष्कळ ठिकाणीं जाऊन हवापालट केला, परंतु गुण नाहीं. शेवटीं जिवाजी आपल्या प्रकृतबिद्दल अगदीं निराश झाला व एकवार येऊन आपणास भेटून जाण्याबद्दल त्यानें तारेस व साबाजीस पत्रें पाठविलीं. तारेची मास्तरीण जरा कडक स्वभावाची असल्यानें तिनें तारेस फार रजा न देतां 'बापास भेटून लागलींच परत आलें पाहिजे, तेथें राहतां कामा नये,' अशी सक्त ताकीद करून पाठविलें. त्याप्रमाणें तारेची व जिवाजीची शेवटची भेट झाली. परंतु तिला तेथें जास्त दिवस राहतां येत नसल्यानें ती तावडतोब बडोद्यास परत गेली. साबाजीही पत्र पाहतांच निघाला. परंतु तो पोंचण्यापूर्वींच जिवाजीचें देहावसान झालें होतें. त्याची व तारेचीही गांठ पडली नाहीं, कारण ती परत बडोद्यास गेली होती.

सारांश, उभयतांची बऱ्याच वर्षांत भेट न झाल्यामुळें व मध्यंतरीं जे अनेक शोकजनक प्रसंग गुदरले त्यांची दोघांसहि आठवण होऊन दोघांचेंही हृदय प्रेमभरानें उचंबळूं लागले व थोडा वेळपर्यंत कोणाच्याच तोंडांतून शब्द निघेना.

शेवटीं साबाजी सद्गदित कंठानें ह्मणाला, "बाळ तारू, तूं बडोद्यास

शाळेमध्यें होतीस आणि अशी एकटी कोणीकडे आलीस ? आगाऊ पत्र सुद्धां नाहीं ? "

तारा पदरानें डोळे पुशीत ह्मणाली, " काका, मी त्या शाळेंतूनच अशी एकटी निघून आलें. मग काय करूं तर ? बाबांनीं माझ्या शिक्षणाकरतां व भोजन वगैरे खर्चाकरितां किती तरी मोठी रक्कम आमच्या शाळेच्या मालकाच्या स्वाधीन केली होती ! पण काय उपयोग ? धड अंगभर वस्त्र मिळावयाचें नाहीं, कीं पोटभर खायला सुद्धां घालीत नाहींत. बरें, तुह्मांला पत्र पाठवून हकीगत कळवावी म्हटलें, तर ती देखील चोरी. कोणींहि पत्र पाठवावयाचें झालें तरी तें मास्तरीणबाईंना दाखविलें पाहिजे. तें त्यांना पसंत पडलें तर त्यांनीं तें पत्र टपालांत टाकावयाचें. यामुळें माझा कांहीं इलाज चालेना. पण तेथें जे माझे हाल चालले होते, ते माझ्यानें सहन करवेनात. ह्मणून जवळ थोडे पैसे होते, ते घेऊन व देवडीवरील भैय्याच्या हातावर कांहीं टाकून मी मास्तरीणबाईंना न कळत इकडे निघून आलें. पण काका, याबद्दल तुह्मी माझ्यावर रागावणार नाहीं ना ? " असें ह्मणून तारा जास्तच रडूं लागली.

साबाजी—" नाहीं बरें बाळ. तूं आतां येथें आनंदानें रहा. माझ्याजवळ तरी दुसरें कोण आहे ? पण या अरण्यांत आणि एकांतवासांत तुला कसें चैन पडेल कोण जाणे ? "

नंतर साबाजीनें स्वयंपाकीणबाईला हांक मारून तारेला कांहीं खावयाला देवविलें. बडोदें सोडल्यापासून ती बहुतेक उपाशीच होती, असें म्हटलें तरी चालेल. भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें व प्रवासाच्या दगदगीनें तारेच्या सुकुमार मुखावर म्लानता आली होती. थोडेंसें पोटांत गेल्याबरोबर तिला बरीच हुषारी वाटली. याप्रमाणें थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर साबाजीनें काढलेल्या सर्व तसबिरी जिकडे तिकडे लावून टाकल्या होत्या त्या ती पाहूं लागली. साबाजींचें तें हस्तकौशल्य पाहून तारेच्या मनास फारच आनंद वाटूं लागला. तसबिरी पाहतां पाहतां एका तसबिरीनें तिचें मन फारच वेधून टाकलें. चित्र पुरुषाचें असून अत्यंत मोहक होतें. तें रुंद व विस्तीर्ण कपाळ, विशाल व तेजःपुंज डोळे, ठसठशीत

नाक, टवटवीत गाल व एकंदर आंगलट राजपुत्रास शोभेल अशी दिसत होती. त्या चित्राकडे कांहीं वेळ निश्चल दृष्टीनें पाहून तारेनें विचारिलें, " काका, ही कोणाची तसबीर ? "

साबाजीः—" ती ? ती सरदार शिवराव यांची. त्यांच्या वडिलांचें नांव रामदेवराव, चंद्रगडचे जहागीरदार. तो पाहिलास का त्यांचा वाडा ? ह्या खिडकींत येऊन पहा. येथून सुरेख दिसत आहे."

तारा उत्सुकतेनें खिडकीजवळ गेली आणि ह्मणाली, " ते उंच उंच सज्जे दिसतात तो का चंद्रगडचा वाडा ? अगबाई, वाडा तर मोठा छानदार दिसतो. काका, तुमची व जहागिरदारांची ओळख आहे ? "

साबाजीः—" ओळख कशाची; आहे आपली झालें. ते किती थोर, श्रीमन्त ! त्यांचें घराणें खानदानीचें असून त्यांच्या पूर्वजांनीं लढाईमध्यें तलवार गाजविली आहे. आणि मी काय ? यःकश्चित् चितारी. पण त्यांचा आपला माझ्यावर लोभ आहे. कधीं कधीं ते मला आपल्या वाड्यांत जेवायला सुद्धां बोलावतात. हा त्यांचाच थोरपणा आहे. किती झालें तरी थोर ते थोरच ! लोक ह्मणतात कीं, ते फार मानी व गर्विष्ठ आहेत ह्मणून. कां ? तर ते कोणाच्या घरीं फारसे जात नाहींत व कोणाशीं फारसे बोलत नाहींत. लोकांना काय ? ते बोलायचेच. तो पहा. आसपास जेवढा मुलुख नजरेच्या टप्प्यांत येत आहे तेवढा सर्व त्यांच्याच अमलाखालीं आहे. ही जहागीर कांहीं लहानसान नाहीं बरें, तारू ! रामदेवराव, त्यांच्या पत्नी माईसाहेब आाणि त्यांची कन्या–बिचारी कुमुदिनी–एवढीच कायती खाशी मण्डळी वाड्यांत असतात."

ताराः—" कुमुदिनीला 'बिचारी' असें कां म्हणतां ? "

साबाजीः—"कारण घरांत एवढी सम्पत्ति असून, सर्व गोष्टींची अनुकूलता असून, तिला कांहीं उपयोग नाहीं. आतांशा किती तरी दिवस बिचारी आजारानें झिजते आहे. ती पहा, हिरवा प्रकाश असलेली एक खिडकी दिसते ती ? तिच्या महालाचीच ती खिडकी. त्या खिडकीच्या शेजारीं एक पलंगडी टाकून तिजवर हें सर्व सृष्टिसौंदर्य पहात ती सदा सर्वकाळ पडलेली असते."

" अरेरे ! खरेंच बिचारीच्या जिवाला मग सुख कोठून असणार ? " असें तारा पुटपुटली. थोड्या वेळानें तिनें विचारलें, " पण काका, शिवराव हे जहागीरदारांचे चिरंजीव ना ? मग ते नाहींत का या वाड्यांत रहात ? "

साबाजीः—" नाहीं. शिवरावांना मुम्बईस राहणें आवडतें. पाहिजे तिकडे हिंडावें, वाटेल तसें वागावें, लागेल तितका पैसा खर्च करावा; अशी नेहमीं चैन चाललेली असते. वडिलांजवळ संपत्ति रगडून आहे ह्मणून ठीक. नाहीं तर ह्या राजश्रींच्या खर्चाला काय पुरणार ? केव्हांच कर्जबाजारी झाले असते."

ताराः—" तर मग शिवरावांचा स्वभाव कांहीं चांगला नाहीं ह्मणावयाचा ? "

साबाजीः—" होय. तसेंच म्हटलें पाहिजे. पण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे मात्र तो एखाद्या लहान मुलाच्या चेहऱ्याप्रमाणें सरळ, निष्कपटी व प्रेमळ असा दिसतो. प्रतारणा नाहीं, कपट नाहीं, किंवा कांहीं नाहीं. त्यांचें हांसत मुख पाहिलें, म्हणजे मनाला मोठी मौज वाटते व अंतःकरण गारेगार होऊन जातें; पण मी हा कोणीकडे एखाद्या उधळलेल्या तट्टाप्रमाणें भकत चाललों ? तारु, तुला कांहीं देवादिकांचीं गाणीं येत असतील, तर एकादें म्हण पाहूं. "

शिवरावांसंबंधानें विशेष माहिती सांगण्याचें साबाजीच्या मनांत नाहीं; हें तारेनें ओळखलें, व त्याच्या आज्ञेप्रमाणें ती गाणें ह्मणूं लागली. तिचा आवाज फारच मंजुळ व सुरेल होता. तशांत '**सुलोचना, इंद्रजित–जाया, चालली शिर मागाया**' हें करुण व शोकरसपरिपूर्ण असें पद म्हणत असतांना साबाजीस त्याच्या आयुष्यांतील मागच्या सर्व बऱ्यावाईट प्रसंगांची आठवण होऊन त्याचें अंतःकरण शोकानें विदीर्ण झालें व आपले मनोविकार त्या सुकुमार मुलीच्या दृष्टीस पडूं नयेत, ह्मणून त्यानें चट्कन् आपली मान फिरविली व तो तेथून उठून बाहेर निघून गेला.

साबाजी तेथून गेल्याचें पाहून तारेनें आपलें गाणें आटोपलें व थोडीशी हवा खावी ह्मणून ती घरांतून पुढील बागेंत आली. त्या वेळीं

स्वच्छ चांदणें पडलें असून बागेंत जिकडे तिकडे सुगंध सुटला होता. जवळच नदीचें पात्र वाहत असून चोहोंकडे शांतता असल्यानें एकंदर देखावा फारच प्रशांत व गंभीर दिसत होता. चंद्राचें प्रतिबिंब नदीच्या स्वच्छ पाण्यांत पडलेलें असून पाण्यामध्यें उत्पन्न होणाऱ्या लहरींमुळें चंद्रमा अत्यानंदपूर्वक नदीच्या पात्रांत नृत्य करीत आहे कीं काय असा भास होई. तारेला साहजिकच तिकडे जावेंसें वाटल्यामुळें ती बागेच्या फाटकांतून बाहेर पडून रस्त्यावर आली. पलीकडे जवळच एक बकुल वृक्ष होता, त्याच्या पुष्पांचा सुगंध तारेला आल्याबरोबर ती तिकडे गेली व वाऱ्यानें जमिनीवर पडलेलीं बकुळीचीं फुलें गोळा करूं लागली. इतक्यांत लांबून घोड्याच्या टापांचा आवाज तिला ऐकूं येऊं लागला. ह्मणून ती त्या बाजूकडे कान देऊन ऐकत उभी राहिली.

इतक्यांत एक गृहस्थ घोड्यावर बसून घोडा भरधांव फेंकीत येत आहे असें तिला दिसलें. रात्रीची वेळ, जवळपास दुसरें कोणी नाहीं, अशा स्थितींत घोडा भरधांव सोडीत तो घोडेस्वार आपल्याकडेच येत असल्याचें पाहून तारेला साहजिकच भय वाटलें; व आतां बागेच्या दरवाजाच्या आंत तरी जाऊन उभें रहावें असें वाटून ती तिकडे जाण्याकरितां निघाली. पण तितका पल्ला तिला आटपण्याजोगा नव्हता. तो घोडेस्वार अगदीं जवळ आला. तेव्हां विशेष भानगडींत न पडतां ती रस्ता सोडून चट्कन् बाजूला झाली व त्या बकुलवृक्षाच्या छायेखालीं जाऊन उभी राहिली. इतक्यांत घोड्यावरील गृहस्थहि तिच्या अगदीं जवळ येऊन ठेपला. चंद्राच्या स्वच्छ प्रकाशांत घोडा व घोडेस्वार दोघेहि भले धिप्पाड असे तिला दिसले. पण विशेषेंकरून घोड्यावर बसलेल्या गृहस्थाची बसण्याची ऐट पाहून तिचें मन अगदीं वेधून गेलें.

तिनें त्याच्या चेहऱ्याकडे नजर टाकिली. पण चंद्रमा त्याच्या पाठमोरा असल्यामुळें चेहरा तिला स्पष्ट दिसला नाहीं. तथापि त्याचा एकंदर बांधा तरुण, उंच व सशक्त मनुष्याचा आहे असें तिला दिसलें. अंगांत जांभळ्या मखमलीचा पोषाख असून त्यावर जरतारीचें सुबक काम केलेलें होतें. घोडेस्वाराची नजर सारखी पुढें असल्यानें तारा त्याला

दिसली नाहीं. परंतु घोड्याची नजर मात्र तिच्याकडे गेली. व वाऱ्यानें हालत असलेला तिचा पदर पाहून घोडा बुजला, आणि एकदम अंग काढून बाजूला उभा राहिला. त्याबरोबर त्या गृहस्थानें एक कमचीचा तडाखा घोड्याच्या पुठ्ठयावर दिला परंतु पुढें जाण्याच्या ऐवजीं मागें सरून घोडा दुगाण्या झाडूं लागला. ह्मणून पुनः एक कमची घोडेस्वारानें त्यास मारिली. तरी सुद्धां घोडा पुढें पाऊल टाकीना, मागें मागेंच सरकूं लागला. तेव्हां त्याची मान थोपटून व चुचकारून घोडेस्वार ह्मणाला, " चलो, बेटा, चलो. मत् डरो. "

आपल्या धन्याचे हे ओळखीचे व प्रेमाचे शब्द ऐकून घोड्यानें आपले कान मात्र उभारले. परंतु जागच्या जागींच तो उभा राहिला. त्याचें सर्वांग भीतीनें थरथर कांपूं लागलें. त्यामुळें घोडेस्वारास जास्तच राग येऊन त्यानें आपली कमची पुनः उगारली.

त्या मूक जनावरास विनाकारण चाबकाचें फटके बसत आहेत असें पाहून तारेचें कोमल हृदय कळवळलें व ' नका नका ' असे शब्द एकदम तिच्या तोंडांतून बाहेर पडले.

तिचे ते मृदु, कळवळ्याचे उद्गार कानीं पडतांच घोडेस्वारानें आपली कमची तशीच आखडून धरिली व लगाम ओढून धरून जिकडून आवाज ऐकूं आला तिकडे पाहून म्हटलें, " कोण आहे तें ? तेथें कोण उभें आहे ? " असें ह्मणून तो झाडाकडे पाहूं लागला. झाडाच्या सावलींत एक तरुणी उभी आहे असें पाहून तो घोड्यावरून खालीं उतरला व घोड्याचा लगाम धरून घोडा ओढीत तिच्याजवळ जाऊन ह्मणालाः—" तुला भीति वाटली वाटतें ? या वेळीं रस्त्यावर कोणी असणार नाहीं, असें समजून मी घोडा भरधांव टाकीत निघालों. माझ्याकडून ही मोठीच चूक झाली तर ! "

तारा सलज्ज स्मित करून ह्मणालीः—" छे छे ! चूक कसली त्यांत ? मी कांहीं भ्यालें नाहीं; पण मला पाहून आपला घोडा मात्र भ्याला. "

" भील तर काय झालें ? मूर्ख बेटा ! कांहीं तरी सोंग आणण्याची

त्याला सवयच आहे. बरें तें असो. तुला कोठें जावयाचें आहे ? तेथपर्यंत पोंचवून मग मी जातों. ”

त्याचें तें सभ्य व अगत्याचें वर्तन पाहून तारा गालांतल्या गालांत हंसून बोलली, “ मला कांहीं लांब जायचें नाहीं. तें घर दिसत आहे तें तिथें. ”

घोडेस्वार, तिकडे हात करून, “ ह्या, ह्या घरांत ? तें घर साबाजी चित्रकाराचें. त्याच घरांत तूं जाणार ? तूं तेथेंच का राहतेस ? ”

“ होय. ”

“ पण मला आजपर्यंत कधीं दिसली नाहींस ती ? ”

“ मी येथें नव्हतेंच मुळीं. आज संध्याकाळीं आलें. ”

“ हां. मग बरोबर. ह्यापूर्वीं मीं कांहीं तुला पाहिलें नाहीं, मला चांगलें आठवतें. ”

हे त्या घोडेस्वाराचे साधेच पण सरळ व निष्कपट अंतःकरणानें उच्चारलेलें शब्द ऐकून तारेला आनंद झाला व तिच्या मुखावर मंद स्मित चमकूं लागलें. या वेळीं तीं दोघेंजण बागेच्या फाटकाजवळ येऊन पोहोंचलीं होतीं. घोडेस्वार तिच्या शेजारीं चालत असून घोड्याचा लगाम त्यानें आपल्या हातावर टाकला होता व तो धिप्पाड घोडा एखाद्या गरीब गाईप्रमाणें त्याच्या मागून शांतपणानें चालत होता. फाटकाजवळ येतांच ती म्हणाली:—“ बरें आहे, आपण जा आतां. ”

तो ह्मणाला:—“ जातों, पण हें पहा. तूं आज संध्याकाळींच येथें आली आहेस; तेव्हां तुझें नांव मला ठाऊक असणें शक्य नाहीं. जाण्यापूर्वीं तें समजलें तर बरें होईल.”

“ माझें नांव तारा. मी साबाजींची पुतणी.”

“ तारा ! तारा का तुझें नांव ? ठीक आहे. आतां मी नाहीं विसरणार. माझें नांव शिवराव. तो वाडा आमचाच.”

“ मला ठाऊक आहे. ” तारा एकदम म्हणाली.

“ ठाऊक आहे ? तें कसें ? तूं तर आज संध्याकाळींच आलीस. मग हें तुला कसें माहीत असावें ? ” शिवरावांनीं साश्चर्य विचारलें.

तारेनें उत्तर केलें, "त्यांत आश्चर्य कसलें ? मीं आपली तसबीर घरांत पाहिली होती, त्यावरून ओळखलें."

त्याबरोबर घोडेस्वारास हंसू आलें, "असें असें; तरीच. बरें आहे. जातों तर आतां. पुनः गांठ पडेलच. मी उद्यांच परत जाणार होतों. पण—पण तो बेत आतां बदलला." असें हांसत हांसत बोलून तो चट्‌कन् घोड्यावर चढून बसला व वायुवेगानें निघून गेला. शिवरावांनीं आपला परत जाण्याचा बेत एकाएकीं कां बदलला हें तारेच्या लक्षांत आलें नाहीं.





# प्रकरण २ रें.

—— :o: ——

## उपदेश रुचला नाहीं.



तो उमदा घोडा त्या उमद्या घोडेस्वारासह दृष्टीआड होई-पर्यंत तारा त्याजकडे टक लावून पहात राहिली व नंतर तिनें एक सुस्कारा टाकिला. कांहीं विचारांत निमग्न होऊन ती तशीच बागेच्या दरवाजापाशीं स्तब्ध उभी होती. इतक्यांत साबाजचिे खालील शब्द तिच्या कानावर पडलेः—

" तारु, रात्रीची कुठें गेली होतीस ? केवढा वेळ मी तुला शोधतों आहें ? काकूबाई बाहेर देखील चहूंकडे पाहून आल्या. पण पत्ता नाहीं. मला वाटलें, तूं पुनः त्या महिलाविद्यालयांत निघून गेलीस कीं काय ?"

तारा जवळ जाऊन हांसत म्हणाली, " काका, ही ब्याद आतां लवकर सुटणारी नव्हे बरें काय ? मी नाहीं आतां कुठें जायची. मला ती महिलाहि नको, नि तें विद्यालयहि नको. मघांशीं सहज बागेमध्यें हिंडत होतें, इतक्यांत बकुळीच्या फुलांचा वास येऊं लागला ह्मणून त्या बाजूला गेले. हीं पाहिलींत का फुलें ? अहाहा ! किती घमघमाट सुटला आहे ! पण काका, नुसतीं फुलेंच मला मिळालीं असें नाहीं. आणखी सुद्धां एक चमत्कार मीं पाहिला. "

इतका वेळ साबाजी तोंडांतून विडीचे फुत्कार सोडीत इकडे तिकडे हिंडत होता. तो एकदम थबकून ह्मणाला, " चमत्कार ! "

" होय. शिवरावांची आणि माझी गांठ पडली. हा चमत्कारच ह्मणा-

यचा. मघाशीं त्यांची तसबीर पाहिली आणि लागलीच त्यांची प्रत्यक्ष मूर्तीहि पहायला मिळाली ! ”

साबाजीः—“ शिवरावांची गांठ पडली ? म्हणजे ते मुंबईहून केव्हां आले ? मला माहीत सुद्धां नाहीं. बरें, पण मीं काढलेली तसबीर अगदीं त्यांच्यासारखी साधली आहे ना ?

“होय काका, अगदीं छान साधली आहे. पण रात्रीची वेळ असल्यानें मला त्यांचा चेहरा तितका चांगला दिसला नाहीं. ते एका खंद्या घोड्यावर बसून गेले. ”

“ एखाद्या पिशाच्चाप्रमाणें ते चट्कन् नाहींसे झाले असतील. त्यांची नेहमींचीच तऱ्हा आहे ती. वीज चमकावी तसे ते तुझ्याजवळून गेले असावेत; होय ना ? मग त्यांचा चेहरा तुला कसा स्पष्ट दिसावा ? तसबीर हुबेहूब साधली आहे कीं कसें हें तुला नाहीं सांगतां येणार. ”

“ पण काका, ते तसे चट्कन् निघून गेले नाहींत. ते गेले असते, पण त्यांचा घोडा त्यांना जाऊंच देईना. तो एकदम थबकला नि पुढें पाऊलच घेईना. मी जवळच झाडाच्या सावलींत उभी होतें. मला पाहून तो फारच बिचकला असावा. ”

“ ते उभे राहिले ! मग मोठेंच आश्चर्य ह्मणावयाचें. त्यांचा स्वभाव फार तापट आहे. घोड्यानें बुजावें ही गोष्ट सुद्धां त्यांना खपावयाची नाहीं. ते उभे राहिले तर !”

“ होय, उभें राहणें त्यांना भागच पडलें.” असें तारा हळूंच ह्मणाली. त्यांच्या उभें राहण्यास आपणच कारण झालों, ह्या गोष्टीची आठवण होतांच तिच्या चेहऱ्यावर सलज्ज स्मिताची छटा दिसूं लागली.

“ तर मग ते अगदीं रागांत असतील ? ”

“ छे ! काका, कुठला राग घेऊन बसलां ? शेळी देखील त्यांच्यापेक्षां जास्त रागीट असेल. ” तारा हांसत बोलली.

“ अरे वाः ! स्वारी आज खूप आनंदांत होती ह्मणायची तर ! परंतु वाड्यांत कांहीं समारंभ असून त्याकरितां पुष्कळ मंडळी जमली आहेत; अशा वेळीं त्यांनीं घोड्यावर बसून बाहेर फिरावयास जावें म्हणजे फारच

चमत्कारिक ! पण त्यांच्यापुढें कोणाचें काय चालणार ? तें असो. पण माझी तसबीर ! ”

“ ती छान साधली आहे असें मीं मघाशींच नाहीं कां सांगितलें ? काका, शिवराव रूपानें फार देखणे आहेत. तशांत त्यांनीं जांभळ्या मखमलीचा पोषाख केला होता, तो त्यांना फार चांगला शोभत होता.”

“ मला वाटतें, स्वारी स्वतःच घोड्यावर सामान ठेवून कोणास न कळूं देतां बाहेर पडली असावी; त्यांच्या मनांत आलें कीं, तसें झालेंच पाहिजे. पण आतां पुनः ते तुला बघायला मिळायचे नाहींत. एक दोन दिवसांपेक्षां जास्त ते येथें कधींच राहत नाहींत. ”

शिवरायांचा येथें जास्त दिवस मुक्काम करण्याचा बेत एकाएकीं ठरला आहे, असें तारा बोलणार होती; इतक्यांत आंतून काकूबाई येऊन झडझडल्या, “ तारु, बरीच कींग आहेस ! केवढा वेळची मी तुला शोधतें आहें ? म्हटलें गेली तरी कुठें ही ? वाटेनें त्रास झाला असेल, निजायचें नाहीं का ? मीं तुझें अंथरुण देखील घालून ठेवलें आहे. जा, नीज जा आतां. किती तरी रात्र झाली ? बोलायला उद्यां पुष्कळ वेळ आहे. शर्थ झाली बाई आत्तांच्या मुलींपुढें ! ”

साबाजीनेंही तारेस निजावयाला जाण्यास सांगितलें, तेव्हां तारा आपल्या अंथरुणावर जाऊन निजली. श्रमून आल्यामुळें तिला लवकरच गाढ झोंप लागली. आज किती तरी दिवसांत तिला अशी स्वस्थ निद्रा लागली नव्हती.

तिकडे सरदार शिवराव घोड्यावरून फेरफटका करून आपल्या वाड्यांत गेले. वाड्याच्या पुढील चौकांतील दिवाणखाना उत्तम प्रकारें शृंगारलेला असून त्यांत खूप रोषणाई केली होती, व पुष्कळ मंडळी जमली असून गायनवादनाचा जलसा चालला होता; परंतु शिवराव तिकडे न जातां परभारें जिना चढून आपल्या खोलीकडे गेले. या खोलींत शिकारीसंबंधाचें सर्व जिन्नस—म्हणजे बंदुका, काडतुसें, भाले, बरच्या वगैरे व्यवस्थितपणें ठेवलेले असून भिंतिवर जागजागीं हरिणांचीं, वाघांचीं व दुसऱ्या अनेक हिंस्र पशूंचीं तोंडें आंत भुसा भरून जणूं सजीव दिसावींत

अशा रीतीनें तयार करून लटकावून ठेवलेलीं दिसत होती. दोहों बाजूंस दोन मोठीं बिल्लोरी कपाटें असून त्यांत रेशमी, जरतारी, लोकरीचे वगैरे कपडे घड्या घालून व्यवस्थितपणानें ठेवलेले होते. खोलीच्या मध्यभागीं भिंतीवर एक मेनका अप्सरेची तसबीर टांगलेली दिसत होती. तेथील एकंदर व्यवस्था पाहतां खोलीच्या मालकास शिकारीचा, व कलाकौशल्याचा पुष्कळ शोक असून टापटीप व नीटनेटकेपणा फार आवडत असला पाहिजे हें कोणाच्याहि तात्काळ लक्षांत येई.

खोलींत जाऊन शिवरावांनीं आपल्या डोकीवरील मंदील काढून खुंटीवर ठेवला व विचारमग्न होत्साते कोटाचीं बटणें काढीत काढीत ते इकडे तिकडे हिंडूं लागले. थोडक्याच वेळानें त्यांच्या मुखावर मंद हास्य चमकलें व ते आपल्याशींच पुटपुटले:—" तारा! तारा काय? तिचें नांव तारा. पण छे! हें नांव नाहीं बरोबर. आकाशांतील ताऱ्यांच्या ठिकाणीं फक्त शुभ्रप्रकाश व चमक एवढींच कायतीं असतात. पण ह्या तारेच्या ठिकाणीं मला केवढी रमणीयता भासली! डोळे किती मनोहर, हात किती गोंडस, गाल किती टवटवीत! इतका मोहक व सुंदर चेहरा आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आला नाहीं. तिची माझी अकस्मात दृष्टादृष्ट होतांच मी स्वप्नसृष्टींत आहें कीं काय असेंच मला वाटलें. तिची तसबीर काढून जर आतां लवकरच होणाऱ्या प्रदर्शनांत ठेविली तर प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी ती तसबीर पाहण्याकारितां लोटतील व तिच्या दर्शनानें अगदीं वेड्या बनून जातील. पण छे! अशी मोहक, हुबेहूब तसबीर कोणाला काढतां येईल? बिलकुल येणार नाहीं. मग संध्याप्रकाशाच्या वेळचें सूर्यबिंब हुबेहूब कां रंगावितां येऊं नये? हें जसें अशक्य, तसेंच तिची हुबेहूब तसबीर काढणेंहि अशक्य आहे. मनुष्य कितीहि कुशल कारागीर झाला, तरी विश्वकर्म्याचें चातुर्य त्याच्या अंगांत थोडेंच येणार आहे? मग सगळेच चित्रकार विश्वकर्मे कां होऊं नयेत?" इतकें बोलून शिवराव एकाएकीं थांबले. त्यांची दृष्टि समोर टांगलेल्या तसबिरींतल्या मेनकेकडे वेधली. ते नाक मुरडून म्हणाले, "छे! हा चेहरा किती तरी कमी प्रतीचा दिसतो! ह्याच्यापेक्षां दसपट, शतपट'

नव्हे किती तरी पट तारेचा चेहरा मोहक व गोड आहे ! आजपर्यंत मेनकेची तसबीर म्हणजे सर्वांत सुंदर, जणूं सौंदर्याची पुतळी, असें मी समजत होतों. पण आतां माझें मत बदललें. खरोखर सौंदर्य कसें असतें हें मला आज समजून आलें." नंतर थोडा विचार करून ते ह्मणाले, "तरी पण 'तारा' हें नांव सुद्धां कांहीं वाईट नाहीं. तारा म्हणजे चांदणी. खरेंच, शुक्राच्या चांदणीप्रमाणें ती मला सतेज व चमकदार दिसली."

इतक्यांत खोलीच्या दाराबाहेर एका नोकरानें मुजरा करून म्हटलें—"गणपतिमंदिरांत सरकार व माईसाहेब यांच्या स्वाऱ्या बसल्या असून, आणखी कांहीं खाशी मंडळी आहेत. आपणाला तिकडेच बोलावलें आहे." त्याबरोबर शिवराव आपलें मनोराज्य टाकून तिकडे निघून गेले.

माईसाहेब हातांत चांदीची सुंदरशी चहादाणी घेऊन मण्डळीस चहा देत होत्या. हें काम करण्यास नोकर चाकर कमी होते असें नाहीं. पण आज त्यांनीं केवळ हौसेखातर ही कामगिरी आपणाकडे घेतली होती. शिवरावांस आज बावीस वर्षें संपून तेविसावें वर्ष लागलें होतें व तन्निमित्त आज त्यांचा वाढदिवस होता आणि ह्या आनंदाप्रीत्यर्थ वाड्यांत चहापार्टीचा समारंभ असून पुष्कळ मण्डळी जमली होती. गायन-वादन यांचा जलसा चालला होता. पलीकडच्या दालनांत माईसाहेब येतील त्या मण्डळीस चहा देत होत्या. शिवरावांना तेविसावें वर्ष लागलें होतें, तरी माईसाहेब अद्यापि तारुण्याच्या अगदीं भरांत असल्याप्रमाणें दिसत होत्या. त्यांची आंगलट किंचित् ठेंगणी पण बांधेसूद व सडपातळ होती. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें, म्हणजे शिवराव रूपानें इतके देखणे असण्याचें कारण सहज कळून येई. शिवरावांचे वडील—रामदेवराव—हेहि तेथेंच असून, त्यांची एक भाची पेटी वाजवीत बसली होती; तिची ते मधून मधून थट्टा करीत होते. त्यांचा बांधा उंच असून चेहऱ्यावर मानीपणाची झांक होती. शिवरावांचा तऱ्हेवाईक स्वभाव रामदेवरावांना बिलकुल आवडत नसे. चिरंजीव आंत येत असलेले पाहतांच त्यांच्या कपाळाला किंचित् आठी चढली व भ्रुकुटी वक्र करून त्यांनीं शिवरावांकडे पाहिलें. माईसाहेबांनीं

मराठी ग्रंथालय स्थापना

हा सर्व प्रकार पाहिला. परंतु त्यांची मुद्रा शांत व आनंदी असल्यामुळें त्यांच्या मुद्रेवर आश्चर्याची अगर रागाची छटा मुळींच दिसली नाहीं. त्यांनीं शिवरावांस जवळ बोलावून चहा दिला. ते चहा पिण्यास सुरवात करणार इतक्यांत त्यांचे परम स्नेही बापूसाहेब त्यांच्याजवळ येऊन ह्मणाले, "कां शिवराव, इतका वेळ आपली स्वारी कुठें नाहींशी झाली होती?"

"बापूसाहेब, मी घोड्यावर बसून रपेटीला गेलों होतों. तुह्मी सर्व मंडळी जलशांत गुंग झालां होतां. मीं त्या गवयाचें गाणें शंभरदां ऐकलें आहे. 'कान्हा बन्सी बोलो ने घागरिया फोरीरे' हा चरण घोळून घोळून किती वेळां तरी तो ह्मणूं लागला! त्याचाच मला कंटाळा आला. शिवाय मी मुंबईस गेल्यापासून घोडा अगदीं बैठा होता. त्याची देखील खुमखुमी जरा नरम व्हावी ह्मणून थोडा फेरफटका करून आलों. चांदणेंहि चक्क पडलें होतें."

"वाः! फार चांगलें केलेंत! इकडे आम्हीं मात्र सगळा वाडा धुंडाळला." असें ह्मणून बापूसाहेब खदखदां हांसूं लागले. त्याबरोबर शिवरावांनाहि हसूं आवरेना. त्या दोघांची लहानपणापासून मैत्री असून दोघेही एकाच शाळेंत शिकले होते व सख्ख्या भावाप्रमाणें त्यांचें एकमेकांवर प्रेम होतें.

इतक्यांत रामदेवरावांची भाची तेथें खिडकीशेजारीं पेटी वाजवीत बसली होती ती ह्मणालीः—"शिवराव, तुह्मी माझी पेटी ऐकावयास आलां असतां तर तुह्मांला कंटाळा आला नसता."

"तें खरें. पण मग मी तुझ्याशीं बोलत बसलों असतों. आणि मग माझाच तुला कंटाळा आला असता." असें हांसत हांसत बोलत ते तिच्या शेजारीं बसून गप्पागोष्टी करूं लागले. परंतु त्यांचें सर्व लक्ष त्या बकुल वृक्षाच्या सावलींत उभ्या राहिलेल्या सुंदरीकडे लागून राहिलें होतें. ती सुन्दरी आतां साबाजीच्या घरांत काय करीत असेल? बसली असेल कीं निजली असेल? अशी बसली असेल, कीं तशी निजली असेल? वगैरे कल्पनातरंगांत ते गुंग होऊन गेले असल्यामुळें त्यांचें भाषण परस्पर असंबद्ध होऊं लागलें. त्यांच्या लक्षांतही ही गोष्ट आली. ह्मणून ते

चट्कन् उठले व इकडे तिकडे हिंडूं लागले. ह्याबरोबर दोन शब्द बोलावे, त्याच्याशीं कांहीं हळूंच पुटपुटावें, उगीचच किंचित् हंसावें, असा प्रकार त्यांचा चालला होता. सारांश, शिवरावांचें मन आज ताळ्यावर नव्हतें.

शिवरावांची ती चमत्कारिक वृत्ति पाहून माईसाहेब रामदेवरावांकडे वळून ह्मणाल्या:—" म्हटलें, शिवरावाचें चित्त आज ठिकाणावर दिसत नाहीं ! "

रामदेवराव:—" होय. तसें दिसतें खरें. काय झालें ? "

माईसाहेब:—" कुणास ठाऊक ? संध्याकाळीं स्वारी अगदीं खुषींत होती. मागाहून काय झालें तें कळत नाहीं."

रामदेवराव रागावून ह्मणाले:—" त्याला कांहीं व्हावें लागत नाहीं. त्याचा स्वभावच असा आहे. आतां एवढा मोठा झाला, तरी कोणत्या वेळीं कसें वागावें हें त्याला समजूं नये, म्हणजे केवढी आश्चर्याची गोष्ट! आज घरीं समारंभासाठीं मंडळी बोलावली आणि हा आपला घोड्यावरून रानोमाळ भटकतो आहे ! काळ-वेळ जरा तरी जाणली पाहिजे; तर तें मनुष्य ! "

माईसाहेब:—" त्याचा स्वभाव लहानपणापासून आहे तसा आहे. कांहीं केल्या बदलत ह्मणून नाहीं. करावें तरी काय माणसानें ? "

रामदेवराव:—" त्यानें नुकताच जो खुळेपणा केला तो कळला का ? ऐशीं हजाराला ठोकर बसली. केवढें जबर नुकसान बरें हें ? आणि 'न देवाय न धर्माय !' फुकटा फुकटीं इतके रुपये गेले ! "

माईसाहेब:—" आहे ठाऊक ! त्यानेंच मला सर्व हकीगत सांगितलीन्. एवढें एक त्याचें बरें आहे. काय असेल तें आपलें मोकळ्या मनें मजजवळ येऊन सांगतो. चोरून ठेवीत नाहीं. घोड्याच्या शर्यतीसंबंधीं मला विशेषशी माहिती नाहीं. पण तो ह्मणाला कीं, आपल्या नांवाला अगदीं बट्टा लागण्याचाच प्रसंग आला होता. कोणीशीं आपल्याबरोबर लबाडी केली ह्मणून शर्यतींतून घोडाच काढून घेणें भाग पडलें. दुसर

मार्गच राहिला नाहीं; असें आपलें त्याचें म्हणणें आहे. मग खरें खोटें कुणास ठाऊक ! ”

रामदेवरावः—“ हकीगत खरी आहे. पण शर्यतीचा तरी हा नाद वाईट नव्हे का ? ह्या शर्यतीच्या पायीं कित्येक मोठमोठे लोक देखील कर्जबाजारी झाले आहेत, मग आपल्यासारख्यांची वाट काय ? बस्स ! तें कांहीं नाहीं. त्याचें आतां लग्नच करून टाकलें पाहिजे. पायांत बेडी पडल्यावर मग येईल स्वारी शुद्धीवर ! ”

माईसाहेबः—“ होय. सगळें खरें. पण इतक्या मुली सांगून आल्या, त्यांतली एक तरी त्याच्या पसंतीस आली का ? आपल्या मनासारखी बायको मिळाली तरच आपण लग्न करून घेणार, एरव्ही नाहीं. असें तो ह्मणतो.”

रामदेवरावः—“ पण आतां लग्न ठेवून उपयोगी नाहीं. त्याला जर एकदां नीट सांगितलें तर तो ऐकणार नाहीं असें नाहीं. ”

माईसाहेबः—“ कुणाचें ? माझें ? एवढी गोष्ट खेरीजकरून बाकी सर्व ऐकेल. लग्नाची गोष्ट काढली, कीं त्यानें कपाळाला आंठ्या घातल्याच. कांहीं तरी निमित्त काढून निघून जातो झालें.”

रामदेवरावः—“ कुमुदिनीकडून तरी त्याला सांगवावें. तिचा शब्द तो मोडणार नाहीं.”

माईसाहेबः—“ मोडणार नाहीं हें खरें; पण कुमुद सांगेल तेव्हां ना! त्याच्यावर तिची ताण आहे. माझ्या दादाच्या स्वरूपासारखी सुरेख बायकोच त्याला मिळायची नाहीं, असें ती म्हणते. ”

रामदेवरावः—“ हा फाजिल लाडाचा परिणाम, बरें का ? तरी मी पहिल्यापासून सांगत होतों, कीं—”

माईसाहेब मध्येंच ह्मणाल्याः—“ मीं नाहीं कांहीं त्यांचे कधीं फाजील लाड केले. स्वभावाला औषध नाहीं ह्मणतात तेंच खरें. लहानपणापासून त्याचा स्वभाव आहे तसाच आहे.”

यावर रामदेवराव कांहीं बोलणार, इतक्यांत पाहुणे मंडळी जावयास निघाल्याची वर्दी आल्यामुळें ते त्यांना निरोप देण्याकरतां निघून गेले. माईसाहेबहि

तेथून निघून खालीं गेल्या. माजघरांत एक सुंदरसा झोंपाळा टांगलेला असून त्यावर एक वयस्क बाई हातांत तसबीर घेऊन तिजकडे पहात बसल्या होत्या. माईसाहेबांस पाहतांच त्या ह्मणाल्याः—" वहिनी, शिवराव आतांशा फारच चांगला दिसतो बाई ! त्याची दररोज मीठ-मोहऱ्या घेऊन दृष्ट काढीत जा."

हे शब्द ऐकतांच एक सुस्कारा टाकून चिंताक्रांत मुद्रेनें माईसाहेब त्यांच्या शेजारीं झोंपाळ्यावर जाऊन बसल्या. त्यांच्याकडे पाहून बाई ह्मणाल्याः—" कां बरें ? त्याचा हूडपणा अजून नाहीं कां गेला ? शर्थ झाली बाई त्याच्या पुढें ? तरी पण त्याचा स्वभाव मोठा गोड व लाघवी आहे बरें ? त्याला पाहिलें, कीं त्याच्यावर माया करावीशी वाटते. आतां अम्मळ हूड आहे हें खरें. तो हूडपणा जायला एकच उपाय आहे. त्याचें लग्न करून टाका म्हणजें झालें. बायको आली कीं, त्याचा सगळा हूडपणा आपोआप निघून जाईल. त्याची काळजीच नको."

माईसाहेबः—" वन्स, लग्न करा ह्मणणें सोपें आहे. आतांपर्यंत त्याला थोड्या का मुली सांगून आल्या ? पण एक देखील त्याच्या पसंतीला येत नाहीं."

बाईः—" कां बरें ? ती प्रधानांची चंद्रिका त्याला दाखविली नाहीं वाटतें ? पोर मोठी सुंदर आहे हो ! ती त्याला पसंत पडल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं तरी निमित्त काढून तिला चार दिवस येथें रहावयालाच बोलवा. ती अगदीं आनंदानें येईल. तिच्या आईबापांचा व तुमचा पुष्कळ घरोबा आहे. ते पाठवून दिल्याशिवाय रहाणार नाहींत."

माईसाहेबः—" तें कुणीं सांगावें ? त्यांचा स्वभाव मोठा मानी आहे ह्मणतात. रहायला बोलावण्याचें कारण ते चट्कन् ओखतील आणि मग पाठविणार नाहींत, व तीहि येणार नाहीं."

बाई मानेस किंचित् हिसडा देऊन ह्मणाल्याः—" पुरे झालें ! येणार नाहीं ह्मणे ! नाचत येईल, नाचत ! आजकाल तुमच्यासारखें स्थळ पाहूं गेलें तरी मिळायचें नाहीं. उदंड संपत्ति, सासूसासरा हौशी, नवरा मुलगा रूपानें तर जणूं मदनाचा पुतळा ! आणखी काय पाहिजे ?

लोटांगण घालीत येईल लोटांगण ! समजलें ? तुम्ही तिला एकदां बोलावणें पाठवून तरी पहा. ”

असें त्यांचें बोलणें चाललें असतां शिवराव हळूच येऊन त्यांच्या पाठीमागें उभे राहिले होते. बोलावणें पाठविण्याबद्दलचा मजकूर त्यांनीं ऐकला तेव्हां ते ह्मणाले, “ कां आत्याबाई, कसलें खलबत चाललें आहे. आह्मांला नाहीं का सांगावयाचें ? एका माणसाला बोलावणें पाठवून आणण्याचा बेत चालला आहे. मीं ओळखलें. ” असें ह्मणून हांसत हांसत व तोंडानें मंजुळ शीळ घालीत ते जिना चढून माडीवर गेले. त्यांच्याकडे सानंद मुद्रेनें पहात आत्याबाई ह्मणाल्याः—“ किती थट्टेखोर स्वभाव आहे याचा ! मला भारी आवडतो.”

इकडे शिवराव तिसऱ्या मजल्यावर कुमुदिनीच्या खोलीकडे गेले. ही खोली दिसण्यांत फारच रम्य व आल्हादकारक होती. खोलीच्या अंतर्भागास रंग लावला होता. तो भपकेदार, डोळ्यांत भरेल, अशा तऱ्हेचा नसून दृष्टीला शांत दिसणारा व नाजुक असा होता. खोलींतील गालीचे, सतरंज्या तसेंच भिंतीवरील चित्रें व वेलपत्ती यांचा सुद्धां रंग फार मजेशीर व सुकुमार असा होता. जेणेंकरून दृष्टीला कंटाळा येईल, अगर मनाला अस्वस्थता वाटेल असा एकहि पदार्थ त्या खोलीमध्यें नव्हता. मध्यभागीं चांदीची झगझगीत सांखली लोंबत असून तिला एक पोपटी रंगाची बिलोरी हांडी टांगलेली होती. त्यायोगें सर्व खोलीभर हिरवागार प्रकाश पडून डोळ्यांना फारच गारपणा वाटे. खिडकीशेजारीं एका सुंदरशा पलंगडीवर एक नाजुक व सुकुमार तरुणी निजलेली होती. शिवराव आंत येतांच ती किंचित् हास्यवदन करून व उठून बसून ह्मणालीः—“ दादा, तूंच का ? तरी मला वाटलेंच कीं, तूं आल्याशिवाय रहायचा नाहींस ह्मणून. ”

शिवरावः—“ ताई, आतां तब्येत कशी काय आहे ? खालीं फार उष्मा होऊं लागला ह्मणून इकडे आलों. येथें किती गार वाटत आहे ! वाराहि किती मजेदार येतो ? ”

कुमुदिनीः—“ खालीं काय चाललें आहे ? ”

शिवरावः—" दुसरें काय चालायचें ? इतका वेळ गाणें, बजावणें, व मृदंगाची धडपड चालली होती. आतां बुद्धिबळें, सोंगट्या, यांची सारखी कुटाकुटी सुरू आहे. "

कुमुदिनीः—" आणि दादा, तूं काय करीत होतास? कोणसें ह्मणालें कीं, तूं घोड्यावर बसून रपेटीला गेलास ह्मणून. "

शिवरावः—" होय ताई, घोडा फार दिवस बैठा होता, आणि चांदणेंहि चांगलें पडलेलें आहे. ह्मणून म्हटलें आणावें एकदां फेरपटका देऊन. "

कुमुदिनीः—" पण दादा, तूं आजच मुंबईहून आलास, तुझा आज वाढदिवस, घरांत केवढा समारंभ, मंडळी जमलेली आणि तूं आपला घोड्यावर बसून बाहेर गेलास ! बाबा किती रागावले ? आईला किती वाईट वाटलें ? ' मनःपूतं समाचरेत् ' हें जें तुझें पहिल्यापासून आहे तसें आहे. तें तूं कांहीं सोडीत नाहींस? तूं आतां लहान का ? "

शिवरावः—" पण ताई, संध्याकाळचा देखावा किती मजेशीर दिसत होता, पाहिला नाहींस ? मला वाटलें बाहेर जाऊन सृष्टिशोभा अवलोकन करावी, ह्मणून गेलों. "

कुमुदिनीः—खरेंच दादा, संध्याकाळच्या वेळचें तें सूर्यबिंब पाहून मला देखील भारी गंमत वाटली. किती वेळ तरी मी सारखी त्याकडे पहात होतें ! तूं बाहेर गेलास हें मला ठाऊक नव्हतें. नाहीं तर मी देखील पहायला आलें असतें. दादा, तूं त्या जरद्या घोड्यावर बसून निघालास ह्मणजे तुझ्याकडे सारखें पहात रहावें असें मला वाटतें. तूं घोड्यावरून कोणत्या बाजूला गेला होतास ? "

शिवरावः—" आपला बगीचा आहे ना ? त्या बाजूला गेलों होतों. " नंतर थोडा वेळ थांबून ते ह्मणाले, "ताई, मला आज एक मोठा चमत्कार दिसला. एक अतिशय सुंदर अशी कुमारी मीं पाहिली."

कुमुदिनीः—" कुमारी ? कुणासारखी होती ? "

शिवराव विचार करीत ह्मणालेः—" कुणासारखी होती वें नाहीं मला सांगतां येत. प्रथम घोड्याची नजर तिच्याकडे गेली. तिला पाहतांच

तो एकदम जागच्या जागीं खिळल्यासारखा झाला. पुढें पाऊल ह्मणून घेईना."

कुमुदिनीः—" पण ती कुणासारखी होती हें नाहीं कां सांगतां येत?"

शिवरावः—" नाहीं. मला नाहीं तिचें वर्णन करतां येत. मी करूं लागलों तर तूं हांसशील. बायकांचीं वर्णनें बायकांनींच करावींत. पुरुषांना तें साधत नाहीं."

" पुरें झालें रे तुझें! मी विचारतें तें सांग आधीं. तिचा गोरेपणा कशासारखा होता? पांढऱ्या वर्णावर किं पिंवळ्या? डोळे बारीक होते किं मोठें? हें देखील कां सांगायला येत नाहीं?" कुमुदिनी ह्मणाली.

" ताई, तिचा वर्ण अगदीं पिंवळ्या केतकीसारखा असून डोळे विशाळ आणि काळेभोर होते. तिच्याकडे पहात असतां तिच्या वर्णाकडे अगर नाकडोळ्यांकडे माझें लक्षच गेलें नाहीं. मला ही सर्व मागाहून आठवण झाली. ताई, मीं मागें तुला राजा रविवर्म्यानें काढलेली एका सुंदर स्त्रीची तसबीर मुंबईहून आणून दिली होती, आठवण आहे का?"

कुमुदिनीः—" हो. त्या तसबिरीसारखी का ती आहे?"

" होय. होय. ही जिवंत, चालती बोलती तसबीरच असें तूं समज. तिचा आवाज सुद्धां कसा असेल, याची कल्पना कर. किती मृदु, किती मंजुळ व किती गोड? अहाहा! तसेंच तिचें हांसत मुख पण गंभीर आणि मोहक. जणूं जादूनें भारलेलें!" मृदु स्वरांत शिवराव ह्मणाले.

कुमुदिनीः—" अरे वाः! दादा, तूं आज काय अगदीं शीघ्र कवीच बनला आहेस."

शिवरावः—" अग, मग त्यांत आश्चर्य कसलें? खरेंच ताई, असला सुंदर व सुकुमार चेहरा पाहून, इतका मंजुळ आवाज ऐकून, अगदीं दगडोबा असला तरी सुद्धां तो कवि बनून जाईल. मग माझी गोष्टच पुसूं नकोस."

कुमुदिनीः—" आहा! तूं किती बुद्धिमान् लागून गेला आहेस? जणूं बृहस्पतीच! पण दादा, ती मुलगी कुणाची? तिचें नांव काय?"

" तिचें नांव ? " इतकें बोलून शिवराव एकाएकीं थांबले व त्यांचा आवाज त्यांना न कळत फारच मंजुळ निघूं लागला. " तिचें नांव तारा. त्या पलीकडच्या झोंपडींत साबाजी चित्रकार आहे ना ? त्याची ती पुतणी ! "

कुमुदिनीचे डोळे साफ उघडले. ती ह्मणाली, " तर मग दादा, तिची एकदां गांठ घेतलीच पाहिजे. "

शिवराव कुमुदिनीच्या तोंडाकडे पाहूं लागले. त्यांच्या चेहऱ्यावर अनुरागाची छटा दिसूं लागली. त्यांची मुद्रा उत्सुक अशी तिला दिसली. त्याबरोबर तिचें तोंड मात्र फिक्कें दिसूं लागलें. ती गंभीर स्वरानें ह्मणाली:—" छे छे ! मी नाहीं तिची गांठ घेणार. दादा, अरे दादा, शेवटीं इतक्या थरावर गोष्ट आली अं ? "

" ह्मणजे ? तुझ्या ह्या ह्मणण्याचा अर्थ काय ? " असें शिवरावांनीं रागानें नव्हे, पण किंचित् जोरानें विचारिलें. जणूं उत्तराची त्यांना भीतिच वाटली.

कुमुदिनीः—" दादा, तूं पुनः तिच्या दृष्टीस पडूं नको. उद्यां सकाळीं आपला मुंबईला निघून जा कसा ! "

शिवरावः—" कां बरें ? ताई, माझी येथून हाकालपट्टी करणें तुला चांगलें दिसतें का ? "

कुमुदिनीः—" नाहीं दिसत. पण मला तसें वाटतें. तूं सध्यां जसा आनंदी प्राणी दिसतोस तसा तूं सदोदित रहावास अशी माझी इच्छा आहे. दादा, तूं जाच. त्यांत तुझेंहि कल्याण आहे व तिचेंहि आहे. "

शिवराव तिच्याकडे हांसत हांसत पहात उठलेः—" ताई, तूं किती ग वेडी ! मला तुझ्या ह्या बोलण्याचेंच हसें येतें. ह्मणे माझेंहि कल्याण होईल व तिचेंहि होईल. मी राहिलों तरी तिचें कोणतें अकल्याण होणार आहे ? ताई, संध्याकाळीं मला ती जशी दिसली, तशी तूं तिला पाहिली नाहींस. तिच्या हजरजबाबी व मार्मिक भाषणानें माझी जशी फजीती केली तसलें भाषण तूं ऐकलें नाहींस. नाहीं तर—"

कुमुदिनीः—" पण दादा, मला नाहीं हांसें येत. तूं आतां येथें

राहूं नकोस, खरोखरच सांगतें. राहण्यापासून काय फायदा आहे ! तुझा स्वभाव मला चांगला माहीत आहे. त्या कुमारिकेला पाहिल्याशिवाय तुला आतां चैन पडणार नाहीं. आणि पुनः तूं तिच्याकडे गेलास कीं, मग तूं तिच्या प्रेमपाशांत सांपडशील हें अगदीं खास. दादा, मागें काय काय प्रकार झाला तो सर्व माझ्या ध्यानांत आहे. तूं पुष्कळ मुली पाहिल्यास, पण त्या वेळीं तूं मला उघडाउघड सांगितलेंस कीं, त्यांपैकीं एकहि आपल्या मनाला येत नाहीं ह्मणून. पण या खेपेला रंग निराळा दिसतो. अतिशहाणा त्याचा बैल रिकामा ह्मणतात तसा तुझा प्रकार होणार आहे. चांगल्या चांगल्या श्रीमंतांच्या, आपल्या बरोबरच्या, मुली सांगून आलेल्या तूं नाकारल्यास आणि आतां ही भिकारीण तुझ्या गळ्यांत पडणार ! तें कांहीं नाहीं. दादा, तूं उद्यां सकाळीं येथून जाच. जातों ह्मणून मला वचन दे. " असें ह्मणून कुमुदिनीनें आपला हात पुढें केला.

कुमुदिनीचें हें भाषण ऐकतांच शिवरावांचा चेहरा उतरला. आजपर्यंत त्यांना आपल्या बहिणीचा कधींही राग आला नव्हता, तो आज आला. " ताई, मी नाहीं तसें वचन देत. " असें किंचित् बेमुर्वतीनें बोलून ते तेथून निघून गेले. कुमुदिनी गूढ विचारांत मग्न झाली. तिचा उपदेश शिवरावांना रुचला नाहीं.

# प्रकरण ३ रें.

—:o:—

## प्रेम-प्रवेश.

वरील हकीकतीनंतर दोन तीन दिवसांची गोष्ट. सकाळी साबाजी चहा पीत बसला होता व ताराहि तेथें होती. आदल्या रात्रीं श्रीविठ्ठल मांदिरांत दिगंबरबोवांनीं संगीत सत्यनारायण केला, त्या वेळीं प्रसाद घेण्याकरितां तारेलाहि आमंत्रण होतें; ह्मणून ती गेली होती. चहा पीत असतां मधून मधून तेथील हकीकत सांगून तारा हांसत होती.

साबाजीः—" तर मग एकूण काल बरीच गंमत झाली ह्मणायची. "

ताराः—" बोवांचा स्वभाव मोठा आनंदी दिसतो. बाई देखील फार अगत्याच्या आहेत, आणि कामाचा उरक तरी किती! एकटीनें इतका सारा स्वयंपाक करून शेवटीं वाढायला सुद्धां तयारी! बोवा ह्मणत होते, बरें का काका?" इतकेंच बोलून तारा थांबली.

साबाजीः—" काय ह्मणत होते?"

ताराः—" ते ह्मणत होते, कीं तुझे काका कधीं देवदर्शनाला येत नाहींत; सारा वेळ घरींच काय करीत असतात?"

साबाजीः—" त्यांचा हा मला टोमणा आहे, मी समजलों. अलीकडे पुष्कळ दिवसांत मी देवदर्शनाला गेलों नाहीं, ह्मणून त्यांचा हा राग असावा. माझ्यासुद्धां मनांत पुष्कळ वेळां जावें असें येतें. पण संध्याकाळीं

मी कोठें तरी फिरायला जातों व कांहीं चमत्कारिक देखावा दिसला, कीं तिकडेच पहात बसतों, मग सगळेंच रहातें."

तारा:—" पण काका, असें नका गडे करूं. चार दोन दिवसांनीं तरी देवाचें दर्शन घ्यावें. प्रपंच काय, नेहमींचाच आहे. परमार्थांत थोडा तरी वेळ घातला पाहिजे. आमच्या शाळेंत सुद्धां एक दोन दिवसांआड देवदर्शनाला सगळ्या मुलींनीं गेलेंच पाहिजे, असा नियम आहे."

साबाजी:—" आणखी कोण कोण मंडळी आली होती ?"

तारा:—" आली होती बरीच. पण मला कुठें आहे त्यांची माहिती ? एक मुंबईचे कोणी शामराव वकील ह्मणून आले आहेत. ते बाईंचे जवळचे नातलग असावेत असें वाटते. घरांत जिकडे तिकडे पुढें पुढें—त्या साऱ्या मंडळींत दुङ्ढाचार्य तेच दिसत होते, तेच करीत होते. जो तो आपली त्यांची वाखाणणी करी आणि ती त्यांना बरी वाटे. पण मला नाहीं हें आवडलें."

साबाजी आश्चर्यानें तिजकडे पाहून ह्मणाला:—" तारू, तूं जेव्हां पहावें तेव्हां दुसऱ्यावर फार टीका करीत असतेस."

तारा:—" पण आपल्यासंबंधानें टीका होते, ही गोष्ट शामरावांच्या लक्षांत आली असेल असें नाहीं वाटत. ते आपल्याच ऐटींत, आपल्याच घमेंडींत दिसत होते. अंगावर कपडे चांगले होते. डाव्या हातांत सलकड्यांचा चुडा भरला होता, डोकीवर केंस राखलेले असून वांकडा भांग काढला होता. झालें, इतकी तयारी असल्यावर मग त्यांनीं घमेंडींत कां असूं नये ?"

साबाजी:—" पण तुला इतका राग येण्याजोगें त्यांनीं काय केलें ?"

त्याबरोबर तारा किंचित् हांसली व तिच्या मुद्रेवर रागाची लाली दिसूं लागली. तिनें स्पष्टपणानें ह्मटलें, " काका, ते माझी लागले प्रशंसा करायला. पण मला नाहीं हें आवडलें. ओळख नाहीं, माहिती नाहीं, आणि म्हणे ही मुलगी अशी आहे, नि तशी आहे. कोर्टांत वकिली करीत असतील, पण मला कुठें हवी आहे त्यांची वकिली ? याचाच मला राग आला."

असें त्या दोघांचें बोलणें चाललें आहे तोंच शामराव वकील बागेच्या फाटकांतून आंत येतांना दिसले.

शामराव वयानें तरुण असून त्यांचा बांधा उंच व सडपातळ होता. नांवाप्रमाणें त्यांचा वर्ण शाम–ह्मणजे काळसर होता. त्यांच्या डाव्या हातांत एक पुष्पगुच्छ असून, उजव्या हातांतील काठीस हेलकावे मिळत होते. डोळे बारीक व ओंठ पातळ होते. तरी पण एकंदरींत त्यांचा चेहरा सुंदर होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अंगामध्यें फ्याशनेबल शिलाईचा कोट, पायांत पॉलिश केलेले बूट व त्यावर सफेत इस्तरीची पाटलोण, दोन्ही हातांच्या किरंगळींत हिरे माणकांच्या आंगठ्या, अशा थाटांत स्वारी आली होती. त्यांच्या एकंदर ऐटीवरून ते श्रीमंत असावेत, हुषार व व्यवहारनिपुण असावेत, असेंच अनुमान होई. त्यांना पहातांच साबाजी गडबडीनें उठला. घरीं कोणी परकें माणूस आलें कीं, त्याची अशीच धांदल उडे. पण तारा नेहमींप्रमाणें शांत व स्थिर होती. प्रौढ बायकांच्या आंगचा धीटपणा शिक्षणामुळें तारेच्या ठिकाणीं प्राप्त झाला होता.

शामराव आंत येतांच साबाजी पुढें येऊन ह्मणालाः—" यावें शामराव, या, असे बसा. तारु, चहा घेऊन ये. "

शामरावः—"अशा वेळीं येऊन तुमच्या गप्पांना हरकत केली याबद्दल मी फार दिलगीर आहें. परंतु येथून परत जाण्यापूर्वीं तुह्मांला भेटून जावें ह्मणून आलों. तुमची मात्र खोटी झाली. "

साबाजीः—" छे ! छे ! यांत खोटी कशाची आणि हरकत तरी कशाची ? आलांत फार चांगलें झालें. बसा. "

इतक्यांत तारा चहा घेऊन आली. तिजकडे पहात शामरावांनीं किंचित् हांसत मुखानें विचारिलेंः—" काल रात्रीं जेवणाला बराच उशीर झाला. तुला कंटाळा आला असेल, नाहीं ? "

ताराः—"कंटाळा कसला त्यांत ? उलट मला किती तरी मौज वाटली ! काकांना मी तीच हकीकत सांगत होतें. बडोद्याहून आल्यापासून कालच्याच दिवस माझा फार आनंदांत गेला. "

नंतर त्यांच्या हातांतील पुष्पगुच्छाकडे पाहून तारा ह्मणालीः--" हीं मदनबाणाचीं फुलें वाटतें. किती छानदार आहेत ? आणि वास तरी किती मधुर येतो आहे ? "

" तुला हवीं तर घे. तुझ्याकरितांच आणलीं आहेत." तिच्याकडे पुष्पगुच्छ करून ते ह्मणाले, " काल रात्रीं दिगंबरबोवांच्या बागेंत ह्या फुलांसंबंधानें तूं बोलल्याचें मीं ऐकलें. ह्मणून येतांना थोडीं घेऊन आलों."

ताराः—" माझ्यासाठीं मुद्दाम आणलींत अंः ! इतकी नको होती तसदी घ्यायला. ही तुमची मोठीच मेहरबानी ह्मणाची ! पण त्या बिचाऱ्या झाडांवर मात्र हा तुह्मी दरोडा घातलात ! "

शामराव किंचित् हांसून ह्मणालेः—पण कोणाकरितां हा दरोडा पडला हें समजलें तर वाईट वाटण्याऐवजीं त्यांना समाधानच वाटेल."

त्यावर तारा खोंचून बोललीः—" वाटेल खरेंच. पण दुःखाची गोष्ट ही कीं, त्यांना हें समजणार कसें ? आतां आपणच त्यांना समजावून सांगितल्यास न कळे ? फुलझाडांची सुद्धां भाषा असते; ठाऊक असेलच."

शामराव हांसले. आपल्या भाषणावर असें रोखठोक व खरमरीत उत्तर मिळेल असें त्यांना वाटलें नव्हतें. ह्मणून ते बुचकळ्यांत पडले व त्यांच्या तोंडातून शब्द निघेना.

ह्या अनिष्ट स्थितींतून साबाजीनें शामरावांची सुटका केली. तो ह्मणालाः—" शामराव, त्या पेल्यांत हीं फुलें द्या ठेऊन आणि तो चहा घ्या अगोदर. चहा निवून चालला आहे. "

वकीलसाहेब चहा पिऊं लागले. चहाचे घोट घेत असतां मधून मधून ते साबाजीबरोबर बोलत होते. परंतु त्यांची तीक्ष्ण नजर तारेच्या चलनवलनाकडे लागलेली असून तिच्या त्या मोहक चेहऱ्याकडे ते आतुरतेनें पहात होते. शामराव थोडाच वेळ बोलले; तरी पण तेवढ्यावरून ते बहुश्रुत असावेत, असा तारेचा ग्रह झाला. मुंबईच्या एक एक गप्पा ते इतक्या सफाईनें ठेवून देत होते, कीं, तारा अगदीं आश्चर्यचकित होऊन गेली. तेथील पारशी व भाटे जातींतील श्रीमंत व बड्या लोकांचीं नांवें,

कायदेकौन्सिलांत झालेल्या वादविवादांतील मुद्दे, तसेंच मोठमोठ्या कामदार लोकांच्या वर्गावर्ग्या वगैरे गोष्टींसंबंधानें ते घडाघड हकीकत सांगत होते. तें पाहून तारेला खरोखरच मोठें आश्चर्य वाटलें.

नंतर मुंबईमध्यें लवकरच होणाऱ्या कलाकौशल्याच्या प्रदर्शनासंबंधीं बोलण्यास त्यांनीं सुरवात केली. प्रदर्शनांत कोणकोणत्या चित्रकारांचीं कोणकोणतीं चित्रें येतील, कोणत्या चित्रास बक्षीस मिळेल, कोणत्या चित्रांची नुसती तारीफ होईल, हें सुद्धां त्यांनीं आगाऊच सांगून टाकिलें. नंतर ते तारेकडे पाहून ह्मणालेः—"तारु, तूं एकदां मुंबई पाहून ये. त्यासारखें दुसरें शहर नाहीं. मुंबई ती मुंबईच."

ताराः—"आतां मुंबईला माझें जाणें लवकर होईल असें वाटत नाहीं. येथून जवळ आहे तरी कांकांचें जाणें वरचेवर होत नाहीं. होय ना काका ?"

साबाजीः—"होय. मी नाहीं वरचेवर जात. मला माझें खोपट सोडून कुठें जावेंसें वाटत नाहीं."

शामरावः—"तर मग तुमचें अभिनंदनच केलें पाहिजे. मुंबई बघायला सुंदर असली, तरी तेथून लवकर बाहेर पडावें असें मला वाटतें."

ताराः—"पण तुह्मी मुंबईतच नेहमीं राहतां ?"

"होय." असें शामराव शांतपणें ह्मणाले. "मी तेथें वकील आहें. फोर्टमध्यें मी राहतों."

"आतां आपला येथें बरेंच दिवस मुक्काम होईल तर ?" असें साबाजीनें उत्सुकतेनें विचारिलें.

शामराव किंचित् थांबले. नंतर तारेकडे वांकड्या नजरेनें पहात ह्मणाले, "पाहूं आतां. कांहीं सांगवत नाहीं. मी आजच जाणार होतों. पण तो बेत तूर्त रहित झाला आहे."

साबाजीः—"वाः ! तर मग चांगलें झालें. येथील हवा फार उत्तम आहे. असलें हवाशीर ठिकाण सोडून मुंबईस जाणें म्हणजे फारच वाईट."

शामराव तारेच्या मुखाकडे नजर टाकून ह्मणाले, "आतां जाणें म्हणजे मला सुद्धां फारच वाईट वाटणार आहे."

नंतर साबाजीकडे वळून ते बोलले:--" बरें, तुमच्या तसबिरी आ-ह्मांला एकदां दाखवा पाहूं. नवीन चित्रें कोणतीं काढलीं आहेत ? "

साबाजीनें त्यांना चित्रें दाखविलीं. तसबिरीवरील पडदे बाजूला करून शामराव चित्रें पाहूं लागले. तारा तेथेंच खिडकीशीं कायसें गुणगुणत होती. इतक्यांत त्यांच्या तोंडांतून कांहीं चमत्कारिक शब्द बाहेर पड-ल्याचें तिला ऐकूं आलें. त्याबरोबर तिनें मागें वळून पाहिलें, तर शिवरा-वांची तसबीर शामराव पहात उभे आहेत, असें तिला दिसलें. त्यांनीं नाक मुरडलें असून कपाळास आंठ्या घातल्या होत्या. तथापि तारेनें मान फिरवितांच त्यांची मुद्रा पुनः गंभीर झाली. किंचित् हांसून व वर पाहून ते बोलले, "अरे वाः ! ही तसबीर शिवरावांची ! कुशल चित्रकाराच्या आव-डीची ही परीक्षाच ह्मणावयाची ! साबाजींनीं शिवरावांची तसबीर काढावी अं ! आणि त्या खालीं 'समस्त सेनाधुरंधर, विश्वासनिधि' राजमान्य राजश्री अशी एकापेक्षां एक जाडी विशेषणें सुद्धां दिलेलीं आहेत ! ! "

तारेनें विचारलें:--"तसबीर चांगली साधली नाहीं असें कां तुह्मांला वाटतें ? "

साबाजी हातांत रंगाचें कलम घेऊन फळ्यावरील चित्र रंगवीत होता. त्याचें ह्या दोघांच्या बोलण्याकडे लक्ष्य नव्हते.

शामराव:--" तसें नव्हे, तसबीर चांगली साधली आहे. शिवरावा-सारखी अगदीं हुबेहुब आहे. पण खालीं जीं लांबलचक विशेषणें दिलीं आहेत तीं मात्र बरोबर नाहींत. कारण शिवरावासारख्याला तीं मुळींच शोभत नाहींत. "

तारा:--" तुमची नि त्यांची ओळख आहे वाटतें ? "

शामराव हांसत नाक मुरडून ह्मणाले, " आणि नाहीं कोणाची ! साऱ्या मुंबईत शिवरावाचा लौकीक--" मध्येंच थोडे थांबून--" दुर्लौ-किक झाला आहे, असें मी ह्मणणार होतों."

ह्या बोलण्याचा तारेला फार राग आला. लागलीच ती ह्मणाली:--" शिवराव, आपलें समर्थन करायला येथें हजर नाहींत ही गोष्ट तुमच्या ध्यानांत नाहींसें दिसतें. "

शामरावः--" अरेरे ! असें आहे का ? तर मग मी उगीच बोललों. तुझा त्यांचा परिचय आहे हें मला ठाऊक नव्हतें. "

तारा शांतपणें बोलली:-" सरदार शिवरावांचा नि माझा विशेष परिचय नाहीं. "

" होय का ? तर मग कार चांगली गोष्ट ! मला त्याबद्दल आनंद वाटतो. " शामराव ह्मणाले.

तारेचे डोळे चमत्कारिक झाले व तिचा चेहरा लाल दिसूं लागला. आपणाकडून चूक झाली हें शामरावांनीं ओळखलें व ती चूक ते सुधारूं लागले. " माझा व तुझा विशेष परिचय नसतां मी इतकें बोललों याबद्दल तूं रागावूं नकोस. तूं या प्रदेशांत नुकतीच आली आहेस. तुला इकडच्या माणसांचा स्वभाव अजून कळलेला नाहीं. सरदार शिवरावांच्या खऱ्या स्वभावाची ओळख तुला अद्यापि चांगली झालेली नाहीं. हीच गोष्ट मनांत येऊन मी बोललों. "

तारेची मुद्रा क्रोधाविष्ट झाली. तेथें हजर नसणाऱ्या तरुणश्रेष्ठाचें समर्थन करण्यास तिच्या अंतःकरणांतील एका विकारानें तिला उद्युक्त केलें. ' दुर्लौकिक ' हा शब्द तिला फार लागला व तिच्या हृदयाला चटका बसला. ती गंभीर हास्य करून ह्मणाली:—" शिवरावांचा दुर्लौकिक असेंच तुम्ही बोलला ना ? हा शब्द फारच मर्मभेदक आहे."

शामराव अद्यापि तारेच्या मुखाकडेच पहात ह्मणाले, " असेल कदाचित्. पण मी तशा अर्थानें बोललों नाहीं. ' लौकिक ' म्हणतां म्हणतां ' दुर्लौकिक ' असा शब्द माझ्या तोंडांतून निघून गेला. 'लौकिक' शब्दावर कांहीं श्लेष करावा, कोटी लढवावी, असें मनांत येऊन मी असें बोललों. पण तरी सुद्धां माझ्याकडून चूक झाली असें नाहीं मला वाटत. सर्व जगभर ज्याचा डंका वाजतो, तो मनुष्य चांगल्याकरितां प्रसिद्ध असला पाहिजे अगर वाईटाकरितां तरी त्याची ख्याति असली पाहिजे. आपल्या अंगच्या शहाणपणामुळें किंवा वेडेपणामुळें तो प्रसिद्धीस आलेला असतो. आणि शहाणपणा, सद्गुण याबद्दल शिवरावांची

प्रसिद्धि नाहीं, एवढें मला ठाऊक आहे. यापेक्षां जास्त मला सांगतां येत नाहीं. "

यानंतर थोडा वेळ त्या खोलींत सर्वत्र सामसूम होतें. शामराव वकील हातांत तसबीर तशीच धरून चोरट्या नजरेनें तारेचें मुखकमल व त्यावर क्षणोक्षणीं होणारे फेरफार न्याहाळीत होते. ते बाह्यतः जरी शांत दिसत होते, तरी त्यांच्या अंतर्यामीं चलबिचल उडून गेली होती व त्यांच्या छातीचे ठोके जलद पडत होते. तारेचे सौंदर्यच अशा प्रकारचें होतें कीं, त्यामुळें पहाणाऱ्याचें हृदय जास्त स्फुरण पावावें तरी एक, किंवा थिजावें तरी एक. तारेचा चेहरा अगोदरच मोहक; तशांत संतापानें त्यावर लाली चढल्यामुळें तो जास्तच खुलून दिसत होता. तिच्याकडे पहात असतां शामरावांचें अंतःकरण फारच उडूं लागले व त्यांचे बारीक डोळे चमकूं लागले. आधल्या रात्रीं दिगंबरबोवांच्या घरीं जेवणाच्या प्रसंगीं, ती रूपानें सुंदर आहे, एवढेंच त्यांना वाटलें; पण आज सकाळच्या वेळीं तिचें तें रमणीय स्वरूप पूर्णपणें पवित्र अशा कौमार्य स्थितींत त्यांच्या दृष्टीस पडलें. तें अप्रतिम लावण्य मूर्त स्वरूपांत पुढें उभें असलेलें पाहून आपलें हृदय जणूं गळून पडत आहे, कीं काय असा भास त्यांना होऊं लागला. त्यांनीं ती तसबीर चट्कन् खालीं ठेविली, व तिजकडे पाहून म्हटलें:--

" बाहेर तें मैदान यावेळीं किती रमणीय दिसतें, तुला ठाऊक नाहीं. माझ्याबरोबर नदी किनाऱ्यापर्यंत येतेस काय ? "

तारा किंचित् हांसून बोलली:—" मी आलें असतें. पण मला सवड नाहीं. या वेळीं घरांत बरेंच काम असतें. "

तारेच्या ह्या झिडकारण्यानें आलेला राग लपवावा म्हणून चट्दिशीं तोंड फिरवून शामराव साबाजीकडे गेले व त्याचा निरोप घेऊन तारेच्या मुखाकडे पहात पहात घरांतून बाहेर पडले. तेव्हां तारेनें एक आरामाचा सुस्कारा टाकला.

साबाजी इतका वेळ चित्रें रंगविण्यांत गुंतला असल्यामुळें, शामरावांचा व तारेचा जो संवाद झाला त्याकडे त्याचें लक्षच नव्हतें. किंबहुना शामराव इतका वेळ आपल्या घरीं होते ही गोष्ट तो बहुतेक विस-

रलाच होता, असें म्हटलें तरी चालेल. शामराव निघून गेल्याचें पाहून तो ह्मणालाः—“ शामराव फार उत्तम मनुष्य, फार हुषार. लहानपणापासून मी त्याला पहातों आहें. तो पुढें चांगला निघेल, आपलें दैव काढील असें मीं भाकीतच केलें होतें आणि त्याप्रमाणें झालें. पण त्यांचा स्वभाव किंचित् हेकड आहे. ज्या वस्तूवर त्यांचें मन गेलें ती वस्तु आपणास मिळालीच पाहिजे असा हेका धरून बसणाऱ्यांपैकींच शामराव आहेत. समजलें तारु ? ”

“ तर मग फार चांगली गोष्ट ! परंतु आकाशांतील सूर्यमंडळ अगर चंद्रबिंब याजवर त्यांचें मन बसलें नाहीं म्हणजे बरें. नाहीं तर चंद्र–सूर्यांनीं यांच्या करितां खालीं यावें तरी एक, किंवा यांनीं तरी त्यांच्याकडे गेलें पाहिजे एक.” असें ह्मणत व किंचित् हांसत तारा स्वयपाक घरांत निघून गेली.

तिसरे प्रहरीं बागेच्या फाटकांतून कोणी येत आहे असें वाटून तारा व साबाजी तिकडे पाहूं लागलीं. तों सरदार शिवरावांची स्वारी खाकी मखमलीचा पोषाख करून व बरोबर चार पांच कुत्रीं घेऊन येत असल्याचें त्यांना दिसलें. दरवाज्याजवळ येतांच शिवरावांनीं हातांतील चाबूक वर करून ‘ तुम्ही बाहेरच रहा, आंत यावयाचें नाहीं. ’ असा कुत्र्यांना इषारा दिला. दोन शिकारी कुत्रे होते ते तत्काळ मागें सरून त्या वाळू घातलेल्या जमिनीवर मान टाकून स्वस्थ पडले. परंतु दोन तीन ‘ बुल् डॉग ’ होते ते मात्र आपणास बाहेर रहाण्यास सांगितलें ह्मणून जणूं चिडून जाऊन जास्तच भुंकूं लागले. तेव्हां शिवरावांनीं त्यांपैकीं एकास चाबकाचा तडाखा देऊन ‘ वाघ्या, चुप बैठ. ’ असें दरडावून म्हटलें; त्याबरोबर ते सर्व कुत्रे गुरगुरत खालीं बसले व शिवराव आंत गेले.

साबाजीः—“ काय शिवराव, आज इतकीं कुत्रींशीं बरोबर आणली आहेत ? त्यांना शिकारीला नेणार वाटतें. तारू, संभाळहो. तिकडे जाऊं नकोस. ”

शिवरावः—“ ते चावरे नाहींत. कांहीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. साबाजी, तुमचें रंगाचें काम चालूं दे. माझ्या येण्यानें तुमचा खो-

ळंबा नको. मी तुह्मांला एक गोष्ट विचारण्यासाठीं आलों आहें. नदीच्या पात्रामध्यें एक लहानसें बेट आहे तेथून त्या अरण्याचा देखावा फारच मजेदार दिसतो. त्याचें चित्र मला काढून द्या."

साबाजी मान हालवून ह्मणाला; "छे, छे, छे! माफ करा, मला--"

त्याला पुढें बोलूं न देतां शिवराव ह्मणाले:—" अलकिडे तुह्मी त्या बाजूला गेला होतां काय? अहाहा ती जागा फारच रमणीय आहे! नदी किनाऱ्यापासून तों तहत त्या पलीकडील टेंकडीपर्यंतचा प्रदेश अगदीं सपाट व हिरवागार असून मधून मधून तांबड्या पिंवळया फुलांनीं गजबजलेलीं लहान लहान झाडें असल्यानें एकाद्या सुंदर गालिच्याप्रमाणें तें ठिकाण शोभिवंत दिसत आहे. तशांत संध्याकाळच्या वेळीं मयूर आपला पिसारा उभारून लांडोरीसभोंवतीं नाचूं बागडूं लागले, ह्मणजे तर जी मजा दिसतें ती कांहीं विचारूं नका. ह्या सर्व देखाव्याचें चित्र जर कोणीं काढलें तर तें किती नामी, किती बहारीचें दिसेल! मला वाटतें, खरोखरच फार सुंदर दिसेल. तें हिरवेंगार मैदान, ती लहान लहान फुलझाडें, तें संध्याकाळच्या वेळचें नीलवर्ण आकाश व हा सर्व देखावा नदीच्या स्वच्छ, स्फटिकाप्रमाणें चमकणाऱ्या पाण्यांत प्रतिबिंबित झालेला!"

शिवरावांचें हें वर्णन तारेच्या कर्णाला केवळ मंजूळ गायनच वाटलें, व तिचें हृदय आनंदभरानें उचंबळूं लागलें. पण साबाजीच्या मनावर परिणाम झाला नाहीं. तो ह्मणाला:--" वा:! शिवराव, वर्णन तर खूप बहारीचें केलेंत. पण मी एखाद्या पर्वताप्रमाणें अभेद्य व अचल आहे. तुमच्या वाक्पांडित्याचा माझ्या मनावर कांहींच परिणाम होणार नाहीं हें खूप समजा. साबाजी हें चित्र रंगविण्यांत गुंतला आहे, त्याला दुसरीकडे लक्ष देण्यास सवड नाहीं."

शिवराव:—" तर मग तुह्मी आह्मांला तें चित्र नाहीं काढून देत?"

साबाजी:—" नाहीं. साफ नाहीं. दुसरें कोणीं विचारलें असतें तर मीं गुळमुळीत उत्तर दिलें असतें. पण तुमच्याजवळ स्पष्ट 'नाहीं' ह्मणून सांगितल्याशिवाय भागायचें नाहीं ह्मणून तसें सांगितलें." असें ह्मणून साबाजी हांसूं लागला.

" मग तुमची मर्जी. " असें ह्मणून शिवरावांनीं तोंड फिरविलें. " जातों तर. तें चित्र माझ्या ताईला मी देणार होतों. "

त्याबरोबर ह्मातान्यानें हातांतील कलम खालीं टाकून देऊन म्हटलें, " तुह्मीं अगोदरच मला तसें कां सांगितलें नाहीं ? "

शिवरावः—" याचें कारण तुह्मी माझ्याकरितां एखादी गोष्ट कराल कीं नाहीं हें मला पहावयाचें होतें. त्याचा चांगला अनुभव आला. "

साबाजीः—" ताईसाहेबांना देण्याकरितां चित्र पाहिजे आहे काय ? तर मग मी अलबत काढून देईन."

शिवरावः—" आतां मी नाहीं तुमचे आभार मानीत. कारण तुह्मी माझ्याकरितां कांहींच करीत नाहीं. ताईकरितां करणार, तर तीच तुमचे आभार मानील. बरें तर, तिकडे कधीं येणार ? तुह्मांला मी जागा दाखवून ठेवतों. "

साबाजीः—" तूर्त सवड होणार नाहीं. आणखी केव्हां तरी—"

शिवरावः—" छे छे ! तसें चालावयाचें नाहीं. आतांच आलें पाहिजे."

साबाजीः—" मला वाटलेंच तुह्मी असें बोलणार ह्मणून. तुमचें नेहमीं 'चटपट' असतें. "

शिवरावः—" तर मग ही वेळ एकदां निघून गेली ह्मणजे पुनः येईल काय ? का तुमच्याकरितां वाट पहात राहील ? मैदानाचा आतांचा हिरवा रंग आणखी आठ दिवसांनीं निघून जाईल. मग त्यांत काय शोभा?"

साबाजी आश्चर्यानें इकडे तिकडे पाहूं लागलाः—" बरें, तिकडे किती वेळ लागेल ? "

" फार नाहीं लागायचा. तास दोन तास ह्मणजे बस् ! "

" पण इतके हे जिन्नस तिकडे नेले पाहिजेत. "

" मी—मी—सगळे आणतों आणि तुह्मांला सुद्धां उचलून नेतों पाहिजे तर. " असें ह्मणून शिवराव सगळे जिन्नस पटापट गोळा करूं लागले. ते मध्येंच तारेकडे पाहून ह्मणाले, " हें पहा, माझें नेहमीं असेंच चुकतें. घरांत कोणी मालकीण आहे हें माझ्या ध्यानांतच राहत नाहीं. मी

साबाजीशीं फार खेळीमेळीनें वागतों. त्यांचे जिन्नस कोठें कोठें असतात हें मला इतकें चांगलें माहीत आहे कीं—"

तारा हांसून बोलली:—" माझ्यापेक्षांही तुह्मांला जास्त माहिती आहे! मग त्यांत चूक ती कसली ? "

शिवरावांनीं सर्व जिन्नस एके ठिकाणीं केलें. रंगाची पेटी, कंपासबॉक्स, लहान मोठीं कलमें, पेले, फळा वगैरे लागणारे सर्व सामान गोळा केले. साबाजीस बसण्याकरितां एक लहानसें स्टूलही त्यांनीं बरोबर घेतलें, व जाण्याच्या तयारीनें ते उभे राहिले. साबाजी हा सर्व प्रकार पहात होता. आतां नाहीं ह्मणून भागावयाचें नाहीं असें जाणून तो उठला व " तारु, मी जाऊन येतों, " असें ह्मणून पुढें निघाला.

शिवरावांचे उत्सुक डोळे तारेकडे लागले. ते ह्मणाले:—" इतकी मजल मारली आहे तेव्हां थोडें पुढें गेलेंच पाहिजे. तारु, तूं सुद्धां चल ना आमच्याबरोबर. "

त्याबरोबर तारा चपापली. तिच्या डोळ्यांतून एक उत्सुकतेची चमक क्षणार्धांत येऊन गेली. तिनें उत्तर केलें:—" मी आलें असतें, पण मला फराळाचें करायचें आहे. "

शिवराव:—" संध्याकाळचा देखावा किती रमणीय दिसतो, नदीचें पात्र किती सुंदर दिसतें हें तुझ्या ध्यानांत येईल तर मग फराळाचें करण्याच्या भानगडींत तूं मुळींच पडणार नाहींस. "

" मला देखील यावेंसें वाटतें, पण फराळाचें कोण करील ? "

" बरें, पण फराळाचें करून तरी येशील ? ती पहा जागा असें ह्मणून त्यांनीं तिला खिडकीशेजारीं नेलें. " येथून कांहीं लांब नाहीं, जवळ आहे. मग येशील ना ? "

" होय होय, येईन. " असें ती पुटपुटली.

नंतर शिवराव बाहेर पडले; चिटकी वाजवून कुत्र्यांना सज्ज होण्यास त्यांनीं खूण दिली व ते साबाजीच्या मागोमाग चालले.

त्यांच्या त्या मनोहर मूर्तीकडे कांहीं वेळ पहात तारा उभी राहिली व नंतर स्वयंपाक घरांत जाऊन काकुबाईच्या मदतीनें तिनें फराळाचें केलें

आणि आपली शाल अंगावर घेऊन ती बाहेर पडली. बागेंतून रस्त्यावर येते तोंच कुत्रीं नाचतबागडत येत असून त्यांच्या मागून शिवरावहि येत असलेले तिला दिसले.

जवळ येतांच शिवरावांनीं तिला म्हटलें:—" तारु, झाले कां तुझें फराळाचें करून ? बरेंच लवकर आटपलें. मला वाटलें तुला पुष्कळ वेळ लागेल. "

तिनें त्यांच्याकडे पाहून सस्मित विचारलें:—" तुह्मी माझी वाट पहात उभे होतां वाटतें ? "

शिवराव:—" छे छे ! मी तिकडून मुद्दाम परत आलों. तूं एकटीच यावीस हें मला बरें वाटलें नाहीं. मी आलों ह्मणून तुला राग आला कीं काय ? "

तिनें स्पष्टपणानें म्हटलें:—" इश्श ! त्यांत कसला राग यायचा ? आमच्यासारख्या गरीबांवर ही तुमची मेहरबानीच ह्मणायची. "

हिंवाळ्यांत संध्याकाळच्या वेळीं चोंहोंकडे धुकें पसरावें त्याप्रमाणें प्रेमरूपी जादूचें पटल तिच्या सभोंवार पसरूं लागलें होतें. तिच्याकरितां दैवानें जें संचित तयार करून ठेविलें होतें तिकडे ती अंधपणानें व शांतवृत्तीनें जावयास निघाली.



# प्रकरण ४ थें

—:o:—

## घोडेस्वाराची फजीति.

तारा आणि शिवराव त्या मैदानांतून बरोबरीनें चालूं लागलीं. कोकिलपक्षी मधुर कुजित करीत इकडून तिकडे भराऱ्या मारीत होते. स्फटिकाप्रमाणें चकाकणारें नदीचें पात्र संथपणानें समुद्राकडे वहात जात असून, हिरवीं गार झाडें वाऱ्याच्या झुळकीबरोबर मंद गतीनें हालत होतीं. पलीकडच्या बाजूस तीं गगनचुंबित चंद्रगड किल्ल्यांतील प्रासादशिखरें अहमहमिकेनें नभोमंडलाचा भेद करीत होतीं. अशा वेळीं तीं दोघेंजण चाललीं असतां शिवरावांनीं एकदमच प्रश्न केलाः—“ तारु, तूं येथें आल्यापासून साबाजीला कसें वाटत आहे ? ”

शिवरावासंबंधानें नानाविध विचार मनांत येऊन तारा त्यांतच अगदीं गढून गेली होती. ती त्या प्रश्नानें एकदम दचकली. तिनें किंचित् हांसून म्हटलें:—“ काका फार थोर मनाचे आहेत. ते माझ्यावर पुष्कळ माया करतात. ”

शिवरावः—“ अलबत् करतील. परकी ममुष्य असलें तरी देखील ते त्याजबरोबर प्रेमळपणानें वागतात. मग तूं तर त्यांची सख्खी पुतणी. मी लहानपणापासून पहातों आहें. त्यांची नेहमीं आनंदी मुद्रा असते. कधीं कोणावर रागावयाचे नाहींत कीं संतापावयाचे नाहींत बरें. पण तुला कसें काय वाटतें ? या आरण्यांत, एकांतवासांत राहण्याचा तुला कंटाळा

आला असेल. पूर्वी बडोद्यांत असतांना मजा मारायला सांपडत होती ती येथें कोठें आहे ? त्याबद्दल वाईट वाटत असेल, नाहीं ?"

त्यांच्या चेहऱ्याकडे कांहीं वेळ निश्चल दृष्टीनें पाहून ती ह्मणालीः—"मी कधीं मजा मारीत नव्हतेंच मुळीं. एखाद्या ओसाड अरण्याप्रमाणें भासणाऱ्या त्या कंटाळवाण्या व त्रासदायक शाळेस सोडून मी ज्या दिवशीं इथें आलें, त्या वेळीं मला किती फरक वाटला व किती आनंद झाला ह्मणून सांगूं ? जणूं स्वर्गसुखांत मी येऊन पडलें, असें मला वाटलें. ज्या जगांत मला कोणीहि मायेचें व ममतेचें नाहीं अशा चिंतेंत मी होतें, त्याच जगांत माझ्यावर प्रेम करणारें, माझी कळकळ बाळगणारें कोणी तरी आहे असें मला आतां वाटूं लागलें आहे."

इतकें बोलून ती थांबली. तिच्या त्या खिन्न झालेल्या वदनाकडे पाहून शिवरावांनीं साश्चर्य विचारिलें, "ह्मणजे ? तुला मायेचें कोणी नाहीं ? मला नाहीं माहीत."

"तुह्मांला कसें माहीत असणार ? माझे बाबा नुकतेच वारले, दोन वर्षें झालीं. आई तर लहानपणींच गेली." तारेचे डोळे पाण्यानें भरले. नंतर दोघेंही थोडा वेळ स्तब्ध राहिलीं. मग तारा ह्मणाली, "खरेंच, हा चंद्रगडाचा प्रदेश मला नंदनवनाप्रमाणें भासत आहे. बरें. तुह्मी नेहमीं मुंबईत असतां, पण तेथली हवा कांहीं चांगली नाहीं ह्मणतात."

शिवरावः—कां बरें ? हिवाळ्यांत तर मुंबईची हवा फारच उत्तम असते. घाणेरड्या गल्लींत बिऱ्हाड करून, भिकार खाणावळींत जेवण करून राहणारे जे लोक आहेत त्यांना मुंबईची खरी किंमत कोठून कळणार ? तूं मुंबईत कधीं राहिली आहेस काय ?"

ताराः—"नाहीं. मी फक्त इकडे येतांना एक दिवस मुंबईत उतरलें होतें. परंतु काल रात्रीं मुंबईची बरीच हकीकत मला ऐकायला मिळाली."

शिवरावांनीं आश्चर्यानें ह्मटलें:—"काल रात्रीं ? ती कशी ? कोणीं सांगितली ?"

ताराः—"दिगंबरबोवांच्या घरीं. तेथें सत्यनारायणाची पूजा होती, ह्मणून मला जेवायला बोलावलें होतें. तेथें मुंबईचेच कोणी शामराव

ह्मणून आले आहेत. त्यांनीं मुंबईचें महत्त्व माझ्या मनावर ठसविण्याचा बराच प्रयत्न केला."

शिवराव आठवण करीत ह्मणाले, "शामराव! शामराव का? ते माझ्या माहितीचे नाहींत."

ताराः—"नसतील. पण ते तुह्मांला ओळखतात."

शिवरावः—"ते मला ओळखतात? अरे वाः! मग माझ्या कसें बरें ध्यानांत येत नाहीं? थांब हो, शामराव नव्हे का? तो बोवांचा कोणी नातलग आहे काय?"

"होय. बाईचा भाचाच" तारा ह्मणाली. तिच्या कपाळास आंठ्या पडलेल्या शिवरावांना दिसल्या.

शिवरावः—"हां आतां मला आठवण झाली. उंच, रोडके, वर्ण काळसर आहे नव्हे काय? मला वाटतें ते वकील–होय वकीलच. आतां आली मूर्ति ध्यानांत. त्यांनीं का तुला मुंबईची हकीकत सांगितली?"

"होय," असें तारेनें उत्तर दिलें. इतक्यांत सकाळच्या वेळीं शामरावाचें व तिचें झालेलें संभाषण तिला आठवलें. त्याबरोबर ती संतापानें लाल झाली. शामरावाचें नांव काढणें सुद्धां तिला बरें वाटेना. ह्मणून विषय बदलण्याच्या हेतूनें ती समोर दूरवर पाहून ह्मणाली, "ते बसलेले काकाच नव्हेत काय?"

शिवरावः—"होय साबाजीच ते. आपल्या कामांत कसे अगदीं गर्क झाले आहेत! ते वळतील असें मला वाटलें नव्हतें, पण ताईचें नांव सांगण्याबरोबर स्वारीनें होय ह्मटलें."

ताराः—"काकांचें तुमच्या बहिणीवर प्रेम आहे. तो समोर मोठा वाडा दिसतो तो कोणाचा, असें मीं विचारल्यावरून त्यांनीं मला सर्व हकीकत सांगितली. त्यांच्या बोलण्यावरून तुमच्या बहिणीवर त्यांची फार माया आहे असें मला वाटलें. त्यांचें नांव कुमुदिनीताईसाहेब, नव्हे काय? काका ह्मणत होते."

शिवरावः—"होय. तिचें नांव कुमुद. स्वभावानें भारी गोड आहे. जो जो ह्मणून तिच्या ओळखीचा आहे त्या प्रत्येकाची तिजवर माया

आहे. तिच्या करितांच मीं हें चित्र काढण्यास सांगितलें आहे. ह्या चित्रा-पासून तिला इतका आनंद होईल, कीं तसा दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं. बायकांना फार आवड कशाची असते ? "

" हिरेमाणकांची व दागदागिन्यांची होय ना ! " तारा हंसून बोलली.

" तुला आहे का त्यांची आवड ! नसेल असें वाटतें."

तारा खोंचून बोलली:—" कां बरें ? माझ्या जातीचे गुणदोष माझ्या-मध्यें कां असू नयेत ? मला आहे हिरेमाणकांची आवड. जें जें ह्मणून सुंदर, दुर्मिळ व मूल्यवान् आहे, त्या सर्वांची मला आवड आहे. बडोद्यांत असतांना मी एकदां एके ठिकाणीं लग्न समारंभ पहाण्याकरितां गेलें होतें, मला आठवतें अगबाई, बाई ! काय त्या वरातीचा थाट ! बायका तर किती नटल्या होत्या, केवढाले उंची उंची शालु नि पैठण्या नेसल्या होत्या, कांहीं विचारू नका. मला वाटे, त्यांच्या सारखे जर दागदागीने, कपडे आपल्याला घालायला मिळतील तर किती उत्तम होईल ? या विचारानें मला जी मौज वाटावयाची ती मात्र नाहींशी झाली आणि मी आपली ओक्साबोक्शीं रडत घरीं आलें. आपण किती गरीब, किती भिकारी असें मला वाटूं लागलें. "

शिवराव हांसून ह्मणाले:—" आतां त्यापेक्षां जास्त शहाणी झालीस काय ? "

तारा:—" छे. कांकणभर कमीच ह्मटलें तरी चालेल. आपण घरांत कोंडून बसावें आणि दुसऱ्यांनीं मजा माराव्यात हें मला आतां तर मुळींच आवडणार नाहीं. हेवेखोर व दुष्टस्वभावाची ही स्पष्ट कबुलीच नव्हे काय ? " असें ह्मणून तारा किंचित् हंसली.

" होय. " असें शिवराव ह्मणाले. त्यांच्या तोंडावर एक मधुर हास्य चकाकलें. " अशा स्वभावामुळें तुझ्यावर नसतीं संकटें मात्र येतील असें मला वाटतें. " इतकें बोलणें होतें, तों साबाजीनें त्यांना पाहिलें. तो ह्मणाला:—" शिवराव, तुमचीं कुत्रीं पुढें आणूं नका. मागें घ्या." नंतर तारेकडे पाहून त्यानें विचारिलें. " फराळाचें करायचें आहे ह्मणून घोकत होतीस. झालें का एकदाचें ? "

ताराः—" काका मी करूनच इकडे आलें. "

शिवरावः—" साबाजी, तुमच्या चित्राचें कसें काय चाललें आहे ? "

साबाजीः—" आतांपर्यंत ठीक चाललें होतें. पण आतां तुमची स्वारी आली घोटाळा करावयाला आणि त्रास द्यायला. "

शिवरावः—" तारू, आह्मीं येथून निघून जावें, येथें राहूं नये अशी याची ही स्पष्ट सूचनाच बरें काय? चल, आपण येथून निघून दुसरीकडे जाऊं. "

तारा त्या हरित व मृदु दूर्वांकुरांवर बसत बसत ह्मणालीः— "आह्मी येथेंच बसावें, असें सांगण्याची काकांची ही एक वेगळी तऱ्हा आहे. तुह्मांला माहीत नसेल पण मला आहे ठाऊक. "

शिवरावांनीं आपले कुत्रे दूर घालविले व तेहि तिच्यापासून थोड्या अंतरावर बसले. समोरच्या देखाव्याकडे हातांतील चाबूक करून ते ह्मणालेः—" तारू, पहा बरें! मीं अतिशयोक्ति केली काय ? हा देखावा किती सुंदर आहे ? "

साबाजीच्या कानावर ते शब्द गेले. त्याबरोबर तो ह्मणालाः— " देखावा सुंदर आहे, तर पाहूनच समाधान मानून घ्या ह्मणजे झालें. मग माझ्यामागें चित्र काढण्याचा तगादा कशाला करीत आहां ? "

हे शब्द ऐकतांच शिवराव तारेकडे पाहून ह्मणालेः--" तारू, ही शेवटची सूचना बरें का ? आतां राहिलों तर तें स्टूल आमच्यावर येऊन आदळेल. चल, आपण नदीपलीकडे जाऊन फुलें काढूं. माझी होडी जवळच आहे. "

असें ह्मणून शिवराव उठले. ताराही त्यांच्याबरोबर निघाली. शिवरावांनीं तारेला होडींत बसविलें व आपण तिच्यासमोर बसून वल्हीं घेऊन मारूं लागले.

या वेळीं संध्याकाळचा समय असल्यानें सूर्याचा सुवर्णसदृश प्रकाश तारेच्या कपोल भागावर व भालपटलावर पडल्या कारणानें तिचा चेहरा चकाकत होता. पाण्यांतून होडी मंदगतीनें चालली असतां ज्या लहरी उत्पन्न होत त्यावर सूर्यतेज प्रतिबिंबित झाल्यामुळें जणूं आपण सुवर्ण

पटलाचा मार्गच आक्रमित आहोंत, असा त्यांना भास होई. तारेचे ते काळे कुळकुळीत व किंचित् कुरळे केश वाऱ्यानें हालत, त्यामुळें तर फारच शोभा दिसत होती.

शिवरावांची दृष्टि तिच्या चेहऱ्याकडे लागली होती. त्यांच्या मनामध्यें तिच्याविषयीं सप्रेम पूज्य भाव उत्पन्न झाला, यांत मुळींच आश्चर्य नाहीं. कारण, इहलोकीं ज्याकरितां जगणें योग्य आहे अशा फार थोड्या वस्तूं-पैकीं सौंदर्य ही एक चीज आहे असें त्यांचें मत होतें.

परंतु तारेचें लक्ष्य त्यांच्या आतुर नेत्रांकडे नव्हतें. ती हातांत सुका-णूंची दोरी धरून पाण्याच्या लाटांकडे एकाग्र दृष्टीनें पहात बसली होती. तेही शांतपणानें होडी वल्लवीत होते. त्यांना कोणी इंद्रपद जरी देऊं केलें असतें, तरी त्या वेळच्या त्या मोहक स्थितीचा भंग त्यांनीं केला नसता. तारेची बकुलवृक्षाखालीं गांठ पडल्यानंतर शिवरावांनीं त्यांची बहीण कुमुदिनी इंचेजवळ तारेचें जें चित्र रेखाटलें होतें, तें त्यांच्या ध्यानांत येऊन, त्यांचें मनन सुरू झालें. " छे छे ! त्यापेक्षां किती तरी जास्त सुंदर ! खात्रीनें जास्त. ती विचारांत किती गढून गेली आहे ! माझा–किंबहुना सर्व जगाचा–तिला विसर पडला आहे. देवा, हिच्या मनामध्यें प्रेमभाव उत्पन्न करून तिला जागृत केलें तर ! पण छे ! हा निर्दयपणा होईल. परंतु त्या नेत्रांमध्यें चमकणारा तो कोमल प्रकाश पाहणें, अत्युत्कट प्रेमाच्या निश्वासामुळें किंचित् अलग झालेलीं तीं ओष्ठ बिंबें अवलोकन करणें याची किंमत केवढी आहे ? पुरुषाला कितीही दुःख झालें असलें, तरी त्याच्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न होऊन ते डोळे त्याजकडे पाहून जर चमकले, व ते ओष्ठ जर उन्नत झाले, तर त्याच्या सर्व दुःखाची भरपाई होऊन जाईल. मग तो लागलीच गतप्राण झाला तरी हरकत नाहीं. "

तीं दोघेंही भिन्न भिन्न विचारांत इतकीं निमग्न होऊन गेलीं होतीं कीं, होडी किनाऱ्यास लागून त्यांना धक्का बसला तेव्हां तीं दोघेंही दचकलीं.

ताराः--" अगबाई ! किती लवकर आपण आलों ! मला भारीच मजा वाटली. मी स्वप्नसुखांत होतें असें मला वाटतें. "

शिवरावः---" मी तरी होतोंच. "

असें बोलत तीं दोघेंही होडींतून किनाऱ्यावर उतरलीं. शिवरावांनीं होडी एका झुडपास बांधून टाकली व तीं दोघें नदीकांठचीं फुलें तोडूं लागलीं. फुलें तोडण्याच्या नादांत तीं इतकें एकमेकांजवळ येत कीं, शिवरावांच्या श्वासोच्छ्वासाच्या वायूनें आपल्या डोकीचे केश हालत आहेत असा तारेला भास होई. एकमेकांच्या हाताला सुद्धां हात लागे. बरींचशीं फुलें तोडून झाल्यावर ती त्या मृदुशाद्वल शय्येवर बसली व आपल्या शालींत घातलेल्या त्या पुष्पराशीकडे पाहून ह्मणाली, " ही केवढी निर्दयपणाची लूट आह्मीं केली बरें ? पुरे झाली, आतां नका गडे तोडूं. उगीच नासून जायचीं. "

तथापि शिवरावांचें फुलें तोडण्याचें काम सुरूच होतें. आणखी कांहीं फुलें तोडल्यानंतर त्यांनीं त्या फुलांकडे एकवार पाहिलें व त्यांची वृत्ति किंचित् विचारमग्न झाली. त्यांच्याकडे पाहून तारा ह्मणालीः--" तोडलेल्या फुलांचें काय करावें, हा विचार तुह्मांला पडला आहे असें दिसतें. मग आणखी कशाला हवींत ? मी माझ्या फुलांचे गजरे करतें. तुह्मी आपल्या फुलांचा एक मोठा तुरा बांधा."

असें ह्मणून तारा गजरे करूं लागली. थोडक्याच वेळांत तिनें त्या सर्व फुलांचे गजरे करून टाकले. परंतु शिवरावांना कधींच संवय नसल्यामुळें तुरा बांधण्याचें काम त्यांना साधेना. शेवटीं एकदांचीं सर्व फुलें एके ठिकाणीं करून केळीच्या सोपटानें ते बांधूं लागले. इतक्यांत सोपट तुटून त्यांच्या हातांतील सर्व फुलें खालीं विसकटून पडलीं. तीं तीं दोघेंही गोळा करूं लागलीं. गडबडीनें गोळा करीत असतां त्यांचा एकमेकांस हस्तस्पर्श होई; त्याबरोबर दोघांच्याहि अंगावर रोमांच उभे रहात. इतक्यांत तारा चट्कन् उठून उभी राहून ह्मणाली, " आतां घरीं गेलें पाहिजे. काका तिकडे काळजी करीत असतील. " असें ह्मणून

तिनें त्या नदीच्या पात्राकडे भीतिपूर्ण दृष्टीनें पाहिलें. नंतर सर्व फुलें घेऊन तीं दोघेंही नदीजवळ आलीं.

तारा होडींत पाऊल टाकणार, इतक्यांत घंटेचा आवाज ऐकूं येऊं लागला. ह्मणून तिनें मागें वळून पाहिलें, तर दोन पांढरे सफेत घोडे जुंपले आहेत अशी एक चारचाकी रबरी धांवांची गाडी तिकडून येत आहे असें तिला दिसलें. गाडीच्या पुढच्या भागावर दोन नोकर बसले असून मागचे बाजूस दोन नोकर उभे होते. गाडी हाकावयास बसलेल्या नोकरांच्या अंगांत कलाबतूनें सुशोभित केलेलें तांबडें डगलें होतें. यावरून गाडी चंद्रगडच्या जहागीरदारांची असावी असें तिला वाटलें. इतक्यांत गाडीही जवळ आली. आंत एक गौरवर्ण व अत्यंत सुस्वरूप तरुणी बसली असून तिच्या हातांत एक पुस्तक होतें; पण ती वाचीत नसून खिडकीच्या चौकटीवर पुस्तक ठेवून बाहेर पहात होती. पुस्तक सैल धरलें असल्यामुळें गाडीला किंचित् धक्का बसल्याबरोबर तें तिच्या हातांतून निसटून खालीं रस्त्यावर पडलें. त्याबरोबर " अरे, पुस्तक, पुस्तक ! " असें ती ओरडली. तें ऐकतांच कोचमनानें गाडी थांबविली. पुस्तक पडलेलें तारेनें पाहिलें होतें. तिनें तें उचलून त्या तरुणीला दिलें.

तारेस अकस्मात् तेथें पाहतांच कुमुदिनीला फारच आश्चर्य वाटलें. तिची सुकुमार, निष्कपट, व लडिवाळपणाची मुद्रा पाहून कुमुदिनीच्या मनांत तिजविषयीं पूज्यभाव उत्पन्न झाला. ती तारेकडे सस्मित वदनानें पाहून ह्मणाली:--" शाबास ! चांगलें केलेंस ! माझ्या हातांतून पुस्तक कसें खालीं पडलें कोण जाणे. पण तूं अशी एकाएकीं कुठून आलीस ? काय ग ? आकाशांतून उतरलीस कीं काय ? " कुमुदिनीच्या बोलण्यांत भाषासौंदर्य व मार्दव होतें.

तारेनें किंचित् हांसून उत्तर केलें:--" अगदीं उलट. मी खालीं त्या होडीजवळ होतें. "

कुमुदिनी:--" होय का ? पण मीं नाहीं तुला पाहिलें. तुझ्या हातांतील गजरे मोठे छान दिसतात. त्या उतरणीवरील फुलें वाटतें हीं ?"

"होय, आपणाला पाहिजेत का ? " असें ह्मणून तारेनें गजरे पुढें केले.

कुमुदिनीः—" नको, नको. मी कशाला तुला लुबाडूं ? "

तारा हांसली व ह्मणाली, "लुबाडणारी मीच.मींच हीं फुलें चोरून आणलीं. माझी मालकी नसतां मीं आणलीं ह्मणजे चोरीच नव्हे कां ?आपण घ्या ह्मणजे झालें. "

" तूं आपल्याकरितां आणखी घेऊन येत असशील तर मी हीं घेतें." असें ह्मणून तिनें तारेच्या हातांतील एक गजरा घेतला व त्याचा ती वास घेऊं लागली. दोघीही थोडा वेळ स्तब्ध राहिल्या. तारेच्या मागच्या अंगास शिवराव उभे होते. पण ते झाडाच्या आड असल्यानें कुमुदिनीला दिसत नव्हते. ते गालांतल्या गालांत हंसत सर्व प्रकार पहात होते. कुमुदिनीच्या डोळ्यांवरून तिच्या मनांत कोणते विचार घोळत असावेत हें त्यांनीं ओळखलें. वनदेवतेप्रमाणें चमकणारी जी बालिका तिच्या समोर उभी होती, तिच्यासंबंधीं जास्त माहिती आपणाला मिळावी अशी तिची इच्छा दिसत होती. इतक्यांत कुमुदिनीनें विचारिलें, " तूं परगांवची वाटतें! येथली राहणारी नव्हेस, होय ना ? "

" मी परगांवची नव्हे. इथेंच त्या–त्या घरांत राहतें ! " तारा आपल्या घराकडे हात करून ह्मणाली.

कुमुदिनीला आश्चर्य वाटलें. ती संधि साधून शिवराव पुढें आले. त्यांना पाहतांच, " दादा, तूं आहेस का इथें ? " असें ती आश्चर्यानें ह्मणाली.

नंतर शिवरावांनीं तारेची व कुमुदिनीची ओळख करून दिली; मग आपण इकडे कां आलों, साबाजीनें चित्र काढण्याचें कबूल करून सुरवातही कशी केली; तेथें बसण्याचा आपणास कंटाळा आला ह्मणून होडींतून येऊन फुलें कशीं काढलीं वगैरे हकीकत शिवरावांनीं कुमुदिनीला सांगून, साबाजी बसला होता तिकडे बोट दाखविलें. त्यावर कुमुदिनी ह्मणाली, " साबाजी चित्र का काढीत आहेत ? खरेंच तारू, तुझे काका चित्रें काढण्यांत फार कुशल आहेत, हो. त्यांची माझी पुष्कळ दिवसांची ओळख आहे. जरा बरें वाटूं लागलें, कीं मी एक दिवस त्यांचीं चित्रें पाहण्याकरितां मुद्दाम येईन. पण तोपर्यंत तूं एकदां वाड्यांत येऊन जा. घटकाभर बोलत बसूं ह्मणजे माझा तितका वेळ जाईल. येशील ना! "

थोडा वेळ तारा कांहींच बोलली नाहीं. ती काय उत्तर देते त्याची वाट पहात शिवराव नदीच्या पात्राकडे तोंड करून उभे होते. शेवटीं " मी मोठ्या आनंदानें येईन." असे शब्द तारेच्या मुखांतून बाहेर पडलेले ऐकतांच शिवरावांनीं एक आरामाचा सुस्कारा टाकला.

नंतर कुमुदिनीनें कोचमनकडे पाहिलें. त्याबरोबर गाडी चालूं लागली. जातां जातां मागें वळून " दादा, चंद्रिका आली आहे." असें आपल्या बारीक व मंजुळ आवाजांत कुमुदिनीनें शिवरावास हांक मारून सांगितलें.

" बरें आहे." असें शिवरावांनीं उत्तर केलें.

कुमुदिनीच्या गाडीकडे पहात कांहीं वेळ तारा रस्त्यांतच स्तब्ध उभी राहिली. 'चंद्रिका आली आहे' हे कुमुदिनीचे शब्द तिच्या मनांत घोळत राहिले. तिनें ते किती वेळां तरी मनांतल्या मनांत उच्चारिले. नंतर कुमुदिनीची ती क्षीण झालेली प्रकृति पाहून तिच्या अंतःकरणांत चमत्कारिक विचार उत्पन्न झाले. ऐहिक सौख्य भोगण्यास नुसतें उच्चकुल व संपत्ति एवढींच पुरेशीं नाहींत असें तिला समजून आलें.

वरील विचारामध्यें ती इतकी गढून गेली होती, कीं, तिच्या मागच्या बाजूकडून रस्त्यानें एक घोडा दौडत येत होता, तरी तिला समजलें नाहीं. परंतु शिवरावांच्या कानावर तो आवाज पडला. ते नदीच्या कांठीं जाऊन होडी सोडीत होते. त्यांनीं मागें वळून पाहिलें तर एका धिप्पाड घोड्यावर एक उंच व सडपातळ काळासावळा गृहस्थ बसला असून घोडा बेफाम होऊन अगदीं तारेच्या पाठीमागें येत असल्याचें त्यांना दिसलें. तारा पाठमोरी उभी होती. "अरेरे" असें ओरडत शिवराव तेथून धांवत निघाले व झट्दिशीं तारेच्या व घोडेस्वाराच्या मध्यें जाऊन त्यांनीं दोन्ही हातांनीं घोड्याचा लगाम गच्च धरला, आणि जोरानें त्या घोड्यास मागें खेंचलें, त्याबरोबर घोडा मागच्या पुठ्ठ्यावर खालीं पडला व त्याचे पुढचे पाय वर उचलले. घोड्यावरील गृहस्थ नदीच्या पात्राकडे पहात बेसावधपणें निघाला होता. ह्या प्रकारामुळें तो इतका दचकला कीं, घोड्यानें पुढचे पाय उचलल्याबरोबर त्याला आपला तोल संभाळणें अशक्य होऊन तो धाडकन् खालीं जमिनीवर पडला.

त्या आवाजानें भयभीत होऊन तारा एकदम वळली व रस्त्यांतून बाजूला सरकली. शिवरावांच्या हातांत घोड्याचा लगाम तसाच असून ते त्या जनावराला जोरानें मागें खेंचीत होते. घोडेस्वार आश्चर्यचकित होत्सात्सा रस्त्यावर पडला होता व तारा तो सर्व देखावा भीतिपूर्ण दृष्टीनें अवलोकन करीत होती.

घोडेस्वार लागलीच उठून उभा राहिला व आपले कपडे झाडून त्यानें संतप्त मुद्रेनें शिवरावाकडे पाहिलें व " याचा अर्थ काय ? " असें ह्मणून त्यानें सहज आपला चाबूक उगारला.

पण यामुळें गोष्ट भलत्याच थरावर गेली. शिवरावांचा स्वभाव अगोदरच तापट व रागीट ! तशांत चाबूक उगारलेला पाहतांच त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. एका क्षणांत घोडेस्वाराच्या हातांतील चाबूक शिरावांनीं हिसकावून घेतला व त्याच्या हातास हिसडा देऊन त्यास जमिनीवर आदळलें आणि चाबकाचे तुकडे तुकडे करून त्यांनीं ते त्याच्याच अंगावर फेंकून दिले. इतका सर्व प्रकार एका निमिषमात्रांत झाला. आपण मध्यें जाऊन सोडवावें असें तारेला किती तरी वाटलें, पण तिला तशी सवडच मिळाली नाहीं. आतां मात्र धीर करून ती पुढें झाली व शिवरावांकडे पाहून ह्मणालीः—

" शिवराव ! शिवराव, काय हें ? " शिवरावांचा चेहरा रागानें लाल झाला होता. त्याचा मोहकपणा जाऊन त्यास उग्र स्वरूप प्राप्त झालें होतें. तें पाहून भीतीनें तारेची गाळणच उडाली.

तिचे ते विनयपूर्ण, काकुलतीचे पण रागाचे शब्द ऐकतांच शिवरावांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. घोड्याचा लगाम तसाच घट्ट हातांत धरून ते नम्रपणें खालीं मान घालून तिच्या समोर उभे राहिले. इकडे घोडेस्वारही हळू हळू व येईल तितकें बळ आणून उठून उभा राहिला. आपल्या अंगावरील माती त्यानें झाडून टाकिली व आपल्या सामनेवाल्याकडे डोळे वटारून पाहून तो ह्मणाला, " शिवराव, याचा तुह्मांला जाब द्यावा लागेल ! "

यामुळें तर जास्तच भडकून शिवराव ओरडले, " इतकेंच, कीं आ-

णखी कांहीं तुला बोलावयाचें आहे ? मूर्खा, ह्या सुकुमार बालिकेच्या अंगावरून, तिला तुडवून तुझा घोडा जात होता हें तुला समजलें कीं नाहीं ? दे याचें उत्तर आधीं ?"

शिवरावांनीं पुनः आपला हात उगारला, तितक्यांत तारेनें धीर करून त्यांचा तो वज्रासारखा कठिण हात आपल्या कोमल व मृदु बोटांनीं धरिला. त्याबरोबर शांत होऊन ते ह्मणाले, "अशी भिऊं नकोस. मी त्याला मारीत नाहीं." नंतर घोडेस्वाराकडे पाहून ते ह्मणाले, "हां, घोड्यावर बैस आणि लवकर दृष्टीआड हो. पण अगोदर ह्या बालिकेची क्षमा माग आणि मग निघून जा. त्याशिवाय सुटका नाहीं."

"नको नको, क्षमा कसली मागावयाची त्यांत!" तारा मध्येंच मोठ्यानें ह्मणाली.

"नको कशी ? मागितलीच पाहिजे. तो तसा येथून जाऊं दे तर खरा, ह्मणजे मग पाहतों !" शिवराव जोरानें ह्मणाले. त्यांचे डोळे विस्तवाप्रमाणें लालभडक दिसत होते. "एखाद्या शिपुरड्यानें वाटेल तसा घोडा पळवीत जावें आणि सांपडेल त्यांस तुडवावें असेंच कीं नाहीं ? तें कांहीं नाहीं. अगोदर हिची क्षमा माग आणि मग येथून निघून जाण्याची गोष्ट."

किंचित् थांबून घोडेस्वार ह्मणाला, "तारू, माझ्या निष्काळजीपणामुळें हा असा अनिष्ट प्रकार घडला, याबद्दल मला खरोखरच फार वाईट वाटत आहे. तुझी खात्री झालीच असेल, कीं मी बेसावधपणानें घोडा पळवीत होतों—"

"एखाद्या खुळचटाप्रमाणें !" मध्येंच शिवराव ओरडले.

"आणि मीं तुला पाहिलें नव्हतें. तथापि ह्या गृहस्थांनीं सरदार शिवरावांनीं आपली रेड्यासारखी शक्ति खर्च करून मला घोड्यावरून खालीं पाडलें नसतें तरी कांहींच घोंटाळा झाला नसता. अगदीं आयत्या येळीं कां होईना पण तूं माझ्या दृष्टीस पडली असतीस आणि मीं घोडा आवरला असता व तुला कांहींच इजा झाली नसती. परंतु शिवरावांच्या चुकीमुळें—नव्हे गडबडीमुळें, उतावळेपणामुळें—हा सर्व प्रकार झाला. सर्व दोष त्यांच्याकडेच आहे. मी पुनः एकवार तुझी क्षमा मागतों."

असें ह्मणून घोडेस्वारानें आपली मान लवविली. परंतु त्या वेळीं त्याच्या डोळ्यांतून एक द्वेषाग्नीची ज्वाला निघून त्या उंच, धिप्पाड व रागानें संतप्त झालेल्या शिवरावांच्या आकृतीकडे गेली.

तारा कांपत कांपत ह्मणाली, " नको, नको ! त्यांत कसली क्षमा मागायची ! असें कोणी मुद्दाम का करील ! आहे काय त्यांत ! येथें अशा वेळीं कोणी असणार नाहीं, असें तुह्मांला वाटलें असावें. माझ्याकडूनच चूक झाली. मी इकडे कशाला आलें कोण जाणे ! आलें नसतें तर फार बरें झालें असतें. "

नंतर शिवराव त्या घोडेस्वारास ह्मणाले, "हा घे तुझा घोडा. बैस यावर आणि जा घरीं. ह्या बालिकेच्या जिवाला कांहीं इजा झाली नाहीं हें तुझें मोठें भाग्य समज. जा. या पुढें जरा जास्त काळजीनें घोडा पळवीत जा. ध्यानांत ठेव. "

घोडेस्वार शिवरावांकडे क्षणमात्र रोखून पहात उभा राहिला. नंतर मानेला एक हिसका देऊन तो चट्कन घोड्यावर चढून बसला व " ठीक आहे. मी ध्यानांत ठेवतों. आतां तर मुळींच विसरणार नाहीं. " असें रागानें ह्मणत त्यानें घोड्यास टांच मारली व तेथून तो पार निघून गेला.

वाचकहो, हा घोडेस्वार ह्मणजे शामराव वकील होते हें तुह्मी ओळखलेंच असेल.



# प्रकरण ५ वें.

——:०:——

## ही चंद्रिका कोण ?

शिवराव आणि तारा होडींत बसून नदीच्या अलीकडे आली व तारेला तिच्या खोपटापर्यंत पोंचवून शिवराव परत चंद्रगड किल्ल्याकडे निघून गेले.

रात्रीचें जेवण आटपल्यानंतर तारा साबाजीबरोबर इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी बोलत बसली होती. त्यांत शिवरावांबरोबर आपण फुलें आणण्याकरितां ह्मणून होडींत बसून नदीपलीकडे कसे गेलों, तेथें घोड्याच्या गाडींतून कुमुदिनी येत असतां तिच्या हातांतून पुस्तक कसें खालीं पडलें, तें आपण उचलून कसें दिलें, नंतर शामराव घोडा पळवीत कसे आले, वगैरे हकीकत तिनें साबाजीस सांगितली. परंतु शामराव घोड्यावरून पडल्याची बातमी अगर त्यांची आणि शिवरावांची बोलाचाली झाल्याची हकीकत मात्र तिनें साबाजीस कळविली नाहीं. तिचा स्वभाव अत्यंत सरळ होता या गोष्टीचा विचार करतां तिनें ही हकीकत साबाजीस सांगूं नये, हें फारच विलक्षण. एकदां दोनदां तर हकीकत सांगण्याकरितां तिचे ओंठ देखील हालले. परंतु सुरवात कशी करावी याची तिला अडचण पडली. परंतु शिवरावांची ती रम्य मनोरम मूर्ति मात्र तिच्या डोळ्यासमोरून हालली नाहीं.

कुमुदिनीच्या तोंडांतून चंद्रिकेचें नांव बाहेर पडलेलें ऐकल्यापासून तें नांव तारेच्या कानांत सारखें घुमत होतें. त्या नांवांत एक प्रकारची जादू

होती. त्या जादूनें तिचें मन भरून गेलें व तिला त्रासहि होऊं लागला. तिनें मध्येंच एकदम साबाजीस प्रश्न केला, " ही चंद्रिका कोण ? "

साबाजी आश्चर्यचकित होऊन ह्मणाली, "चंद्रिका ? कुठली चंद्रिका ? मला नाहीं माहीत. पण नांव ओळखीचें दिसतें. तारू, तूं कोठें ऐकलेंस हें नांव ? "

ताराः—" संध्याकाळीं कुमुदिनीताईसाहेब शिवरावांना ह्मणाल्या, 'चंद्रिका आली आहे.' तें मीं ऐकलें."

साबाजीः—" हां हां. आतां आलें ध्यानांत. तिला बोलावणें गेलें होतें खरें. शेवटीं आली ह्मणायची. तारू, चंद्रिका रूपानें फारच चांगली आहे. केवळ सौंदर्याची खाणच. तिच्यासारखी सुंदर स्त्री कोठेंहि पहायला मिळायची नाहीं. "

ताराः—" इतकेंच ना ? अग यांत तिचा काय मोठेपणा ? तिचा गुण कोणता ? स्वरूप चांगलें असणें ही एक ईश्वरी देणगी आहे. यांत तिची शिफारस कोणती ? "

तारेच्या ह्या शांत पण मार्मिक भाषणानें साबाजी थोडा कुंठित झाला. तो ह्मणाला, " चंद्रिका रूपानें उत्कृष्ट आहे; इतकेंच नाहीं, तर तिच्या ठिकाणीं एक प्रकारची जादू आहे. "

तारा हांसून बोलली:—"अरे वाः ! मग तर फार चांगलें. ती कसली जादू करते ? गारुड्याप्रमाणें पुंगी वाजवून सर्पांना गुंगविते, कीं आपल्या नजरबंदीनें माणसांना भारून टाकते, करते तरी काय ? "

साबाजी खोंचूनः—" तारू, आतां मात्र टीका करण्याची तूं कमाल केलीस ! दुसऱ्याची चेष्टा करण्याचें तूं कोठें शिकलीस ? ही कांहीं उपजत विद्या नव्हे. महिलाविद्यालयांत हें शिक्षण मिळालेलें दिसतें. नाहीं; ती सर्पांना गुंगवीत नाहीं अगर माणसांना नजरबंदीनें चकित करूनहि सोडीत नाहीं. तथापि ती रूपानें फार सुंदर आहे एवढी गोष्ट खरी. शिवाय--"

तारा मध्येंचः--" सुंदर सुंदर ह्मणजे कशी, तें सांगा अगोदर. "

साबाजीः—" तिची कांती पिंवळ्या केतकीसारखी आहे, केंस काळे-भोर, हरिणीसारखे चंचल आणि कमलासारखे नाजुक नेत्र. "

तारा गालांतल्यागालांत हांसू लागली. तिकडे पाहून साबाजी ह्मणाला, " कां ? ही अतिशयोक्ति आहे असें तुला वाटतें कीं काय ? तुझी तिची गांठ पडली म्हणजे तुला समजेल. "

तारा हळूंच बोलली, " तिच्या भेटीकरितां मी कांहीं उतावीळ झालेली नाहीं. काशीयात्रा करून आलें कीं मनुष्याला कृतकृत्य व्हावें अशांतला प्रकार आहे कीं काय ? "

साबाजीः—" तसें, तसेंच. अगदींच कांहीं खोटें नाहीं. तिच्या सौंदर्याला भुलून किती तरी सरदारपुत्र तिच्या प्रेमाकरितां—मरणालासुद्धां तयार झाले आहेत ! ती रूपानें सुंदर आहे; इतकेंच नाहीं, तर ती चांगली सुशिक्षित, विद्यासंपन्न अशी आहे. थोडक्यांत सांगायचें ह्मणजे आधुनिक सुधारणेची ती एक मूर्ति आहे. अलीकडील कलाकौशल्याचा नमुना आहे. त्यांत नुसत्या सौंदर्यापेक्षां कांहीं अधिक असतें. नुसती हुषारी असूनही भागत नाहीं. ती घोड्यावर चांगली बसते. शिकार देखील फार उत्तम करिते. परवांच तिनें एक केवढा मोठा ढाण्या वाघ मारला ! "

ताराः—" काका, तुह्मीं तर वर्णनाची अगदीं कमाल केलीत. तिचा स्वभाव मग चांगला नसेल. कारण इतके गुण तिच्या अंगीं आहेत तर तेथें एखादा अवगुण ह्मणून पाहिजेच. "

साबाजीः—" छे, छे. तूं चुकलीस. तिच्यासारखी गोड स्वभावाची दुसरी बायकोच मिळायची नाहीं. "

ताराः—" अग बाई, तर मग इतकी सुवर्णसंपन्न बायको मिळाली ह्मणून तिच्या नवऱ्याला अगदीं धन्य धन्य वाटत असेल. तो तिला अगदीं हातावर झेलीत असेल नाहीं ? "

साबाजीः—" कुठला नवरा ? वेडी कुठली ! तिचें अजून लग्नच झालें नाहीं."

ताराः—" ह्मणजे ? अद्यापि लग्न झालें नाहीं ! इतकी गुणसंपन्न

असून लग्न न होतां कशी राहिली? काका, पुरुषांना तिचें भय वाटत असावें. ”

साबाजी हांसून ह्मणाले, “ असेल कदाचित्. तिचें लग्न मागेंच व्हायचें. चांगलीं चांगलीं स्थळें किती तरी सांगून आलीं होतीं. तिच्या मनांत असतें, तर ती ह्या वेळीं जहागीरदारीण सुद्धां झाली असती. ”

ताराः—“ खरेंच. अशी सुंदर, शिकलेली, सर्व गुणांनीं भरलेली बायको जहागीरदारीण झाली तरच खरें पण तसें तिनें मनांत कां बरें आणलें नाहीं? आणायला पाहिजे होतें! ”

साबाजीः—“ कां आणलें नाहीं, तें समजत नाहीं; पण तारू, तूं मघापासून मला इतकें खोदून खोदून विचारीत आहेस, त्यावरून तिच्या संबंधानें तुला मत्सर वाटतो असें दिसतें. दोन बायकांमध्यें द्वेष उत्पन्न करावयाचा असेल, तर एकीची दुसरीपुढें स्तुति करायला सुरवात करावी, कीं काम झालेंच. असा अनुभव आहे. ”

तारेला राग आला, पण तिनें तो हांसण्यावारी घालविला. ती ह्मणाली, “ द्वेष! काका, मी नाहीं तिचा द्वेष करीत. उलट मी तिला पाहण्यासाठीं फारच उत्सुक झालें आहें. तिचें दर्शन घ्यावें, तिच्याशीं चार शब्द बोलावें, तिच्या अंगांत जी जादू आहे तिचा अनुभव घ्यावा, असें मला वाटूं लागलें आहे. ती कुठें राहते? ”

साबाजीः—“ ती बहुतेक मुंबईत असते. सध्या इथें आली आहे. इथेंच तुझी गांठ पडेल. पण ती मुंबईहून या वेळीं कां आली तें समजत नाहीं. तिला इकडे आणविण्यांत माईसाहेबांचा दुसराच कांहीं हेतु असेल. शिवरावही आले आहेत. ”

ताराः—“ बरें, मग? ”

साबाजीः—“ मग काय? माईसाहेबांच्या मनांत शिवरावांचें केव्हां एकदां लग्न होईल असें झालें आहे; व शिवरावांना चंद्रिकेसारखीहि दुसरी सुंदर बायकोच मिळायची नाहीं. हाच हेतु असावा. त्या दोघांचा जोडाही फार चांगला शोभेल. तिच्यासंबंधानें विचार केला तर यापेक्षांही जाड्या मागण्या तिच्या आईबापांनीं झिडकारल्या आहेत. तरी चंद्रगडची माल-

कीण होणें, हें जरा विशेष आहे. त्यांत कांहीं जादु आहे. शिवरावांना ताळ्यावर आणण्याकरितां माईसाहेबांनीं हें जाळें टाकलें आहे. ह्या जाळ्यांत हे राजश्री सांपडतात कीं कसें हेंच पहावयाचें आहे. "

तारा स्तब्ध राहिली. विचारांनीं तिचें मन गोंधळून गेलें व तिचे डोळे आकाशांतील तारकांकडे लागून राहिले. " सरदार शिवराव, चंद्रगडचे भावी जहागीरदार ! त्यांनीं कोणत्याही स्त्रीशीं लग्न करून घेतलें तर या तारेला–यःकश्चित् गरीब चित्रकाराच्या पुतणीला–त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? कांहीं नाहीं. मुळींच कांहीं नाहीं. कांहीं कांहीं बायका किती दैववान् असतात, ईश्वराची त्यांच्यावर केवढी बहाल मर्जी असते बरें ? चंद्रिकेचेंच उदाहरण घ्या. रूपानें अप्रतिम, सर्वगुणसंपन्न, हुषार, अगदीं राज्ञीपदाला योग्य. इतकें असून तेवढ्यानें ईश्वराचें समाधान नाहीं. तें आतां तिला सरदार शिवरावांना देणार आहेत. तिनें आपलें मोहिनीजाल पसरल्यावर ते त्यांतून निसटून जातील ही गोष्टच अशक्य ! तिच्या अंगांत एक प्रकारची जादू आहे. तिच्यांत दुसऱ्याला भारून टाकण्याचें सामर्थ्य आहे, असें नुकतेंच काकांनीं नाहीं का सांगितलें ? काका इतके वयातीत, इतके अनुभवी पण त्यांना सुद्धां तिनें मोहून टाकलें नाहीं काय ? एरव्हीं चंद्रिकेची इतकी स्तुति त्यांनीं केली नसती. त्यांच्यासारख्या वयोवृद्ध गृहस्थाची ही स्थिति, मग अल्लड, अननुभवी अशा शिवरावांचा काय पाड ? "

याप्रमाणें विचार करीत ती कांहीं वेळ स्तब्ध राहिली. पण शिवरावांसंबंधानें इतके विचार करीत बसणें आपल्यासारख्याला कांहींच फायदेशीर नाहीं, हें जाणून ती ताबडतोब उठली व निजावयास निघाली. इतक्यांत बाहेर एकजण येऊन ह्मणाला, " ताराबाई, कोण आहेत ? त्यांचें पत्र आहे. उत्तर मागितलें आहे. " असें ह्मणून त्यानें एक पत्र तारेपुढें टाकिलें.

इतक्या रात्रीं, ध्यानीं मनीं नसतां पत्र आलेलें पाहून तारेला किंचित् भीति व आश्चर्यहि वाटलें. तिनें भीत भीत तें पत्र उचलून घेतलें. पत्याचें अक्षर बारीक व सुंदर होतें. पाकिटावर छाप होता. त्यावरून तें

चंद्रगडच्या किल्ल्यांतून आलें आहे, असें तिनें ओळखलें. पण पत्रांतील मजकुराचा तिला अदमास लागेना. ह्मणून पाकीट न फोडतां ती तशीच त्याकडे कांहीं वेळ पहात राहिली. शेवटीं एकदांचा धीर करून तिनें तें पाकीट फोडलें व आंतील पत्र काढून ती वाचूं लागली.

"मु० किल्ले चंद्रगड,

"श्रीमती कुमारी ताराबाई यांस,

"कबूल केल्याप्रमाणें उद्यां दोन प्रहरीं आपण साबाजींना घेऊन वाड्यांत जेवणास येण्याचें करावें. जेवण झाल्यानंतर सायंकाळपर्यंत बोलत बसावयास पुष्कळ वेळ मिळेल. साबाजी नाहीं ह्मणतील, परंतु तसें न करतां तुह्मांला घेऊन त्यांनीं अगत्य अगत्य यावें, असा माझा त्यांना निरोप कळवावा. आल्याशिवाय राहूं नये.

"आपली,

"कुमुदिनी."

तारेनें तें पत्र कित्येक वेळां पुनःपुन्हां वाचलें. जणूं त्यांतील मजकूर खरा कीं खोटा हें तिला समजेना. सायंकाळीं कुमुदिनीची गांठ पडल्या वेळीं तिनें वाड्याकडे येण्याबद्दल आपणास सांगितलें होतें खरें; पण तें सहजासहजीं सांगितलें असेल, त्यांत मनावर घेण्याजोगें कांहीं नाहीं असें तिला वाटत होतें. परंतु आतां तर खास बोलावणेंच आलें; आणि तेंहि जेवणाचें आमंत्रण!

नंतर ती साबाजीजवळ जाऊन ह्मणाली:—"काका, कुमुदिनीताईसाहेबांकडून चिठी आली आहे. उद्यां दोनप्रहरीं आपणां दोघांना त्यांनीं तिकडे जेवणास बोलावलें आहे."

साबाजी साश्चर्य मुद्रेनें ह्मणालाः—"उद्यां! जेवणाला! वाः! फार चांगलें. जाण्याचें तुझ्या मनांत असेलच. मग 'बरें आहे' ह्मणून त्यांना निरोप पाठीव. ही त्यांची मोठीच मेहेरबानी ह्मणावयाची. तारू, पाहिलेंस! तूं तोंडांतून शब्द काढल्याबरोबर तुझी इच्छा पूर्ण झाली. आतां ती लावण्याची खाण, सौंदर्याची पुतळी, चंद्रिका तुला पहावयास मिळेल.

" पण काका, जावें असें मला कांहीं वाटत नाहीं. ती मंडळी किती श्रीमंत, किती थोर ! आणि आपण पडलों गरीब ! गरिबांनीं गरिबांच्याच घरीं जाणें बरें." तारा विषण्ण चित्तानें ह्मणाली.

" तें खरें. पण त्यांचें आपल्यावर लक्ष आहे व त्यांचा आपला घरोबाहि आहे. इतकें अगत्यानें बोलावलें आहे, तर जाण्यास हरकत नाहीं." साबाजी म्हणाला.

" बरें तर " असें ह्मणून तारेनें कुमुदिनीस खालील दोन ओळींचें उत्तर पाठविलें:—

" श्रीमंत सकल सौभाग्यवति कुमुदिनीताईसाहेब, यांचे सेवेशीं—

" आपल्या पत्राप्रमाणें उद्यां दोन प्रहरीं आम्ही येऊं.


" आपली,

" तारा."

---

# प्रकरण ६ वें.

## कुमुदिनीच्या महालांत.



दुसरे दिवशीं सकाळीं चंद्रगड येथील वाड्याच्या टॉवरवरील घड्याळांत अकराचे ठोके पडले व त्या आवाजानें आसपासचें सर्व मैदान घुमूं लागलें. इतक्यांत एक घोड्याची गाडी वाड्यांतून निघून साबाजीच्या खोपटासमोर येऊन उभी राहिली. त्याबरोबर साबाजीनें तारेस हाक मारून निघण्यास सांगितलें. तारा तयारींतच होती. तिच्या अंगावर दागदागिने कांहीं नव्हते; ती अस्मानी रंगाचें साधें पातळ नेसली असून तिच्या अंगांत गुलाबी पोलकें होतें व तिनें बुचड्यावर एक पिवळ्या गुलाबाचें फूल खोवलें होतें. त्या योगानें तिचा भव्य केशकलाप फारच रमणीय दिसत होता.

तिचा तो निष्कपट हसतमुख चेहरा पाहून साबाजीस धन्यता वाटली. जणूं स्वर्गीय सौंदर्यच आपल्यापुढें मूर्तिमंत उभें आहे असा त्याला भास झाला.

तीं दोघेंहि जाऊन गाडींत बसलीं व गाडी नदीच्या पुलावरून वाड्याच्या दरवाज्यांत जाऊन उभी राहिली.

वाड्याची इमारत फारच टोलेजंग व सुंदर होती. वाड्यापुढचें तें भव्य मैदान, त्या मोठमोठ्या कमानी, ते लोखंडी सुळे लावलेले दरवाजे, तो नागव्या तरवारींचा पहारा वगैरे पाहून तारा अगदीं आश्चर्यचकित होऊन गेली. इतक्यांत नोकरानें दार उघडलें. साबाजी आणि तारा दोघेंहि गाडींतून खालीं उतरलीं व पायऱ्या चढून वाड्यांत गेलीं.

त्याबरोबर त्यांचें स्वागत करण्याकरितां खुद्द रामदेवरावांची स्वारी पुढें झाली व एका बाजूनें माईसाहेबहि बाहेर आल्या. तारेचें तें रूपलावण्य पाहून माईसाहेबांना फार आश्चर्य वाटलें, पण त्यांनीं तें बाहेर दाखविलें नाहीं. त्या ह्मणाल्या, " काय साबाजी, प्रकृति बरी आहे ? आलांत फार चांगलें झालें. ही तुमची पुतणी नव्हे का ? कुमुद सांगत होती. मुली, ये इकडे. " असें ह्मणून त्या तारेला घेऊन आंत गेल्या. इकडे रामदेवरावही साबाजीस घेऊन दिवाणान्यांत गेले.

माईसाहेबांचें प्रेमळ व अगत्याचें वर्तन पाहून तारेला जरा धीर आला. माजघरांतील एका प्रशस्त खोलींत लोडास टेकून एक ह्मातान्याशा बाई बसल्या होत्या. त्यांच्याकडे पाहून माईसाहेब ह्मणाल्याः—" वन्सं, ही साबाजीची पुतणी बरें का? तारू इथें बैस. परकीपणा मानूं नकोसहो. "

ती वृद्धा ह्मणाली, " असें काय ? बरें झालें बाई, गांठ पडली. ये बाळ, तारू, ये, अशी माझ्याजवळ बैस. तुझ्यामुळें तरी साबाजी त्या आपल्या खोंपटांतून बाहेर पडले ह्मणायचे. त्यांच्या अंगामध्यें गुण कमी का आहेत. पण ते त्या मठींतून बाहेर येतील तेव्हां. तारू, आतां तूं आली आहेस, तेव्हां त्यांच्या गुहेंतून त्यांना कधीं कधीं असें बाहेर हुसकून देत जा, नेहमीं घरांत कोंडून राहणें त्यांना कसें बरें वाटतें, ईश्वर जाणे ! "

साबाजीस आपल्या झोंपडींतच बरें वाटतें, ते कधीं कुठें बाहेर जाव-

याचे नाहींत, देवदर्शनालासुद्धां जात नाहींत, दिगंबर बोवादेखील परवां म्हणत होते, वगैरे हकीकत तारेनें त्या बाईना सांगितली. ती मोकळ्या मनानें त्यांच्याशीं बोलत बसली होती. इतक्यांत जेवणाची तयारी आहे अशी वर्दी देऊन एक नोकर निघून गेला. पण तिकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं.

इतक्यांत माडीवरून एक अत्यंत रूपवती तरुणी खालीं आली व त्या म्हाताऱ्या बाईशेजारीं जाऊन उभी राहिली. तिचे लांब, सडक व घनदाट केश तिच्या पाठीवर रुळत होते. डोळे कमलपुष्पासारखे सुकुमार व नाजूक असून आकाशांतील चांदणीप्रमाणें चमकत होते.साबाजीच्या वर्णनावरून तारेनें तिला लागलीच ओळखलें. तिची बोलण्या चालण्याची ढब अत्यंत मोहक असून, एकंदर शरीराची ठेवण फारच बांदेसूद व गोंडस होती. तिची शरीरकांति पाहून तर तारा अगदींच दिपून गेली. अंगाखांद्यावर हिऱ्यामोत्यांचे दागिने लटकावून दिले होते. त्यांच्या चमकणऱ्या तेजानें चोहोंकडे प्रकाशच प्रकाश दिसूं लागला.

इतक्यांत माईसाहेब तेथें आल्या. त्यांनीं, “ तारू, ही प्रधानांची चंद्रिका बरें कां ! ” असें म्हणून त्या दोघींची ओळख करून दिली. तारेनें वरती पाहिलें तर चंद्रिकेचे नेत्रकमल आपल्याकडेच लागले आहेत, असें तिला दिसलें. ती क्षणभर स्तब्ध राहिली. तिच्या तोंडांतून शब्द निघेना. शेवटीं महत्प्रयासानें “ गांठ पडली, बरें झालें. ” असें ती चंद्रिकेला म्हणाली. चंद्रिकेच्या ओंठांतून मधुर हास्य बाहेर पडलें. त्या दोघीजणी एकमेकींकडे बराच वेळ पहात उभ्या राहिल्या. आपल्याला पाहून चंद्रिकेला बरें वाटलें नाहीं, इतकें शेवटीं तारेनें ओळखलें.

नंतर सर्व मंडळी जेवणाकरितां उठली. जेवण करून पुनः सर्व बायका मधल्या दालनांत जमून विडा खात बसल्या. परंतु चंद्रिका आपणाबरोबर बोलण्याचें, किंबहुना आपणाकडे पाहण्याचें सुद्धां मुद्दाम टाळीत आहे, असें तारेला आढळून आलें. पण त्याचें कारण मात्र तारेच्या लक्षांत आलें नाहीं. थोडा वेळ गप्पागोष्टी झाल्यानंतर ती तिसऱ्या मजल्यावर कुमुदिनीला भेटण्याकरितां निघून गेली.

कुमुदिनी नेहमींप्रमाणें आपल्या खोलींत खिडकीशेजारीं एक पलंगडी टाकून तिजवर पडलेली होती. तारेला पाहतांच ती उठून बसली व प्रसन्न वदनानें ह्मणाली. " ये, तारू, माझ्याजवळ बैस. आलीस फार चांगलें झालें. तूं आल्याचें मला समजलें; पण मीं म्हटलें खालीं मंडळी जमली असतील तुला कशाला बोलावून त्रास द्यावा ? "

तारा:—" छे, छे, त्रास कसला त्यांत ? मी केव्हांच येणार होतें, पण तुमची खोली माहीत नव्हती. ह्मणून कुणाला तरी घेऊन यावें असें मनांत होतें. पण त्या जमलेल्या बायकांपैकीं कोणी हालेनात. शेवटीं माडीवर तरी जाऊन पहावें ह्मणून जिना चढून वर आलें तर शिवराव तेथें उभे होते. त्यांनीं मला इकडे आणलें."

कुमुदिनी:—" मी देखील केव्हांची तुझी वाट पहात आहें. ह्मटलें, अजून कशी आली नाहीं ? ही जागा तुला कशी काय आवडते ? असें ह्मणून कुमुदिनीनें तारेच्या हातास धरून आपल्या शेजारीं बसविलें.

तारा पलंगडीवर बसून ह्मणाली, " ही जागा फारच रमणीय आहे. ह्या वाड्यासारखा वाडा मीं जन्मांत पाहिला नाहीं. किती मोठा, उंच व शोभिवंत आहे ! खरोखरी फारच सुंदर आहे, बाई. "

कुमुदिनी:—" तुला तसें वाटतें, पण मला काय वाटतें, समजलें ? तुझ्या त्या घरकुल्याकडे पाहिलें ह्मणजे मला वाटतें, बरें का तारू, मला वाटतें, कीं तुझें जिणें फार सुखाचें आहे. "

तारा साश्चर्य ह्मणाली, " माझें ? सुखाचें आहे खरें, मी नाहीं ह्मणत नाहीं, पण हा वाडा किती सुंदर आहे ! "

कुमुदिनी:—" तुला असें वाटण्याचें कारण एवढेंच कीं, तुला येथील अनुभव नाहीं. माझी खात्री आहे. थोडे दिवस तूं येथें राहून पहा. ह्मणजे तुला कंटाळा येईल. बरें, आतां मला सांग चंद्रिकेला तूं पाहिलेंच असशील, रूपानें कशी सुरेख आहे, नाहीं ! आमच्या दादाला बायको मोठी छान् शोभेल. आमच्या सर्वांच्या मनांत आहे, कीं दादाला हीच बायको करावी. "

तारेच्या मनाची कशी स्थिति झाली त्याचें वर्णन करतां येणें शक्य

नाहीं. तथापि आपल्या मनांतील कोणताहि भाव प्रगट न करण्याबद्दल तिची शक्य तेवढी खटपट चालली होती. तिचा श्वासोच्छ्वास सुद्धां कांहीं वेळ बंद झाला.

नंतर तिनें स्पष्टपणानें विचारलें, " पण शिवराव चंद्रिकेशीं लग्न करून घेण्याला तयार आहेत का ? "

कुमुदिनीः—" अग हो. मग मोठें छान् होईल नाहीं ? "

तारा खिन्नतापूर्वक हांसून ह्मणाली, " शिवरांवांचें चांगलें होईल, असेंच ना ? "

कुमुदिनी साश्चर्य मुद्रेनें ह्मणाली, " तूं मोठी चमत्कारिक मुलगी दिसतेस. आतां यावर मी काय बोलणार ? होय, होय, तसेंच. पण चंद्रिकेचें सुद्धां चांगलें होईल. "

" होय. खरेंच होईल. " एवढेंच तारा पुटपुटली. विशेष वाद करणें तिला पसंत वाटलें नाहीं.

कुमुदिनी पुढें हांसून ह्मणाली, " तारू, दादाच्या लग्नाबद्दल आह्मां सर्वांनाच मोठी उत्सुकता वाटत असून त्याचें केव्हां एकदां लग्न होईल, असें आह्मांला झालें आहे. दादा स्वभावानें फार स्वच्छंदी आहे असें लोक बोलतात, पण मला नाहीं तसें वाटत. तारू, तो स्वच्छंदी आहे असें तुला तरी वाटतें काय ग ? "

त्याबरोबर तारेची मुद्रा पालटली. तिचें अंतःकरण गुप्त स्फुरणानें जोरानें हालूं लागलें. असा प्रश्न केल्यामुळें तिच्या अंतःकरणाला कशा वेदना होऊं लागल्या हें बिचाऱ्या कुमुदिनीच्या लक्ष्यांत आलें नाहीं. तारेनें काय उत्तर द्यावें बरें ? ती हळूच पुटपुटलीः—" म-मला नाहीं ठाऊक. मला कसें सांगतां येईल. शिवरावांची आणि माझी तशी ओळख तरी ? "

कुमुदिनीः—" बरोबर आहे. तुला नाहीं माहिती. मी विसरलें. मला वाटतें तुझी आणि आमची किती तरी दिवसांची जुनी ओळख आहे. पण वास्तविक पाहिलें तर, काल संध्याकाळींच तुझी-माझी प्रथम गांठ पडली आणि तीहि फार नाहीं. थोडका वेळ मग मला असें कां बरें

वाटावें ? तारू, तुझ्याजवळ कांहीं तरी जादू आहे खास. तुझा स्वभाव मला भारी आवडतो. तुला पाहिल्याबरोबर तुझ्याविषयीं माझ्या मनांत प्रेमभाव उत्पन्न झाला. आपण दोघीजणी जिवलग मैत्रिणी होऊं या. तारू, मी तुझ्याजवळ एखादी गोष्ट काढली तर तूं नाहीं ह्मणणार नाहींस ना ? ”

ताराः--“ मी तुमच्या करितां काय पाहिजे तें करीन.”

कुमुदिनीः--“ तर मग त्या खिडकींत जाऊन पेटीवर गाणें ह्मण पाहूं. ”

तारा हांसतः—“ मला येत नाहीं, असें मीं ह्मटलें तर ? ”

पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय

कुमुदिनीः--“ तसें होणारच नाहीं. माझा तर्क चुकायचा नाहीं. असल्या गोष्टींत मी मोठी जादूगार आहें असें दादा नेहमीं ह्मणत असतो. ”

“ बरें तर, पाहतें येतें का ? ” असें ह्मणून तारा पेटीवर जाऊन बसली व पेटीच्या सुरांत ती गाऊं लागली. “ चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूप खाणी ” हें पद ह्मणावयास तिनें आरंभ केला. गायक व श्रोता-त्या दोघीजणी–त्या गाण्यामध्यें इतक्या तल्लीन होऊन गेल्या होत्या, कीं शिवराव आंत आल्याचें त्या दोघींनाहीं मुळींच समजलें नाहीं. पुढील शोकरसही गाण्यांत पूर्णपणें उतरला. गाणें संपल्यानंतर तारेनें सहज खोली-च्या दाराकडे पाहिलें, तों शिवराव आंतील बाजूस उभे असल्याचें तिला दिसलें. त्याबरोबर तिची मुद्रा एकदम पालटली, पण ती कांहीं बोलली नाहीं.

शिवराव कुमुदिनीकडे पाहून ह्मणालेः--“ ताई, हें पहा तुझ्याकरितां मीं काय आणलें आहे तें ! ” असें ह्मणून साबाजीनें काढलेलें चित्र त्यांनीं पुढें केलें.

कुमुदिनी चित्र पाहून आनंदातिशयानें ह्मणाली, “माझ्याकरितां? वाः! दादा, फार छान्, फार सुंदर आहे. कोणीं काढले ? मी ओळखतें. तारू, तुझ्या काकांनीं हें चित्र काढलें आहे. होय, होय त्यांनींच. त्यांच्याशिवाय इतकें चांगलें चित्र दुसरें कोण काढणार आहे ? ”

" ताई, तूं बरोबर ओळखलेंस. साबाजीनेंच काढून दिलें." नंतर तारेकडे वळून ते ह्मणाले, " तारू, तूं फार छान गातेस, आणखी एकदां तें गाणें ह्मण पाहूं."

ताराः--" नाहीं, मी नाहीं ह्मणायची."

शिवरावः—" नाहीं ह्मणत? तूं ह्मणशील असें मलाही वाटत नाहीं. तरी पण पुनः एकदां, एकच वेळ, तूं जर गाशील तर काय पाहिजे तें देईन."

" पण नाहींच म्हणायची मी." असें ह्मणून तारा पेटीवरून उठून कुमुदिनीकडे गेली. तिजकडे पाहून कुमुदिनी ह्मणालीः--" तारू, हें चित्र किती सुंदर आहे, नाहीं? आज काय बक्षिसांची अगदीं रेलचेल उडून हेली. हें चित्र मिळालें, तुझी गांठ पडली आणि तुझें अत्युत्कृष्ट गाणें ऐकायला सांपडलें. तारू, तूं फारच छान गातेस. इतकें उत्तम गायला कुठें शिकलीस?!"

शिवराव मध्येंच ह्मणाले-" छे! छे. हें शिकून येण्याजोगें नाहीं. ही ईश्वराचीच देणगी आहे."

कुमुदिनीनें त्यांजकडे पाहिलें. कांहीं अंतस्थ उत्सुकतेनें शिवरावांचे डोळे चकाकत आहेत, असें तिला दिसलें. त्याबरोबर ती ह्मणाली, " दादा, तूं साबाजीकडे जाऊन सांग, कीं आमच्यावर तुमची ही मोठी मेहेरबानी झाली."

शिवरावः--" जाईन अंमळशानें, थोडा वेळ मी येथेंच बसतों. गाणें ऐकल्यापासून हें नंदनवनच आहे, कीं काय असें मला वाटूं लागलें आहे."

" येथें बसूं नको. बसायचें आहे तर त्या पेटीवर बैस जा आणि ह्मण कांहीं तरी." नंतर तारेकडे पाहून ती ह्मणाली, " आमच्या दादाला पेटी वाजवायला न गायला देखील चांगलें येतें. तुला माहीत नाहीं वाटतें? त्याचा स्वभाव जरा आळशी आहे, स्वतः ह्मणून त्याला कांहीं करायला नको. तो आतां गायचा सुद्धां नाहीं. होय ना रे दादा?"

शिवराव तारेकडे पहात उभे होते. त्यांच्याकडे पाहणें व त्यांच्याशीं

बोलणें जणूं भाग आहे असें तारेस वाटून ती त्यांना हळूच ह्मणाली, "मग काय; ह्मणणार ना?"

त्याबरोबर शिवराव पेटीबर जाऊन बसले. जणूं तिच्या हुकुमाची ते वाटच पहात होते. आपल्या सुरेल व मंजुळ आवाजांत त्यांनीं गाण्यास आरंभ केला. पण गाणें ह्मणत असतां त्यांचे उत्सुक डोळे आपल्याकडे लागले आहेत असें तारेनें ओळखलें.

शिवरावांचा आवाज सारंगीसारखा मृदु, गोड व सुरेल होता. शिवाय पेटी वाजविण्याच्या कामांत तर ते इतके निष्णात व तरबेज होते, कीं, एखादे वेळीं ते स्वतः तान घेत आहेत कीं पेटीचे सूर काढीत आहेत हे सुद्धां ओळखूं येत नसे. त्यांचीं बोटें पेटीच्या पडद्यांवरून इतक्या जलदीनें व सफाईनें हालत होती कीं, तारा तर अगदीं थक्क होऊन गेली. परंतु याहीपेक्षां शिवरावांनीं ह्मटलेल्या पदांतील भावार्थच तारेच्या अंतःकरणांत फार ठसला. तूं कोठें पाहिजे तिकडे जा; पर्वतावर जा, खोल दरींत जा, रानावनांत जा; कोठेंही गेलीस तरी माझें प्रेमरूपी हरिण तुझ्या पाठोपाठ येईल." असेंच जणूं ते ह्मणत आहेत असें तारेला वाटलें. क्षणभर ती चंद्रिकेला विसरली. नव्हे—सर्वच गोष्टींचा तिला विसर पडला. त्यांच्या तेजःपुंज व विशाल डोळ्यांनीं आणि मधुर व सुरेल आवाजानें तिला अगदीं भारून टाकिलें. ती अगदीं पराधीन झाली. तिची मान लवली व डोळे मिटले. आपली स्थिति खरोखरच अशी होईल काय? सदोदित, जिथें जाईन तिथें, त्यांचें प्रेम आपल्या मागें येईल काय?" वगैरे कल्पनातरंगांत ती निमग्न झाली. थोडक्याच वेळांत ती शुद्धीवर आली, पण तिचा चेहरा अगदीं उतरून गेला होता.

तिजकडे पाहून कुमुदिनीनें म्हटलें, "तारू, तुला कंटाळा आला वाटतें?"

ताराः—"होय. मी आतां आपला निरोप घेतें."

कुमुदिनीः—"बरें तर, दादा तिला खालीं पोंचीव जा. कुणालाही झालें तरी कंटाळा येईपर्यंत ठेवून घेणें बरें नाहीं. नाहीं तर पुनः येणार नाहीं. तारू, पुनः येऊन भेटशील ना?"

" येईन बरें, येतें. " असें ह्मणून तारा खोलींतून बाहेर पडली. तिला पोंचविण्याकारितां शिवरावही मागून चालले.

" खरेंच. दादा इतकी तिची तारीफ करीत होता, ती कांहीं विनाकारण नव्हे. आहेच तशी ती. " कुमुदिनी मनांत ह्मणाली.

---

# प्रकरण ७ वें.

—:o:—

## प्रेमाची फेड प्रेमानें.



शिवराव आणि तारा दोघेंजण तिसऱ्या मजल्यावरून उतरून दुसऱ्या मजल्याच्या गच्चीवर आलीं. त्या ठिकाणीं फुलझाडांच्या पुष्कळशा लहान मोठ्या कुंड्या व्यवस्थित रीतीनें ठेवलेल्या होत्या. त्यामुळें पाहणारास ती एक छोटीशी बागच आहे, असें वाटे. येथून जात असतां शिवराव ह्मणाले, "तारू, थोडी थांबशील काय?"

तारा मान हालवून ह्मणाली, " छे, छे ! फार उशीर झाला. काका काय बरें ह्मणतील ! "

शिवराव आर्जवानें ह्मणालेः--"पण फार वेळ नको. एक क्षणभरच थांब. आतांपर्यंत तूं ज्याच्या त्याजवळ बसलीस, बोललीस, सर्व कांहीं केलेंस. पण माझ्याबरोबर तूं थोडें तरी निवांतपणें बोललीस का ? येथून जाण्यापूर्वीं तूं थोडा वेळ—एक क्षणभर कां होईना—माझ्याबरोबर बोललीस एवढें तरी समाधान मला वाटूं दे. "

" छे, छे! मला गेलें पाहिजे. " असें म्हणत ती तशीच पुढें चालली. तेव्हां शिवराव लगबगीनें तिच्या पुढें जाऊन व तिच्या समोर उभे राहून काकुळतीस येऊन ह्मणाले, " तारू ! "

ती केविलवाणें तोंड करून त्यांजकडे पाहूं लागली. पण त्यांना मात्र एखाद्या गुलाबाच्या नाजुक व सुकुमार फुलाप्रमाणें तिचें रूपलावण्य आपणापुढें उभें आहें असें दिसलें. ते किंचित् तिच्याजवळ येऊन ह्मणाले, " तारू, मी बोलतोंच आतां. तुला एकदाचें सांगून टाकतों. तुझ्यावर माझें प्रेम आहे. खरेंच तारू तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे. "

एवढेच शब्द शिवराव बोलले. पण ह्या शब्दांनीं तारेला काय वाटलें, तिच्या मनाची कशी स्थिति झाली, हें फक्त तिच्या स्थितींतल्या स्त्रीलाच सांगतां येईल. ती अद्यापि वयानें लहान होती. असे प्रेमासंबंधाचे उद्गार तिनें आपल्या चुलत्याच्या तोंडून निघाल्याचें फक्त ऐकलें होतें. आतां सुद्धां त्या शब्दांचा खरा खुरा अर्थ तिला क्वचितच समजला. शिवराव आपल्या समोर उभे असून आपल्याकडे विनयशीलपणानें, उत्सुकतेनें, व आतुरतेनें पहात आहेत एवढेंच तिला दिसलें. त्यांच्या दृष्टीवरून आपणास प्रतिरोध करितां येणार नाहीं असा अधिकार त्यांच्या दृष्टींत आहे असें तिला वाटलें. आपले डोळे त्यांच्या डोळ्यांकडे जणूं ओढले जात आहेत असें तिला वाटलें. ते पुनः ह्मणाले, " तारू, तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे. " त्यांचा आवाज मधुर गायनासारखाच वाटला. शब्द निघून गेले तरी किती तरी वेळ तिच्या कानांमध्यें तो आवाज घुमत राहिला.

तिची मुद्रा पालटली व तिच्या अंगांस कंप सुटला, तिनें त्यांच्याकडे पाहून म्हटलें, " छे ! छे ! "

" पण--पण तशी स्थिति झाली आहे. " असें ते किंचित् पुढें सरकून व तिच्या आश्चर्यचकित त्रस्त नेत्रांकडे पाहून ह्मणाले, " तारू, खरेंच तूं मला आवडतेस. "

" छे ! छे ! " ती पुटपुटली. " ती गोष्ट अशक्य आहे."

त्यावरोबर त्यांच्या त्या उत्सुक चेहऱ्यावर एक अस्पष्ट हास्य चमकून गेलें. त्यायोगें त्यांच्या डोळ्यांतील प्रेमविकार जास्तच बळावत आहे, असा तिला भास झाला. ते ह्मणाले, " तर अशक्य ! तुझ्यावर प्रेम न करणें हेंच अशक्य आहे असें मी ह्मणतों. तारू, तूं माझ्यावर रागावशील होय ? माझ्याकडून कांहीं चुकलें, कांहीं गैरशिस्त प्रकार झाला कीं काय ?

खरेंच, माझ्याकडून जरा घाई झाली, उद्धटपणाचें व असभ्यपणाचें वर्तन झालें. माझें सुंदर प्रीतिपात्र किती पवित्र व सुकुमार पुष्प आहे हें मीं ध्यानांत आणावयाला पाहिजे होतें. माझी तारा–ही एक आकाशांतीलच पवित्र व देदिप्यमान तारा आहे. तिच्याकडे भीत भीत, पूज्यबुद्धीनें जावयास पाहिजे होतें. एकदम जाऊन छापा घालायला नको होता. मी थोडा जास्त घमेंडीत गेलों. मीं येथें इतकें बोलायला नको होतें; पण तारू, माझें प्रेम कसें आहे तुला ठाऊक नाहीं. एखाद्या पर्वतावरून पडणारा पाण्याचा प्रवाह जसा प्रतिरोध करण्यास कठिण, त्याप्रमाणें तारू, माझा प्रेम-प्रवाह आहे. त्याच्या मार्गांत जी जी वस्तु सांपडेल, त्या त्या वस्तूला तो आपल्याबरोबर घेऊन जाणार. तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे तें अशा प्रकारचें आहे. आतां सांग तूं काय उत्तर देणार तें ? ” असें बोलत ते तिच्या जास्तच जवळ आले. त्यांच्या श्वासोच्छ्वासाच्या वायुलहरींनीं आपल्या डोकीचे केश हालत आहेत, असें तिला वाटलें. त्यांच्या छातीच्या धडधडण्याचा आवाज सुद्धां तिला ऐकूं येऊं लागला. तिनें त्यांना काय बरें उत्तर द्यावें ? तिनें आपलें अंतःकरण उघड करून सांगावयाचें ठरविलें असतें, तर त्यांच्या छातीवर आपली मान टाकून ‘ माझा स्वीकार करा ’ असें ती बोलली असती; पण ती जरी अद्यापि बालस्वभाव होती, केवळ बालाच होती, तरी आपल्यामध्यें व शिवरावांमध्यें किती अंतर आहे ह्याची तिला थोडी तरी कल्पना, नव्हे, जाणीव होती. तीं दोघें हल्लीं ज्या ठिकाणीं–ज्या गच्चिवर–उभीं होतीं, तें स्थळ–ती गचीच त्यांच्या परस्परांमधील अंतर स्पष्ट दाखवीत होती. चंद्रगडचे जहागीरदारपुत्र व यःकश्चित् चित्रकराची पुतणी या दोघांमधील अंतर–जमीनअस्मानाचें अंतर–तेथून स्पष्ट दिसत होतें.

ती कांहीं बोलत नाहीं, असें पाहून शिवराव किंचित् निराश होऊन आर्जवानें बोलले, “ तूं माझ्याशीं बोलत नाहींस ? एक शब्द सुद्धां बोलायचा नाहीं अं ? मी जे शब्द बोललों त्याच शब्दांनीं मला प्रत्युत्तर देण्याकारितां तुझीं तीं सुंदर ओष्ठबिंबें हाललेलीं पहावींत अशी माझी केवढी इच्छा आहे ? तारू, ‘ तुमच्यावरहि माझें प्रेम आहे, ’ एवढे

शब्द तुझ्या तोंडांतून निघालेले ऐकण्याकरितां मी माझें सर्वस्व देण्यास तयार आहें."

ती पुनः मान हालवून ह्मणाली, "छे छे! मला पुनः विचारूं नका मला त्रास होतो."

"माझें तुझ्यावर प्रेम जडलें आहे हें ऐकून तुला त्रास होतो काय? याचाच तुला राग आला होय? याबद्दलच तुला वाईट वाटत आहे काय? तारू, माझ्यावर तूं प्रेम करीत नाहींस काय? प्राणप्रिये, जिवलगे, एकवार, फक्त एक क्षणभर झालें तरी हरकत नाहीं, पण 'माझी प्राणप्रिया' असें ह्मणाण्याला मला परवानगी दे. पहा, तूं आतां माझीच आहेस" असें ह्मणून त्यांनीं आपले दोन्ही हात वर केले. "माझ्या बाहुपाशांत तूं बद्ध आहेस. एक क्षणभर कां होईना, तुझ्याकडून ऊत्तर येईपर्यंत तरी तूं माझी हो. तारू, तुला वाईट वाटतें होय? तुझ्यावर माझें सर्वस्वी निःसीम प्रेम आहे, त्या सर्व प्रेमाच्या मोबदला ह्मणून थोडें तरी प्रेम तूं माझ्यावर करीत नाहींस काय? हें तुझ्या कोमल स्वभावाला योग्य आहे काय? तारू, बोल, बोल!"

ती कष्टी होऊन ह्मणाली, "मला आतां बोलायला जास्त आग्रह करूं नका. मी जातें. उशीर नाहीं का झाला?"

शिवरावः--"छे छे! मला उत्तर दिल्यावांचून तूं जाऊं नकोस. तूं कां बोलत नाहींस? मी ह्मणजे कोणीच नाहीं, अगदींच क्षुल्लक, तुच्छ तुझ्या पासंगाला सुद्धां लागावयाचा नाहीं असें तुला वाटतें काय? तसें असेल तर स्पष्ट सांग. जी खरी गोष्ट असेल ती सहन करण्यास अत्यंत कठिण असली तरी स्पष्टपणें सांगितलेली बरी. पण हें डळमळीत स्थितींत राहणें नको. तारू, बोलग."

"तसें नव्हे, तें कारण नव्हे" असें ती खालीं मान घालून ह्मणाली.

"तर मग कोणतें?" असें ह्मणून तिचें उत्तर ऐकण्याकरितां त्यांनींहि आपली मान किंचित् लवाविली.

ती ह्मणाली, "तें नव्हे. पण--पण आपण विसरला वाटतें?"

" विसरलों ? काय विसरलों बरें ? " असें त्यांनीं विनयशीलपणानें विचारिलें. त्यांचे नेत्र उत्कट औत्सुक्यानें चकाकूं लागले.

ती अस्पष्ट शब्दांत बोलली, " मी कोण, आपण कोण, हें विसरलां वाटतें ? "

"ह्या पृथ्वीतलावर संचार करणाऱ्या यच्चयावत् प्राण्यापेक्षां तूं मला अत्यंत सुंदर श्रेष्ठ व अमूल्य वाटतेस, ह्याखेरीज मी सर्व कांहीं विसरलों आहें." असें ते आतुरतेनें बोलले. नंतर आपल्या नैसर्गिक अभिमानानें त्यांनीं ह्मटलें, " तारू, दुसऱ्या गोष्टी ध्यानांत ठेवण्याची मला गरज काय ? "

ताराः—" तुह्मांला गरज नसेल, पण मला गरज आहे. मीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. तें विसरून भागणार नाहीं व विसरणें शक्यही नाहीं. किंबहुना ध्यानांत ठेवणें माझें कर्तव्य आहे असें मी समजतें. मी तारा ह्मणजे यःकश्चित् गरीब चित्रकाराची पोर ह्मणजे कोणीच नाहीं आणि आपण. "

" मी कोण ? " असें शिवरावांनीं लागलीच विचारिलें. जणुं तिच्या प्रत्येक प्रश्नाला प्रत्युत्तर देण्याला त्यांची पूर्ण तयारी होती.

" तुह्मी ? " ती सभोंवार पाहून ह्मणाली. " तुह्मी ना ? तुह्मी जहागीरदारांचे चिरंजीव—ह्या सुंदर वाड्याचे, येथील अपार संपत्तीचे मालक. तुह्मी मघाशीं जे शब्द बोलला ते पुनः बोलूं नका. तुमच्यासारख्याला हें योग्य नव्हे. "

शिवरावः—" तर मग तुझें म्हणणें मी असा आहें, श्रीमंत आहें, ह्मणून मी गरीब, भिकारी व्हावें, असेंच कीं नाहीं ? माझ्याजवळ इतकें आहे, मला सर्व गोष्टींची अनुकूलता आहे सबब ज्या एका वस्तूमुळें बाकीच्या वस्तू बाळगाव्यासारख्या वाटतात ती वस्तु मला मिळूं नये असेंच तुझें म्हणणें कीं नाहीं ? तारू, हें जर खरें असेल तर मग पुष्कळ बिघे जमिनीचा मालक होण्यापेक्षां त्या जमिनीवर मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारा होणें बरें असें मला वाटतें. पण तशी स्थिति नाहीं. मी गरीब आहें कीं श्रीमंत आहें, सरदारपुत्र आहें कीं यःकश्चित् मनुष्य आहें याची मी फिकीर करीत नाहीं," थोडा विचार करून ते म्हणाले.

" छे छे, मी त्याची फिकीर करतों. तुझ्याकरितां मी त्याची फिकीर करतों. मीं पूर्वीं कधींहि या माझ्या संपत्तीची, जहागीरीची फिकीर केली नाहीं. मला ही गोष्ट पूर्वीं कधीं उमगली नाहीं. परंतु आतां माझ्या सर्व लक्ष्यांत आलें, मला आतां आनंद वाटत आहे. कारण तुला कळलें काय ? "

तारेनें नकारार्थीं मान हालविली, व ती खालीं पाहूं लागली.

" कारण असें कीं तुला हें सर्व मला अर्पण करितां येईल, " असें म्हणत शिवराव तिच्या चरणीं लीन झाले. " तारू, ह्या तुझ्या चरण-कमलीं मी माझें ऐश्वर्य, संपत्ति, सरदारी सर्व कांहीं अर्पण करितों. तें स्वीकार करण्या योग्य आहे असें तुला वाटत असेल तर घे. आणि माझ्या बरोबर तूं त्यांची स्वामिनी हो. तुझ्या प्रेमाशीं तुलना केली तर जहागीर, संपत्ति, हीं सर्व मला कःपदार्थ वाटतात. तारू, मी फक्त तुझ्या प्रेमाचा भुकेला आहें, तेवढें मला वाढ म्हणजे मग कांहीं नको. " असें म्हणत ते तिला आलिंगन देण्याकरितां उद्युक्त झाले.

त्यांच्या त्या प्रेमाच्या आतुरपणापासून भिऊन तारा चटकन् मागें सरकली. त्याबरोबर तेहि उठून उभे राहिले, व एका कोचावर तिला बसवून तिच्या शेजारीं शांत व अनुतापपूर्ण मुद्रेनें उभे राहिले.

" तारू, मला क्षमा कर. मीं तुला विनाकारण भिवविलें. आतां पहा मी कसा शांतपणें व लीनतेनें उभा राहतों. फक्त तूं माझें बोलणें ऐकून घे म्हणजे झालें. "

ती कांपत कांपत पुटपुटली, " छे छे, मला तसें करतां येणार नाहीं. तुमच्या म्हणण्याला जर मीं रुकार दिला तर माईसाहेबांना भेटा-यला मला तोंड आहे काय ? वाड्यांतील सारे लोक मला काय म्हणतील बरें ? हिनें तुमचें प्रेम चोरून नेलें असें म्हणतील कीं नाहीं ? "

" पण तूं कुठें चोरलें आहेत ? तारू, तुझ्यासारखी निष्कपट व निर्मल अंतःकरणाची एखादी मठवासी योगिनी सुद्धां असणार नाहीं. तूं

कांहींच चोरलें नाहींस. मींच तुला माझें सर्वस्व देऊन टाकलें आहे. मग तुला कां बरें ते दोष देतील ? ”

“ मिळून अर्थ एकच. ” ती पुटपुटली. “ त्यांना बरें वाटणार नाहीं. नाहीं, तसें होणें शक्य नाहीं.”

शिवराव सस्मित उत्तरले, “ शक्य कां नाहीं ? केव्हांच तें शक्य झालें आहे ! तारू, क्षणांत प्रेम करणारा, क्षणांत न करणारा असा मी आहें काय ? माझ्याकडे एकदां नीट पहा. वारा आला—मग तो थोडा असो अगर सोसाट्याचा असो, म्हणजे ज्याप्रमाणें पान हालतें त्याप्रमाणें मी आहें काय ? नाहीं, खात्रीनें नाहीं. मी स्पष्ट सांगतों, तुझ्यावर माझें जें प्रेम जडलें आहें तें काढून टाकतां येण्याजोगें नाहीं. त्याची मुळें फार खोल गेलीं आहेत. माझें प्रेम तुझ्यावर बसलें नाहीं, बसणें शक्य नाहीं, असें तूं जरी मला निक्षून सांगितलेंस तरी देखील माझें तुझ्यावर जडलेलें प्रेम लोपणार नाहीं. त्या प्रेमानें माझ्या हृदयांत मूळ धरलें आहे तें माझ्याशीं समानरूप झालें आहे, माझा अंशच बनलें आहे. तुला मीं प्रथम पाहिलें त्या वेळेपासून तुझी मला आठवण झाली नाहीं अशी एक घटका सुद्धां गेली नाहीं. तारू, झोपेंतसुद्धां तूं मला येऊन भेटतेस. माझें प्रेम तुमच्यावर आहे असें तूं माझ्या कानांत सांगितलेंस अशा प्रकारचें मला स्वप्न पडलें, तें स्वप्न खरें होऊं दे. जिवलगे, प्राणप्रिये, तुझें अंतःकरण जर माझ्यावर प्रेम करीत असेल तर तसें मला कळूं दे. मला सर्व जग म्हणजे तूंच. माझा सौख्याचा ठेवा तूं हिरावून नेऊं नकोस. माझ्या प्रेमाबद्दल तुला शंका येत नसेलच. होय ना ? ”

त्यांच्या प्रेमाबद्दल शंका ! तिला शंका येणें शक्यच नव्हतें. कारण त्यांच्या प्रत्येक शब्दांत, प्रत्येक दृष्टिक्षेपांत, प्रत्येक अंगविक्षेपांत खऱ्या, निर्मळ, शुद्ध प्रेमाचा ठसा दिसत होता. तरी पण अजून सुद्धां ती रुकार देईना. ते बोलत असतांना सुद्धां सरदार रामदेवरावांचा—त्या मानी पुरुषाचा तो रागीट चेहरा तिरस्कारानें आपल्याकडे पहात आहे. माई-साहेबांचे ते मनोहर डोळे आश्चर्य, तिरस्कार व संताप यांनीं पूर्ण असे आपल्याकडे लागले आहेत असें तिला वाटलें.

इतक्यांत कोणाचींशीं पावलें त्यांना ऐकूं आलीं. तेव्हां जरूर तर शिवरावांपासून दूर रहातां यावें या हेतूनें ती गडबडीनें उठली. पण शिवराव भिऊन जाणाऱ्यांपैकीं नव्हते. त्यांनीं तिचा हात धरला व जवळच्या सज्जाकडे बोट दाखवून ह्मटलें, "हा पहा सज्जा. तेथें इतका वारा व थंडी नाहीं. तेथें जाऊन बसूं या. आह्मां दोघांशिवाय तेथें तिसरें कोणीहि नाहीं, चल. काय सांगायचें तें सांगून टाक."

त्यांना प्रतिकार करण्यास ती असमर्थ होती. ते तिला त्या सज्जावर घेऊन गेले. एक वाऱ्याची मजेदार झुळूक येऊन आसपासचीं झाडें जणुं हर्षभरानें हालूंडुलूं लागली. धक्क्यावरून नदीचें पाणी खालीं पडत होतें त्याचा धो धो आवाज त्यांना मंजुळ गायनाप्रमाणें वाटला. समोरच्या आमराईमध्यें पक्षी कूजन करीत होते. त्या उभयतांचें जें परस्पर प्रेमाविष्करण होणार होतें, हृदयाचें मीलन होणार होतें त्याला जणुं सर्व जगाचें पूर्ण अनुमोदन आहे असाच भास होऊं लागला.

ह्या सर्व प्रसाद चिन्हांनीं शिवरावांचें अंतःकरण स्फुरण पावूं लागलें. ते म्हणाले, "तारू, आतां मला सांग. माझें म्हणणें पुनः एकदां नीट ऐकून घे. पुनः पुनः सांगण्याचा मला कंटाळा नाहीं. कधींच कंटाळा येणार नाहीं. सांगतों ऐक. तारू, तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे. खरेंच जडलें आहे. आतां यावर तूं काय उत्तर देणार तें दे. माझ्याजवळ येऊन माझ्या कानांत सांग पाहिजे तर. सांग, सांग. माझेंहि प्रेम तुमच्यावर आहे, असें मला सांग अगर मला येथून जायला तरी सांग. पण तूं तसें सांगणार नाहींस. खचित सांगणार नाहींस."

असें ह्मणून त्यांनीं तिला आपल्याजवळ घेतलें व तिला घट्ट आलिंगन देऊन तिचें प्रेमातिशयानें चुंबन घेतलें. त्याबरोबर तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. आनंदातिशयामुळें तिचा स्वर कंपित झाला. ती त्यांच्या छातीवर मान टाकून सलज्ज मुद्रेनें पुटपुली, "माझेंहि प्रेम तुमच्यावर आहे."

ह्या शब्दाचा शिवरावांना—ज्यांना आजपर्यंत शेंकडों सुंदर मुली सांगून आल्या होत्या त्या पुरुषाला—विशेष अर्थ वाटला. तरी त्यापेक्षां किती

तरी पटीनें जास्त तारेला वाटला ? ह्या चार शब्दांनीं त्या कुमारकेची शिवरावांवरील श्रद्धा व्यक्त करून दाखविली. त्या शब्दांनीं तिनें आपलें परम पवित्र जीवित, आपलें शुद्ध, निर्मळ व निष्कलंक अंतःकरण शिवरावांना अर्पण केलें ! त्यांच्यापेक्षां दसपट; नव्हे, शतपट अधिक प्रेमानें तिनें त्यांच्या प्रेमाची फेड केली. क्षणमात्र तीं स्तब्ध राहिलीं. त्यांची दृष्टि आकाशांतील अस्ताचलास जाणाऱ्या सूर्यबिंबाकडे लागली. ह्या सरळ प्रणयदानाच्या आनंदानें–गायनानें त्यांचें सर्वांग स्फुरण पावूं लागलें. नंतर तिला घट्ट आलिंगन देऊन त्यांनीं नुसता चुंबनांचा वर्षाव करून सोडला. ते पुटपुटले, " तारू, हें खरेंच ना ? जिवलगे, आज मला सर्व जग निराळें भासूं लागलें आहे. तुझें प्रेम माझ्यावर आहे ही गोष्ट मला इतकी आश्चर्याची वाटते कीं, मला ती खरीच वाटत नाहीं. प्राणप्रिये, खरेंच माझ्यावर तुझें प्रेम आहे ना ? " असें ह्मणून तिच्या तोंडाकडे सानंदमुद्रेनें ते पाहूं लागले. तिनेंहि चुंबनाची फेड चुंबनानें केली. दोघेंहि प्रेमसागरांत गढून गेलीं. जणूं सर्व जग स्वस्थ आहे असा त्यांना भास होऊं लागला.

लवकरच तारा शुद्धीवर आली व त्यांच्या बाहुपाशांतून मुक्त होण्याची खटपट करूं लागली. " मीं काय केले हें ? " ती पुटपुटली.

शिवराव हांसून ह्मणाले, " केलें ? एका मनुष्याला त्याच्या अगदीं अटकळीच्या बाहेर तूं सुखी करून टाकलेंस, एवढेंच. "

ताराः—" छे छे ! माझ्याकडून चूक झाली. मला भीति वाटते. "

शिवरावः—" कशाची भीति वाटते ? यांत भिण्याजोगें काय आहे ? कांहीं नाहीं. माझ्या बाहुपाशांत असतांना, माझ्या छातीवर तुझी मान असतांना भीतीची गोष्ट तूं काढतेस ? जिवलगे, तूं स्वस्थ बैस. "

ताराः—"अहाहा! मला किती सौख्य वाटत आहे? स्वप्न तरी नव्हे ना?"

त्यांनीं तिचें चुंबन घेऊन म्हटलें, " तुला हें स्वप्न वाटते काय ? तुला इतकें सौख्य वाटत आहे तर मग मी किती सुखी असेन याचा विचार कर. कारण पुरुषाचें प्रेम बायकांच्या प्रेमापेक्षां जास्त उत्कट असतें. मला कसें वाटत असेल यांचा विचार कर. "

" तरी पण तें गैरच झालें. मला त्याचीच भीति वाटते ! सर्व जग नांवें ठेवील." असें तारा सुस्कारा टाकून ह्मणाली.

शिवराव तिरस्कारपूर्वक हांसून म्हणालेः—" सर्व जग ! आह्मांला त्या जगाशीं काय करावयाचें आहे ? आम्ही दोघेंजण त्या जगाच्या बाहेर अगदीं दूर अलिप्त आहोंत. आमचें जग म्हणजे आमचें दोघांचें प्रेम ! आमचे दोघांचे दोन जीव एवढेंच !"

ताराः—" सारें जग काय ह्मणेल बरें आतां ? तुह्मी कोठें गेलां ह्मणून सर्व मण्डळी तुमची वाट पहात असतील. तुह्मी येथें माझ्याजवळ आहांत, हें व येथें झालेला सर्व प्रकार जर त्यांना समजला तर सर्वजण काय बरें ह्मणतील ? "

" ते ह्मणतील कीं, माझ्यासारखा नशीबवान् दुसरा कोणी नाहीं ! देवानें आपल्या दोन्ही हातांनीं आपला सर्व प्रसाद मला देऊन टाकला आहे व सर्व पदार्थांत उत्तम पदार्थ—या परम पवित्र व सुंदर अप्सरेचें प्रेम त्यानें मला दिलें आहे, असें ते ह्मणतील." ते काय ह्मणतील, हें शिवराव पूर्णपणें समजून होते व त्यांच्या गहजबाला काय उत्तर द्यावें, याचाच विचार त्यांच्या मनांत चालला होता.

" इश्श ! कांहीं तरीच ! " ती पुटपुटली.

" कांहीं तरी नाहीं. तूं खरोखरच देवांगना आहेस. तुझ्या पायाला सुद्धां स्पर्श करावयास मीं योग्य नाहीं."

" छे, छे ! तुह्मी तर माझे राजे, माझ्या जीवाचे कलिजे आहांत ! "

शिवराव जरी मनाचे धीट होते,तरी तिची निस्सीम श्रद्धा पाहून त्यांचें अंतःकरण द्रवूं लागलें. ते पुटपुटले, "तारू, तुला मागच्या सर्व गोष्टी माहीत नाहींत, समजलीस.तेव्हां—परंतु हें पहा, माझें सारें जीवित आजपासून मीं तुझ्या स्वाधीन केलें आहे. तें इतःपर तुझेंच आहे."

त्यांचे ते उत्कट प्रेमाचे शब्द ऐकून तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले ती एकदम ह्मणाली, " होय. माझेंच. दुसऱ्या कोणीं हिरावून नेई पर्यंत तरी माझेंच आहे ! "

# प्रकरण ८ वें.

——:o:——

## प्रभाकराचा फोटो.

ताऱेचे शेवटचे शब्द ऐकतांच शिवराव दचकले. जणूं हें भाकितच आहे असें त्यांना वाटलें. इतका भारदस्तपणा, गंभीरपणा तिच्या बोलण्यामध्यें होता. " कोणाची छाती आहे तुला माझ्यापासून हिरावून नेण्याची ? " असें ते बोलले. नंतर किंचित् हांसून ह्मणाले:—" भित्रे, थरथर कांपणारे प्राणप्रिये, तुला कोणापासून कशाची भीति वाटते, तें तरी सांग ! "

" मला माईसाहेबांची—सर्वांचीच भीति वाटते. मी घरांत आलेली त्यांना–कुणाला खपणार नाहीं. मी कांहीं चंद्रिका नव्हे. ती किती श्रीमंत, थोर घराण्यांतील ! शिवाय रूपानें अतिशय सुंदर, सर्वगुणसंपन्न ! "

तिच्याकडे पाहून शिवराव सस्मित बोलले; " असेल, श्रीमंत असेल, सुंदर असेल, गुणवान् असेल, सर्व कांहीं असेल. पण आतां काय त्याचें ! तिच्या संबंधानें तूं कां बोलणें काढीत आहेस ? "

" कारण वाड्यांत ह्मणत होते–कुमुदिनीताईसाहेब ह्मणत होत्या, कीं तुमचें तिच्याशीं लग्न व्हावें अशी सर्वांची इच्छा आहे, ह्मणून. "

" ताईचें काय तूं मनावर घेतेस ? पुष्कळ उपवर मुलींसंबंधानें ती नेहमीं असेंच बोलत असते. या बाबतींत विशेषें करून आमच्या मातोश्री

फारच उतावळ्या झाल्या आहेत. झाल्या असतील. पण मी ह्मणतों, इच्छा ह्मणजे कांहीं घोडें नव्हे अगर गाडी नव्हे कीं, आपल्या आईबापांच्या मर्जी प्रमाणें त्यावर बसावें अगर खालीं उतरावें. प्रिये, मी चंद्रिकेला वरणार नाहीं. मी तुझ्या चरणाचा दास झालों आहें. माझा अव्हेर तूं करूं नकोस."

"तुह्मी माझ्यापासून दूर कुठें जाणार नाहीं?"

"कधीं नाहीं. कुडींत जीव आहे तोंपर्यंत येथें तुझ्या शेजारीं बसून राहीन."

"कुडींत जीव आहे तोंपर्यंत!" असें तारा पुनः बोलली. जणूं त्या शब्दांत मधुर गायनच आहे असें तिला वाटलें. "नेहमीं तुह्मी माझ्याजवळ बसून राहाल का? कानाला तरी हें फारच गोड लागतें."

"परंतु तें खरेंच आहे. त्याप्रमाणें मी करीन."

इतक्यांत संध्याकाळचे सहाचे ठोके पडले. त्याबरोबर तारा खडबडून उठली व ह्मणाली, "अगबाई! सहा वाजले! किती उशीर झाला तरी हा! आतां गेलेंच पाहिजे. येथून कोणीही न पाहतां, कोणालाही न समजतां कसें जातां येतें कुणास ठाऊक?" नंतर पुनः उभयतांनीं एकमेकांचें चुंबन घेतलें व दुसरे दिवशीं संध्याकाळीं नदीच्या घांटावर उभयतांनीं भेटावयाचें असें ठरवून दोघेंहि खालीं निघून आलीं.

इतक्यांत साबाजीही वाड्यांतून बाहेर निघाला; त्याला शिवरावांनीं एकदम ह्मटलें, "साबाजी, तुमचें चित्र ताईला फार आवडलें—तिला किती तरी आनंद झाला! तारूला सुद्धां विचारा पाहिजे तर, नाहीं ग तारू?"

तारेनें नुसती मान हालविली. नंतर साबाजी तिला ह्मणाला, "तारू, आतां जाऊं या, नाहीं? गाडी केव्हांची वाट पहात उभी आहे; तुला ताईसाहेबांनीं लवकर सोडलें नाहीं वाटतें?"

त्याबरोबर तारा किंचित् हांसली. तितक्यांत माईसाहेब ह्मणाल्या, "इतकी कांहीं गडबड नको करायला. अजून पुष्कळ अवकाश आहे." माईसाहेबांच्या मागोमाम चंद्रिकाही बाहेर आली. ती आपल्या स्पष्ट व खणखणीत आवाजानें पण वाईट वाटल्यासारखें दाखवून ह्मणाली,

पुणे मराठी ग्रंथालय

"ताराबाई, तूं निघालीस वाटतें? फार वेळ गांठसुद्धां पडली नाहीं. मी तुला त्या महिला–विद्यालयासंबंधानें किती तरी विचारणार होतें! मला वाटलें तूं आजची रात्र येथें राहशील."

माईसाहेबः—"तारू, पुनः इकडे येऊन भेट बरें कां?"

"ताईनें त्याबद्दल तिच्याकडून कबूली घेतली आहे." शिवराव ह्मणाले. नंतर सगळ्यांचा निरोप घेऊन साबाजी व तारा गाडींत जाऊन बसलीं व गाडी चालूं लागली.

त्यांच्या खोपटाजवळ गाडी येतांच तीं दोघेंहि गाडींतून खालीं उतरलीं. त्या वेळीं चोंहोंकडे अंधार पडला होता. त्यांत खोपटाच्या दाराजवळ एक उंच आकृति उभी असलेली पाहून तारा दचकून ह्मणाली; "काका, कोण हो तें?

साबाजीः—"कोठें कोण तें?" नंतर तो वळून दाराकडे पाहून ह्मणाला, "कोण? तुह्मी का शामराव? इतक्या तिन्हीसांजच्या वेळीं कोणीकडे."

शामरावः—"होय, मीच तो, सहज हवा खाऊन यावें ह्मणून बाहेर पडलों. फिरत फिरत इकडे आलों, तर तुह्मी वाड्यांत गेलां आहांत असें काकूबाईनीं सांगितलें, ह्मणून तसाच त्या मैदानाकडे गेलों. तिकडून परत नदीजवळ आलों, तर गाडीचा आवाज ऐकूं येऊं लागला. तुह्मी परत आलां असाल, भेटून जावें ह्मणून इकडे आलों."

"बरें झालें. या, आंत या. बिडी ओढा. पण तुमचा हात कां असा वर धरलेला आहे? फडकें बांधलेलें दिसतें."

शामरावः—"कांहीं विशेष नाहीं. काल एके ठिकाणीं ठेंच लागून मी पडलों, त्यामुळें हात जरा दुखावला आहे. जातों, आतां आंत नाहीं येत."

"अगदीं रात्र झाली." असें ह्मणून ते निघाले. इतक्यांत किंचित थांबून त्यांनीं आपल्या खिशांत हात घालून ह्मटलें, "खरेंच, बरी आठवण झाली. मुख्य गोष्टच मी विसरलों होतों. इकडे येतांना मघांशीं रस्त्यांत तार

ऑफिसांतील पोऱ्या भेटला, त्यानें ही तुमची तार मजकडे दिली." असें ह्मणून त्यांनीं ती तार साबाजीच्या पुढें केली.

साबाजी साश्चर्य भेदरून मोठ्यानें ओरडला, "माझी तार! ह्मणजे? मग मोठेंच आश्चर्य ह्मणायचें." साबाजीनें ती तार घेतली व तो आंत दिव्याजवळ जाण्यास निघाला. जातां जातां, "शामराव, याहो." असें तो शामरावांस ह्मणाला व आंत गेला.

"नको नको. मी जातोंच आतां." असें ह्मणत शामराव तारेकडे वळून ह्मणाला, "तारू, हात पाहिलास का किती सुजला आहे तो?"

तारा आपल्या बोटांनीं त्यांचा हांत दाबून ह्मणाली:-"खरेंच गडे. किती सूज आली ही! मला भारी वाईट वाटतें."

शामराव:—"तूं त्याबद्दल इतकें मनाला लावून घेऊं नकोस. आहे काय त्यांत? मी केव्हांच विसरून गेलों."

तारा:—"शिवरावांना सुद्धां मागाहून भारी वाईट वाटलें."

शामराव:—"यांत काय संशय? त्यांना वाईट वाटलेंच असेल. माझा हात मोडावा असें त्यांच्या मनांत खात्रीनें असणार नाहीं. खरो-खरच माझ्या निष्काळजीपणाबद्दल मला ही चांगलीच शिक्षा मिळाली. तरी पण मी सांगून ठेवतों कीं, अगदीं आयत्या वेळीं मी घोडा आंवरला असता."

तारा:—"होय. मला देखील तसेंच वाटतें. मला कांहींच इजा झाली नसती."

शामराव संतापून ह्मणाला, "नसतीच झाली. मला घोड्यावरून खालीं पाडण्याची अगर मला चिडविण्याची शिवरावांना कांहीं गरज नव्हती. पण, पण ते पडले मार्फीतले लोक."

तारा:—"ह्मणजे? मी नाहीं समजलें?"

शामराव:—"माझ्या बोलण्याचा अर्थ असा कीं, ज्या गोष्टी दुसऱ्या माणसांनीं मनांत सुद्धां आणतां कामा नये, त्या गोष्टी शिवराव बिनदिक्कत करतात, आणि त्याबद्दल त्यांना शासन होत नाहीं."

तारा सखेद ह्मणाली, " तुह्मांला किती लागलें हें कळलें तर त्यांना खरोखर फारच वाईट वाटेल, आणि ते तुमची मनोभावानें क्षमा मागतील. "

शामराव वरोपकरणी ह्मणाले, " त्याबद्दल माझी खात्री आहे. शिवाय—" ते खोंचून बोलले, " सरदार, शिवरावांकडून हात मोडून घेणें ह्मणजे त्यांत कांहीं विशेष आहे, नाहीं ? विदीर्ण अंतःकरणापेक्षां पुष्कळ बरें. "

तारा साश्चर्य ह्मणाली, " विदीर्ण अंतःकरण ? ह्मणजे काय ? " असें ह्मणतां तारेचा चेहरा लाल झाला व क्रोधभरानें आरक्त झालेले तिचे नेत्र त्यांना आव्हान करूं लागले.

शामराव ह्मणाला, " दुसऱ्याचे अवयव मोडून टाकण्यांत शिवराव जसे पटाईत आहेत तसेच ते दुसऱ्याचें अंतःकरण विदारण्यांतहि प्रवीण आहेत. पण छे ! मी विसरलोंच. तुझ्या देखत चंद्रगडच्या भावी जहागीरदारासंबंधानें कांहीं बोलून उपयोगी नाहीं. जास्त कमी शब्द माझ्या तोंडांतून गेले असतील तर मला क्षमा कर. जातों." असें ह्मणून व किंचित् वक्रदृष्टि करून शामराव तेथून गेले. तारा क्षणभर त्यांच्याकडे पहात उभी राहिली. गार व रुक्ष वारा अंगाला झोंबला ह्मणजे जसे शहारे यावेत, तसे तिच्या अंगावर शहारे आले. अंतःकरण विदीर्ण करणें ह्मणजे काय हाच प्रश्न तिच्या मनांत घोळूं लागला.

इतक्यांत साबाजीच्या तोंडचे कांहीं शब्द ऐकून ती दचकली व तिकडे वळून पाहूं लागली. तर साबाजी दिव्याजवळ उभा राहून तार वाचीत असल्याचे तिला दिसलें. त्याचा चेहरा फिका व काळजीनें काळवंडलेला दिसूं लागला.:—" शिव ! शिव ! आतां मी कसें करूं ? " असें तो आपल्याशीं एकदम पुटपुटला.

तारा गडबडीनें त्याजकडे जाऊन ह्मणाली:—" काका, काय झालें ? कसली तार आहे ? "

ती तार चुरमुडून हातांत धरून साबाजी ह्मणाला, " छे, छे ! एवढी गोष्ट खेरीज करून मी काय पाहिजे तें तुला सांगेन. " नंतर थोडा

शांत होऊन तो ह्मणाला, " तारू, बातमी फार वाईट आली! " त्याची मुद्रा अत्यंत दुःखपूर्ण दिसूं लागली.

तारा ह्मणाली, " पण काका, काय बातमी आहे सांगा तरी. तुमच्या दुःखामध्यें मी भागिदारीण होईन. दुःख विभागलें गेलें ह्मणजे तितका त्याचा तीव्रपणा कमी होतो. कुणाची तार आहे ? "

" मला विचारू नकोस. माझ्यानें सांगवत नाहीं. मोठ्या शरमेची गोष्ट आहे. ह्या काळिम्यानें मला मरण देखील येईल. "

" काळिमा ? काका, तुह्मांला काळिमा ? मग मोठेंच आश्चर्य! "

साबाजी त्वेषानें मुठी आवळून ह्मणाला, " खरेंच तारू, हा काळिमाच बरें! किती भयंकर व अपमानास्पद! मोठी बेअब्रूच ह्मणावयाची. आजपर्यंत मिळविलेला सगळा नांवलौकिक जाऊन आतां या माझ्या म्हातारपणांत बट्टा लागण्याची पाळी आली. शिव शिव !" किंचित् विचार करून तो पुनः ह्मणाला, " तारू, किती वाजलें बरें ? मला मुंबईला गेलें पाहिजे. प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. व्यर्थ दवडून उपयोगी नाहीं."

तारा भीतियुक्त मुद्रेनें ह्मणाली, " आतां इतक्या रात्रीं मुंबईला जाणार ? छे, छे ! तें जमायचें नाहीं. "

" मला गेलेंच पाहिजे. काम तसेंच निकडीचें व जरूरीचें आहे. तीन वाजतां एक गाडी आहे. ती गाडी साधेल. मी आतां निघतोंच. "

" पण काका, तुह्मी एकटेच जाऊं नका. मी येतें बरोबर. "

" नको नको. मी एकटाच जातों. या कामीं मला कोणाचीहि मदत उपयोगी पडणार नाहीं. देव तुझें कल्याण करो. आपल्या सप्रेम सहानुभूतीनें माझें दुःख सहन करण्याच्या कामीं तूं मला मदत करीत आहेस, याचें मला फार कौतुक वाटतें. तारेंतील मजकूर तुला सांगण्याचें माझ्या मनांत फार होतें; पण नाहीं सांगत. तारू, माझ्यानें सांगवत नाहीं. "

तारा हळूंच बोलली, " तर मग काका, नकाच सांगूं; पण तिकडे फार दिवस राहूं नका बरें, लवकर या. "

" जरूरीपेक्षां जास्त राहाणार नाहीं. तारू, तूं आनंदानें रहा. आपल्या प्रकृतीला जपत जा. काकूबाई आहेतच तुझी काळजी घ्यायला.

तुला सोडून जाववत नाहीं. पण इलाज नाहीं. बाळ, तुझ्यापासून एखादी गोष्ट इतक्यांतच गुप्त ठेवावी लागेल, असें मला वाटलें नव्हतें. ”

हे शब्द ऐकतांच तारेच्या अंतःकरणाला दचका बसला व तिचा चेहरा सलज्ज झाला. तिचीसुद्धां एक गुप्त गोष्ट होती. पण साबाजीस आलेल्या तारेमुळें जी भीति उत्पन्न झाली होती, त्या भीतीनें तिला त्या गोष्टीची आठवणच नव्हती. तीं आतां तिच्या मनास पटली व ती चपापली.

साबाजी पुढें ह्मणाला, “ आह्मां परस्परांमध्यें गुप्त गोष्टी राहणें बरें नाहीं, परंतु–तारू, तूं कशाला इतकी कष्टी होतेस ! मी फार दिवस तिकडे राहणार नाहीं. लवकरच परत येईन. ” असें ह्मणून साबाजी घरांतून बाहेर पडला व स्टेशनवर जाण्यासाठीं निघाला.

आपल्या चुलत्यावर जें गुप्त व भयंकर संकट येऊन गुदरलें होतें, त्याकडेच तारेचें मन वेधून गेलें; व थोडा वेळपर्यंत तिला काळजी लागून राहिली. इतक्यांत संध्याकाळीं किल्ल्यांतील वाड्याच्या गच्चीवर जो प्रकार घडला त्याची आठवण तिला झाली. त्याबरोबर तिचें सर्व दुःख नाहींसें झालें आणि सरदार शिवरावांचा तो मोहक चेहरा व त्यांचें प्रेमाचें संभाषण हें सर्व तिच्या समोर उभें राहिलें. तो सर्व प्रकार इतका आकस्मिक व विलक्षण तऱ्हेनें घडून आला होता, कीं, तिला जणूं हें सर्व नाटकच आहे असें वाटलें. त्या नाटकाची रंगभूमि तो टोलेजंग व भव्य वाडा असून वाड्यांतील खाशा स्वाऱ्या व इतर मंडळी हीं त्या नाटकांतील किरकोळ पात्रें आहेत व सरदार शिवरावांची ती ऐटबाज, नयनमनोहर मूर्ति मुख्य नायकाचें काम करीत असून मुख्य नायिकेची भूमिका आपणाकडे आली आहे असें तिला वाटूं लागलें. त्यांच्या सप्रेम व उत्कट चुंबनाची गोडी तिला वाटूं लागली; त्यांच्या परिणद्ध बाहुपाशाचें अलौकिक सौख्य ती अनुभवूं लागली; पण हा सर्व प्रकार खरोखरच घडला होता. शिवरावांवर तिचें अत्यंत प्रेम होतें व आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांचेंहि प्रेम तिच्यावर बसलें होतें. शिवराव श्रीमंत, थोर, बडे जहागीरदार ! अशा राजबिंड्याचें प्रेम आपल्यावर कां बसावें, याचेंच

तिला आश्चर्य वाटूं लागलें. शिवरावांनीं आपल्या रूपाचें व गुणांचें इतकें वर्णन व कौतुक करावें, आपल्याला इतकी पूज्य मानावी अशी ती कोण ! हाच विचार तिच्या मनांत घोळूं लागला.

ह्या विचारांतच तारा त्या खोलींतून इकडून तिकडे खेपा घालूं लागली. मध्येंच भिंतीकडे तोंड करून ठेवलेल्या तसबिरीची तिला आठवण झाली. त्याबरोबर, जसा एखादा कृपण मनुष्य गुप्त ठेवलेल्या धनसंचयाची आठवण होतांच त्याजवर उत्कंठेनें झडप घालतो, त्याप्रमाणें तिनें चट्दिशीं जाऊन शिवरावांची तसबीर घेतली, व तिच्याकडे आतुरतेनें व सप्रेम दृष्टीनें बराच वेळ नजर लावून तिनें तिचें चुंबन घेतलें. त्या विशाळ व काळ्याभोर डोळ्यांतील चमकणारें हास्य ह्मणजे काय हें तिला आतां समजलें. प्रेमप्रकाश त्या डोळ्यांतून कसा चकाकत होता, हें तिला आज दिसून आलें. तसबीर जागच्या जागीं ठेवीत असतांना तिचा हाताचा धक्का एका लहानशा पेटीस लागून ती पेटी खालीं पडली. तिचें झांकण उघडलें गेल्यामुळें आंतील सर्व जिन्नस बाहेर जमिनीवर पडले. ती गडबडीनें ते जिन्नस पेटींत भरून ठेवूं लागली. एक लहानसें कागदाचें पाकीट पेटींत ठेवीत असतां त्यांत एक फोटो असल्याचें तिला दिसलें. त्या फोटोकडे विशेष लक्ष्य न देतां तो जागच्या जागीं ती ठेवणार होती. इतक्यांत त्या फोटोच्या खालीं लिहिलेल्या शब्दांकडे तिचें लक्ष्य वेधलें. फोटो घेऊन ती तत्काळ दिव्याजवळ गेली.

तो फोटो एका मुलाचा होता. त्याच्या भिंवया रेखल्यासारख्या, हांसत मुख व डोळ्यांत चमक असून चेहरा फारच मोहक होता. खालच्या बाजूस ‘प्रभाकर’ एवढीं चारच अक्षरें लिहिलेलीं होतीं.

तिनें पुनः एकवार—पण निष्काळजीपणानेंच—त्या चेहऱ्याकडे पाहिलें. इतक्यांत आपल्या माहितींतल्या कोणा तरी माणसाच्या चेहऱ्यासारखा याचा चेहरा आहे अशी कल्पना तिच्या डोक्यांत एकदम येऊन गेली. त्यामुळें ती जरा जास्त लक्ष्यपूर्वक पाहूं लागली. आतां तर शंकाच राहिली नाहीं. तिच्या चुलत्याच्या—साबाजीच्या चेहऱ्याशीं त्या फोटोंतील चेहऱ्याचें साम्य तिला दिसलें; इतकेंच नव्हे, तर आपल्याही चेहऱ्यासा-

रखा त्या फोटोचा चेहरा आहे असें तिला वाटलें. कारण त्या फोटोवरून डोळे उचलून तिनें समोरच्या आरशांत आपलें प्रतिबिंब पाहिलें तर फोटोमध्यें जी एक प्रकारची चर्या दिसत होती, तसलीच चर्या आरशांत तिला दिसली. ती आश्चर्यचकित होऊन स्वतःशींच पुटपुटली. " प्रभाकर प्रभाकर ! हा कोण प्रभाकर बरें ? या नांवाचा कोणी मनुष्य माझ्या ओळखीचा नाहीं. "

नंतर ती त्या लवंडलेल्या पेटीकडे पुनः गेली व त्यांतून आणखी कांहीं पाकिटें तिनें काढिलीं; पण तीं सर्व बंद होतीं. ह्या सर्व प्रकारांत कांहीं गुह्य होतें. तेंच तिला जाचूं लागलें, व तिच्या पाठीस लागलें. नंतर निश्चयकरून तिनें तो फोटो पाकिटांत घालून जागच्या जागीं ठेवला. असें करीत असतां तिची नजर तिच्याकडे हास्यवदनानें पाहणाऱ्या त्या–शिवरावांच्या–तसबिरीकडे गेली व त्याबरोबर एक आकस्मिक विचार–कांहीं अंशीं भविष्यसूचक, कांहीं अंशीं अतर्क्य, अमानुष, असा तिच्या डोक्यांत आला. ती ह्या घरीं प्रथम ज्या दिवशीं आली, त्या दिवशीं ह्याच तसबिरीनें तिला प्रथम भेट दिली होती व नंतर जो प्रकार घडला तो सर्व त्या तसबिरीनें सुचविला होता. त्याप्रमाणेंच त्या मुलाचा फोटोही तिच्या सहजच दृष्टीस पडला. यांत कांहीं विशेष होतें काय ? ह्या मुलासंबंधानें कांहीं भानगडीचा प्रकार पुढें येणार आहे काय ? असा एक विचार तिच्या मनांत येऊन गेला. स्वतःस किंचित् दोष लावून तिनें ती वेडेपणाची कल्पना मनांतून घालविली; व तो सुंदर फोटो पेटींत जागच्या जागीं ठेवून ती निजावयाला गेली. पण स्वप्नांत सुद्धां त्या मुलाचा चेहरा तिच्या समोरून हालला नाहीं.



# प्रकरण ९ वें.

—:o:—

## अनिष्ट बातमी.

तारा व साबाजी गाडींत बसून निघून गेल्यानंतर त्या गाडीकडे पहात शिवराव एक दोन मिनिटें तसेच उभे राहिले व गाडी दिसेनाशी झाल्यावर ते वाड्यांत येऊन आपल्या खोलीकडे गेले. चंद्रगडचें जहागीरदार घराणें म्हणजे भारी मानी व तापट. अगदीं सौम्य रीतीनें बोलावयाचें म्हटलें तरी, दूरदर्शीपणा व पोक्त विचार यांचा शिवरावांच्या ठिकाणीं बहुतेक अभावच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें हृदय उत्कंठेनें जरी जलद उडत होतें, व त्या सुकुमार कुमारिकेची मूर्ति आपल्या निष्कलंक कौमार्यसौंदर्यांत त्यांच्या डोळ्यापुढें नाचत होती, तरी ह्या एकंदर स्थितीचा विचार करण्याकरितां ते क्षणभर स्तब्ध उभे राहिले. इतका वेळ ते आपल्या खोलींतून इकडे तिकडे खेपा घालीत होते. कांहीं वेळ विचार केल्यावर ही स्थिति फारच विलक्षण आहे, झाला हा प्रकार फारच चमत्कारिक झाला, असें कबूल करणें त्यांस भाग पडलें, व आपल्याशींच ते किंचित् हांसले.

इतिहासप्रसिद्ध, राजवैभवशाली जहागीरदारांच्या राजबिंड्या पुत्रानें यःकश्चित् चितार्‍याच्या पुतणीबरोबर—ती रूपानें कितीहि जरी सुंदर, मूर्तिमंत रतिच असली, तथापि संपत्ति अगर घरंदाजपणा

यांपैकीं कशाशीच जोड तिच्या रूपाला नाहीं अशा मुलीबरोबर, लग्न करून घेण्याचें मनांत आणावें अं ? आपल्या मातुःश्रीची अत्यंत मोठी इच्छा म्हणजे आपण एकदांचें लग्न करून घ्यावें, व आपला संसार थाटलेला पहावा, अशी असल्याचें शिवराव पूर्णपणें जाणून होते. त्या-प्रमाणें लग्न करून घेण्याचा त्यांचा विचारहि ठरला हें खरें. परंतु हें कसलें लग्न, व हा संसार तरी कसला म्हणावयाचा ? अगोदरच वैभव-शाली असलेल्या घराण्यास ह्या लग्नापासून वैभवाची जोड मिळण्याऐवजीं, त्या घराण्याचा पूर्वीचा नांवलौकिक व दर्जा यांत भर पडण्याऐवजीं, या लग्नानें उलट कमीपणाच येणार व त्यामुळें त्या पिढीजाद व खानदानीच्या घराण्याचा मानमरातब बद्दु होणार असेंच सर्व लोकांचें मत पडावयाचें.

शिवरावांचे याप्रमाणें विचार चालले असतां जेवणाची वर्दी आली म्हणून ते खालीं निघून गेले. तारेसंबंधानें माईसाहेबांचें मत काय आहे हें समजून घेण्याची शिवरावांना फार इच्छा झाली होती. म्हणून जेवण झाल्यानंतर माईसाहेब, चंद्रिका, आत्याबाई वगैरे मंडळी बोलत बसलेल्या असल्याचें पाहून शिवरावहि तेथें जाऊन गप्पा मारीत बसले. बोलतां बोलतां साबाजी व तारा यांच्यासंबंधानें भाषण काढून शेवटीं त्यांनीं माईसाहेबांस म्हटलें, "आई, तारेसंबंधानें तुझें काय मत आहे ?"

माईसाहेबः—"ती कशी आहे याबद्दल मीं नाहीं इतका विचार केला.. तरी पण तिचा चेहरा आनंदी दिसतो."

"आनंदी चेहरा !" इतकेंच शिवराव बोलले. त्यांच्या भिंवया किंचित् चढल्या. माईसाहेबांची वर्णन करण्याची तऱ्हा फार सौम्य आहे. आनंदी चेहऱ्यापेक्षां तारेच्या ठिकाणीं कांहीं तरी जास्त आहे असें त्यांना वाटत होतें. त्यांच्या मनांतील भाव ओळखून चंद्रिका त्यांच्याकडे हांसत पाहून म्हणालीः—"मला विचाराल तर मी सांगतें, कीं नुसत्या आनंदी चेहऱ्यापेक्षां तिच्यामध्यें कांहीं जास्त आहे. ती रूपानें फार सुरेख, फारच सुंदर आहे." तारा वाड्यांत आल्यापासून ती जाईपर्यंत शिवरावांनीं चंद्रिकेकडे पूर्ण दुर्लक्ष्य केलें होतें. याबद्दल तिनें हा शिवरावांना टोमणा

दिला. पण ही गोष्ट शिवरावांच्या लक्ष्यांत आली नाहीं. ते म्हणाले, " चंद्रिके, तुझें म्हणणें बरोबर आहे. ती खरोखरच रूपानें अतिशय सुंदर आहे." यावर पुनः चंद्रिका खोंचून हांसत बोलली, "आहेच तशी ती, मला फारच आवडते. " जणूं त्यांचें हृद्गत तिला समजलें. व तें आपणास पसंत पडलें असें तिनें दर्शविलें.

नंतर रात्र बरीच झाली म्हणून माईसाहेब निजावयास निघून गेल्या. शिवरावहि निजण्याकरितां निघाले. तेव्हां चंद्रिका त्यांना म्हणाली, " शिवराव, निजा आतां; स्वस्थपणानें झोंप घ्या, त्रास बराच झाला आहे, स्वप्नेंहि चांगलीं पडतील. "

शिवराव तिच्याकडे साश्चर्य पाहूं लागले. तिच्या बोलण्यांत कांहीं विशेष अर्थ होता काय ? तारेबरोबर त्यांचें जें बोलणें झालें होतें, तें चंद्रिकेनें आडून ऐकले असेल काय ? वगैरे विचार त्यांच्या मनांत आले. परंतु चंद्रिकेच्या चेहऱ्यावरून तसा कांहीं प्रकार त्यांना दिसून आला नाहीं. म्हणून ते मुकाट्यानें तेथून आपल्या खोलीकडें निघून गेले व पलंगावर जाऊन पडले.

शिवराव बिछान्यावर पडले खरे, पण त्यांना झोंप लागेना. तारेसंबंधानें नानाविध विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांची चित्तवृत्ति चलबिचल झाली. तिकडे माईसाहेबहि आपल्या अंथरुणावर या कुशीवरून त्या कुशीवर करीत होत्या. शिवरावांच्या लग्नासंबंधानें त्या फारच आतुर झाल्या होत्या. तरी पण तारेसंबंधानें शिवराव इतकी चौकशी करीत असल्याचें पाहून त्यांच्या मनाला अस्वस्थता आली होती. न जाणो, तारेवर त्याचें मन गेलें असावें असा एक दुःखद विचार त्यांच्या मनांत आला. चंद्रिकेला त्यांनीं मुद्दाम बोलावणें पाठवून चार दिवस इकडे राहण्याकरितां आणलें होतें. चंद्रिका रूपानें फारच सुरेख व श्रीमंत घराण्यांतील होती. अशी सून आपणांस मिळावी अशी माईसाहेबांची साहजिकच फार उत्कट इच्छा होती. परंतु तारा वाड्यांत आल्यानंतर तिला पाहून शिवरावांच्या वृत्तींत व चेहऱ्यांत कसा फरक पडला होता, हें त्यांनीं पूर्णपणें ओळखलें होतें. सर्व बाजूंनीं उत्तम अशा चंद्रिकेबरोबर

शिवराव लग्न करून घेईल अशी त्यांची समजूत होती. पण तारा येऊन गेल्यापासून शिवरावांच्या वृत्तीबद्दल त्यांच्या मनांत संशय येऊं लागला. ह्मणून चंद्रिकेसंबंधानें एकवार शिवरावांना सर्व हकीकत सांगून ते कांहीं वळतात काय पहावें, व त्यांच्या मनांत तरी काय आहे हें एकदां नीट पुरतेपणीं समजून घ्यावें, असा विचार करून त्या बिछान्यावरून उठल्या व तडक शिवरावांच्या खोलीकडे गेल्या.

मातुःश्रीस पहातांच शिवरावांना फारच आश्चर्य वाटलें. त्या निजावयाकरितां म्हणून गेल्या असून मध्येंच कां आल्या याचा विचार त्यांना पडला. मातुःश्रीकडे पाहून ते नेहमींच्या लडिवाळपणानें म्हणालेः—
" काय आईसाहेब, इतक्या रात्रीं इकडे येण्याची तसदी घेतली ? "

" झोंप येईना म्हणून आलें, झालें. शिवराया, खोली तर मोठी सुरेख शृंगारली आहेस ? ह्या इतक्या तसबिरी परवां मुंबईहून येतांना का आणल्यास ? "

शिवराव किंचित् हांसून म्हणाले, " होय, आई, पण ह्या तसबिरींसंबंधानें कांहीं गप्पा मारायला तूं या वेळीं आली नाहींस; तर मग कशा संबंधानें बरें ? घोड्याच्या शर्यतीसंबंधानें तूं बोलावयाला आली असावीस. मीं घोडे विकून टाकावेत असें तुझें म्हणणें आहे कीं काय ? "

" छे, छे ! मी नाहीं तसें म्हणणार. घोड्यांना पुष्कळ किंमत पडली हें खरें. पण तुला जर त्यांपासून करमणूक होते तर मी कशाला—" इतकें अर्धेच बोलून माईसाहेब थबकल्या.

शिवराव हांसून म्हणाले, " किंमत पुष्कळच पडली. पण आई, तुला खरोखर सांगतों, हे घोडे घेतल्यापासून मला कांहीं बरें वाटत नाहीं. कोणत्याच गोष्टीपासून मला अलीकडे बरे वाटेनासें झालें आहे. कारण कांहीं समजत नाहीं. "

" कारण कसलें समजायचें त्यांत ? तूं आतां एकदां लवकर लग्न करून घे म्हणजे तुला बरें वाटेल. "

माईसाहेबांकडून असें उत्तर येणार हें शिवरावांनीं आधींच ओळखलें होतें. त्यांची मुद्रा क्षणमात्र गंभीर दिसूं लागली. नंतर ते सस्मित ह्मणाले,

"पण आई, हा उपाय भयंकर नव्हे काय? घोड्यांच्या शर्यतीपासून मला मजा वाटावयाची राहिली, घोड्यांचा मला कंटाळा येऊं लागला तर घोडे विकून टाकले म्हणजे झालें. इतर करमणुकीचे पदार्थहि मला सहज सोडून देऊन मोकळे होतां येईल. पण एकदां लग्न झालें आणि तें अनिष्टकारक झालें तर तें कसें मोडतां येईल? तो त्रास फारच दुःसह होईल."

"पण लग्न अनिष्टकारक कां होईल, असें मी विचारतें."

"कधीं कधीं असें होतें खरें." शिवराव खोंचून बोलले.

"पण नवराबायकोचें एकमेकांवर चांगलें प्रेम असेल तर मग नाहीं होणार."

हे शब्द ऐकतांच शिवराव स्तब्ध झाले व त्यांचे डोळे जमिनीकडे लागले. त्या जमिनींतून तारेच्या चेहऱ्यासारखा मोहक चेहरा असलेली एक नाजूक सडपातळ व सुकुमार मूर्ति वर येत असल्याचें त्यांना दिसलें.

माईसाहेब पुढें ह्मणाल्या; "ज्या मनुष्यावर आपलें प्रेम असतें त्यांशीं लग्न केलें ह्मणजे जें सौख्य होतें, त्या सौख्यासारखें दुसरें सौख्यच नाहीं."

"तर मग माझ्यावर खरेंखुरें प्रेम करणारी बायको तूं मला पाहून देतेस? मग आहे माझी कबूली."

"तशी बायको मिळणार नाहीं असें का तुला वाटतें? शिवराया, तुझें लग्न व्हावें, तुझा संसार थाटलेला पहावा, नातवंडें पण पहावींत असें मला किती तरी वाटतें. शिवाय हल्लीं तुझें लग्नाचें अगदीं वय झालें आहे. तुझ्या स्वतःच्या सौख्याचा प्रश्न बाजूस ठेविला तरी इतर गोष्टी सुद्धां विचार करण्यासारख्या आहेत. तूं लग्न करून घेतलें नाहींस तर ह्या जहागिरीला पुढें वारस कोण? यापूर्वींच तुझें लग्न व्हायला पाहिजे होतें. मला बोलायला लावशील असें मला वाटत नव्हतें. तूं तसा निष्ठुर व हट्टी नाहींस. कांहीं थोर व कुलीन घराण्यांतील मुली तुझ्या व माझ्या पहाण्यांत आल्या आहेत. त्यांतून एखादी मुलगी आपणांस पसंत आहे असें तूं सांगितलेंस तर बरें होईल."

शिवरावांच्या चेहऱ्यावर किंचित् लाली चढली व त्यांचे डोळे जमि-

नीकडे लागले. त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां आपलें ह्मणणें त्यांना पटलें असें समजून माईसाहेब पुढें ह्मणाल्या, " ऐकून मला फार आनंद होईल व मी मनापासून तुझें ह्मणणें मान्य करीन."

" खरेंच कीं काय ?" शिवराव निर्हेतुकपणानें बोलले.

" अगदीं खरें. शिवराया, मीं आज ही गोष्ट तुझ्याजवळ काढली याचें तुला आश्चर्य वाटत असेल."

" थोडेंसें वाटत आहे खरें." शिवराव सस्मित बोलले. परंतु त्यांच्या हास्यांत मजा नव्हती. आपल्या मातेपासून आपण आपलें हृदय चोरून ठेवीत आहोंत, तिच्याशीं आपण गुप्तपणाचें व टाळाटाळीचें वर्तन करीत आहोंत असा विचार मनांत येऊन, त्यांच्या मानी पण सरळ मनाला वाईट वाटूं लागलें; त्यांच्या थोर व उदात्त मनोवृत्ति जागृत होऊन त्यांनीं बंड सुरूं केलें. " थोडेंसें वाटत आहे. कारण मी कांहीं अद्याप ह्मातारा झालों नाहीं. आई, माझ्यासंबंधानें कांहीं भयंकर कागाळ्या तुला कोणीं सांगितल्या असाव्यात व माझ्या भावी नाशापासून माझें संरक्षण होण्यास विवाह हाच एक उपाय आहे अशी कोणीं तरी तुझी समजूत केली असावी असें वाटतें."

माईसाहेबांनीं उत्तर केलें, " तुझ्यासंबंधानें माझ्याजवळ कोणींच कांहीं कागाळी करीत नाहीं, कारण मी कोणाचें ऐकूनच घेत नाहीं. शिवराया, तुझ्या हातून वाईट, लांछनास्पद गोष्ट कदापि होणार नाहीं याची मला खात्री आहे."

शिवराव शांतपणानें बोलले, " मी याबद्दल फार आभारी आहें. बरें, मग कारण काय ? मनांत घोळत असलेला विचार एकदां सांगून मोकळें व्हावें असें तुला वाटून तूं हा उपदेश मला केलास त्याचें कारण काय ?"

" मला वाटतें तशीच वेळ सध्यां आली आहे. कारण, तुझ्या सौख्याची व कल्याणाची मला इतकी काळजी वाटत आहे कीं, तुझ्या वर्तनावर देखरेख ठेवून शक्य तर तीं दोनींहि तुला मिळवून देणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतें. तूं एखादी मुलगी पसंत केलीच असशील

तर मला सांगितल्याशिवाय तूं राहणार नाहींस. मला असें खात्रीनें वाटतें. अन्यथा वर्तन तुझ्या हातून होईल अशी माझी कल्पनाच धांवत नाहीं. तुझी निवड चांगली व शहाणपणाचीच असणार याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं. तुझ्यासारखा शहाणा मनुष्य हीन विवाहसंबंधासारखें अनर्थमूलक कृत्य कधीं करील अशी मला मुळींच भीति वाटत नाहीं. कांहीं कांहीं गोष्टी अशा असतात, कीं, त्या एकदां केल्या म्हणजे सुधारणें शक्य नसतें; त्यावर उपायच चालत नाहीं."

"पण आई, मी कांहीं एखाद्या हलक्या घराण्यांतल्या मुलीबरोबर लग्न करून घेण्याच्या विचारांत सध्यां तरी नाहीं; खात्रीनें सांगतों."

माईसाहेबः—"तर मग माझें एवढें ऐकशील काय?"

"कोणतें? लग्नाची कबूली देऊं कीं काय?" शिवराव त्यांच्याकडे जिज्ञासापूर्ण दृष्टीनें पहात ह्मणाले.

"होय. ती देऊन मला एकदां सुखी कर."

"मी देईन. पण समज कीं तुझ्या त्या उद्दिष्ट देवांगनेनें तो मान घेण्याचें नाकारलें तर मग पुढची वाट काय?"

"वाट कसली? ती जबाबदारी माझ्यावर!" त्या सस्मित पुटपुटल्या.

"आई, यावरून तुमचें सर्व अगोदरच ठरलें आहे असें एखाद्यास वाटेल." शिवराव बोलले.

"मीं ठरविलें आहे असें गृहीत धर. आईसारखी लग्न जुळविणारी कळकळीची बायको दुसरी कोण असणार?"

"खरोखरी तूं ठरविलें आहेस? मला आश्चर्य वाटतें. आईसाहेब, तुमच्या पसंतीला कोण उतरली हें विचारूं का?"

"तूं ओळख पाहूं, मला ती येथून दिसत आहे. तुला नाहीं दिसत. अगदीं आंधळा रे आंधळा! इतकें कसें दिसत नाहीं? तिचें अंतःकरण प्रेमळ आहे. तुझ्याकडून एका शब्दाची अपेक्षा आहे."

"आई, माझ्या ध्यानांत येत नाहीं. तूं अशानें एखाद्याला लाजवितेस."

"तर मग तिचें नांव सांगण्याचें मलाहि कांहीं कारण नाहीं?"

"छे, छे! तिचें नांव मला समजलें पाहिजे."

माईसाहेब कांहीं वेळ स्तब्ध राहिल्या. नंतर त्या हळूंच ह्मणाल्या, " शिवराया, तिचें नांव चंद्रिका."

शिवराव चट्कन् तिच्यापासून दूर झाले. त्यांनीं तिच्याकडे ताठ दृष्टीनें पाहून म्हटलें, " चंद्रिका ! आई तूंच कां हें बोललीस ? "

परंतु माईसाहेबांना शिवरावांच्या तिरस्कारयुक्त दृष्टीचें भय वाटलें नाहीं. त्या ह्मणाल्या, " होय, मी बोललें. माझ्या पोटच्या गोळयाच्या सौख्याचा जर प्रश्न आहे, तर कां मागें घ्यावें ! तुझ्या अगदीं पायाजवळ एक मोठा धनसंचय आहे, एक अत्यंत मौल्यवान् हिरा आहे, आणि तूं तिकडे न पाहतां, मुळींच लक्ष्य न देतां जर निघालास, तर तो जेणें करून तुझ्या हातांत पडेल, असा शब्द मी बोललें तर त्यांत माझी चूक कसली ? तुझें सौख्य तेंच माझें जीवित. शिवराया, चंद्रिका ह्मणजे एक अलोट धनसंचय आहे. तिकडे दुर्लक्ष करून तूं जाणार नाहींस अशी माझी खात्री आहे."

बोलतां बोलतां माईसाहेब इतक्या सद्गदित झाल्या, कीं तशा त्यापूर्वीं कधींही झाल्याचें शिवरावांनीं पाहिलें नव्हतें. ज्या सुंदर बालिकेला त्यांनीं त्यांच्या मानस चक्षूंपुढें उभें केलें होतें त्या बालिकेला शिवरावांनीं आतां प्रथमच पाहिलें. किंबहुना तिची योग्यता आतां त्यांच्या लक्ष्यांत येऊं लागली. परंतु ती दुसरी बालिका—जिचे सुकुमार ओष्ठ, " शिवराव माझें तुमच्यावर प्रेम आहे, " असें अद्यापि पुटपुटत आहे असें त्यांना वाटलें त्या बालिकेची काय वाट ? हा विचार मनांत येतांच शिवराव एकदम दचकून चट्कन् दूर होऊन ह्मणाले, " आई, तूं असें बोलशील असें मला वाटलें नाहीं. तुला समजणें शक्य नाहीं. "

माईसाहेबांनीं उत्तर दिलें, " आईचे डोळे फार तीक्ष्ण असतात. शिवराव, तुझ्या पायाजवळ धनसंचय आहे व ती गोष्ट मीं तुला कळविली आहे. आतां तुझा तूं विचार कर. "

"असें आहे तर मग स्वस्थ बसायला विशेषच कारण आहे. पण आई, तुझी गैरसमजूत होत आहे असें मला वाटतें."

" माझी नाहीं गैरसमजूत झाली. माझी खात्री नसती तर मी बो-

लेलें असतें असें तुला वाटतें काय? शिवराया, तूं तिच्यासंबंधानें चांगला विचार कर. तिच्या दहाव्या हिश्शानें तरी सुंदर स्त्री तूं कधीं पाहिलीस काय? ह्या टोलेजंग वाड्याचें शिरोभूषण या दृष्टीनें तूं विचार करून पहा." इतक्यांत शिवराव सहज तेथून निघून खिडकीकडे गेले. त्यांच्याकडे पहात माईसाहेब ह्मणाल्या, "शिवराया, तूं निज आतां. मी जातें. मी काय बोललें त्याचा विचार कर" असें ह्मणून माईसाहेब तेथून निघून गेल्या.

माईसाहेब आपल्या खोलींत जाऊन बिछान्यावर पडल्या. त्यांचा चेहरा उतरला होता व डोळ्यांत काळजी दिसत होती. त्या स्वतःशीं पुटपुटल्या, "माझ्या अजमासाबाहेर प्रकार घडला आहे. त्याच्या डोळ्यांतील क्षणोक्षणीं होणारा फरक मीं ओळखला व त्याच्या मनांतील रहस्य मीं ताडलें. परंतु तसें कधीं होणार नाहीं. मी त्याचें मन अजूनही वळवीन. पण तें कसें वळवायचें हाच प्रश्न आहे."

माईसाहेब गेल्यानंतर शिवराव आपल्या खोलींतून इकडून तिकडे खेपा घालीत राहिले. त्यांच्या भृकुटी वक्र झाल्या व मन गोंधळून गेलें. मातुःश्रीच्या ठिकाणीं त्यांची पूज्यबुद्धि होती. त्यांचा प्रत्येक शब्द शिवरावांच्या मनांत खोल जाऊन भिनला. मातुःश्रीवर त्यांचें निःसीमप्रेम होतें, व मातुःश्रीचा स्वभाव त्यांना पूर्णपणें माहीत होता. तारा कितीही पवित्र, प्रेमळ व गोड स्वभावाची असली तरी तिच्यासारख्या गरीब घराण्यांतील मुलीशीं लग्न करण्याबद्दल संमति त्यांच्याकडून मिळणार नाहीं, त्यापेक्षां त्यांना मेलेलें पुरवेल, असा माईसाहेबांचा स्वभाव त्यांना पूर्णपणें माहीत होता. हा विचार मनांत येतांच त्यांना मनस्वी दुःख झालें. तथापि त्यांनीं धैर्य धरलें. ते स्वतःशीं पुटपुटले, "काय होईल तें होवो. मी तिला कदापि अंतर देणार नाहीं. तीच माझा मौल्यवान् हिरा आहे. माझा अलोट खजीनाहि तीच. मी कांहीं तिच्याकडे दुर्लक्ष करून जाणार नाहीं. अहाहा! माझी प्राणप्रिया!"

इतक्यांत दरवाजावर थाप मारलेली ऐकूं आली ह्मणून त्यांनीं जाऊन खोलीचा दरवाजा उघडला. तों त्यांचे परम जीवश्चकंठश्च स्नेही बापू-

साहेब सस्मित वदनानें आंत येऊन ह्मणाले, " काय सरदार, आज कांहीं कमजास्त आहे वाटतें ? " हा प्रश्न ऐकतांच शिवराव किंचित् घोटाळले. ते हांसण्याचा बाहणा करून ह्मणाले, "होय–नाहीं. तसें कांहीं कमजास्त, नाहीं. कां बरें ? "

" कां बरें !" बापूसाहेब दोन्ही हात कोटाच्या दोन खिशांत घालून व शिवरावांकडे थट्टेनें पाहून ह्मणाले, " आणखी कां बरें ह्मणून विचारतां ! माझी खोली तुमच्या खोलीच्या अगदीं खालीं आहे हें तुमच्या लक्ष्यांत आहेना ? तुमच्या पावलांचा दणदण आवाज मला केवढा वेळ ऐकूं येत आहे. जणूं काय तुह्मीं हा रहदारीचा रस्ताच करून सोडला ! शिवराव, आज गालीच्याची इतकी कां खराबी चालविली आहे ? " असें ह्मणून बापूसाहेब कळवळून त्यांचेकडे पाहूं लागले. त्यांच्या दृष्टींत शिवरावां-संबंधाची काळजी व त्यांच्यावरचा दृढ विश्वास हीं दिसत होतीं.

शिवराव बोलले, " बापूसाहेब, मी एका अडचणींत सांपडलों आहें."

" मला सांगा, कसली अडचण ? "

" मी नाहीं सांगत. तुमच्याकडून मला यांत उपयोग होणार नाहीं." असें ह्मणून शिवरावांनीं सुस्कारा टाकिला.

बापूसाहेब एकदम उठून उभे राहून ह्मणाले, " मी जातों तर. माझा उपयोग झाला असता तर बरें झालें असतें. शिवराव, तुह्मीं कांहीं तरी आज करणार आहांत असें वाटतें. माझा कांहीं उपयोग होण्याजोगा असेल तर तुह्मी मला सांगालच. "

" बापूसाहेब, जरा बसा आणि ही विडी ओढा. " असें ह्मणून शिवरावांनीं त्यांच्याकडे विडी व काड्यांची पेटी टाकली. " माझें मन तुमच्यापुढे माझ्यानें मोकळें करवत नाहीं. तथापि मला विचार केला पाहिजे. त्यांत मला तुमच्या मदतीची जरूर आहे. रात्र बरीच झाली काय ? "

बापूसाहेब जांभई देऊन ह्मणाले, " मध्यरात्र उलटून गेली. संध्याकाळचा वेळ मोठा मजेंत गेला, नाहीं ? पण शिवराव, त्या काळ्याभोर डोळ्यांच्या मुलीबरोबर तुह्मी जरा अधिक प्रसंग करीत होतां नाहीं ? "

" कोणत्या मुलीशीं ? " शिवराव आश्चर्यपूर्वक म्हणाले.

" साबाजी चित्रकाराच्या पुतणीशीं. ती रूपानें किती सुरेख व मोहक आहे ! तिला पाहिलें कीं, अप्सरेची आठवण होते. पण दुःखाची गोष्ट ही कीं, तिचें लग्न त्या दुष्ट वकिलाबरोबर होणार आहे ह्मणे ! याचेंच मला वाईट वाटतें."

" काय ? " शिवरावांनीं शांतपणानें विचारलें.

बापूसाहेब गुरगुरले, " तुह्मी नाहीं कां ऐकली ही बातमी ? दिवाणखान्यांत बुद्धिबळांचा डाव चालला होता तेथें मंडळी बोलत होती."

" काय बोलत होती ? " शिवरावांनीं अजून शांतपणेंच विचारलें. पण त्याचे डोळे मात्र चमकूं लागले. बुद्धिबळें कुटणाऱ्या मंडळींत तारेचा विषय निघणें म्हणजे महत्पाप आहे, हा केवळ तिचा उपमर्द आहे, असें त्यांना वाटलें.

" आपले गंगाधरपंत आहेत ना ? त्यांनींच ही हकीकत सांगितली. त्यांची व वकिलांची चांगली ओळख आहे."

" कोण वकील ? "

" अहो, मुंबईचे शामराव वकील ! त्यांच्याशीं तिचें लग्न होण्याचें ठरलें आहे. "

शिवरावांना फार आश्चर्य वाटलें व त्यांची मनोवृत्ति क्षुब्ध झाली. इतक्या थरावर गोष्ट येऊन शेवटीं असा प्रकार व्हावा याचाच त्यांना राग आला.

ते ह्मणाले, "बापूसाहेब गोष्ट खोटी, साफ खोटी. "

" असेल. तसेंही असेल. खोटी असेल. पण तुमचा कांहीं संबंध त्यांत नाहीं. खरी असो वा खोटी असो. तुह्मांला दोन्हीही सारखींच. "

शिवराव कांहीं बोलले नाहींत, पण ही अनिष्ट बातमी ऐकतांच त्यांची मुद्रा विचारमग्न झाली. बापूसाहेबांच्या मात्र कांहीं लक्षांत आलें नाहीं.



## प्रकरण १० वें.

## अभिमान जागृत झाला.

तारेवर शामरावांचें मन बसलें. पण ही गोष्ट स्वतःशीं सुद्धां कबूल करण्यास शामरावांना बराच वेळ लागला. कारण प्रेमासारख्या नाजुक मनोविकाराच्या हल्ल्यास आपण अगदींच जुमानीत नाहीं, अशी ते नेहमीं घमेंड बाळगीत. स्त्री जातीविषयीं क्षुद्र व तिरस्कारणीय प्रेम दाखविणारीं जीं माणसें आहेत तीं अगदीं दुर्बल व नादान अशी त्या माणसांची नेहमीं थट्टा व उपहास करून ते आपली व आपल्या मित्रमंडळीची करमणूक करीत.

शामरावांचें म्हणणें नेहमीं असें असे कीं, विवाह म्हणजे केवळ एक सौदा आहे. जो मनुष्य समजुतदार आहे तो अगदीं नाइलाज होईपर्यंत सहसा लग्न करून घेत नाहीं व जेव्हां घेतो तेव्हां तो आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्याकरितांच घेतो. प्रेम अगर त्यासारखाच मनोविकार वस्तुतः कांहीं नाहीं. ही कल्पना अगदीं खोटी आहे. नाटकांत अगर कादंबरींत त्याचें अस्तित्व आढळतें, पण गतकाळाची ही दंतकथा आहे, निदान थोडा तरी समंजसपणा असणाऱ्या माणसाला ही फार लाजिरवाणी गोष्ट आहे, असें शामराव म्हणत. शामराव दिसण्यांत उमदे, रूपानें सुरेख होते. त्यांचे डोळे किंचित् बारीक होते तरी तेवढ्यानें त्यांच्या देखणेपणास कांहीं वैगुण्य आलें नव्हतें. ते तसे हुषारहि होते. विद्यासंपन्न व गुणी होते. म्हणजे प्रेमासारख्या कोमल मनोविकारास बळी पडण्याची

पूर्ण पात्रता त्यांच्या अंगांत होती. परंतु त्यांचीं स्वतःचीं जीं तत्त्वें होतीं त्या तत्त्वांना ते नेहमीं अगदी चिटकून रहात; म्हणून आजपर्यंत या विकाराची त्यांना विशेषशी बाधा झाली नव्हती. नेहमीं आनंदी चेहरा असावयाचा. कोणीहि भेटलें तरी त्याजकडे पाहून—वरोपकरणी कां होईना, हंसावें; पण कोणाविषयींहि मनांत खरोखर प्रेमभाव ठेऊं नये. अशा रीतीनें वागून संथपणानें, धिम्मेपणानें व गुप्तपणानें आपला व्यवसाय त्यांनीं चालविला होता व त्यांत यश संपादन केले होतें. पण आतां मात्र अगदीं उलट स्थिति झाली. ते प्रेमपाशांत सांपडले.

परंतु ही स्थिति त्यांना फारच त्रासदायक वाटूं लागली. जर त्यांच्या प्रेमाचा विषय बनलेली स्त्री उच्च कुलांत जन्मलेली अगर अलोटसंपत्तीला वारस होणारी असती, तर मग त्यांना इतका त्रास झाला नसता परंतु ज्या बालिकेनें त्यांच्या मनांत हा अविचाराचा मनोविकार आकस्मिक जागृत केला होता, ती बालिका थोर घराण्यांत जन्मलेली नव्हती. तिच्या आईबापांपासून हुंड्याच्या रूपानें पुष्कळ पैसा उकळावा म्हटलें तर तशी-ही स्थिति नव्हती. साबाजी चित्रकार अगदीं गरीब होता ही गोष्ट त्यांस माहीत होती. म्हणून या गोष्टीचीच त्यांना खंती वाटूं लागली. ती मुलगी एका यःकश्चित्, कोपऱ्यांत पडून राहिलेल्या चित्रकाराची पुतणी, मुलगी सुद्धां नव्हे. तिची गांवांत कोणाची ओळख सुद्धां नव्हती. तिच्याशीं लग्न केल्यानें कांहींच फायदा व्हावयाचा नाहीं. इहलोकीं आपल्या महत्त्वा-कांक्षा साधण्याच्या कामीं तिचा काडीमात्र उपयोग होणार नाहीं, ही गोष्ट पूर्णपणें ते समजून होते. पहिल्याच दिवशीं जेव्हां तारेच्या सौंदर्यानें किंबहुना सौंदर्यापेक्षां तिच्या पवित्र व दिव्य विमलतेच्या अवर्णनीय जादूनें त्यांना भारून टाकिलें व ते अगदीं गार होऊन गेले तेव्हांच त्यांनीं आपली स्वतःची पुष्कळ निर्भर्त्सना केली. ते स्वतःस ह्मणाले, " शामराव, तूं तिच्याकडे पुनः जाऊं नकोस व बळेंच मूर्खपणा पदरांत घेऊं नकोस. ती तुझ्यासारख्याला अगदीं योग्य नाहीं. ती नुसती सुंदर आहे एवढेंच. पण तिच्या इतक्या, तिच्यापेक्षांहि जास्त सुंदर शेंकडों मुली तूं पाहिल्या आहेस. ती यःकश्चित्—अगदींच यःकश्चित्—

घराण्यांतील आहे. छे, छे ! तूं असा वेडेपणा करूं नकोस. उद्यां सकाळीं येथून निघून मुंबईला जा. चालता हो. येथें राहूं नकोस. "

परंतु शामराव मुंबईला गेले नाहींत. ते दिगंबरशास्त्र्यांच्या बागेंत गेले; तेथील फुलांचा एक सुंदरसा पुष्पगुच्छ करून घेऊन ते साबाजीच्या खोंपटाकडे आले आणि ज्याला ते मूर्खपणा म्हणत त्याच मूर्खयणाच्या चिखलांत—गाळांत जास्तच रुतून बसले. पण अजूनसुद्धां वेळ गेली नव्हती. त्यांनीं तसें मनांत आणलें असतें तर सुटका होण्याची अद्यापिहि आशा होती. आपला स्वार्थपरायण स्वभाव स्मरून व मनांतील सर्व महत्वाकांक्षांचा विचार करून त्यांच्या जोरावर त्यांना निसटून जातां आलें असतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, तारेनें त्यांच्या आकस्मिक प्रेमापेक्षांहि जास्त सामर्थ्यवान् असा त्यांच्या स्वाभिमान जागृत केला. सरदारपुत्र शिवराव यांच्या कृतीचें समर्थन करण्याचें खरोखरीच तिनें धाडस केलें. तारेनें, न समजतां कां होईना, हा त्यांच्यावर शेवटचा घाव घातला म्हणावयाचा. त्या घावानें त्यांच्यामध्यें हेवा—मत्सर उत्पन्न झाला व त्या मत्सराग्नीच्या ज्वालांनीं जळफळत ते तेथून निघून गेले.

तथापि त्यांच्या सर्व दूरदर्शी निश्चयाचा चक्काचूर उडवून देणारी शेवटची ठिणगी अद्यापि लागलेली नव्हती. त्या अरण्यांत—निर्जन ठिकाणीं तारा व शिवराव अशीं दोघें हिंडत असतांना त्यांनीं पाहिलीं. शिवरावांनीं तर त्यांच्या अंगावर चाल करून जाऊन त्यांना घोड्यावरून खालीं पाडून धुळींतहि लोळविलें. त्या वेळीं त्या तरुण सरदारपुत्राच्या संतप्त व तिरस्कारयुक्त मुद्रेकडे पहात शामराव जमिनीवर पडले असतां त्यांनीं आपल्या मनाशीं असा निर्धार—नव्हे पणच—केला, कीं काय होईल तें होवो; सरळ उपायांनीं अगर कुटिल प्रयत्नांनीं तारेला आपलीशी करून घ्यावयाची. ज्यानें आपणास जमिनीवर लोळवून धूळ चारली व आपला असा अपमान केला त्या पाजी, हलकट व उद्धट स्वभावाच्या सरदारपुत्रापासून तिला आपण हिरावून नेणारच नेणार ! असा त्यांचा कृतनिश्चयच झाला.

हा निश्चय फार धिटाईचा व फाजिल अभिमानाचा होता. पण शाम-

रावहि स्वभावानें धीट व फाजिल अभिमानी होते. शामराव फार भयंकर तऱ्हेचा मनुष्य होता. ते फार हुषार, पण उलट्या काळजाचे होते. त्यांनीं आपल्या धंद्यांत यश संपादन केलें होतें तें आपल्या स्वतःच्या मनगटाच्या जोरावर ! त्यांनीं द्रव्य मिळविलें होतें, ते वयानें मोठे नव्हते. तरी त्यांचा चहूंकडे बोलबाला चालला होता. कायद्याच्या पेंचांत जे लोक सांपडत, ते शामरावांकडे येत. शामराव त्यांची हकीकत शांतपणें ऐकून घेत व त्या पेचांतून पार पाडण्याची युक्ति त्यांना सांगत आणि त्याप्रमाणें वागून ते लोक त्यांतून पार होऊन जात.सारांश,आपल्या वकिलीच्या धंद्यांत ते यशस्वी झाले होते. अपयश त्यांना कधींच कोणत्याहि कामांत आलें नव्हतें; आणि म्हणूनच आपल्या हल्लींच्या निश्चयांत सुद्धां आपणांस यश मिळेल असा त्यांना पूर्ण भरंवसा वाटला. ते दिगंबरबोवांच्या घरीं परत गेल्यावर त्यांचें मनन सुरू झालें. वृद्ध साबाजीची जेवढी पूर्वपीठिका त्यांना माहीत होती, तेवढी ते आठवूं लागले. पण त्यांना विशेष हकीकत माहीत नव्हतीच. बोवांना त्यांनीं विचारून पाहिलें. पण त्यांनाहि कांहीं जास्त माहिती सांगतां येईना.

साबाजीची राहणी एखाद्या वानप्रस्थाश्रमी मनुष्यासारखी असे. तारेशिवाय त्याचे कोणी आप्तइष्ट नाहींत असाच सर्वांचा समज झाला होता. त्याच्या पूर्वाश्रमासंबंधीं कोणासच कांहीं माहिती नव्हती. कांहीं वर्षांपूर्वी तो ह्या प्रदेशांत आला व चित्रकाराचा धंदा करूं लागला एवढेंच सर्व लोक सांगत. यापेक्षां जास्त माहिती कोणासच कांहीं सांगतां येईना. साबाजीचें लग्न तरी झाले होतें कीं नाहीं हें देखील कोणास ठाऊक नव्हतें.

तारेचीं व शिवरावांची नदीतीरीं गांठ पडल्यानंतर तिच्या मुखचंद्रम्याचें पुनः एकवार तरी दर्शन व्हावें, ह्मणून शामराव तिच्या झोंपडीच्या आसपास पुष्कळ वेळ हिंडत होते. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. आपणाला मुंबईस लवकर परत जायला हवें हें ते जाणून होते. पण त्यांचा पाय येथून निघेना. घोड्यावरून पडल्यामुळें त्यांचा हात सुजून थोडा जड झाला होता, हें खरें पण त्याची विशेष काळजी घ्यायला पा-

हिजे होती अथवा ते महिना पंधरा दिवसांचे दुखणेकरी झाले, अशांतला प्रकार मुळींच नव्हता. तथापि शामरावांनीं फडक्यानें तो हात बांधला व घोड्यावरून पडल्यामुळें आपला हात दुखावला आहे, आणखी कांहीं दिवस तरी आतां येथें राहिलें पाहिजे, अशी त्यांनीं बोवांची समजूत घातली व मुंबईला जाण्याचें लांबणीवर टाकलें.

पुढें तारेला वाड्यांत जेवणाचें आमंत्रण आल्याची हकीकत त्यांनीं ऐकली. त्यामुळें त्यांचा मत्सराग्नि प्रदीप्त झाला. ते करकर दांत खात साबाजीच्या खोपटानजीक कुंपणाच्या आड उभे राहिले व तारा गाडींतून जात असतां त्यांनीं तिचा मुखचंद्रमा पाहिला. हरप्रयत्न करून तारेला आपलीशी करावयाचीच हा त्यांचा निश्चय झाल्यामुळें ती त्यांना जास्तच मोहक व सुंदर दिसूं लागली. तिच्या प्राप्तीसंबंधाचें मनोहर मनोराज्य करीत, शिवरावांसंबंधानें रागानें व संतापानें जळफळत, ती इतक्यांत वाड्यांतून परत येईल, पुनः एकवार तिची दृष्टादृष्ट होईल, पुनः तिच्या दर्शनाचा लाभ होईल अशा इच्छेनें प्रेरित होत्साते संध्याकाळपर्यंत त्या खोपटाच्या आसपास ते फिरत होते.

त्याप्रमाणें शामरावांचें नशीबहि फळफळलें. तिच्या नुसत्या दर्शनापेक्षां त्यांना जास्त लाभ झाला. रस्त्यावरून इकडे तिकडे फिरत असतां तार आफिसांतील एक शिपाई हातांत तारेचा लखोटा घेऊन साबाजीच्या खोपटाकडे निघाला असल्याचें त्यांनीं पाहिलें. शिपायास थांबवून त्यांनीं लखोट्यावरील पत्ता वाचला. ती साबाजीची तार आहे असें त्यांना आढळून आलें. साबाजी घरीं नाहींत, मी त्यांच्याकडेच निघालों आहें, ते आल्यावर त्यांची तार त्यांना देईन असें सांगून त्यांनीं शिपायाकडून ती तार आपल्याजवळ घेतली. तारेंत काय मजकूर आहे, हें लखोटा फोडून पहावें असें शामरावांना किती तरी वाटलें. पण त्यांनीं आपलें मन आवरलें. त्यांची सदसद्विवेकबुद्धि जागृत होऊन तिची त्यांच्या अंतःकरणास टोंचणी सुरू झाली म्हणून नव्हे, तर त्या तारेंत कांहीं तसा महत्त्वाचा मजकूर असणार नाहीं असें वाटून त्यांनीं ती तार फोडली नाहीं. "तसबीर काढण्याची कांहीं तरी कामगिरी असेल, दुसरें काय असणार ? गुप्त

व महत्त्वाची बातमी तारेंतून कोणी कळविणार नाहीं. " असें ते आपणाशींच पुटपुटले. म्हणून त्यांनीं ती तार तशीच आपल्याजवळ ठेवली व साबाजी आल्यानंतर त्यांना ती दिली हें वाचकांस माहीत आहेच. परंतु तार वाचल्याबरोबर साबाजीचे उद्गार जेव्हां त्यांनीं ऐकलें तेव्हां मात्र आपण तार फोडून पाहिली असती तर बरें झालें असतें असें त्यांना वाटूं लागलें.

तारेचा निरोप घेऊन शामराव आपल्या घरीं जाण्याकरितां निघाले. परंतु तिच्या दृष्टीआड होतांच ते पुनः मागें फिरले व खोपटाजवळच्या कुंपणाआड उभे राहून खोपटांत काय प्रकार होत आहे तो ते पाहूं लागले. तेथून साबाजी काय करीत आहे हें त्यांना खिडकींतून दिसत होतें. त्याची मुद्रा उद्विग्न झाली होती, हें त्यांनीं पाहिलें. तारेच्या सुकुमार मुखावरहि काळजीची छटा आलेली त्यांना दिसली. " तारेंत कांहीं तरी महत्त्वाचा खेदजनक मजकूर असावा. ती तार मीं फोडून पाहिली नाहीं ही मोठी चुक झाली. साबाजी पुढें काय करतो तें पहावें. " असें आपल्याशींच पुटपुटत शामराव साबाजीची हालचाल पहात होते. सामानसुमान बांधण्याची तयारी आंत चाललेली त्यांना दिसत होती. त्यावरून साबाजी मुंबईला निघाला आहे असें त्यांनीं ताडलें. आतां मुंबईला जावयाचें म्हणजे मध्यरात्रीनंतर तीन वाजतां एक गाडी आहे त्या गाडीनेंच गेले पाहिजे; साबाजी त्याच गाडीनें जाईल, दुसरी गाडी नाहीं; असें म्हणून शामराव तेथून निघाले ते तडक आपल्या बिऱ्हाडीं आले आणि आपली ट्रंक व छत्री घेऊन स्टेशनवर गेले. कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून एके ठिकाणीं अंधारांत ते साबाजीची वाट पहात बसले. इतक्यांत साबाजीची स्वारीही मुंबईला जाण्याकरितां तेथेंच येऊन दाखल झाली.

बरोबर तीन वाजावयास पांच मिनिटें कमी असतां मुंबईस जाणारी आगगाडी स्टेशनांत येऊन धडकली, व साबाजी एका डब्यांत जाऊन बसला. तें पाहून शामरावहि दुसऱ्या एका लांबच्या डब्यांत चढले व गाडी चालूं झाली. पहांटे पांच वाजतां गाडी बोरीबंदर स्टेशनांत आली. साबाजी गाडींतून उतरून एका ' व्हिक्टोरिया ' जवळ गेला व ग्रँटरोड

रिपन थिएटर' असें गाडीवाल्यांस सांगून गाडींत बसला. शामराव टेहळणीवर होतेच. साबाजी कोठें जाणार हें त्यांनीं ऐकलें व तेही दुसऱ्या एका व्हिक्टोरियांत बसून कोटमधील आपल्या ऑफिसकडे गेले.

शामरावांचें ऑफिस दुसऱ्या मजल्यावर होतें. ते जिना चढून माडीवर गेले. दरवाज्याच्या एका बाजूस एका लहानशा पथारीवर अगदीं रोडका, तोंडावर देवीचे वण असलेला, असा खुजा मनुष्य निजलेला होता. शामरावांच्या बुटाचे खाड्खाड् आवाज ऐकतांच तो दचकून जागा झाला व शामरावांस मुजरा करून त्यांच्या आज्ञेची वाट पहात हात जोडून उभा राहिला. हा शामरावांचा नोकर–बाल्या–किंबहुना बंदा गुलाम होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कोणी पक्षकार वगैरे लोक आले तर त्यांची वकीलसाहेबांना वर्दी देणें अगर कांहीं तरी सबबीवर त्यांची बाहेरच्या बाहेर रवानगी करणें हें काम या नोकराकडे असे. त्याची मुद्रा फारच चमत्कारिक होती. तो अमक्या वर्णाचा आहे अगर अमुक जातीचा किंवा वयाचा आहे हें त्याच्या चेहऱ्यावरून मुळींच ओळखतां येत नसे. “ शामराव, तुह्मीं हें रत्न कोठून पैदा केलें ?” असें त्यांची मित्रमंडळी नेहमीं विचारीत पण उत्तर देण्याचें शामराव टाळीत अगर थट्टेवारी घालवीत. अशा रीतीनें भुजंगाची पूर्वपीठिका अज्ञात अशीच राहिली व सगळ्यांना भुजंग ह्मणजे एक गूढच होऊन बसलें. तो शामरावांचा एकनिष्ठ व त्यांचें वाटेल तें काम करण्यास नेहमीं तयार असणारा नोकर होता, शामरावांची इच्छा आगाऊच ओळखून त्याप्रमाणें वागण्याकरितांच केवळ त्याचा जन्म झाला आहे, असें सर्वांना वाटे.

शामराव खोलींत जातां जातां “ कपडे घालून ये. बाहेर कांहीं काम आहे. ” असें सांगून आंत गेले.

थोडक्याच वेळांत भुजंग पोषाख करून मोठ्या अदबीनें शामरावांपुढें येऊन उभा राहिला. त्यास शामराव ह्मणाले, “ भुजंग, तुला ग्रँटरोडवरील रिपन थिएटर माहीत आहे ? ”

“ होय, साहेब. ”

“ त्या थिएटराजवळ जा आणि कंबर थोडीशी वांकलेली, केंस अगदीं

पांढरे झालेले असा एक म्हातारा नुकताच तिकडे गाडींत बसून गेला आहे, तो कोठें उतरतो, कोठें जातो, काय करतो हें पाहून ये."

" तो प्रथम कोणत्या घरांत जातो तेवढें पाहून यायचें ना ? "

शामराव किंचित् विचार करून म्हणाले, " साधारणपणें दोनप्रहर, पर्यंत त्या गृहस्थावर तूं नजर ठेव. तो कोठें कोठें जातो एवढें मला समजलें पाहिजे. जा, जा. सायकलवरून जा म्हणजे लौकर पोंचशील. "

" हुकूम. त्याचें नांव, आडनांव, कांहीं ? "

" त्याचें नांव साबाजी. पण—पण हें पहा. त्याला मुळीं सुद्धां समजून उपयोग नाहीं बरें का ? कोणालाहि न समजतां ही कामगिरी झाली पाहिजे. "

" जी, हुकूम " असें म्हणून भुजंग सायकल घेऊन खालीं उतरला व एका क्षणांत दिसेनासा झाला.

अरेरे ! भोळी बिचारी तारा ! तिला काय माहीत, कीं त्या रात्रीं शामरावांनीं आपणास पेचांत आणण्याकरितां जाळें तयार करण्याचा व्यूह आरंभिला असून त्या जाळ्याचा पहिला फेर फोर्टमधील ह्या त्यांच्या ऑफिसांत तयार होता. ती आपली साबाजी निघून गेल्यानंतर मधुर सुवास येणाऱ्या नदीच्या कांठच्या त्या खोपटांत स्वस्थ निजली होती व स्वप्नसौख्यांत गुंग झाली होती.

तिकडे चंद्रगड किल्ल्यांतील वाड्याच्या एका महालांत माईसाहेब बिछान्यावर पडल्या असून, आपल्या मुलाला साबाजी चित्रकाराच्या पुतणीबद्दल लागलेलें वेड कोणत्या उपायांनीं घालवितां येईल या गोष्टीचा विचार करीत होत्या. पण आपल्यापेक्षां जास्त तरतरीत, चाणाक्ष व कमी शंका बाळगणाऱ्या मनाचा उद्योग त्याच दिशेनें चालला आहे, हें त्यांच्याही लक्षांत आलें नाहीं.



# प्रकरण ११ वें.

——:०:——

## निर्वाणीचें अस्त्र.

भुजंग ग्रँटरोडकडे निघून गेला, त्यावेळीं थोडी रात्र होती. म्हणून शामराव कपडे काढून पहाटेची साखर झोंप घेण्याकरितां बिछान्यावर जाऊन पडले व लवकरच त्यांना गाढ निद्राही लागली. त्यांच्यासारख्या विशेष मनोवृत्तीच्या लोकांनाच अशी गाढ झोंप लागते. सकाळीं सात वाजतां ते जागे झाले. प्रातर्विधि आटपून त्यांनीं चहा घेतला व खुर्चीवर बसून टेबलावरील कांहीं कागदपत्र वाचण्यांत ते निमग्न होऊन गेले. तेवढ्या वेळेपुरते तरी, साबाजी चित्रकाराच्या पुतणीसारखा—तारेसारखा—एखादा प्राणी या जगती तलावर वास करीत आहे ही गोष्ट सुद्धां ते विसरून गेले.

हाच त्यांच्या प्रकृतीमध्यें विशेष प्रकार होता. त्यांच्या कर्तबगारीची मख्खी कायती हीच होती. इतर सर्व गोष्टी मनांतून अजीबात घालवून टाकून, ते आपलें सर्व लक्ष एकाच विषयाकडे लावूं शकत.

ते खुर्चीवर बसले असतां त्यांच्याकडे बरीच मंडळी येऊन गेली. शेवटीं दहा वाजण्याचे सुमारास एक उंच, तरुण व अप्‌टुडेट फ्याशनेबल पोषाख केलेले गृहस्थ त्यांच्या समोरच्या एका खुर्चीवर येऊन बसले. वकीलसाहेब कागदपत्र वाचण्यांत गुंग झाले आहेत असें पाहून त्या

गृहस्थांनीं तोंडांत तंबाखूचा चोथा होता तो काढून टाकला आणि खिशां-तून विडी व काड्यांची पेटी काढून त्या साधनांनीं त्यांनीं हवेमध्यें निरनिराळ्या प्रकारचे ढग उत्पन्न करण्यास आरंभ केला. लवकरच त्यांनीं विडी फेंकून दिली व दुसऱ्या एका डबींतून पानाची पट्टी काढून ती चघळण्यास सुरवात केली; एकदां विडी ओढावी, नंतर विडा खावा, पुनः विडी फुंकावी, मग तंबाखू चघळावी; फिरून विडी पेटवावी, असें त्यांचें रहाटगाडगें सारखें सुरूं होतें, जणूं तोंडास व हातास मोकळीक म्हणून कसली ती द्यावयाची नाहीं असा त्यांनीं संकल्पच केला होता. हे गृहस्थ नेहमीं मुंबईतच राहणारे असून पूर्वीं पुष्कळ श्रीमंत होते. परंतु लक्ष्मीच्या सहवासापेक्षां तिच्या थोरल्या बहिणीचा—आक्काबाईचाच सहवास त्यांना जास्त प्रिय वाटत होता म्हणूनच कीं काय त्या संपत्तीची विल्हेवाट करण्याच्या कामीं त्यांनीं अतोनात परिश्रम केले व त्यांत त्यांना यशही आलें. जुगाराच्या आड्डयाचे ते पुढारी असून मुंब-ईतील यच्चयावत् पोलिस लोकांची व त्यांची पक्की ओळख झाली होती. पुष्कळ वेळां त्यांना शामरावांच्या वकीलीचा उपयोग झाला होता व त्यांनींही पुष्कळ पैसे शामरावांच्या मेहनतीचा मोबदला म्हणून वकील-साहेबांच्या तिजोरींत आणून ओतले होते. शामरावांचें लक्ष त्यांच्याकडे जातांच त्यांनीं त्या गृहस्थाचें स्वागत करून, काय काम आहे म्हणून विचारलें. "वकीलसाहेब, मी एका अडचणींत सांपडलों आहें व त्या कामांत मला तुमची सल्ला पाहिजे आहे." गृहस्थानें उत्तर दिलें.

"हरिश्चंद्रराय, तुम्हांला कसली अडचण आली आहे?"

"तुम्हांला भेंडीबाजारांतील ती हिरवी हवेली माहीत आहेच?"

शामरावांनीं होकारार्थीं मान हालविली.

"मी तेथें परवां रात्रीं गेलों होतों. दररोजच मी तिकडे जात असतों खरा; पण परवां रात्रीची हकीकत सांगणार आहें—"

शामराव मध्येंच म्हणाले, "हं, आणि तेथें जाऊन जुगार खेळलां व हजारों रुपये त्यांत घालाविले, असेंच कीं नाहीं?"

"मीं घालविले नाहींत; मिळविले."

" अरे वाः ! मग खूपच मजा झाली ह्मणायची. मी तुमचें अभिनंदन करतों " शामराव वरोपकरणी हांसून बोलले.

हरिश्चंद्रराय ह्मणाले, " त्या दिवशीं मीं सगळ्यांनाच जिंकलें व पुष्कळ पैसे मिळविले. पण त्यांतल्यात्यांत एका मुलाकडून फारच मिळविले. तो मुलगा वयानें अगदीं लहान–अजून पोरच आहे. आपल्या बाळाजी नाइकानें त्याला तेथें आणलें होतें. बाळाजी नाईक, माहीत आहे ना ? "

" हो. बाळाजीला सर्व मुंबई ओळखत आहे. पुढें."

" पुढें काय ? तो मुलगा खेळूं लागला. त्यानें या भानगडींत पडूं नये, ह्मणून मीं माझ्याकडून किती शिकस्त केली. पण तो मुळीं देखील ऐकेना. अशा खेळाच्या नादाला अशीं अल्पवयी पोरें एकदां लागलीं ह्मणजे मग तो मोहपाश त्यांना कसा सोडीत नाहीं व तीं मग कशीं फशीं पडतात, हें आपणाला माहीत आहेच. "

पुनः शामरावांनीं होकारदर्शक मान हालविली. पण ते आतां फार उतावीळ झाल्यासारखे दिसत होते. भुजंग जाऊन बराच वेळ झाला होता. तो इतक्यांत परत येईल; त्यानें काय चौकशी केली व त्याला काय तपास लागला हें जाणण्यासाठीं ते फार उत्सुक झाले होते.

हरिश्चंद्रराय पुढें ह्मणाले, " प्रथम प्रथम त्याचें नशीब अनुकूल होतें व त्याला पैसे मिळाले; पण मागाहून सर्व पारडें फिरलें व मिळविलेले पैसे जाऊन आणखी तीनशें रुपये तो हरला. मग मीं आपण होऊन तेवढ्यावरच खेळ पुरा केला. कारण अशा मुलाकडून जिंकले हेच रुपये जास्त झाले. दुसरे दिवशीं ह्मणजे काल दोन प्रहरीं मला मंडळींनीं आग्रह करून पुनः खेळायला नेलें, त्यांत मी हरलों व मला पैसे द्यायचे होते ह्मणून मीं त्या मुलाकडे पैशाबद्दल तगादा केला—"

" आणि त्यानें टाळाटाळी चालविली आहे व त्या कामांत माझी तुह्मांला मदत पाहिजे आहे असेंच ना ? " शामराव मध्येंच हांसत ह्मणाले.

" छे छे ! मला नको तुमची मदत. मी पुढें सांगतों तेवढें पुरतें

ऐकून घ्या ह्मणजे झालें." हरिचंद्रराय जरा खोंचून बोलले. शामरावांच्या मध्येंच बोलण्यानें त्यांना साहजिकच राग आला होता.

शामराव म्हणाले, "माफ करा. तुह्मी पुढें तेंच सांगणार असें मला वाटलें. बरें, पुढें काय हकीकत झाली?"

हरिश्चंद्ररायांनीं उत्तर केलें, "त्यानें पैसे देण्याचें नाकबूल केलें नाहीं. पण तो म्हणाला कीं, तूर्त आपणाजवळ इतके पैसे रोख देण्यास सवड नाहीं. असें ह्मणून त्यानें मला एक प्रॉमेसरी नोट–दस्त–लिहून दिली."

"आणि ती घेण्याचें तुह्मीं नाकारलें. अगदीं परक्या माणसाकडून कागद करून घेऊन त्याचा उपयोग काय? साहजिक आहे."

हरिश्चंद्रराय पुन्हां त्रासून म्हणाले, "मीं तसें कांहीं एक केलें नाहीं. समजलें? त्या प्रॉमिसरी नोटीवर आपल्या बाळाजी नाइकाची जामिनकी होती व त्या खालीं त्याची सही होती. अर्थातच मला ती प्रॉमिसरी नोट कबूल होती. त्या मुलाकडून पैसे मिळाले नाहींत तर बाळाजी नाइकाकडून घ्यावयाचे असें त्याचें माझें ठरलें. पुढें माझी व बाळाजीची सहज रस्त्यांत गांठ पडली व मी त्यास प्रामेसरी नोटीची हकीकत सांगून त्याजकडे पैसे मागितले. पण तो म्हणाला; "कुठली प्रॉमिसरी नोट आणि कुठली जामिनकी! कोणालाहि कसलाच कागद लिहून द्यावयाचा नाहीं असा माझा गेल्या वर्षापासून कृतनिश्चय झाला आहे व तो मीं आतांपर्यंत बरोबर पाळला आहे. देवाची शपथ घेऊन सांगतों." असें बाळाजी ह्मणाला."

शामराव थोडे पुढें वांकले व लक्षपूर्वक ऐकूं लागले. एखाद्या सशाचा अगर हरिणीचा वास लागल्याबरोबर कुत्र्याच्या डोळ्यांत जशी तीक्ष्ण कठोर चमक येते, तशी शामरावांच्या डोळ्यांत दिसूं लागली. पण ते या वेळीं कांहीं बोलले नाहींत. फायदा होण्याची वेळ आली, कीं ते नेहमीं गप्प बसत. त्याप्रमाणें आतांहि त्यांनीं मौनव्रत धारण केलें.

हरिचंद्रराय पुढें म्हणाले, "बालाजी नाइकाचे हे शब्द ऐकतांच मी मनामध्यें चपापलों. त्या दस्तावर–प्रॉमिसरी नोटीवर बालाजीची सही त्या पोऱ्यानें बनावट केली, त्यानें खोटा दस्त तयार केला अशी माझ्या

मनाची खात्री झाली. पण त्या बिचाऱ्या पोरांची मला दया आली. त्याच्याशीं निष्ठुरपणा दाखवूं नये असें मला वाटलें. म्हणून मी तेवढ्यावरच आवरलें व बालाजीला थाप दिली, कीं माझ्याकडून चुकलें. तुमची जामीनकी घालण्याचें ठरलें होतें पण मागाहून दुसऱ्याची घातली. परंतु दारूच्या निशेमध्यें माझ्याकडून असा प्रमाद घडला. तुमचा कांहीं संबंध नाहीं. तुह्मी जा. इतकें जेव्हां मीं त्याला सांगिलें, तेव्हां बालाजीची स्वारी जरा शांत झाली. "

शामरावांनीं हळूच विचारलें, " बरें पुढें ? "

" मग मी एक भाड्याची व्हिक्टोरिया करून खेतवाडी सातवी गल्ली, घर नंबर २२ कडे गेलों. "

पुढें न बोलतां हरिश्चंद्रराय मध्येंच थांबले, व चपापल्यासारखें करून त्यांनीं आपले ओंठ चावले. शामरावांनीं तो पत्ता स्पष्टपणें ऐकला व आपल्या हृदयपटलावर त्याचा ठसा मारून ठेविला. वरोपकरणी मात्र आपण तो पत्ता ऐकलाच नाहीं असें दाखवीत आपल्या नखांतील माती टांकाच्या टोंकानें ते कोरून काढूं लागले.

हरिश्चंद्रराय आपलें बोलणें सुधारून पुढें ह्मणाले, " मी त्या मुलाच्या बिऱ्हाडीं गेलों. त्यानेंहि आपला अपराध कबूल केला व तो रडूं लागला. गरीब बिचारा ! मला त्याची दया आली. होऊं नये ती गोष्ट त्याचे हातून झाली त्याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. तो ओक्साबोक्शीं रडूं लागला. बनावट दस्त करण्याचा त्याचा उद्देश नसावा असें मला वाटतें, मी अकस्मात् पैसे मागण्यास गेलों आणि त्याच्याजवळ तर पैसा नव्हता. आतां आपणाला भिकारडा ह्मणतील, दिवाळखोर ह्मणतील याची त्याला भीति पडली आणि प्रॉमिसरी नोटीची कल्पना त्याला सुचली. त्याचें म्हणणें असें आहे कीं, बाळाजी नाइकाची व त्याची जिवश्चकंठश्च दोस्ती होती. सबब त्याची जामीनकी आपण घालून त्याच्या-सारखी सही केली. बाळाजी आपणास क्षमा करील, असें त्याला वाटलें. "

शामराव हांसून ह्मणाले, " पण न्यायाचीं कोर्टें ह्या त्याच्या कृतीकडे निराळ्या दृष्टीनें पहातील. "

" न्यायाचीं कोर्टें ! म्हणजे ? मी त्याजवर फिर्याद करीन असें तुह्मांला वाटतें कीं काय ? "

" तर मग माझ्याकडे कशाला आलांत ? " असें शामराव बोलणार होते. पण तितक्यांत आवरून ते मृदु भाषेनें बोलले, " मग तुमच्याकरितां मीं काय करावें तर ? "

" हं, हाच तर महत्त्वाचा विषय आहे. ती प्रामिसरी नोट फाडून टाकावी असें मनांत आणून मी घरीं गेलों, पण ती मला सांपडेना. मीं तिचें काय केलें असेल असें तुह्मांला वाटतें ? "

" मला नाहीं ठाऊक. जाळून विडी पेटविली असेल. "

" छे, छे ! तसें नाहीं झालें. गैरशुद्धींत असतांना मीं ती नोट इतर चिठ्यांबरोबर त्या संपतराम मारवाड्याचें कर्ज भागविण्याकरितां त्याजकडे दिली. आतां याचा विचार करा. तो गरीब बिचारा पोरगा पश्चात्तापानें व भीतीनें अगदीं वेडा झाला आहे. त्या निर्दय, मारवाड्याकडून जर तो कागद परत मिळाला नाहीं, तर खात्रीनें त्या पोरावर तो म्हातारडा कायदेशीर इलाज केल्याशिवाय कधींहि रहावयाचा नाहीं."

शामराव सस्मित बोलले, " खरेंच बोवा. तो म्हातारा आहेच तसा वस्ताद खरा. तो इतका बेताल होईल कीं, तुमच्या त्या पोऱ्याला तुरुंगांत पाठविल्याशिवाय स्वस्थ रहायचा नाहीं. "

" पण त्यानें असें करणें बरें नव्हे. वकीलसाहेब विचार करा. तो पोरगा अगदीं अजाण, अल्पवयस्क, तशांत गरीब. त्याला असल्या क्षुल्लक गोष्टीबद्दल क्षमा झालीच पाहिजे."

शामराव खुर्चीवरून उठले, व बराच वेळ आपण हरिश्चंद्ररायाशीं संभाषणांत घालविली, आतां जास्त वेळ खर्च करण्यास सवड नाहीं; अशा दृष्टीनें पहात ते ह्मणाले, " ठीक आहे. एवढेंच ना ? "

" होय. आतां आपण एवढेंच करायचें कीं, त्या मारवाड्याकडून ती नोट आतांच्या आतां आणवून तुमच्याकडे घ्यावयाची. "

शामराव ह्मणाले, " पण हरिश्चंद्रराय, तुह्मी हें अगदीं बेकायदेशीर

कृत्य करीत आहांत, असें मला सांगणें भाग पडत आहे. ज्या ठिकाणीं जाणें तुमच्या ह्या दोस्त पोऱ्याला भाग आहे, त्या ठिकाणीं जाण्याचें वांचविण्याकरितां तुह्मी विनाकारण स्वतःचे तीनशें रुपये घालवीत आहां. आज नाहीं उद्यां, लवकर किंवा उशीरा, आतां नाहीं आणखी थोड्यां दिवसांनीं त्याला तुरुंगामध्यें जावें लागणारच. त्यांत तिळप्राय शंका नाहीं. अशा रीतीनें ज्यानें आपला वर्तनक्रम आरंभिला आहे तो शेवटीं तेथेंच जाणार हें अगदीं नक्की ठरलेलें आहे. मग तीनशें रुपये व्यर्थ कां घालवावेत ? परंतु—"

हरिश्चंद्ररायाच्या निष्कपट व दयाभूत चेहऱ्यावर शांत निश्चयाची छटा कायम असलेली पाहून शामराव पुढें ह्मणाले, "परंतु ही गोष्ट तुमच्या हितसंबंधाची आहे. त्याचा योग्य विचार तुमचा तुह्मी करावयाचा आहे. तुम्हांला योग्य सल्ला देणें हें माझें कर्तव्य आहे व ती मीं दिली आहे. तुह्मी तितक्या रकमेचा चेक मला लिहून देत असाल तर त्या मारवाड्याकडे—माझी त्याची चांगली ओळख आहे—माझ्या नोकरास पाठवून देतों. तो बाहेर गेला आहे. तुमचा चेक लिहून तयार होईपर्यंत—इतक्यांत येईल. इतकें बोलून शामरावांनीं कागद, दौत व लेखणी हरिचंद्ररायापुढें केली.

हरिश्चंद्रराय कागद घेऊन लिहूं लागले. इतक्यांत त्यांच्या मनांत कायसें येऊन त्यांची मुद्रा पालटली व ते ह्मणाले, "वकीलसाहेब, चेक लिहून देणें मला बरें दिसत नाहीं. तो घेऊन तुह्मी एखाद्या ब्यांकेकडेच जाणार, नव्हे काय ! पूर्वीप्रमाणें ब्यांकेत माझी ठेव असेल असें तुह्मांस वाटत असावें. छे, छे ! मीं ते सर्व पैसे मागेंच काढले आहेत. तुह्मी मला तीनशें रुपये उसनेच द्या, म्हणजे झालें."

ह्या मागणीचें शामरावांस आश्चर्य वाटलें नाहीं, पण त्यांनीं किंचित् अंग चोरून आश्चर्य वाटल्याचें दर्शविलें. हरिश्चंद्रराय पुढें काय बोलणार हें त्यांनीं अगोदरच ओळखलें होतें. ते ह्मणाले, "मी फार दिलगीर आहें. सध्यां माझ्याजवळ फारसे पैसे शिल्लक नाहींत. थोडे आहेत त्यांतून मला बरेंच देणें भागवावयाचें आहे." तेव्हां हरिश्चंद्रराय अगदीं काकु-

ळतीस येऊन—स्वतःकरितां ते इतक्या काकुळतीस कधींच आले नसते—म्हणाले, "पण वकीलसाहेब, त्या लेंकराचा विचार करा. त्याजकडे पहा."

शामराव खिशांत हात घालून व मुद्रा किंचित् कठोर करून ह्मणाले, "हरिश्चंद्रराय, माफ करा. मी त्याचाच विचार करीत आहें. पण अशा अल्पवयस्क, पाजी, हरामखोर पोऱ्यासंबंधानें असें करावें, असें कांहीं मला वाटत नाहीं."

हरिश्चंद्रराय रागानें लाल होऊन ह्मणाले, "पण तो पाजी, हरामखोर मुलगा नाहीं."

"बरें. तसें कां होईना! तुह्मांला पसंत असेल तर खोटा-बनावट-दस्त करणारा असें मी ह्मणतों. जर कोणाला शिक्षा होणें योग्य असेल, तर या पोऱ्यास शिक्षा झालीच पाहिजे. समजलें? तुमचें म्हणणें हा भयंकर अपराध आपसांत संपवावा असेंच कीं नाहीं? अगदीं गैर. बेकायदेशीर!"

हरिश्चंद्रराय खिन्न स्मित करून म्हणाले, "छे, छे! तसें नव्हे. तुह्मी असें काय भलतेंच बोलत आहांत? फक्त ही गोष्ट गुप्त रहावी, बाहेर फुटूं नये एवढीच माझी इच्छा आहे."

"ठीक आहे. तुमच्या मताप्रमाणें माझें मत नाहीं. तथापि मी आतां यासंबंधानें जास्त वादविवाद करूं इच्छित नाहीं. परंतु गुन्हा छपविण्याकरितां लागणारा पैसा मात्र मला देतां येत नाहीं. तुमच्या स्वतःकरितां पाहिजे असेल तर मात्र—"

शामरावांच्या दयाशून्य चेहऱ्यांत, त्यांच्या आंवळलेल्या तिरस्कारपूर्ण ओठांत व तीक्ष्ण आणि क्रूर डोळ्यांत इतकें क्रौर्य भरलें होतें कीं, त्यांचें अंतःकरण वळविण्याकारितां, त्यास मार्दव आणण्याकारितां जास्त प्रयत्न करणें म्हणजे तितका वेळ व्यर्थ घालविण्यासारखें आहे, असें हरिश्चंद्ररायांना वाटलें. ते म्हणाले, "हरकत नाहीं. तुह्मांला तसदी दिली, मीं तुमचा इतका वेळ घेतला याबद्दल मी फार दिलगीर आहें. मी जातों

आतां. हा सर्व प्रकार अगदीं गुप्त ठेवावयाचा बरें का ! तुह्मांला ठाऊक कीं मला ठाऊक."

वकीलसाहेबांनीं आपल्या भिंवया चढविल्या व मनोहर हास्य करून म्हटलें, " हरिश्चंद्रराय, तुह्मी कायदेपंडिताच्या ऑफिसांत आहांत. ह्या चार भिंतीच्या चवकटींत जो प्रकार होतो, जी हकीगत घडते, ती हकीगत, तो प्रकार, पक्षकारांची तशी इच्छा असल्याशिवाय बाहेर जाऊं शकत नाहीं. तुमची ही त्रोटक हकीगत तुह्मीं जणूं सांगितलीच नाहीं अशा रीतीनें मी आपल्या हृदयकपाटांत बंद करून ठेवतों. समजलें ? ठीक आहे. या तर ! "

हरिश्चंद्रराय उठून जावयाकरितां निघाले. ते खोलींतून बाहेर पडतात तोंच भुजंग सायकलवरून परत आला व शामरावांना सलाम करून त्यानें कागदाचा एक तुकडा त्यांच्या टेबलावर ठेवला.

शामरावांनीं तो कागद घेऊन ' खेतवाडी, सातवी गल्ली, घर नंबर २२ ' असें वाचलें. त्याबरोबर त्यांना कसलीशी आठवण होऊन ते नोकरास म्हणाले, " भुजंग, हरिश्चंद्रराय आतांच निघून गेले. जा, जा. लवकर. त्यांना सांग कीं, तुमच्याशीं आणखी कांहीं बोलावयाचें आहे. असेच येऊन जा. पळ ! "

त्याबरोबर भुजंगानें धूम ठोकली व थोड्याच वेळांत तो हरिश्चंद्ररायांसह परत आला. त्याची मुद्रा अद्यापि खिन्न दिसत होतीच. त्यांनीं दरवाजांतूनच म्हटलें, " वकीलसाहेब, मला पुन्हां कां बोलावलेंत ? "

शामरावांनीं त्यांना आंत येऊन खुर्चीवर बसण्यास सांगितलें व खोलीचें दार लावून तूं बाहेरच्या बाजूस बैस असा भुजंगास हुकूम सोडला. त्याबरोबर मोठ्या तत्परतेनें भुजंग बाहेर गेला व त्यानें खोलीचें दार बंद करून घेतलें.

नंतर शामराव ह्मणाले, " हरिश्चंद्रराय, मघांशीं मीं तुमच्या म्हणण्यास रुकार दिला नाहीं. यावरून मी नेटदार वकील नाहीं, असें तुह्मी ह्मणत असाल. परंतु ती तुमची हकीकत ऐकल्यापासून माझ्या मनाला

चटका लागून राहिला आहे. त्या पोरानें मोठी वाईट गोष्ट केली. आपसांत संपवून टाकावें असें तुह्मी मघांशीं ह्मणालां नव्हे का ?"

हरिश्चंद्रराय उत्कंठेनें ह्मणाले, "होय. माझी तशी इच्छा आहे आणि सर्व हकीकत तुह्मीं नीट ऐकून घेतली तर तुह्मी सुद्धां तसेंच ह्मणाल."

शामराव शांतपणें बोलले, "तर मग तुह्मी मला सर्व हकीगत नाहींच का सांगितलीत ? त्या मुलाचें नांव पाहिजे तर नका सांगूं. पण—"

हरिश्चंद्रराय निष्कपटपणानें म्हणाले, "तुह्मीं मला मदत करणार आहां तर तुमच्यापासून कोणतीच गोष्ट लपवून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं. तसा प्रकार नसता तर मात्र मीं तुह्मांला त्याचें नांव समजूं दिलें नसतें."

शामराव किंचित् हांसून व कागदाच्या कपट्याकडे पाहून म्हणाले, "हो. असें तर खरेंच. तुह्मी सर्व हकीगत एकदां सांगा पाहूं."

हरिश्चंद्रराय म्हणाले, "सांगतों. त्या मुलाचें नांव प्रभाकर. मुलगा पण मुलगा आहे बरें. रूपानें तर मदनाचा पुतळाच. पण त्याचें कोणी आप्त-इष्ट नाहीं. अगदीं एकटा आहे. त्याची काळजी करणारासुद्धां कोणी नाहीं. ह्मणून मला त्याची दया येते."

"असें कां बरें ?" शामराव बोलले. त्यांचे डोळे जमिनीकडे लागले व अंतःकरणांत अतिशय उत्कंठा वाढून राहिली. अशी स्थिति आहे तर त्या ह्मातान्यासंबंधानें—साबाजी चित्रकारासंबंधानें—कांहीं तरी गुप्त रहस्य असलेंच पाहिजे असें त्यांना वाटलें.

हरिश्चंद्ररायांनीं उत्तर दिलें, "असा प्रकार दिसतो खरा. ह्या मुलाचा बाप म्हातारा असून चित्रकार, लेखक, अगर इतर धंदा करणारा असावा. कोठें तरी खेड्यापड्यांत रहात असेल व ह्या मुलाला आपल्याजवळ ठेवणें त्याला आवडत नसेल."

"याचें कारण ?" शामराव नखें टोकरीत बोलले.

"कारण एवढेंच, कीं, त्या मुलाचा चेहरा अगदीं त्याच्या आईसारखा आहे. त्या नवराबायकोचें कसल्याशा क्षुल्लक कारणावरून जंगी भांडण झालें. ती नवऱ्याला कायसें टाकून बोलली, ह्मणून राजश्रींनीं

डोकींत राख घातली व जे कोठें निघून गेले, त्याचा पत्ता नाहीं. त्यांच्या पाठोपाठ तीही मुलाला टाकून त्यांच्या शोधार्थ निघून गेली. पण त्या दोघांची गांठ पडली नाहीं. मुलाची अनास्था चालल्याचें त्याला समजलें तेव्हां त्यानें त्याची चांगली व्यवस्था केली व शिक्षण चालविलें. पण त्या मुलाला आपल्याजवळ ठेवणें त्याला आवडत नाहीं. ह्मणून तो मुलगा असा बाहेर बाहेरच असतो. आतां दिपवाळीची सुट्टी आहे, ह्मणून आपल्या एका सोबत्याबरोबर तो मुलगा येथें आला आहे. "

" समजलों. समजलों. ही एक कादंबरीच आहे ह्मणावयाची. बरें. " असें बोलत त्यांनीं भुजंगानें दिलेला कागदाचा तुकडा फाडून टाकला. " त्या मुलानें अलीकडे आपल्या बापास पत्र वगैरे पाठवून येथें आल्याचें तरी कळाविलें आहे कीं नाहीं ? "

" ईश्वराला माहीत. पण कळाविलें असावेंसें वाटतें. कारण, तार केली आहे, लवकरच येतील, असें कायसें तो बोलत होता. "

शामराव जणूं सहजगत्या ह्मणाले:—" होय का ? तर मग केली असेल तार. बरें, मग काय ? तुह्मी म्हणतां, त्या मारवाड्याकडून तो कागद आणावयाचा. होयना ? मला कांहीं हें सोईचें दिसत नाहीं; पण तुह्मी जर तसें म्हणतां तर लवकर आणवावा हें बरें. " असें ह्मणून त्यांनीं एक पत्र लिहिलें व एक चेकही लिहून तयार केला.

हरिश्चंद्रराय सानंद मुद्रेनें ह्मणाले, " शाबास ! शाबास ! वकीलसाहेब, शाबास ! तुमचे फार फार उपकार आहेत. तुमच्यासारखा सद्गृहस्थ अशा वेळीं कच खाईल, मागें घेईल, असें मला वाटलें; पण नाहीं. खरोखरीच नाहीं. "

" पण मी करतों हें बरें नाहीं. केवळ तुमच्याकरितां—" असें ह्मणून शामरावांनीं भुजंगास हांक मारली.

त्याबरोबर भुजंग खाड्कन् दरवाजा उघडून लगबगीनें आंत येऊन उभा राहिला. त्याजकडे पत्र देऊन शामराव म्हणाले, " हें पत्र नेऊन संपतराम मारवाड्याकडे दे आणि उत्तर घेऊन ये. जरूर."

भुजंग पत्र घेऊन ताबडतोब निघून गेला.

नंतर शामराव हरिश्चंद्ररायांना म्हणाले, " बरें, पण तुम्ही ही गोष्ट आणखी कोणाजवळ बोलला नाहीं ना ? "

" नाहीं. कोणाजवळ अद्याप बोललों नाहीं व पुढेंही बोलणार नाहीं. पैज मारा पाहिजे तर. "

शामराव सस्मित बोलले, " ठीक आहे. नाहीं तर मग आज तीनशें रुपये खर्चून कांहींच उपयोग होणार नाहीं. एकाजवळ तुम्ही ही गोष्ट बोलला कीं, सर्व जगभर झालीच समजा. माझी गोष्ट सोडून द्या. बरें, पण ही इतकी माहिती तुम्हीं कशी मिळविली. "

" त्या मुलाचा स्नेही बालाजी–त्याजकडून. त्या मुलाला केव्हां केव्हां भेटत जा, असें मला बालाजीनें सांगितलें आहे."

"असें ! असें ! आतां जुळलें. बरें आहे. मला एक दोन पत्रें लिहावयाचीं आहेत, तेवढीं लिहितों. "

" हो, हो. खुशाल लिहा. " असें म्हणून हरिश्चंद्ररायांनीं विडी पेटविली व तिचा धूर काढीत ते इकडे तिकडे पहात राहिले. "

वकीलसाहेब पत्रें लिहूं लागले. एक पत्र लिहून झालें. नंतर ते दुसरें लिहिण्यास सुरवात करणार इतक्यांत भुजंग परत आला व त्यानें एक पाकीट टेबलावर ठेवलें. पाकीट फोडून आंतून शामरावांनीं एक दस्त बाहेर काढला व हरिश्चंद्ररायांना दाखविला.

त्याबरोबर हरिश्चंद्रराय एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाले, " आतां ठीक झालें. काळजी गेली. गरीब बिचारा पोरगा! आतां आपणाला कांहीं भय राहिलें नाहीं, हें समजल्यावर तो अगदीं हरखून जाईल. "

" खास, खास हरखून जाईल. पण ह्या हकीकतीचें पत्र नाहीं का त्याला लिहीत ? मला वाटतें, लिहिलेलें बरें. "

" बरोबर. अगदीं योग्य सूचना. मग येथेंच लिहितों तर ! "

शामरावांनीं त्यास नोटपेपर व पाकीट देऊन म्हटलें, " पण पत्ता येथला लिहूं नका म्हणजे झालें. ही हकीकत तुमच्याखेरीज दुसऱ्या कोणास समजली आहे, ही गोष्ट त्याला समजून उपयोगी नाहीं. "

" अलबत्, नाहींच उपयोगी. वकीलसाहेब, कमाल आहे तुमच्या दूरदर्शीपणाची. केवढें धोरण ! किती दूरवर विचार ! उगीच नाहींत पक्षकार लोक तुमच्याकडे धांवून येत ! नाहीं तर, हायकोर्टांत वकील, ब्यारिस्टर वगैरे कमी का आहेत ? पण तुमचाच इतका लौकिक का ? खुबी ती हीच. नेहमीं डोकें कसें अगदीं शांत व तयार असतें ! " असें म्हणून हरिश्चंद्ररायांनीं खालील मजकुराचें पत्र लिहिलें:—

" श्रीयुत प्रभाकर चित्रकार यासः—

" जें पाहिजे होतें तें मिळालें—एवढ्यावरून ओळखावें. आतां काळजी करण्याचें कारण नाहीं. इतःपर जपून वागावें."

पत्र लिहून झाल्यावर हरिश्चंद्ररायांनीं तें शामरावापुढें ठेवून म्हटलें, " एवढा मजकूर पुरे ना ? "

शामराव पत्र लिहिण्यांत निमग्न झालेले दिसत होते. हरिश्चंद्ररायाचा प्रश्न ऐकून त्यांनीं वर पाहिलें व " काय म्हटलेंत ? " असें म्हणत म्हणत पुढें पडलेलें पत्र वाचून ते म्हणाले, " ठीक ठीक. पुरे झालें. पण–पण–त्याच्या मनाला काळजी राहूं नये ह्मणून तो कागद–बनावट दस्त–आपण फाडून टाकला असा मजकूर लिहा." असें ह्मणून भुजंगानें आणलेलें पाकीट टरटर फाडून त्याचे बारीक बारीक तुकडे करून त्यांनीं ते केराच्या टोपलींत टाकून दिले. हरिश्चंद्ररायांनीं ताजा कलम घालून हा मजकूर लिहिला व म्हटलें, " भुजंगाबरोबर हें पत्र देतों पाठवून ? "

" नको, नको. त्याला शंका येईल. पोस्टांत टाका म्हणजे झालें. "

" तसेंच करतों तर. आतां मी मोकळा झालों. एक दोन दिवसांत तुमचे रुपये पाठवून देतों. जातों. वकीलसाहेब, मजवर आपले अगणित उपकार आहेत. "

हे शेवटचे शब्द ऐकले न ऐकल्यासारखें करून शामराव बोलले, " ठीक आहे. कांहीं गडबड नाहीं. सवड होईल तेव्हां द्या झालें. या."

असें ह्मणून पुनः शामराव पत्र लिहूं लागले. हरिश्चंद्रराय खोलींतून बाहेर पडले व जिना उतरून खालीं गेले. त्यांच्या पावलांचा आवाज कमी कमी होत अगदीं ऐकूं येईनासा झाला. तेव्हां शामराव चट्दिशीं

खुर्चीवरून उठले व दरवाजास आंतून बोल्ट–कडी–घालून टेबलाजवळ आले. टिपकागदाखालून एक कागद काढून आनंदातिशयानें ते वाचूं लागले. प्रभाकरानें खोटा दस्त केला होता तो हाच. कांहींहि न बोलतां ते कितीतरी वेळ तो कागद पहात राहिले. दुधाकडे पहातांच मांजराची स्थिति होते, त्याप्रमाणें त्यांची स्थिति झाली. ते जिभल्या चाटूं लागले. जणूं तो कागद म्हणजे अतुल संपत्तीचा ठेवा, शत्रूचा संहार करणारें निर्वाणीचें अस्त्रच आहे असें त्यांना वाटलें. त्यांनीं आपलें डोकें वर केलें व आपल्या करामतीचें कौतुक करीत ते सस्मित पुटपुटले, " इतक्या लवकर हें साधन माझ्या हातीं आलें अं ! माझें नशिब मला अनुकूल, पूर्णपणें अनुकूळ आहे. ती आतां माझी झालीच. अहाहा ! माझी सर्वांग-सुंदर तारा मला मिळालीच पाहिजे. शिवरावासारखे शेंकडों सरदारपुत्र मध्यें येऊन कितीही नाचले तरी हरकत नाहीं. नाचा म्हणावें, खुशाल नाचा. तुमच्या सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकून, तुमची खोडकी जिरवून, हा शामराव तारेला घेऊन जाणार ! शाबासरे पठ्या ! " असें ह्मणून वकीलसाहेबांनीं स्वतःची पाठ थोपटली.

---

# प्रकरण १२ वें.

—:o:—

## आणभाक.



तारा दुसरे दिवशीं सकाळीं निजून उठली. आधल्या दिवशीं घडलेल्या सर्व गोष्टींनीं तिचें मन विचारमग्न झालें. वाड्यांतील मेजवानी, साबाजीला आलेली तार, त्याचें अकस्मात् मुंबईला निघून जाणें, तो चमत्कारिक लहानसा फोटो, ह्या सर्वांहून जास्त महत्वाची गोष्ट ह्मणजे सरदारपुत्र शिवरावांचें तिच्यावर जडलेलें निरतिशय प्रेम व आज संध्याकाळीं त्यांना भेटण्याकारितां नदीच्या घाटावर

येण्यासंबंधानें काल तिनें दिलेली कबूली, इत्यादि गोष्टींनीं तिचें मन गोंधळून गेलें.

साबाजी मुंबईला गेल्याचें काकूबाईंना माहीत नव्हतें. तो गेला तेव्हां त्यांना गाढ झोंप लागली होती. आतां खालीं गेल्यावर काका कुठें गेले, कशाकरितां गेले, इतक्या घाईनें कां गेले, वगैरे प्रश्न विचारून काकूबाई आपली पुरेवाट करतील, आणि काका मुंबईला गेले यापलीकडे आपणाला तर मुळींच माहिती नाहीं व काकांनींही कांहींच सांगितलें नाहीं; तेव्हां काकूबाईंची जिज्ञासा आपल्याकडून कशी तृप्त होणार ? व आपल्याकडून समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं ह्मणजे त्या जास्तच संतापून आपणाला नाहीं नाहीं तें बोलणार. आतां काय करावें, असा विचार करीत तारा खालीं आली. काकूबाई घरांतलि केरपोतेरें करून चहाची सुद्धां तयारी करून वाट पहात बसल्या होत्या. आज घरांत साबाजी नसल्यामुळें त्यांच्या तोंडाला खीळ पडल्यासारखी झाली होती. तुंबलेलें पाणी एकाएकीं जोरानें बाहेर पडावें त्याप्रमाणें तारा खालीं आलेली पाहतांच काकूबाईंची जिव्हा स्वैर वृत्तीनें क्रीडा करूं लागली:—“ तारू, याला काय ह्मणायचें ? मी केवढा वेळची चहा सुद्धां करून बसलें आहें ! ही का उठायची वेळ ! इतकीं वर्षें शाळेंत जाऊन हेंचका शिकलीस ? धन्य झाली बाई तुझ्यापुढें. आज साबाजी कुठें दिसत नाहींत ते ? तुझी उशीरा उठण्याची संवय लागली वाटतें त्यांना. ह्मणच आहे. ‘ संगतिः संगदोषेण ’ ” वगैरे वगैरे थोड्या वेळांत त्या तारेला हजार शब्द बोलल्या. तारेचा स्वभाव थट्टेखोर व आनंदी असल्यानें तिनें त्यांचें बोलणें विशेष मनावर न घेतां “ तार आली ह्मणून काका रात्रीं मुंबईला गेले. यामुळें निजायला मला उशीर झाला. ” एवढेंच ती बोलली. परंतु एवढ्यानें काकूबाईंची उत्कंठा जास्तच वाढली. त्यांनीं प्रश्नावर प्रश्न करण्यास सुरवात केली. साबाजी मुंबईला असे एकाएकीं कां निघून गेले, कोणाची तार आली होती, मजकूर काय होता, येणार कधीं, गेले केव्हांसे, वगैरे किती तरी विचारलें.पण तारा तरी बिचारी काय सांगणार ? मुंबईहून तार आली ह्मणून साबाजी गेले खरे, पण तार कोणाची व इतकें जरूरीनें जाण्याजोगें काय काम होतें,

हें तिला बिलकुल माहीत नव्हतें. साबाजीनें आपणाला यासंबंधानें अगदीं काळोखांत ठेविलें, यत्किंचितहि थांग लागूं दिला नाहीं, ह्मणून तारेला अगोदरच वाईट वाटत होतें. तशांत काकूबाईच्या प्रश्नावलीनें तर ती जास्तच खट्टू झाली. काकूबाईही थोडा वेळ चिंताक्रांत झाल्या. नंतर त्या ह्मणाल्याः—" आज येथें शामराव असते तर फार बरें झालें असतें. ते फार हुषार असून मायाळू आहेत. तुझ्या काकांच्यासाठीं काय पाहिजे तें करतील. त्यांना या घराबद्दल पूर्वीपासून काळजी वाटत आहेच. अलीकडे अलीकडे तर ती फार वाढली आहे. "

" खरें कीं काय ? कारण काय बरें ? "

"कारण कसलें त्यांत ? मला नाहीं सांगतां येत. पण ते आतांशा इकडे पुष्कळ येतात एवढें खरें. नेहमीं इकडेच असतात, म्हटलें तरी चालेल. खरेंच गडे तारू, सगळेंच मुसळ केरांत! आतां या माझ्या विसराळूपणाला काय करूं बरें ? काल संध्याकाळीं येथें येऊन ते गजरे देऊन गेले आहेत त्यांची मला आठवणच नाहीं. कोमेजतील ह्मणून ओल्या फडक्यांत गुंडाळून त्या झाडाच्या कुंडींत ठेविले आहेत. थांब हो, घेऊन येतें. " असें ह्मणून काकूबाई बागेंत गेल्या व गजरे घेऊन परत आल्या. " हे पाहिलेस ? कसे सुंदर आहे ते ? "

" खरेंच, फार छान आहेत. पण हे गजरे त्यांनीं कोणाकरितां दिले आहेत ? माझ्याकरितां कीं काकांकरितां ? "

" इश्श ! हें ग काय विचारणें ? तुझ्या काकांना हे गजरे घेऊन करावयाचें तरी काय ? चमत्कार आहे तुझ्यापुढें."

" ते नाहीं मला माहीत. शामराव काकांचे स्नेही आहेत, माझे नाहींत. ह्मणून आपलें मीं विचारलें. बरें, आतां होतें तेथें नेऊन ठेवा जा. "

" बरें ठेवतें हो. आणखी कांहीं आहे का काम करायचें ? " असें काकूबाई खोंचून बोलल्या व कपाळाला आंठ्या घालून वांकड्या नजरेनें तिजकडे पहात तेथून निघून गेल्या. शामरावांनीं दिलेल्या गजऱ्यांची अशी संभावना तारेकडून होईल असें त्यांना वाटलें नव्हतें.

त्या सबंध दिवसभर तारेच्या मनाला बिलकुल चैन नव्हती. ती क-

सल्या तरी विचारांत गुंग असावी असें तिच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. स्वयंपाकघरांत जाऊन काकूबाईशीं थोडें बोलावें, मग बागेंत जाऊन फुलझाडांकडे पहात रहावें, नंतर घरांत येऊन खिडकीशीं विणकाम करीत बसावें, पुनः बागेंत जावें असा प्रकार चालला होता. तिची ही चमत्कारिक तऱ्हा पाहून काकूबाईची चर्पटपंजरी चाललेली होती, पण तारेनें तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. दिवस कसाबसा निघून गेला व संध्याकाळ होत आली तसें तारेचें हृदय जलद उडूं लागलें. सर्व दिवसभर ज्या घटकेचा ती विचार करीत होती, ज्या घटकेसंबंधानें तिचें मनोराज्य चाललें होतें, ती घटका अगदीं जवळ येऊन ठेपली. पण आतां मात्र तिला भय वाटूं लागलें. हें प्रेम, शिवरावांचें व तिचें एकमेकांवर जडलेलें प्रेम, इतकं विलक्षण व गूढात्मक होतें कीं, ती भीतीनें जवळ जवळ गारठून गेली. आपण घरींच राहावें, त्या अमोलिक भेटीचा योग जुळवून आणूं नये असें तिला एकदां वाटलें. पण तितक्यांत शिवरावांची मूर्ति तन्मय दृष्टीनें तिची वाट पहात उभी असलेली तिच्या डोळ्यांसमोर दिसूं लागली. त्याबरोबर तिचें हृदय जरा शांत झालें. "मला गेलेंच पाहिजे" असें ती स्वतःशीं पुटपुटली; व आपला बेत पुनः फिरेल अशी जणूं भीति वाटून ती चट्कन् उठली व अंगावर शाल घेऊन, "बाई, माझें कपाळ दुखत आहे. नदीकांठीं थोडी फिरून येतें. गार वारा लागला ह्मणजे जरा बरें वाटेल." असें काकूबाईस सांगून ती बाहेर पडली.

काकूबाई रागानें फुणफुणत ह्मणाल्या, "जा, तूं जा, साबाजी तर गेलेलेच आहेच. मीही उद्यां सकाळीं निघून चालती होतें. माझी कांहीं वतनदारी येथें ठेवलेली नाहीं. सगळ्यांनींच मेले असें चालविलें तर इथें रहायचें तरी कशाला ?" पण तारेला ते शब्द ऐकूं गेले नाहींत. ती झपाझप पावलें टाकीत नदीच्या घाटावर येऊन पोंचली, तों सरदार शिवराव तिची वाट पहात होडींत बसले असल्याचें तिला दिसलें. ती चट्कन् होडींत बसली व शिवराव वल्हीं मारूं लागले. थोडक्याच अंतरावर एक लहानसें बेट त्या नदीच्या पात्रांत झालेलें होतें. तेथें पाण्याचा प्रवाहहि शांत होता. त्या ठिकाणीं जाऊन शिवरावांनीं

आपली होडी थांबविली व हातांतील वल्हीं होडीवर आडवीं टाकून ते ह्मणाले, " तारू, तुझ्याकडे मी एकदां पोटभर पाहून घेतो. एवढा वेळपर्यंत मला तशी संधीच मिळाली नाहीं. "

तारेनें सलज्ज स्मित करून किंचित् मान फिरविली, पण तेवढें सुद्धां शिवरावांना खपलें नाहीं. ते तिच्याकडे पहात म्हणाले, " हें कांहीं चांगलें नाहीं. तारू, तुझ्या ह्या विशाळ व काळ्याभोर नेत्रकटाक्षांसाठीं हा शिवराव अत्यंत तृषित झाला आहे. चातकपक्षी मेघाकरितां जसा उत्कंठित झालेला असतो, त्याप्रमाणें माझी स्थिति झाली आहे. ह्मणून तूं आपले डोळे एके बाजूस लपविलेस तर मला तें खपणार नाहीं. पण तूं आज कसला विचार चालविला आहेस? तुझ्या त्या मनोहर नेत्रकमलांत गंभीरपणाची झाक दिसत आहे त्याचें कारण काय? "

" शिवराव, ही गोष्ट आम्ही करतों ही गोष्ट चांगली कीं वाईट याचा मी विचार करतें आहें."

" चांगली कीं वाईट ? " शिवराव बोलले. जणूं ह्या प्रश्नाचा न्यायाच्या दृष्टीनें ते विचार करूं लागले असें दिसलें. " चांगलीही म्हणतां येईल व वाईटही म्हणतां येईल. दोन्ही तऱ्हांनीं याचें उत्तर येईल. आमचें दोघांचें प्रेम जर एकमेकांवर खरोखर असेल तर चांगली, नसेल तर वाईट. प्रिये, वाईट कृत्य करावयास हा शिवराव तुला कधींहि सांगणार नाहीं, हें तूं पक्कें ध्यानांत ठेव. ही आपली चोर भेट. घटका अर्ध्या घटकेची भेट—लौकिकदृष्ट्या थोडी वाईट असेल, पण लोकांच्या दृष्टीशीं आपणाला काय करायचें आहे? आमच्या परस्पर सौख्याची फक्त आम्हीं काळजी घेतली म्हणजे झालें. लोक काय, दहा तोंडांनीं दहा बोलणार. "

शिवरायांच्या ह्या विचारसरणीनें तारेला मोठें कोडेंच पडलें. ती अद्यापि मुग्ध कुमारिका होती. तथापि तिनें गांभीर्ययुक्त मुद्रेनें म्हटलें, " पण मी म्हणतें, चंद्रिकेनें असें केलें असतें का ! "

शिवरावः—" चंद्रिका व तूं फार भिन्न भिन्न आहांत. तिच्या-

मध्यें व तुझ्यामध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे. चंद्रिका लोकांना फार भिऊन वागणारी आहे."

"तर मग तुह्मी कांहीं तिला असें करण्यास सांगणार नाहीं ?"

"मुळींच नाहीं, कधींहि सांगणार नाहीं." शिवराव जोरानें व स्पष्टपणानें बोलले. "प्राणप्रिये, तुझ्याखेरीज मी दुसऱ्या कोणाही स्त्रीला असें माझ्याबरोबर येण्याकरितां बोलावणार नाहीं. मीं सांगावें, असें तुला वाटतें काय ?"

"नाहीं. नाहीं," ती चट्कन् बोलली.

"तर मग प्रिये, आमच्यासारखे सुखी कोणीच नाहींत. उभतांचें एकदां 'शुभमंगल सावधान' झालें कीं आह्मी सौख्यसागरांत पोहूं लागूं. मग मुहूर्त कधींचा ठरवावा ? तारू, आमच्या ताईचीसुद्धां तुझ्यावर पुष्कळ मर्जी आहे."

"तें सगळें खरें. पण तुह्मी म्हणतां तसें होणें बरें नाहीं. तें ताईसाहेबांना–वाड्यांतील सर्व मंडळींना पसंत पडणार नाहीं."

"पुनः आपलें तेंच. वाड्यांतील मंडळींशीं तुला काय करावयाचें आहे ? त्याचा विचार तरी कशाला करतेस ? आमच्या दोघांवर एकदां अक्षता पडल्या, कीं मग सर्व कांहीं आपोआप ठीक होईल. मला आतां जास्त दिवस धीर निघणार नाहीं. तारू, खरें प्रेम म्हणजे काय असतें तें मला आतांपर्यंत–तुझी दृष्टादृष्ट होईपर्यंत समजलें नव्हतें. तुला पाहिल्यापासून माझ्या मनाची कशी स्थिति झाली आहे, तूं पाहतेसना ? ह्या तुझ्या भेटीची किती उत्कंठेनें मी वाट पहात असतों, ते कंटाळवाणे तास केव्हां निघून जातील असें मला किती तरी वाटतें, दिवस किती उदासीन भासतो, हें मी तुला आतां सांगत बसत नाहीं. तारू,—" तारेचे डोळे त्या वेळीं पाण्यांत पडलेल्या नुकत्याच उदय पावणाऱ्या पौर्णिमेच्या मनोहर चंद्राच्या प्रतिबिंबाकडे लागले होते. तिजकडे पाहून ते ह्मणाले, "तारू, तूं बोलत कां नाहींस ? तुला कशाची भीति वाटते तें तरी कळूं दे."

"भीति कसली ह्मणा, पण–पण–तुमच्या माझ्यामध्यें केवढें अंतर

आहे याचा विचार केला का ? तुह्मी श्रीमंत, थोर, ह्या येवढ्या मोठ्या जहागिरीचे मालक आणि मी काय यःकश्चित् चित्रकाराची पुतणी. शिवराव, तुह्मी माझ्याबरोबरीचे, माझ्या सारखेच गरीब असतां तर किती बरें झालें असतें ! मग कशाचीच आडकाठी आली नसती. आम्ही मग एका लहानशा खोपटांत राहिलों असतों. तुह्मी सकाळीं न्याहारी करून कामावर जाणार ते संध्याकाळीं परत येणार, आणि मी स्वयंपाक तयार करून तुह्मांस पाय धुण्याकरितां ऊन पाण्याचा तांब्या हातांत घेऊन तुमची उत्कंठेनें वाट पहात दरवाजांत उभी राहणार. खरेंच हें किती आनंदाचें जिणें झालें असतें बरें. अशीं शेतकऱ्यांचीं सुखी जोडपीं बडोद्यांत असतांना मीं किती तरी पाहिलीं आहेत ! संध्याकाळच्या वेळीं शेतकरी दिवसभर शेतांत राबून खरें विश्रांति सुख घेण्याकरितां आपआपल्या जनावराकरितां वैरणीचे भारे डोकीवर घेऊन घराकडे चालले आहेत, व त्यांच्या बायका खोपटाच्या दाराशीं आपलीं गोजिरवाणीं तान्हुलीं घेऊन " इथं इथं बैस रे काऊ, बाळा घाली जेऊं " वगैरे गाणीं गाऊन त्याचें मन रिझवीत आपल्या पतिराजाची प्रेमानें वाट पहात उभ्या आहेत, असा देखावा पाहून मला फार आनंद होई. त्या बायका मला इतक्या सुखी दिसत कीं, त्यांच्यासारखें सुख मला कधीं भोगायला मिळेल असें वाटून मी त्यांचा हेवा देखील करीं. "

" पण तारू, तूं शेतीवर मोलमजुरी करून पोट भरणाऱ्याची बायको होण्याकरितां का जन्माला आलीस ? ईश्वरानें तुला इतकें रूपलावण्य दिलें आहे, तें एखाद्या काबाडकष्ट करून उपजीविका करणाऱ्या धटिंगणाच्या सहवासांत आयुष्य घालविण्याकरितां दिलें आहे काय ? नाहीं, नाहीं, खात्रीनें नाहीं. दारिद्र्याच्या त्या भयंकर विवंचना व हालअपेष्टा तुझ्यापेक्षां भिन्न प्रकारच्या बायकांकरितां आहेत. तथापि तारू, तुझी तशी इच्छाच असेल, मी दिवसभर कामावर जावें व संध्याकाळीं माझी वाट पहात एका लहानशा खोपटाच्या दाराशीं तूं उभें असावें असें तुझ्या मनांत असेल, तर तिकडूनहि माझी तयारी आहे. तसें कां होईना ! तुझी इच्छा आहे तर मी हा कडा, ही जहागीर, ही श्रीमंती सर्व कांहीं सोडून

देऊन एखाद्या जाईच्या वेलीनें आच्छादलेल्या खोपटांत तुझ्यासमवेत राहीन. तुझ्याकरितां, केवळ तुझ्याकरितां, तारू, मी इतकें देखील करण्यास तयार आहे. समजलें ? ”

तारा मान हालवून व कानांवर हात ठेवून बोलली, “ छे, छे, छे ! नकोग बाई ! मग तर लोकांना तक्रार करण्यास, मला नांवें ठेवण्यास, माझ्या नांवानें खडे फोडण्यास चांगलेंच फावल्यासारखें होईल. ह्या दुष्टेनें कैदासणीनें शिवरावांना आपल्या बरोबरीला ओढून खालीं आणलें, त्यांच्या थोर कुळास, दर्जास व जहागीरदारीस योग्य अशीं जीं कर्तव्यकर्में त्यांनीं करण्याचीं तीं विसरण्यास त्यांना हिनें शिकविलें असें ह्मणून कडाकड बोटें मोडतील, मला बोंचून बोंचून खातील. नको ग बाई ! शिवराव, माझ्या वेडीचें काय तुह्मी मनावर घेतां ? वेड्यासारखी मी आपली कांहीं तरी बडबडलें, झालें. ”

तारेचें हें समंजसपणाचें व भारदस्तपणाचें भाषण ऐकून शिवराव अगदीं थक्क झाले. एवढा वेळपर्यंत त्यांचें प्रेमच तिच्यावर जडलें होतें. पण आतां तिजविषयीं आदरबुद्धि याचीहि जोड त्या प्रेमाला मिळाली. जिच्यावर आपलें प्रेम जडलें, जिला आपण आपलें सर्वस्व देखील अर्पण करण्यास तयार झालों आहों, ती केवळ लावण्यलतिकाच नाहीं, एक केवळ चालती बोलती सुंदर पुतळी नाहीं अगर शाळेंतून घरीं आलेली अर्धवट शहाणी अशी कुमारिका नाहीं, तर तिला पुष्कळ विचारशक्ति आहे ते विचार प्रकट करण्याचें पूर्ण सामर्थ्य आहे असें वाटून शिवराव आनंदभरानें डोलूं लागले. ते साश्चर्य ह्मणाले, “ तारू, तुझ्या ह्या शहाणपणाच्या बोलण्यानें मी तर अगदीं थक्क झालों ! इतका अनुभव, इतकें ज्ञान, इतका पोक्त विचार तूं कोठें शिकलीस ? ठीक आहे, तुला नको तर मीहि आपला वाडा सोडून जाणार नाहीं व शेतांत मजुरीहि करणार नाहीं. मग आतां काय राहिलें ? तूं माझी पत्नी होऊन या जगांत तुला योग्य असें स्थान तूं सुशोभित कर म्हणजे झालें. आमच्या वाड्याच्या भव्य दिवाणखान्यांतील सुंदर तसबिरींत भर घालण्याला तुझ्या-

पेक्षां जास्त सुंदर व नयनमनोहर मूर्ति मला कोठें सांपडेल ? खचित कोठेंच सांपडणार नाहीं."

"पुरे! पुरे! किती मेली स्तुति करायची तरी! मी ह्या स्तुतीला पात्र नाहीं. मला काय समजतें? भोळी, वेडी मीं! तुमच्यावर प्रेम करावें एवढें मला समजतें. या पलीकडे माझ्या समजुतीची मजल जाऊं शकत नाहीं."

इतकेंच ती बोलली. पण तेवढ्या शब्दांत सर्व कांहीं भरलेलें होतें. शिवरावांची सर्व आदरबुद्धि जागृत झाली, त्यांचें अंतःकरण हर्ष-भरानें उचंबळूं लागलें. कांहीं वेळ तीं दोघेंही स्तब्ध राहिलीं. प्रत्येक जण दुसऱ्यासंबंधानें विचारांत गर्क झालें. नंतर तारा एकाएकीं ह्मणाली, "मला आतां गेलेंच पाहिजे. तो पहा, चंद्र किती वर आला तो."

"खरेंच, आतां गेलें पाहिजे. पण थोडी थांब. आपण होडींतून उत-रून त्या किनाऱ्यावरून चालत धरणापर्यंत जाऊं. या धरणापर्यंतच, जास्त नाहीं. तेथून परत येऊं आणि होडींत बसून मागें जाऊं. पांच मिनिटें सुद्धां लागावयाचीं नाहींत. चल. धरणाजवळच्या पाण्यांत चंद्राचें प्रतिबिंब पडलेलें तुला दाखवितों. कशी मौजच मौज दिसते पहा. हें ठिकाण माझ्या फार आवडीचें आहे. वाऱ्याच्या झुळुकेबरोबर कंपित होणाऱ्या त्या जलाशयांत चंद्र, सृष्टिसुंदरीचें मनोहर स्वरूप पाहून मोहित होत्साता जणूं देहभान विसरून जाऊन नृत्य करीत आहे असें वाटतें. तो हृदयंगम देखावा पहात तासचे तास मी त्या धरणावर किती तरी वेळां मी उभा राहिलों आहें! तुला बरोबर घेऊन तो देखावा पहात आज कांहीं वेळ बसावें अशी मला इच्छा झाली आहे. चल."

असें ह्मणून शिवरावांनीं होडी किनाऱ्याकडे नेली व तीं दोघेंही होडीं-तून उतरून नदीच्या कांठाकांठानें धरणावर जाऊन पोंचलीं. तेथें गेल्या नंतर शिवराव त्या पाण्याकडे बोट दाखवून ह्मणाले, "तारू, हेंच तें ठिकाण! किती मजेदार आहे पहा. पण ही मौज दाखविण्याकरितांच केवळ तुला मीं इकडे आणलेलें नाहीं. तुझ्या प्रेमाची आणभाक तुझ्या-कडून घेण्याकरितां मीं तुला आणलें आहे." असें बोलून ते खालीं वां-

कले व पाण्यांत आपल्या हाताचीं बोटें भिजवून तिच्या डोकीवर त्यांनीं कांहीं थेंब शिंपडले. नंतर आपल्याही डोकीवर थोडे शिंपडून ते ह्मणाले, "तारू, ही आपली आर्यलोकांची पुरातन पद्धत आहे. आतां मी ह्मणतों तसें तूं ह्मण; आनंद होवो, दुःख होवो, सौख्य होवो कीं संकट येवो, संपत्ति मिळो कीं दारिद्र प्राप्त होवो, हृदयाशीं हृदय लावून आह्मीं परस्परांस चिकटून राहणार, मृत्युयेईपर्यंत आह्मी एकमेकांस सोडणार नाहीं."

तारेनें सस्मित वदनानें ते शब्द उच्चारले. शेवटचे शब्द उच्चारून संपतांच त्यांनीं तिला घट्ट आलिंगन देऊन तिचें प्रेमानें चुंबन घेतलें. नंतर तीं दोघेंही तेथून होडीकडे परत निघालीं.

तीं परत चाललीं असतां ज्या झाडाच्या पुढें तीं उभीं होतीं त्या झाडाच्या मागच्या बाजूनें एक भुतासारखी आकृति पुढें सरकली. त्या आकृतीचें सर्व लक्ष्य त्या दोघांकडे लागलेलें होतें. तीं उभयतां दृष्टीआड होईपर्यंत ती आकृती—त्यांच्याकडे पहात राहिली व तीं दिसतनशीं झाल्यावर ती मागें वळली आणि चंद्रगड किल्ल्याकडे जो रस्ता जात होता, त्या रस्त्यानें निघाली. इतक्यांत दुसरीही एक आकृति झाडाच्या सावलींतून पुढें आली व तिच्या बाजूबाजूनें चालूं लागली. इतक्यांत कायसें पडलें ह्मणून पहिल्या आकृतीनें किंचित् मागें वळून पाहिलें तर दुसऱ्या आकृतीनें झट्दिशीं चार पावलें टाकून रस्त्यावर पडलेला दस्तरुमाल उचलला.

चंद्रिका—पहिली आकृति चपापली. तिला फार आश्चर्य वाटलें, आपण गुप्तपणें त्या दोघांची टेहळणी करण्यासाठीं आलों असतां आपल्या पाळतीवर राहणारी ही आकृति कोण असावी, असें वाटून ती त्या आकृतीकडे किंचित् भीति, किंचित् तिरस्कारपूर्ण मुद्रेनें पाहूं लागली.

ही दुसरी आकृती पुरुषाची असून सडपातळ होती. तिचे डोळे बारीक, ओंठ आंवळलेले, वर्ण काळसर होता. उचलून घेतलेला दस्तरुमाल मोठ्या अदबीनें पुढें करून त्यानें ह्मटलें, "बाईसाहेब, मला आपल्याशीं कांहीं बोलावयाचें आहे."

" बोलायचें असेल तर बोलेनास बापडा. मी कशाला नको ह्मणूं आणि नको ह्मणून तरी काय उपयोग? पण येथें आपणां दोघांशिवाय कोणी नाहीं हें लक्ष्यांत ठेव."

" इतकें बजावून सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्यापासून तुह्मांला बिलकुल भीति पोंचणार नाहीं, समजलें!"

" पाहतें आतां. तूं मला ओळखतोस वाटतें?" तिनें विचारलें. तिच्या कठोर आवाजानें व रागीट दृष्टिक्षेपांनीं जो तिरस्कार प्रदर्शित केला त्याची कल्पना शब्दांनीं करून देणें कठिण आहे.

त्याच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट हास्य—आदरयुक्त पण अभिमानपूर्ण हास्य—चमकलें. " कांहीं कांहीं लोक इतके जगप्रसिद्ध असतात कीं, चांदण्यामध्यें सुद्धां त्यांचा चेहरा सहज ओळखतां येतो. तशांपैकींच प्रधानांच्या चंद्रिका बाईसाहेब—"

इतक्यांत तिनें वर हात करून पुढें न बोलण्याविषयीं सूचना दिली. त्याबरोबर तो थांबला. तिनें ह्मटलें, " तुला माझ्याशीं काय बोलावयाचें आहे?"

तिनें त्याला त्याचें नांव विचारिलें नाहीं. तो कोणी तरी भिकारी असावा व आपली गाडी उभी राहिलेली पाहून कांहीं तरी मागण्याकरितां आला असावा असाच तिचा ग्रह झाला होता. तिच्या एकेरी भाषेवरून ती आपणास कोणीतरी यःकश्चित् मनुष्य समजत आहे असें त्याला वाटलें. त्यामुळें त्याला अतिशय राग येऊन त्या क्रोधाग्नीनें त्याचें अंतःकरण जळफळूं लागलें. पण त्यानें तसें बाहेर दिसूं दिलें नाहीं.

तो बोलण्यास कचरतो असें पाहून तिनें रागानें विचारिलें, " तुला माझ्याजवळ कांहीं मागायचें आहे काय?"

" होय, तसें कां ह्मणाना? मला आपल्याजवळ कांहीं मागायचें आहे. बाईसाहेब, आपला माझा परिचय नाहीं. तथापि मला आपल्याकडून मदत मिळावी, असें माझें मागणें आहे."

" पण माझ्याजवळ येथें पैसे नाहींत. वाड्याकडे ये."

त्याबरोबर तो एकदम पुढें होऊन तिच्या समोर उभा राहिला व

संतप्त होऊन बोलला, " पैसे ? कोणाला तुमचे पैसे पाहिजेत ? तुम्हांला वेड तर लागलें नाहीं ? "

चंद्रिका त्याजकडे आश्चर्यमिश्रित संतापानें पहात ह्मणाली, "मला वाटतें तुलाच वेड लागलें आहे. तूं माझ्याजवळ पैसे नाहीं का मागितलेस ? "

तो हांसत बोलला, " पैसे ? तुमच्याजवळ मी पैसे कशाला हो मागूं ? तुमची कांहीं तरी गैरसमजूत झालेली दिसते. मला मदत पाहिजे आहे ती पैशाची नव्हे. "

" तर मग कशाची ? काय मनांत असेल तें लवकर व थोडक्यांत सांग. माझा विनाकारण वेळ घेऊं नकोस. मला जायचें आहे." चंद्रिका बोलली. तिचा पूर्वीचा तिरस्कार जाऊन त्या ठिकाणीं तिच्या मनांत किंचित् जिज्ञासा उत्पन्न झाल्याचें त्याला दिसलें.

त्याबरोबर त्यानें फासंच केला. तो चट्कन् रस्त्यांतून बाजूला सरकला व मोठ्या अदबीनें ह्मणाला, " इतकी बाईसाहेबांना जाण्याची गडबड असेल, तर मग खुशाल जा. माझ्याकडूनच चुकलें. तुमच्या चांगल्या स्वभावाचा मीं फाजील फायदा घेतला, याबद्दल मी आपली माफी मागतों. तुमचें कल्याण होवो. मी जातों बाईसाहेब. " असें बोलून तो चालूं लागला.

चंद्रिकेनें त्याजकडे तिरस्कारपूर्ण दृष्टीनें पाहिलें. नंतर तिनें आपले ओंठ चावले. तिचे नेत्र खालीं झाले. ती हलक्या आवाजानें ह्मणाली, " जरा थांब. "

तो मागें वळला व आपल्या कोटाच्या दोन्ही खिशांत दोन्ही हात घालून शांतपणें पण अभिमानपूर्ण मुद्रेनें उभा राहिला. ती त्याजकडे पहात कांहीं वेळ स्तब्ध राहिली. तिच्या अंतःकरणामध्यें जिज्ञासा व स्वाभिमान यांचें तुमुल युद्ध सुरू झालें होतें. त्याच्याकडून कसली चूक झाली हें समजून घेण्याविषयीं जिज्ञासा व आपणासारख्या श्रीमंत स्त्रीनें त्या भिकाऱ्याबरोबर बोलत रहावें हा अभिमान. शेवटीं जिज्ञासेचाच जय झाला. ती त्याला ह्मणाली, " मीं तुला अशाकरितां थांब म्हटलें, कीं, तूं कसली चूक झाली म्हणालास तें सांग. तुझी वागणूक, बोलण्याची

ढब तुझी भाषा हीं सर्व मला दुर्बोध आहेत. तुझें काय म्हणणें आहे तें नीट सांग. "

तो नम्रतापूर्वक बोलला, " बाईसाहेब, मी सृष्टिदेवतेचा एक परम निःसीम भक्त आहें. ह्या येथील अरण्यांत–विशेषेंकरून चांदण्या रात्रीं, हें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत हिंडण्याची मला मोठी मौज वाटते. यांत कांहीं विशेष नाहीं खरें. "

" बरें मग ? "

" रोजच्याप्रमाणें मी आजही सहजगत्या नदीकांठीं हिंडत होतों. नदीकिनाऱ्याचा तो नितांत शांत व गंभीर देखावा पाहून ईश्वराच्या अगाध लीलेचें कौतुक करीत चाललों असतां, दोन व्यक्ति–आतांच येथून गेलेल्या–या ठिकाणीं आल्या. कोणी प्रेमी जोडपें असावें, कांहीं तरी प्रणयप्रकार असावा, आपल्यामुळें उगीच त्यांच्या सुखांत अंतर कशाला, असें मनांत येऊन मी परत फिरलों. पण चंद्रप्रकाशांत जिच्याशीं माझ्या हितान्हिताचा संबंध आहे अशी व्यक्ति त्या दोघांपैकीं एक आहे असें मला दिसलें. "

" कोणती ? " तिनें शांतपणें विचारिलें.

" ती तरुणी. जिज्ञासेपेक्षां तिच्यासंबंधाच्या काळजीमुळेंच पुढें काय प्रकार होतो हें पहावें असें वाटून मी त्या झाडाच्या आड उभा राहिलों. पण चोरून ऐकणाऱ्याला ज्याप्रमाणें त्याची निंदाच ऐकूं येते, व चोरून पहाणाऱ्याला स्वतःस अनिष्ट असा प्रकार दृष्टीस पडतो त्याप्रमाणें माझें झालें. त्यांचा ऐकमेकांशीं झालेला करार, आणभाक ह्मणा पाहिजे तर, मला ऐकूं आली. "

" पण या गोष्टीचा माझ्याशीं कसा संबंध पोंचतो. " असें कपाळास आंठ्या घालून ती बोलली.

तो सस्मित ह्मणाला, " हं, बाईसाहेब, इथेंच माझी चूक झाली असावी. तुह्मी ऐकत उभ्या राहिला होता, त्यांत तुमचाही कांहीं हेतु असावा. हितानहिताच्या संबंधामुळें अगर जिज्ञासेमुळें तुह्मांला ऐकत उभें

राहण्याची स्फूर्ति झाली असेल, तुह्मी मला आनंदानें या कामीं मदत कराल असें मला वाटलें. हीच माझी चूक झाली. ”

“ मी ऐकत उभी होतें, हें तुला कसें समजलें ? ” तिनें प्रश्न केला.

“ तुह्मी येथें आला, त्या अगदीं सावधगिरीनें इकडे तिकडे पहात येऊन त्या झाडाच्या आड उभ्या राहिला. हें सर्व मीं पाहिलें. त्या दोघांचें संभाषण चाललें असतां तुमच्या चेहऱ्यांत वरचेवर फरक पडे हेंहि मला दिसत होतें. ”

त्याबरोबर ती चपापली. त्या दोघांचें संभाषण चाललें असतां आपला चेहरा क्षणोक्षणीं कसा पालटे हें तिच्या ध्यानांत आलें. आपल्या चेहऱ्यावरून आपले मनोविकार यानें जाणले असतील हें खरें, असें जाणून ती ह्मणाली, “ बरें तुझा तर्क बरोबर आहे असें धरून चाललें, तरी माझ्याकडून तुला कसली मदत होणार ? ”

“ त्या दोघांची झालेली आणभाक आम्हीं उभयतांनीं नुकतीच ऐकिली ती मोडून काढण्याच्या कामीं मला मदत करावयाची हेंच. ” तो तत्परतेनें व अगदीं उघडपणानें बोलला.

ती क्षणमात्र स्तब्ध झाली. तिचा विचार चालला आहे असें दिसलें. नंतर ती बोलली, “ मी तुला कां मदत करावी ? त्या दोन व्यक्तींशीं माझा कांहीं संबंध आहे हें तुला कसें कळलें ? ”

त्यानें मृदुलतेनें उत्तर केलें:—“ तुम्ही इतक्यांत विसरलां वाटतें ? मीं तुमच्या चेहऱ्यावरून तें ओळखलें.”

ती दचकली. ह्या मनुष्यापुढें आपली मात्रा चालत नाहीं असें तिला वाटूं लागलें. तिनें थोड्या वेळानें विचारलें, “ माझा कांहीं संबंध आहे असें जरी मानलें तरी तुझ्यावर विश्वास ठेवून, तुझ्या नादीं लागून, माझें हित साधेल हें कशावरून ? याला पुरावा काय ? ”

“ लागेलतितका पुरावा मी देईन. माझें तिच्यावर प्रेम आहे. ” तो शांतपणें ह्मणाला.

ती साश्चर्य ह्मणाली, “ तिच्यावर तुमचें प्रेम आहे ! आतां येथून आमच्याजवळून जी मुलगी गेली तिच्यावर ! ”

" होय. ज्या तरुणीनें सरदारपुत्र शिवरावांना आतां येथें आणभाक दिली, त्या तरुणीवर माझें प्रेम जडलें आहे. " तो जोरानें बोलला.

" बरें, मीं मदत करावयाची म्हटलें तर कोणत्या तऱ्हेची करावी ? "

" तें तुमचें तुम्हीं ठरवावें, तिच्या पुरती–साबाजीच्या तारेपुरती जबाबदारी मी घेतों.

ती भिंवया चढवून ह्मणाली, " नांवें घेणें बरें नाहीं."

" बरोबर. अगदीं बरोबर. 'तो' आणि 'ती' असेंच आपण ह्मणूं ! मीं तर अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, ही त्यांची आणभाक कधींच पूर्ण होणार नाहीं. तिच्यावर माझें प्रेम आहे; पण त्याचा मी द्वेष करतों. तुह्मी त्याच्यावर प्रेम करतां व तिचा द्वेष करतां ! आपल्या दोघांच्या दोन तऱ्हा आहेत."

चंद्रिका किंचित् दचकली. तिच्या गौरवर्ण चेहऱ्यावर सलज्जतेची गुलाबी लाली चढूं लागली. तिनें म्हटलें, " असें बोलणें म्हणजे तुमचा धाडसीपणाच आहे ! " तो भिकारी नसून कोणीतरी ऐपतदार गृहस्थ आहे असें वाटून ती त्याला आतां बहुवचनानें संबोधूं लागली.

" बाईसाहेब, त्यांत कसला आला आहे धाडशीपणा ? माझा संबंध मीं दाखविला. तुमचा काय आहे हेंहि मला माहीत आहे. माझें म्हणणें चुकीचें आहे, असें तुमचें म्हणणें आहे काय ? तसें असेल तर मला स्पष्ट सांगा. कांहीं झालें तरी मला सारखेंच असें ह्मणा कीं, मी तुमचा निरोप घेऊन निघालोंच ! "

ती स्तिमित दृष्टीनें त्याजकडे पाहूं लागली. पण तिला तसें म्हणवेना. कारण तो बोलला तें खरेंच बोलला. शिवरावांवर तिचें प्रेम बसलें होतें व तें प्रेम इतकें उत्कट होतें,कीं,त्याबद्दल तिचें तिलाच आश्चर्य वाटूं लागलें. आतांपर्यंत त्या प्रेमाचा जोर केवढा आहे हें तिच्या लक्षांत आलें नव्हतें. परंतु थोड्या वेळापूर्वीं सरदारपुत्र शिवरावांनीं दुसऱ्याच एका कुमारिकेला घट्ट पोटाशीं धरून प्रेमभरानें तिचें चुंबन घेतलेलें तिनें पाहिलें, तेव्हां त्या प्रेमाचा वेग किती प्रचंड आहे हें तिला समजलें. दुखवलेला अभिमान, उत्कट प्रेम, आत्मप्रीति वगैरे मनोविकारांनीं तिच्या अंतःकरणांत कल्लोळ

उडवून दिला होता. तिच्या समोर उभ्या राहिलेल्या गृहस्थाला हा सर्व प्रकार कळून चुकला. तिच्या मानी पण सुंदर चेहऱ्यावर तिच्या अंतः-करणांतील प्रत्येक विचार उमटलेला त्याला दिसला.

ती ह्मणाली, " माझ्या कांहीं लक्षांतच येत नाहीं. तुमचा माझा बिलकुल परिचय नसतां तुम्ही याप्रमाणें बोलत आहांत याचेंच मला आश्चर्य वाटतें."

" मी तुमच्याकडे अशाकरितां आलों आहे कीं, तुमच्या व माझ्या मनामध्यें एकच हेतु आहे. त्या दोघांचा करार मोडून टाकून त्यांची एकमे-कांची ताटातूट करावयाची, हाच हेतु अपणां दोघांस साधावयाचा आहे. दुसरें असें कीं, हा हेतु सिद्धीस नेण्याच्या कामीं मला उपायहि सुचला आहे. बाकीचा भाग तुह्मी युक्तिप्रयुक्तीनें व आपल्या कल्पनाशक्तीनें उरकून टाकाल अशी मला खात्री वाटत आहे. चंद्रिकाबाईसाहेब—"

" माझें नांव घेऊं नका." ती घाबऱ्या घाबऱ्या आजूबाजूला पहात ह्मणाली.

" —तुमच्याकडून—फक्त तुमच्याकडूनच मला मदत होण्यासारखी आहे. मी त्या कुमारिकेचें मन वळवितों, असें मघांशीं मीं सांगितलेंच आहे. तुम्ही त्याच्यावर आपली मात्रा चालवून त्याला वळवा. या कामा-करितां मीं पुष्कळ प्रयत्न केले. बेतबात करून, जुळणी बसवून, सर्व कांहीं नक्की ठरविलें आहे. चातुर्य, कल्पना, योजनाशक्ति, यांचा मी या कामीं उपयोग केलेला आहे. आतां फक्त तुम्ही आपल्या सौंदर्यरूपी मात्रेचा वळसा देऊन पहावयाचा, एवढेंच काय तें राहिलें आहे. आपण दोघे मिळून खात्रीनें यश संपादन करूं. एकएकट्याला मात्र यश येणें कठिण. कारण तिला मीं जरी चिमट्यांत धरलें आहे, तरी त्याची मला खात्री वाटत नाहीं. तो स्वभावानें फार हट्टी, दुराग्रही, उलट्या काळजाचा, निधड्या छातीचा आहे. एखादे वेळीं आपले सर्व बेत एका क्षणांत फिसकटवून टाकील. तुमचें काम म्हणजे त्याला असें करतां येऊं नये एवढेंच पहावयाचें आहे. ही गोष्ट तुह्मांला कबूल आहे ? "

तिनें थोड्या वेळानें विचारलें, " तिचें मन वळविण्याचा कोणता उपाय तुम्हीं योजिला आहे ? "

" या प्रश्नाचें उत्तर मी देऊं इच्छित नाहीं, याबद्दल माफी असावी. परंतु तिच्यावर माझा चांगलाच दाब आहे, याची मात्र खात्री असूं द्या. माझ्याप्रमाणेंच तुमचाही त्याच्यावर चांगलाच दाब आहे. तो तुम्हीं उपयोगांत आणा म्हणजे झालें. जरा जास्त खुलासा करून सांगतों. त्याचें कल्याण करण्याचें जर खरोखरच तुमच्या मनांत असेल, तर तुम्ही आतां नाहीं होय ह्मणूं नये, अनमान करूं नये. सरदारपुत्र शिवरावानें—भावी जहागीरदारानें—एकाद्या यःकश्चित् क्षुद्र चितार्‍याच्या पुतणीशीं विवाह लावल्यापासून कोणता फायदा होणार आहे ? तिचा नवरा या नात्यानें त्याचें कांहींच महत्त्व राहणार नाहीं. पण तेंच तुमच्याशीं त्याचें लग्न झालें तर तुम्हां उभयतांच्या दर्जास व थोर कुळास साजेल अशा उच्च पदाप्रत तो चढेल. आतां याउप्पर तुम्ही कांकूं करणार काय ? "

तिचें मन चलबिचल झालें. तिचा कांहींच निश्चय होईना. ह्या माणसाशीं, अगदीं अपरिचित अशा गृहस्थाशीं आपण करारमदार कसे करावे, त्याला कसें अभिवचन द्यावें, असा तिला विचार पडला व ती गुळमुळ करूं लागली.

खिशांतील घड्याळ काढून त्यानें म्हटलें, " हं. आटपा लवकर ! उशीर होत चालला. मी जो योग जुळवून आणण्याच्या खटपटींत आहें तो तुह्मांला कबूल नाहीं असें दिसतें. ठीक आहे. घेतों तर मी आतां रजा." असें ह्मणून तो चालूं लागला.

ती पुन्हां ह्मणाली, " थांबा, जाऊं नका. माझी कबूली आहे."

तेव्हां तो सस्मित बोलला, " वाः, फार छान केलेंत ! आपला हा सर्व करार पुरा झालाच ह्मणावयाचा. माझें आपणाला इतकेंच सांगणें आहे कीं, आपण यापुढें चांगलें लक्ष ठेवा व अगदीं सावधगिरीनें वागा. लोखंड तापून चांगलें लाल झालें, म्हणजे हटकून घाव घाला. तशी वेळ आली कीं, मी तुह्मांला सूचना करीन. तुम्ही तयारींत असा. त्या दोघांची आणभाक आतां कायम राहील हें शक्यच नाहीं. तुम्ही तुमच्याकडून

आणि मी माझ्याकडून शिकस्तीनें प्रयत्न करूं या. ठरलें तर मग. मी आतां जातों."

" पण—पण—तुम्ही आपलें नांव अजून मला सांगितलें नाहींच."

" माझें नांव शामराव वकील. येतों."

असें ह्मणून शामराव तेथून निघून गेले. चंद्रिकाही आपल्या गाडींत जाऊन बसली व वाड्याकडे निघून गेली.

इकडे शिवराव व तारा होडींत बसून घाटावर आलीं. तारा खोपटाकडे जाण्यास निघाली. तेव्हां शिवराव हळूच ह्मणाले, " तारू, जा आतां. मीहि जातों. उद्यां पुन्हां गांठ पडेलच. जा. तूं बागेच्या फाटकाजवळ जाईपर्यंत मी येथें उभा राहतों, म्हणजे कसलीच भीति नाहीं."

तारा झपाझप पावलें टाकीत बागेच्या फाटकाजवळ येऊन पोंचली, तों घरांतून एक आकृति बाहेर पडून बागेंतून तिजकडेच येत असलेली तिला दिसली. किंचित् चपापून तिनें वर पाहिलें. चंद्राचा स्वच्छ प्रकाश त्या आकृतीच्या चेहऱ्यावर पडला होता. त्या छोट्या फोटोंतील चेहऱ्यासारखा चेहरा तिला दिसला. फक्त बालपण जाऊन तो तारुण्याप्रत पावं लागला होता. " प्रभाकर तो हाच काय ? " असें ती मनांत ह्मणाली.

शिवराव वाड्याकडे परत निघून गेले.

---

# प्रकरण १३ वें.

:o:

## मेहरबानी खातर!

त्या लहान फोटोमध्यें तारेनें जो चेहरा पाहिला होता तोच हा चेहरा. फक्त बाल्यावस्थेंतून तारुण्याप्रत त्याचें रूपांतर होत चाललें होतें. त्याचे नेत्र निष्कपट स्वभाव दाखविणारे काळेभोर होते, चेहरा मनोहर व

हांसतमुख होता; बांधा कृश व ठेंगणा होता.त्याचा एकंदर चेहरा फार नाजुक असून, मुलापेक्षां मुलीचाच चेहरा आहे असें पहाणाऱ्यास वाटे इतका नाजुकपणा त्या चेहऱ्यांत होता.

तारा टक लावून पाहूं लागली. तिच्या डोळ्याला जो प्रकार दिसत होता तो खरा कीं खोटा याचीच तिला शंका येऊं लागली. पूर्वी तिच्या मनांत येऊन गेलेली कल्पना पुनः तिच्या मानसपटलावर चमकून गेली व तिचें अंतःकरण आकस्मिक मनोविकारानें—भीतीच्या कीं सौख्याच्या तिला सांगतां येईना—स्फुरण पावूं लागलें. हा मुलगा कोण, येथें दरवाजास टेंकून काय करीत आहे? ह्मणूं हें घर आपलेंच असून येथें मनसोक्त वापरण्यास आपणास पूर्ण हक्क आहे असें त्याच्या चर्येवरून दिसतें! वगैरे विचार एका क्षणार्धांत तिच्या डोक्यांत येऊन गेले; तिनें एक पाऊल पुढें टाकिलें तोंच त्या मुलानें फाटक उघडलें व हर्षभरित मुद्रेनें तिजकडे पहात तो ह्मणाला, "तुझेंच नांव तारा नव्हे काय?"

त्याचा आवाज ऐकून तिला फार विस्मय वाटला. तिच्या चुलत्याच्या-साबाजीच्या आवाजासारखा अगदीं तो आवाज होता. फक्त कोमल व खणखणीत एवढाच फरक.

"होय. माझेंच नांव तारा." तारा साश्चर्य पाहून ह्मणाली.

"तर मग आम्ही दोघें बहीणभांवडें आहोंत?"

"बहीणभांवडें? तीं कशीं?"

"हो, चुलत भांवडें! तूं आमच्या जिऊकाकाची मुलगी, आणि मी प्रभाकर तुझा चुलत भाऊ."

"अगबाई! खरेंच का? मला हें ठाऊक नव्हतें."

"तुला कसें ठाऊक असणार?" असें ह्मणून प्रभाकरानें एक निश्वास टाकला.

इतक्यांत साबाजी घरांतून बाहेर आला. त्यास पाहून तारा लडिवाळपणानें ह्मणाली, "काका, आलां का मुंबईहून?"

"होय बरें बाळ, मी मघांशींच आलों. येतांना तुझ्या करमणुकीसाठीं एक खेळगडी घेऊन आलों आहें. हा बघ माझा मुलगा प्रभाकर! याची

व तुझी ओळख नाहीं." त्याच्या आवाजांत उद्विग्नपणाची छाया होती, व चेहरा म्लान दिसत होता.

"बर झालें बाई, ये भाऊ," असें ह्मणून तिनें प्रभाकराचा हात धरला. तिला स्वाभाविकच फार आनंद झाला.

साबाजी ह्मणाला, "तो मुंबईस आला होता. सध्यां सुटी आहे ह्मणून मी त्याला इकडे घेऊन आलों."

"बरें झालें. मी आंत जाऊन पानें मांडतें. स्वयंपाक झाला असेल." असें ह्मणून तारा स्वयंपाक घरांत निघून गेली.

ती गेल्यानंतर प्रभाकर ह्मणाला, "बाबा, तारू रूपानें किति छान आहे हो? माझी बहीण इतकी सुंदर आहे हें मला माहीत नव्हतें."

ह्मातारा प्रेमानें गहिवरून ह्मणाला, "तुला ठाऊक नाहीं. ती रूपानें जितकी सुंदर आहे तितकी स्वभावानेंही गोड आहे. जणु स्वर्गीय देवताच आहे असें वाटतें. तिला तुझी हकीकत कांहींच माहीत नाहीं."

"बरें झालें. मीही तिला समजूं देत नाहीं. काय पाहिजे तें होऊं दे."

तारेनें स्वयंपाकीण बाईला तगादा करून जेवणाची तयारी लवकर करविली व त्या दोघांना वाढून आपणही जेवावयास बसली. जेवतां जेवतां साबाजीचें व तारेचें संभाषण चाललें होतेंच. पण आपण मुंबईला कां गेलों हें साबाजीनें तारेला सांगितलें नाहीं व तिनेंही त्यास विचारिलें नाहीं. साबाजी मध्येंच ह्मणालाः—

"तारू, तूं संध्याकाळची कोठें गेली होतीस? आह्मी आलों तेव्हां घरांत दिसली नाहींस."

"काका, तुह्मी गेला, काकुबाईही स्वयंपाकांत गुंतल्या. मग मला चैन पडेना ह्मणून हवा खाण्यासाठीं बाहेर गेलें होतें."

तिच्या चेहऱ्यावर एकाएकीं लज्जतेची छाया दिसूं लागली. साबाजीला दिसलें नाहीं, पण प्रभाकराच्या लक्ष्यांत हा प्रकार आला.

साबाजीः—"पण यायला बराच उशीर झाला, नाहीं? इतका वेळ—"

ताराः—"झाला खरें, काका, मी यापुढें इतका वेळ बाहेर रहाणार नाहीं." आपणाकडून चुकलें ही गोष्ट तिला खात होती.

साबाजीः—" आतां तुझा वेळ जायला प्रभाकर आहे. तो तुझ्याबरोबर येत जाईल."

ताराः—" मग मोठीच आनंदाची गोष्ट. भाऊ, तुला येथलीं पाहण्यासारखीं सर्व स्थळें माहीत असतील. रोज मला एकेक दाखवीत जा."

" छे छे! मला नाहीं माहीत. मी येथें पूर्वीं कधींच अलों नाहीं." प्रभाकर बोलला. तें ऐकून तारेला फार आश्चर्य वाटलें; इतक्यांत साबाजी ह्मणाला, " तारू, प्रभाकर नागपुराकडे शिकत होता. त्याला इकडची कांहीं माहिती नाहीं. तूंच त्याला बरोबर नेऊन दाखीव."

जेवण झाल्यानंतर साबाजी आराम खुर्चीवर मनसोक्त धूम्रपान करूं लागला, व नेहेमींप्रमाणें त्याची वृत्ति विचारमग्न झाली. इकडे तारा मण्यांचें झुंबर करण्याकारितां हातांत तार व निरनिराळ्या रंगाचे मणि घेऊन बसली. तिला प्रभाकर ह्मणाला, " ताई, आतां रात्रीं काम करायचें?"

ताराः—" काम कसलें हें? आपली कांहीं तरी करमणूक आहे झालें. झोंप येईपर्यंत कांहीं उद्योग. आळशासारखें स्वस्थ बसणें मला नाहीं आवडत. आळशी माणसासंबंधानें एक जुनी ह्मण आहे ती आहे कीं नाहीं ठाऊक?"

प्रभाकर दचकला व त्याचा चेहरा उतरला. याच्या मनाला लागण्याजोगें असें आपण काय बोललों हें तारेला समजेना. ती पुढें ह्मणाली, " मला नाहीं स्वस्थ बसवत. तू बसतोस का?"

प्रभाकरः—" अग हो. तासाचे तास मी कांहीं न करतां स्वस्थ बसतों. मला त्याचें कांहीं वाटतच नाहीं. मी मोठा भयंकर आळशी मनुष्य आहें. पण आतां मला तुझा कित्ता गिरवला पाहिजे व चांगल्या संवयी लावून घेतल्या पाहिजेत. येथें असेपर्यंत पुष्कळ वाचावे, अभ्यास करावा असें मी ह्मणतों. मग करूं कां आजपासून आरंभ? " त्याचे डोळ अत्यंत उत्सुकतेनें तिच्या चेहऱ्याकडे लागले.

तिनें सस्मित उत्तर केलें, " छे! आज नको. तूं आज मुंबईहून आलास, त्रास झाला आहे. लवकर नीज जा."

मी दमलों आहें खरा, पण मी इतक्यांत नाहीं निजायला जात. मी तुझ्याजवळ बसून तूं झुंबर कसें करतेस तें पहातों. तुझी हरकत नाहीं ना ?"

"इश्श! हरकत कसली त्यांत? बसून मला तुझ्या शाळेची हकीकत सांग."

"तें कांहीं नाहीं. मी आपला स्वस्थ तुझें झुंबर पहात बसणार. तूंच मला गोष्टी सांग, मी मोठ्या आवडीनें ऐकेन."

हा मुलगा मोठा विलक्षण आहे, असें तारेला वाटलें. त्याच्या शांत वृत्तींत उद्विग्नता दिसत होती. तारा मनांत ह्मणाली, " ही उद्विग्नता कायमची नसावी. जाईल आतां."

इतक्यांत, "तारू, पेटीवर बसून गाणें म्हण पाहूं." असे चुलत्याचे शब्द तिनें ऐकले. त्याबरोबर हातांतील मण्यांचें काम एकीकडे ठेवून ती पेटीवर जाऊन बसली व गाणें ह्मणूं लागली. थोडा वेळ गाऊन झाल्यानंतर कोणी तरी स्फुंदत, हुंदके देत असल्याचा आवाज तिच्या कानावर पडला, ह्मणून तिनें वळून पाहिलें तर, प्रभाकर तिच्या पाठीमागें गुडघ्यांत मान घालून बसलेला तिला दिसला. ती ह्मणाली, " भाऊ, नीज जा आतां. अगदीं झोंपेला आलास."

तो आवाज इतका मधुर, इतका प्रेमळ, इतका कळवळीचा होता किं, त्यानें प्रभाकराचें अंतःकरण उचंबळून आलें. तो सप्रेम दृष्टीनें—एखादा इमानी व लाडका कुत्रा आपल्या धन्याकडे पहातो त्याप्रमाणें तिजकडे पाहूं लागला. थोड्या वेळानें त्यानें ह्मटलें:—"ताई, तूं माझ्यावर किती प्रेम करतेस ग? पण मी मात्र तुझ्या प्रेमाला पात्र नाहीं—"

तो पुढें बोलणार इतक्यांत त्याची नजर दरवाजाकडे गेली. एक गृहस्थ दरवाजांतून आंत येत असल्याचें त्यानें पाहिलें. त्याबरोबर त्यानें तारेला खूण केली. तिनें तिकडे नजर टाकली, तों शामराव वकील येत आहेत असें तिला दिसलें. ती चट्दिशीं पेटीवरून उठली व साश्चर्य मुद्रेनें त्यांच्याकडे पाहत राहिली.

शामराव आंत येऊन ह्मणाले, " साबाजी निजले वाटतें. मी आतां येणार नव्हतों. पण पेटीचा मधुर स्वर व गाण्याचा मंजुळ ध्वनि ऐकूं येऊं

लागला मग राहवेना ह्मणून आलों. पण हा तुला विनाकारण त्रासच ह्मणायचा ! "

ताराः—" यांत कसला आहे त्रास ? आलांत, बरें झालें. हा माझा चुलतभाऊ प्रभाकर. "

वकीलसाहेबांचे बारीक डोळे इतका वेळ तारेच्या चेहऱ्याकडे लागलेले होते त्यांचें आतां स्थलांतर होऊन ते प्रभाकराकडे वळले. त्यांची दृष्टि क्षणमात्र चमत्कारिक झाली. नंतर ते नेहमींप्रमाणें हांसत ह्मणाले, " खरें किं काय ? अरे वा: ! सुटींत आला आहे वाटतें ? कसें काय प्रभाकर, तब्येत बरी आहे ? " असें ह्मणून त्यांनीं प्रभाकराचा हात धरला.

प्रभाकर तारेला ह्मणाला, " ताई, पण तूं ह्यांचें नांव मला नाहीं सांगितलेंस ? "

ताराः—" ह्यांचें नांव शामराव वकील. काकांचे हे फार दिवसांचे स्नेही आहेत. "

" आणि तुझे नव्हेत का ? " शामराव हांसत बोलले, तारा हांसूं लागली. " बरें, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें कां होईना ? हे आमचे स्नेही आहेत, बरें भाऊ ? "

शामराव प्रभाकराकडे वळून बोलले, " आणि तुझे देखील, होय ना ? "

" होय तर काय ? " प्रभाकर बोलला; पण त्याच्या बोलण्यांत लाजाळूपणा व नाखुषी उघड उघड दिसत होती.

नंतर शामराव खुर्चीवर बसले व " गाणें मध्येंच कां थांबविलें चालूं दे. आह्मीही दोन चिजा ऐकूं " असें ते तारेस ह्मणाले. पण, काकांना झोंप लागली आहे, ते आज मुंबईहून दमून आले आहेत, अशी सबब तिनें पुढें ठेवली.

" खरें कीं काय ? " शामराव उसनें आश्चर्य दाखवून ह्मणाले. " मी देखील मुंबईला जाऊन आलों. हो. पण बरी आठवण झाली. मीं मुंबईहून येतांना तुझ्याकरितां–एक गाण्याचें पुस्तक आणलें आहे. हें पहा. " असें म्हणत त्यांनीं आपल्या खिशांतून एक पुस्तक काढून तारेच्या हातांत

दिलें. पुस्तक उघडून ती पाहूं लागली, तर त्यामध्यें तिनें ऐकलेलीं पण तिला न येणारीं अशीं किती तरी सुंदर गाणीं होतीं ! तीं गाणीं पहा-तांच तिला फार आनंद झाला. तिला तें पुस्तक भारी आवडलें. तिची सानंद मुद्रा पाहून शामराव सस्मित ह्मणाले, " एखाद्या दिवशीं आह्मांला तीं गाणीं ह्मणून दाखवावयाला पाहिजेत. "

" हो, अलबत् दाखवीन. "

शामराव पुढें ह्मणाले, " तशी संधिही लवकरच येईल असें वाटतें. कारण मला आतां इकडे वरचेवर यावें लागणार आहे. माझ्या पक्षकारां-पैकीं एक गृहस्थ खूप श्रीमंत असून त्यांना चित्रकलेचा फार नाद आहे. साबाजीचीं चित्रें त्यांना फार आवडलीं आहेत. एका विशिष्ट प्रकारच्या देखाव्याचें चित्र साबाजीकडून काढून घेण्याचें त्यांच्या मनांत आहे; पण तो विषय अतिशय अवघड असल्यानें चित्र जसें जसें तयार होत जाईल तसतशा त्यासंबंधानें सूचना कराव्या लागणार व त्या सूचना करण्याचें मीं त्या गृहस्थाजवळ कबूल केलें आहे. "

" पण काका किती हट्टी स्वभावाचे आहेत तें तुह्मांला माहीत आहेच. तसलें चित्र ते काढून देतील असें तुह्मांला वाटतें काय ? "

" माझें सांगणें ते ऐकतील असें मला तरी वाटतें. ते माझे फार वर्षांचे दोस्त आहेत. माझें ते मोडणार नाहींत. "

" तर मग तें चित्र तुह्मांलाच पाहिजे वाटतें ? "

" छे छे ! त्या गृहस्थांनाच पाहिजे आहे. ते माझे पक्षकार आहेत व साबाजीस सांगण्याचें मीं त्यांच्या जवळ कबूल केलें आहे. "

" असें, असें, " तारा बोलली.

शामराव यानंतर कांहीं वेळ स्वस्थ बसले होते. पण त्या अवधींत तारेला देण्यासाठीं ह्मणून काकूबाईजवळ आपण काल आणून दिलेले फुलांचे गजरे कुठें ठेविले आहेत हें ते बारकाईनें पहात होते. पण त्यांचें गजरे त्यांना कोठें दिसेनात. तारेच्या बुचड्यावर एक गजरा होता; पण तो त्यांनीं दिलेल्या गजऱ्यांपैकीं नव्हता. शिवरावांनीं आणलेल्या फुलांचा हा गजरा असावा असें त्यांना वाटलें. त्याबरोबर क्षणमात्र त्यांच्या चेहऱ्यावर

कृष्णवर्ण छटा येऊन गेली, व त्यांच्या हाताच्या मुठी जणूं ठोसे लगावण्याकरितां वळल्या. पण तितक्यांत त्यांनीं आपली वृत्ति शांत होऊं दिली. "ठीक आहे. मीं दिलेले गजरेच तिनें घालण्याची वेळ लवकरच येईल." असा त्यांनीं आपल्या मनांत निश्चय केला.

नंतर ते उठले व " तुझा मुक्काम आतां येथेंच आहे. वरचेवर गांठ पडेलच. मी दिगंबर बोवांच्या घरीं असतों, तिकडे येत जा. " असें प्रभाकरास सांगून ते निघून गेले.

शामरावाकडे पहात प्रभाकर बराच वेळ तसाच उभा होता. ते दिसतनासे झाल्यावर त्यानें एक आरामाचा सुस्कारा टाकिला. त्याची ती विलक्षण मुद्रा पाहून तारेनें विचारिलें, " भाऊ, काय हें ? "

प्रभाकरः—" ताई, शामराव आपण बाबांचे स्नेही आहोंत ह्मणतात, तें खरें काय ग ? "

" मला तसें वाटतें. "

" आणि तुझे सुद्धां ? " त्यानें उत्सुकतेतें म्हटलें.

" माझी त्यांची अलीकडे इथें मी आल्यापासून नुकतीच ओळख झाली आहे. "

प्रभाकरः—" हं, असें ह्मण, मला वाटलेंच तसें. तो कांहीं तुझा स्नेही नाहीं, व तुला तो आवडतही नाहीं. तूं जणूं मला हें स्वतः सांगितलेंस, असें मीं पक्कें ओळखलें. आतां तर तुझ्या तोंडून ऐकून मला फार बरें वाटलें. " त्याच्या बोलण्यांत आवेश व दृष्टींत अस्वस्थता दिसत होती. तिनें साश्चर्य विचारलें, " तें कां बरें ? "

"कां म्हणजे? मला तो बिलकुल आवडत नाहीं. उलट त्याचा राग येतो!"

" पण तूं तर त्यांना आजच पाहिलेंस आणि असें कसें ह्मणतोस ? भाऊ, तुला हें बरें काय ? "

" बरें नव्हे खरें, पण राहवत नाहीं. खरेंच तारू, मला त्याचा भारी राग येतो. त्याच्याकडे पाहिलें कीं, मला एकप्रकारची भीतिच वाटते. तो बोलत होता त्या वेळीं माझा जणुं कोणी गळाच दाबीत आहे असें मला होत होतें. मी काय ह्मणतों आलें का ध्यानांत ? "

" आलें." तारा चटकन् बोलली. शामरावांचें बारीक पण चघळपणाचें भाषण तिच्या कानावर पडे तेव्हां तिला सुद्धां असेंच वाटे. तथापि त्या मुलाच्या तऱ्हेवाईकपणाला–चमत्कारिक मनोवृत्तीला–उत्तेजन देणें बरें नव्हे असें वाटून ती ह्मणाली, " पण हा अगदींच वेडेपणा आहे. शामराव किती ममताळु व पोक्त विचाराचे आहेत ! त्यांनीं माझ्याकरितां फुलांचे गजरे आणून दिले. शिवाय हें गाण्याचें पुस्तकही मुंबईहून आणून दिलें. "

प्रभाकरानें तें पुस्तक हातांत घेतलें व त्याकडे कांहीं वेळ तिरस्कारपूर्ण दृष्टीनें पाहून त्यानें तें टेबलावर टाकलें. जणु ते पुस्तक खिडकींतून लांब फेंकून द्यावें असेंच त्याला वाटत असावें असा भास झाला. तो ह्मणाला, " बरें, ताई, तो इतकें कशाकरितां करीत आहे याची कांहीं कल्पना ? "

" मला नाहीं माहीत—मेहेरबानीखातर, दुसरें काय ? "

प्रभाकर मान हालवून ह्मणाला:—" पण मला नाहीं तसें वाटत. ही त्याची मेहेरबानी आह्मांला नको आहे. कां बरें ? माझ्या बोलण्याचा तुला राग आला कीं काय ? "

तारा हांसून बोलली—" इश्श ! यांत कसला रे राग यायचा ? "

प्रभाकर:—" ताई, तुला तो आवडत नाहीं हे मला बरें वाटतें. कारण जो मनुष्य तुझ्या आवडीचा आहे त्याचा द्वेष करणें मला बरें वाटत नाहीं. "

" पण विनाकारण कोणाचा द्वेष करणें तरी चांगलें का ? भाऊ असला स्वभाव चांगला नव्हे. "

" खरेंच, ताई. तुझ्या सहवासानेंच हा स्वभाव कांहीं सुधारला तर सुधारेल. माझ्या बोलण्याचा तुला राग आला नाहीं ना ? खरें सांग. "

" खरोखर, मुळींच नाहीं आला. पण आतां जास्त बोलूं लागलास तर मात्र मी रागावेन. तूं नीज जा. आतां उद्यां आणखी बोलत बसूं. " असें ह्मणून तारा उठली. प्रभाकरही निजावयास गेला.

---



# प्रकरण १४ वें.

——:o:——

## प्रभाकराचा बचाव.

कुत्र्याची आपल्या धन्यावर केवढी भक्ति असते, घोड्याचें मालकावर किती प्रेम असतें, हें सर्वांना माहीत आहेच. अशाच प्रकारची भक्ति व अशा तऱ्हेचें प्रेम तारेवर त्या मुलाचें-प्रभाकराचें-बसलें होतें. तो मोठा विलक्षण व तऱ्हेवाईक मुलगा होता. येथें आल्याच्या पहिल्या रात्रीं त्याच्या चेहऱ्यावर जी खिन्नता व उदासीनता दिसत होती ती लवकरच नाहींशी झाली. त्याचा चेहरा आतां टवटवीत व आनंदी दिसूं लागला. तथापि तो अजूनही ह्मणावा तसा मन मोकळें करून वागत नव्हता. केव्हां केव्हां तो गुडघ्यांत खालीं मान घालून चिंताक्रांत असा बसलेला दिसे. कधीं कधीं कोणीकडे तरी टक लावून अभिष्टासारखें पहात रहावें असा त्याचा प्रकार चालला होता. त्यानें केलेल्या खोट्या-बनावट दस्तासंबंधानें तारेला यत्किंचित्‌ही माहिती नव्हती. ह्मणून तिला वाटे, प्रभाकराला ही एक खोड लागली असावी-एक प्रकारचें वेड असावें, असें ती ह्मणे.

तथापि हा वेड्याचा प्रकार, ही त्याची शून्य दृष्टीनें कोणीकडे तरी पहात राहण्याची संवय अलीकडे पुष्कळच कमी झाली होती. तो आतांशा बराच बोलका व थट्टेखोर बनत चालला होता. तारेच्या ठिकाणीं

तर त्यांची मोठी विलक्षण भक्ति होती. नुसत्या भगिनीप्रेमापेक्षां त्यांत कांहीं जास्त होतें. आदर व पूज्यबुद्धि यांचा त्यांत मिलाफ झालेला दिसे. तासांचे तास तो तिच्या शेजारीं बसून तिचें विणकाम पहात अगर तिचें मधुर गुणगुणणें ऐकत राही. तिच्या सहवासांत त्याला जितकें सुख होई तितकें दुसऱ्या कशानेंहि होत नसे. ती बागेंतून हिंडूं लागली कीं प्रभाकरहि तिच्या मागून हिंडे. ती नदीकडे हवा खाण्याला गेली कीं पाठोपाठ तो जाई. एखादा भक्त ज्याप्रमाणें निःसीम भक्तीनें व प्रेमानें आपल्या आराध्य देवतेला भजत असतो त्याप्रमाणें तारेवर त्या मुलाची प्रेम व भक्ति होती. तारेच्या ठिकाणीं त्याची इतकी निष्ठा पाहून साबाजीला सुद्धा फार आश्चर्य वाटूं लागलें. प्रभाकराचा स्वभाव लहानपणापासून भारी हट्टी व तऱ्हेवाईक होता. त्याच्यावर कोणाचेंच वजन पडत नसें. असें असून तो तारेच्या इतका आहारीं कसा आला याचाच चमत्कार साबाजीला वाटूं लागला व त्याप्रमाणें त्यानें एके दिवशीं तारेजवळ बोलूनहि दाखविलें. ती ह्मणाली, " त्याचा स्वभाव मोठा प्रेमळ असून लाघवी आहे; शिवाय तो पुष्कळ समजूतदारहि आहे. त्याची प्रकृति मात्र भारी नाजुक आहे. मला त्याचेंच भय वाटतें. "

इतक्यांत प्रभाकर नदीला स्नान करावयास जाण्याच्या तयारीनें तेथें आला. त्याला तारा ह्मणाली. " भाऊ, तूं इतका वेळ कोठें गेला होतास ? मला वाटलें कीं, तूं स्नान करूनच आला असशील."

प्रभाकरः—" छे ग; मी जाणार होतों. पण तूं ह्मणालीस कीं जुळलें तर आपणहि येऊं, ह्मणून मी तुझी वाट पहात बाहेर उभा राहिलों. अजून तुझी तयारी झाली नाहीं वाटतें ? ठीक आहे. तुझें आटपायचें असेल तर आटपूं दे. "

ताराः—" नाहीं बरें आतां उशीर लावीत. ही बघ निघालेंच. "

असें ह्मणून तीं दोघेंही नदीकडे स्नानाला निघालीं. घाटाजवळ एक होडी असून तींत खाकी पोषाख केलेले एक तरुण गृहस्थ बसले असल्याचें प्रभाकरानें पाहिलें. ते गृहस्थ कोण असें प्रभाकरानें तारेस विचारलें. तारेनें तिकडे नजर टाकून ह्मटलें:—" सरदारपुत्र शिवराव असावेत.

होय, होय, तेच. होडींत बसून ते कधीं कधीं या बाजूला येतात. तो पहा त्यांचा वाडा." असें ह्मणून तारेनें चंद्रगड किल्ल्याकडे बोट दाखविलें.

प्रभाकर उत्कंठेनें ह्मणाला, "शिवराव, चंद्रगडचे भावी जहागीरदार ते हेच का? त्यांना भेटण्याची माझी फार इच्छा आहे. ताई, तुझी त्यांची ओळख आहे वाटतें?"

"ओळख कशाची? आहे आपली थोडीशी झालें." तारा लाजत लाजत ह्मणाली.

प्राभकरः—"शिवरावासंबंधानें मीं किती हकीकत ऐकली आहे! मुंबईत त्यांना कोणी ओळखत नाहीं असें नाहींच. प्रत्येक जण त्यांना ओळखतो. त्यांचा फार डामडौल आहे, श्रीमंतीची त्यांना फार आढ्यता आहे ह्मणतात."

तारा हांसून ह्मणाली, "तूं ह्मणतोस इतका त्यांचा डामडौल आहे काय?"

प्रभाकरः—"अग होय. खरोखरच आहे. चार घोड्यांच्या गाडींत बसून नेहमीं हिंडतात. मुंबईत जेवढे ह्मणून चैनी मंडळीचे क्लब आहेत, आखाडे आहेत, तेवढ्याचे ते मेंबर आहेत. पुण्याच्या शर्यतींतील अति उत्तम असे पंधरा घोडे यांचे स्वतःचे आहेत. ते अत्यंत लोकप्रियहि आहेत. शिवाय नुकतेंच मीं असेंहि ऐकलें आहे कीं, त्यांचें लग्न ठरलें असून समारंभ फारच थाटाचा होणार आहे!"

"खरें कीं काय?" तारा ह्मणाली. तिच्या ओंठांवर किंचित् हास्य विलसूं लागलें.

"त्यांची भावी वधू त्यांच्या सारखीच कोणशी थाटमाट, नट्टा पट्टा करणारी आहे. तिच्याशीं–प्रधानांच्या चंद्रिकेशीं त्यांचें लग्न होणार आहे ह्मणतात."

त्याबरोबर तारेच्या ओठांवरील हास्य मावळलें व तिचा चेहरा म्लान झाला. त्याचें ह्मणणें खोटें, हास्यास्पद होतें तरी तेवढ्या नुसत्या बातमीनें सुद्धां तिचें काळीज चरचर कांपूं लागलें व तिला वेदना होऊं लागल्या.

"होईना तिकडे! श्रीमंतांच्या लग्नाच्या पंचाइती आह्मांला कशाला हव्यात!" एवढेंच तारा बोलली व भराभर चालूं लागली. शिवरावा-

संबंधानें आणखी माहिती प्रभाकर सांगत होताच, पण तारेचें तिकडे लक्ष्य नव्हतें.

तीं नदीच्या घाटावर जाऊन पोचलीं. तारेस पाहतांच शिवरावांनीं चटदिशीं होडी घाटास आणून भिडविली व तारेकडे पाहून, “ तारू, कसें काय ! होडींत बसून—” इतक्यांत त्यांची नजर तिच्या पाठीमागें प्रभाकर होता त्याजकडे गेली. त्यास पाहून त्यांनीं विचारिलें, “ हें कोण बरोबर ! चेहरा नवीन दिसतो.”

ताराः—“ हा माझा चुलतभाऊ, प्रभाकर. ”

शिवरावः—“ अरे वा ! कसें काय ! प्रभाकर, तब्येत बरी आहे ना ! तूं आलास, बरें झालें. इतका वेळ मी एकटाच वल्ही मारून कंटाळलों होतों. तूं माझ्या जोडीला आलास ठीक झालें. चल आपण जरा नदींतून फेरपटका करून येऊं. तुला वल्हें मारतां येतें ना ! परत आल्यानंतर मग स्नान करा म्हणजे झालें. तारू, तूंही ये! चल सुकाणू धरावयास कोणी तरी पाहिजेच आहे.” शिवरावांचें प्रेमळ व मनमोकळें भाषण ऐकून प्रभाकराचें हृदय उचंबळूं लागलें. तारेजवळ आपण त्यांची निंदा केली. याचें त्याला आतां वाईट वाटूं लागलें. लागलीच प्रभाकर होडींत चढून शिवरावांच्या मागें जाऊन बसला व तारा सुकाणूंच्या दोऱ्या धरून बसली.

होडी पाण्यांतून वायुवेगानें चालूं लागली. बराच वेळ झाल्यावर शिवराव किंचित् पुढें वांकून तारेस ह्मणालेः—“ मी काल कुठें जाऊन आलों माहीत आहे काय ! ”

तारेनें एकवार प्रभाकराकडे पाहिलें. पण तो वल्हें मारण्यांत अगदीं गुंग झाला होता. तारेचा हेतु ओळखून शिवराव ह्मणाले,“ वल्ह्याच्या आवाजामुळें आमचें बोलणें त्याला ऐकूं जाणार नाहीं. मी कांहीं जरूरीच्या कारणासाठीं मुंबईला गेलों होतों. शर्यतीच्या घोड्यांसंबंधानें कांहीं भानगड होती ह्मणून जाणें अगदीं भागच पडलें. मी तिकडे गेलों खरा. पण केव्हां परत येईन असें मला होऊन गेलें. एक एक तास ह्मणजे मला युगच वाटूं लागलें. तुला पत्रांतून हकीकत कळवितां येईना. अगर निरोपही पाठवितां येईना. तारू, मला तुझ्याशीं कांहीं जास्त बोलाव-

याचें आहे. प्रभाकराला कोठें तरी पाठवून देऊं काय ? म्हणजे निवांत-पणीं बोलायला सांपडेल. पण त्याला राग नाहीं ना येणार ? तो तसा समजूतदार दिसतो. साबाजीला मुलगा असेल असें मला वाटलें नव्हतें. खरेंच का हा साबाजीचा मुलगा ? ”

पुणे मराठी ग्रं
ग्रं क्र १८३

ताराः—“ होय तर. काकांचाच मुलगा तो. मला देखील माहीत नव्हतें. त्याचा स्वभाव मोठा छान आहे. ”

शिवराव त्याजकडे वळून ह्मणाले,—“ प्रभाकर, तुला आंघोळीला उत्तम जागा पाहिजे असेल तर ती पहा. तें धरण आहे तें ? तेथें पाणी खोल असून अगदीं निवळशंख आहे. तेथें जाऊन स्नान कर. अगदीं धरणाजवळ मात्र जाऊं नकोस हो. तेथें पाणी फारच खोल आहे समजलें.”

प्रभाकरानें रुकार दिला व शिवरावांनीं होडी कांठास नेऊन भिडविली. प्रभाकर होडींतून उतरून धरणाकडे गेला, आणि शिवराव पुनः होडी चालवूं लागले. कांहींसे लांब गेल्यावर त्यांनीं वल्हें थांबविलें व पुढें मान करून ते तारेशीं कांहीं बोलणार तोंच तारा लाजून ह्मणालीः—“ त्याला दिसेल नाहीं. ”

शिवरावः—“ छे, मुळींच दिसत नाहीं. तो कशाला इकडे पहातो आहे ? तारू, मला तुझ्याशीं एक महत्त्वाची गोष्ट बोलायची आहे. रागा-वणार नाहींस असें मला वचन दे. तर सांगतों. ”

“ इतकी महत्त्वाची का ती गोष्ट आहे ? ”

“ होय तारू, ती इतकी महत्त्वाची आहे. आमचें दोघांचें एकदां लवकर लग्न व्हावें असें मी म्हणतों. अगदीं ताबडतोब.”

“ छे छे ! तसें होणें नाहीं.” ती कांपित स्वरानें ह्मणाली.

“ पण मी म्हणतों, तूं होय म्हटलेंच पाहिजे. लाडके, तुझ्याशिवाय मला घटकाभर देखील चैन पडत नाहीं. खरोखर अशी माझी स्थिति झाली आहे. तूं एकदांचें कृपा करून होय म्हण म्हणजे झाले.”

“ आतां यावर मी उत्तर काय देणार ? ” असें ती हळूंच ह्मणाली. तिचे डोळे खालीं झाले, व अंतःकरण जलद उडूं लागलें.

शिवराव चटकर बोललेः—“ काय उत्तर द्यावें हें मी सांगतों. मी

जें जें ह्मणून तुला विचारीन तेवढ्याला तूं नुसतें 'होय' असें उत्तर देत जा म्हणजे झालें. तारू, मीं यासंबंधीं पुष्कळ विचार केला आहे व मला असें वाटूं लागलें आहे कीं, दिवसगत लावल्यापासून आह्मां दोघांचेंहि हित होणार नाहीं; उलट तोटाच होईल. तूं माझी—माझ्या पूर्ण मालकीची—होईपर्यंत मला सुख लागणार नाहीं. आमचें लवकर एकदां शुभमंगल झालेंच पाहिजे. शुभस्य शीघ्रम्."

"पण मी म्हणतें इतकी घाई कां ?" ती आर्जवानें ह्मणाली.

शिवराय उत्कंठित होऊन ह्मणाले, "घाई होईल तितकें चांगलें. जितकी दिवसगत होईल तितकें नुकसान आहे. तारू, तुला एक क्षणभर देखील दुःख अगर त्रास होऊं नये ह्मणून मी वाटेल तें करण्यास तयार आहे. आमचें परस्परांचें एकमेकांवर प्रेम जडलें आहे ही गोष्ट लोकांना समजली कीं, तारू, तुला फार त्रास होईल; सर्व लोक तुझ्यावर बिथरतील. तुझा सख्खा काका साबाजी हा तरी आपली अनुमति देईल काय? विचार कर."

"तुमचें बोलणें माझ्या ध्यानांत आलें. खरेंच, काका कांहीं संमति देणार नाहींत. काकाचसे काय, माईसाहेब, सरकार स्वारी—किंबहुना वाड्यांतील कोणाचीच संमति या गोष्टीला मिळणार नाहीं."

"अं ! त्यांच्या संमतीची मी मुळींच पर्वा करीत नाहीं." शिवराव आपल्या स्वाभाविक बेफिकीरपणानें ह्मणाले. "मला फक्त तुझ्या सौख्याची—मानासिक स्वस्थतेची काळजी वाटते. ती मंडळी तुला सुख लागूं देणार नाहींत अशी मला भीति आहे. ह्मणून ह्मणतों, तारू, तूं व मी अशीं दोघें मिळून येथून कोठें तरी निघुन जाऊं या व लग्न करूनच परत येऊं या. कोणालाच कांहीं कळवूं नये म्हणजे झालें."

"म्हणजे गुप्तपणानें, चोरून, असेंच ना ? शिवराव काय बोलतां हें?"

"पण हाच मार्ग सर्वांत उत्तम आहे. आमच्या दोघांवर एकदां अक्षता पडल्या, आम्ही दोघेंहि विवाहग्रंथीनें बद्ध झालों असें लोकांना समजलें म्हणजे कोणीच कांहीं ह्मणणार नाहीं. कारण, ह्मणून मग काय उपयोग ? याकरितां सांगतों कीं, मी ह्मणालों असें झालेंच पाहिजे. तुझ्या

ह्मणण्याप्रमाणें आम्ही प्रत्येकाची संमति मिळेपर्यंत वाट पहात राहिलों तर ह्मातारे होईपर्यंत आमचें लग्नच होणार नाहीं, समजलें ? ”

“ पण काकांची तरी संमति नको का घ्यायला ? ते मला किती प्रेमानें वागवितात ? माझें दुसरें कोणी आहे काय ! ” तारा पुटपुटली.

“ मीहि तुझ्यावर प्रेम करीन, तूं सुस्थळीं पडावीस, तुला सुख लागावें, अशी साबाजीची इच्छा असणें साहाजिक आहे; त्याच्या इच्छेप्रमाणें मी तुला सुख देईन. तुला कधींहि अंतर देणार नाहीं. मग ठरलें ना ? ”

तारा स्तब्ध राहिली. तिचें मन विचारांत गर्क झालें.

शिवरावः—“ ठरलें तर. आतां पुढचा बेतबात मी सर्व जुळवितों. या कामीं आह्मांला कोणाची तरी मदत पाहिजे आहे. ” किंचित् विचार करून ते म्हणाले, “ मला वाटतें या कामीं आह्मांला प्रभाकराचा पुष्कळ उपयोग होईल. त्याला आम्ही आपला जासूद करूं या. इकडून तिकडे व तिकडून इकडे तो निरोप कळवील. तारू, आमची दोघांची ओळख झाल्यापासून आमचें एकमेकांस बोटभर पत्र सुद्धां कधीं गेलें नाहीं. मुंबईत असतांना, तुझें पत्र यावें, तुझें अक्षर वाचायला, पहायला, मिळावें, तुझा स्पर्श झाला आहे अशी एकादी वस्तु तरी हातांत घ्यायला मिळावी अशी मला किती उत्कट इच्छा होई! आतां तरी तारू, मला पत्र लिहीत जा. प्रभाकर मजकडे तें पत्र आणून देईल. प्रभाकराची आणि माझी आतां गट्टी जमलीच पाहिजे. तुझ्या ठिकाणीं तर त्याची निःसीम निष्ठा आहेच. यांत कांहीं विशेष नाहीं ह्मणा.कारण तुझी ज्याची ज्याची ओळख झाली त्या प्रत्येकाचें प्रेम तुझ्यावर बसलेंच पाहिजे. तुझा स्वभावच असा आहे. ”

शिवरावांच्या चेहऱ्यांत, भाषणात व चालचलणुकींत एक प्रकारची अपार मोहकता होती याचा उल्लेख मागें एकदां केलेलाच आहे. या मोहकतेचा प्रभाव आज मात्र पूर्णपणें दिसून आला. आपण जणूं स्वप्नसृष्टींत आहों असें तारेला वाटलें. ती जादूनें भारून गेली. त्यांचे बोलणें ऐकत असतां तेवढा वेळपर्यंत कां होईना—ती स्थळ, वेळ सर्व कांहीं विसरली. प्रभाकर उतरून गेल्या ठिकाणीं जेव्हां होडी परत आली तेव्हां त्याची तिला आठवण

झाली व तिनें एकदम तिकडे पाहून म्हटलें, " अगबाई, भाऊ कुठें दिसत नाहीं ! कुणीकडे गेला बरें ? "

" धरणाच्या पलीकडे आंघोळ करीत असेल त्याची कांहीं काळजी करायला नको. " नंतर जरा लांबवर पाहून त्यांनीं म्हटलें, " वेडा कुठला ! धरणावर उभा राहून काय पहातो आहे कोणास ठाऊक."

" अगबाई ! तेथें पाणी फार खोल आहे ना ? " तारा उद्गारली.

शिवराव तिला धीर देऊन ह्मणाले, " भिऊं नकोस, धरणावर लोखंडी कठडा आहे त्याला धरून उभा आहे. मी त्याला हांक मारतों. "

असें ह्मणून शिवरावांनीं प्रभाकरास हांका मारण्यास सुरवात केली. प्रभाकर 'ओ' देऊन ह्मणाला, " आलों आलों, माझें उपरणें धूत असतां पाण्यांत पडलें तेवढें काढून घेऊन येतों. "

शिवरावांच्या लक्षांत सर्व प्रकार चटकन् येऊन गेला. धरणाशेजारीं पाणी आतिशय खोल असून त्यांत पडलेलें उपरणें काढण्याकरितां ह्मणून प्रभाकर जर पाण्यांत गेला तर तो बुडण्याची भीति आहे असें वाटून ते झट्दिशीं होडींतून उतरले व पळतच धरणावर गेले; इतक्यांत पाण्यांत पडलेलें आपलें उपरणें धरण्याकारितां ह्मणून प्रभाकर खालीं वांकला व लांब हात करून तें काढूं लागला. पण तितक्यांत त्याचा पाय निसरला व तो पाण्यांत पडला. त्यास पोहतां येत नसल्यानें तो गटंकळ्या खाऊं लागला.

शिवरावांच्या दृष्टीस हा प्रकार पडतांच एक क्षणाचाहि विलंब न करितां अंगांतील कपडे एका निमिषार्धांत काढून टाकून त्यांनीं पाण्यांत उडी घातली व सपासप पाणी तोडीत जाऊन त्यांनीं प्रभाकराची शेंडी धरली व त्यास ओढीत किनाऱ्यावर आणलें. प्रभाकराच्या नाकातोंडांत पाणी गेल्यामुळें तो बराच घाबरला होता, पण थोडक्याच वेळानें तो शुद्धीवर आला व शिवरावांकडे पाहून ह्मणाला:--

" तुह्मी माझा जीव वांचविला. "

" कांहीं तरीच ! मला आज चांगली आंघोळ घडली इतकेंच. " असें शिवराव बोलत आहेत तों ताराही त्यांच्या मागून पळत धांपा टाकीत

तेथें येऊन पोंचली. तिनें आपल्या पदरानें प्रभाकराचें अंग पुसून काढलें. नंतर त्याला घेऊन शिवराव व तारा परत होडीकडे आलीं.

त्या दोघांस होडींत बसवून शिवरावांनीं होडी थोडक्याच अवकाशांत घाटाजवळ आणली व त्यांना घाटावर उतरविलें. प्रभाकर जातेवेळीं शिवरावांकडे पाहून ह्मणाला, "खरोखर, शिवराव तुह्मींच माझा जीव वांचविला. मी हे तुमचे उपकार कधींही विसरणार नाहीं. एखादे दिवशीं तरी मी याची फेड करीन. कधीं रहावयाचा नाहीं. अशक्य असें तुह्मांला वाटेल, पण सिंह आणि उंदीर यांची गोष्ट लक्ष्यांत आणा, ह्मणजे मग शक्य कीं अशक्य हें ध्यानांत येईल."

शिवराव होडी घेऊन परत गेले. इकडे तारा व प्रभाकर घराकडे निघालीं. चालतां चालतां प्रभाकर तारेस ह्मणाला, "ताई, हा त्यांचा केवढा थोरपणाग! केवढी त्यांची हिंमत! केवढें धारिष्ट! दुसरें कोणी येथें उभें असतें तर माझ्याकरितां कांहीं त्यानें पाण्यांत उडी घेतली नसती. शिवाय ते किती प्रेमळपणानें व आनंदानें बोलत होते! इतकें असून अभिमान बिलकुल नाहीं. ताई, खरेंच तुला असला नवरा मिळाला पाहिजे आणि मिळेलही. तुझ्यावर त्यांचें प्रेम दिसतें. तूं गरीब असलीस तरी तुझी योग्यता कांहीं कमी नाहीं—"

तारा मध्येंच ह्मणाली, "भाऊ, तूं पाय उचल. कपडे सगळे भिजून चिंब झाले आहेत. थंडी नाहीं का होणार! काका काय बरें ह्मणतील?"

प्रभाकरः—"बाबांना यांतील कांहींच हकीकत कळवून उपयोगी नाहीं. कारण कळविल्यानें त्यांना त्रास मात्र होईल. मीं अगोदरच त्यांना पुष्कळ त्रास दिला आहे. त्यांत आणखी ही भर पडेल. आह्मी मागच्या दारानें घरीं जाऊं या, ह्मणजे त्यांना समजणार नाहीं. असें ह्मणत तीं फाटकाजवळ आलीं. इतक्यांत शामरावांची उंच, सडपातळ व शामवर्ण मूर्ति तिकडून येत असलेली त्यांना दिसली.

# प्रकरण १५ वें.

—:o:—

## प्रेम नाहीं तर स्नेहभाव तरी असूं दे.

प्रभाकराचे भिजलेले कपडे पाहून शामरावांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्यास कारणही विचारलें. परंतु प्रभाकराच्या मनांत शामरावाबद्दल तिरस्कार वाटत असल्यानें त्यानें विशेष हकीकत न सांगतां फक्त मी नदीकडे आंघोळ करण्याकरितां गेलों होतों, पाय निसरून पडलों, इतकेंच सांगितलें, परंतु तेवढ्यानें शामरावांचें समाधान झालें नाहीं. ह्मणून तूं असा कसा पडलास, कोणत्या ठिकाणीं पडलास, पाणी किती खोल होतें, तुला बाहेर कोणीं काढलें वगैरे प्रश्नावर प्रश्न त्यांनीं विचारले, पण त्यांचें उत्तर देण्याऐवजीं प्रभाकर वांकड्या नजरेनें त्यांच्याकडे पाहूं लागला. तेव्हां तारेनें सर्व हकीगत सांगून शेवटीं ह्मटलें, "त्या वेळीं तेथें शिवराव होते ह्मणून बरें झालें, नाहीं तर मोठा अनर्थ ओढवला असता."

परंतु शिवरावांची ही प्रशंसा शामरावांना आवडली नाहीं. ते नाक मुरडून ह्मणाले, " अंः, आहे काय त्यांत ! धरणावर पाणी तें कितीसें असणार ! आणि प्रभाकरासारख्या मुलाला काढण्याला धैर्य तें किती लागणार ? मी देखील असतों तर त्याला सहज बाहेर काढलें असतें."

आतां बोलणें वाढणार, कारण प्रभाकर रोख ठोक उत्तर दिल्याशिवाय रहावयाचा नाहीं, असें जाणून तारा चटकन् ह्मणाली, "बरें आहे, शामराव आह्मी घरीं जातों आतां."

शामरावांचे लोलुप डोळे तिच्या सौंदर्याकडे लागले. त्यांनीं ह्मटलें, " साबाजीची गांठ घेण्याकरितां मी आलों होतों. येऊं का आंत ? "

ताराः—" येण्याला कोणती हरकत आहे ! तुह्मी पुढच्या दरवाजानें जा, आह्मीं मागच्या बाजूनें येतों. ह्मणजे त्यांना कांहीं कळणार नाहीं. तुह्मीही त्यांच्या जवळ बोलूं नका. नाहीं तर त्यांना विनाकारण त्रास व्हायचा ह्मणून ह्मणतें. "

" तें मला सांगायला नको. माझ्याकडून केव्हांही गैर होणार नाहीं हें तूं खात्रीनें समज, " असें ह्मणत शामराव बागेच्या फाटकांतून आंत गेले.

इकडे तारा व प्रभाकर मागच्या बाजूनें घरांत गेलीं. कोरडे कपडे तारेनें आणून दिले, ते घेऊन प्रभाकर ह्मणाला, " त्यांना फार वेळ घरांत राहूं देऊं नकोस. मला त्यांचा असा राग येतो कीं, काय सांगू ! शिवरावांचें नांव निघालें कीं त्यांच्या कपाळाला आंठ्या पडतात, त्या कां ! "

" कारण ते त्यांना आवडत नाहींत ह्मणून " प्रभाकर रागानें लाल होऊन पुढें ह्मणाला. " त्यांच्या आवडीनावडीची कोण फिकीर करतो ! कुत्र्यांना कुठें वाघ अगर सिंह आवडत असतात ! पण—— "

इतक्यांत साबाजीच्या खोलींत त्याचें व शामरावाचें संभाषण चाललेलें तारेनें ऐकलें, ह्मणून ती दार उघडून आंत गेली.

तिला पाहून शामराव ह्मणाले, " तारू, तुझीं तीं गुलाबाचीं फुलें मला फार आवडतात. मी त्यांचीच प्रशंसा साबाजीजवळ करीत होतों."

ताराः—" मग तुह्मांला कोणतीं पाहिजेत तीं घ्या. आमच्या बागेंत कितीतरी आहेत."

शामराव उठून म्हणाले, " चल तर मग बाहेर आणि दाखीव कोणतीं तोडावयाचीं ती. मला कांहीं फार नकोत. थोडीं पुरेत. मुंबईस जातांना बरोबर घेऊन जाईन व माझ्या खोलींत टेबलावर ठेवून देईन म्हणतों. म्हणजे तितकी जास्त शोभा येईल."

" खरेंच शोभा येईल. तुम्ही मुंबईला जाणार काय ? " तारा बाहेर येत येत म्हणाली.

शामरावांनीं 'होय' म्हणून उत्तर दिलें व तिच्या मागोमाग तेही बागेंत आले. एका झाडाजवळ उभी राहून तारा म्हणाली, " कसला गुलाब पाहिजे तुम्हांला ? पिवळा सोनेरी, कीं फिका किरमिजी रंगाचा ? "

" पिवळा सोनेरी, " असें उत्तर आलें.

तारेनें त्या रंगाचें एक फूल तोडलें व आपल्या बालिश स्वभावास अनुसरून त्याचा वास घेण्याकरितां नाकाजवळ नेलें. फुलाचा वास घेऊन व रंग पाहून ती प्रफुल्लित वदनानें म्हणाली:—

" अहाहा ! किती मजेदार व सुवासिक फूल आहे हें ! हा हिमालयांतील गुलाब आहे, बरें का शामराव ! राणीच्या बागेंतील झाडाचें हें कलम आपण पुष्कळ खटपटीनें पैदा करून आणलें, असें काका म्हणतात. आपल्या इकडचे गुलाब इतके सुवासिक नसून रंगही इतका मजेदार असत नाहीं. " असें बोलत तिनें तें फूल शामरावाच्या पुढें केलें. तिच्या सौंदर्य प्रतिमेनें शामराव अगोदरच मोहित झाले होते. त्या सौंदर्याचा स्पर्श त्या फुलाला झाला होता. शिवाय तिच्या श्वासोच्छ्वासाच्या परिमलानें त्या सुवासिक फुलाच्या परिमलांत भर पडलेली होती. आनंदातिशयानें शामरावांनीं तें फूल तिच्या हातांतून घेऊन म्हटलें, " शाबास ! तारू! ह्या फुलाची किंमत फारच मोठी आहे असें मी समजतों. मी हें माझ्या खोलींत टेबलावर ठेवून देतों म्हणजे येतांजातां तुझें स्मरण मला होईल. "

" होय का ? मग आणखी घ्या हवीं तर. इथें किती तरी आहेत ? "

" नकोत, नकोत. मला आणखी फुलें नकोत. ह्या बागेंत फुललेलीं सर्व फुलें नेल्यानेंहि माझ्या आनंदांत भर पडणार नाहीं. तुझ्या हातांतील गुलाबाचीच काय ती मला विशेष किंमत वाटते. " शामराव बोलले.

पण तारेला हें बोलणें रुचलें नाहीं. ती किंचित् कपाळास आंठ्या घालून घरांत जाण्याकरितां निघाली. तेव्हां शामराव गडबडीनें म्हणाले— " थांब, थांब. तारू, एक क्षणभर थांब. " त्या आवेशांत त्यांनीं तिचा पदरही धरला. त्याबरोबर घाबरून व संतापातिशयानें लाल

होऊन तिनें म्हटलें, " असा चवळपणा मला खपावयाचा नाहीं. कशाला थांब ! "

शामराव—" मला तुझ्याशीं कांहीं बोलायचें आहे. फार नाहीं. दोनच शब्द. तेवढे ऐकून घे म्हणजे झालें. मी जें बोलणार तें प्रशस्त नाहीं, तूं माझें ऐकणार नाहींस, व बोलून माझाही तादृश फायदा होणार नाहीं, हें मी ओळखून आहें. तरी पण मला आतां धीर निघत नाहीं. तारू, तूं तशी समजूतदार आहेस. कांहीं वेळा अशा असतात—"

" कशा असतात ? " तारेनें क्रुद्ध व तिरस्कारपूर्ण मुद्रेनें विचारलें.

शामराव—" कांहीं वेळा अशा असतात, कीं, त्यासमयीं मनुष्याचा आपल्या मनावर दाब रहात नाहीं, त्याच्या सर्व शहाणपणाचा लोप होतो. अशापैकींच हल्लींची वेळ आहे. काय पाहिजे तें होऊं दे, आपण आतां बोलून टाकावें असें मला वाटतें. मी काय बोलणार आहें हें तारू, तूं ताडलेंच असशील. कारण तूं तशी चतुर आहेस. माझ्या मनांतील हृद्गत ज्या तऱ्हेनें प्रकट करण्याची माझी इच्छा आहे, तितक्या उत्तम तऱ्हेनें मला जरी तें प्रकट करतां आलें नाहीं, तरी त्याबद्दल तूं मला दोष देऊं नकोस. तारू, तूं मागची सर्व आठवण करून पहाशील, तुझी माझी प्रथम गांठ पडली तेव्हांपासून आतांपर्यंतची सर्व हकीकत ध्यानांत आणशील, तर माझ्या बोलण्याचा उद्देश तुझ्या लक्ष्यांत आल्याशिवाय रहावयाचा नाहीं. "

तारेनें त्याकडे पाहून नकारार्थी मान हालविली.

शामरावः—" असे विचार मनांत आणण्याचा मला हक्क नाहीं, असें का तुझें ह्मणणें ? तूं जातीनें स्त्री असून जी गोष्ट प्रत्येक स्त्रीला चटकन् ओळखतां येईल ती गोष्ट—म्हणजे तुझ्यावर माझें प्रेम जडत चाललें आहे ही गोष्ट तुझ्या लक्ष्यांत आली नाहीं, असें का तुझें ह्मणणें आहे ! दिवसानुदिवस हा माझा प्रेम-प्रवाह सारखा वाढतच आहे. तुझ्यापासून दूर गेलों, कीं मला चैन पडेनासें होतें. मुंबईला गेलों तरी देखील तुझी मूर्ति माझ्या डोळ्यासमोर उभी ! माझें काम सुद्धां ती मला करूं देत नाहीं. तथापि मीं धीर सोडला नाहीं. फाजिल उतावळेपणापासून बिलकुल

फायदा होणार नाहीं, हें मी पूर्णपणें जाणून आहें. माझ्या स्वभावाची पुरती ओळख तुला होईल, तेव्हां तुझेंही प्रेम माझ्यावर बसूं लागेल. तितकी फुरसत तुला दिली पाहिजे. तोंपर्यंत वाट पहाणें योग्य आहे असें मला वाटतें. "

इतकें बोलून काय उत्तर येतें हें ऐकण्याकरितां ते तिच्याकडे पहात स्तब्ध राहिले. पण ती कांहीं बोलली नाहीं. कां बरें ! कसला विचार ती करीत होती !

त्या वेळीं ज्या पुरुषाचें तिच्यावर खरेंखुरें प्रेम जडलें होतें, त्या आपल्या प्रियकरासंबंधाचें विचार तिच्या मनांत चालले होते. ज्या तरुण सरदारपुत्रानें कसलीही वाट न पाहतां, कोणत्याही प्रकारचा अजमास घेत न राहतां एकदम सरळपणानें आपल्या उत्कट प्रेमाचा प्रवाह तिच्या चरणकमलीं अर्पण केला, आपल्या परिणद्ध बाहुपाशांत तिला बद्धकरून तिचें सर्व प्रेम आपणाकडे ओढून घेतलें, खरें प्रेम कसें असतें हें तिला ज्यानें शिकाविलें, त्या सरदारपुत्र शिवरावासंबंधानें ती विचार करीत होती. त्या दिलदार, उदारधी, तरुणश्रेष्ठापुढें हा दुसरा मनुष्य किती कमी प्रतीचा, किती क्षुद्र तिला दिसला बरें !

शामरावाचें चऱ्हाट पुढें चाललें, " तारू ! मीं माझें सर्व प्रेम तुला अर्पण केलें आहे. प्रेमापेक्षां कांहीं तरी जास्त देण्याचा माझा हेतु आहे. श्रीमंत मनुष्यामध्यें माझी सध्यां गणना नाहीं हें खरें. एखादी बहुमानाची पदवीही मला नाहीं, ही गोष्ट देखील खरी. तथापि अशी संपत्ति व अशा तऱ्हेचा बहुमान मिळविण्याचें मीं मनांत आणलें आहे. व त्याप्रमाणें लवकरच तीं दोन्ही मला साध्य होतील असा भरंवसा आहे. कारण, ज्या गोष्टी मिळविण्याचें मीं मनांत आणलें त्या गोष्टी मला मिळाल्या नाहींत अगर मिळणार नाहींत असा प्रकार होणें नाहीं, केव्हांही नाहीं." असें ते जोराजोरानें पुनः पुनः ह्मणूं लागले.

तारा स्वस्थ उभी राहिली. कांहींच बोलेना. त्यांचा प्रत्येक शब्द तिच्या अंतःकरणाला भयंकर वेदना देत होता. तथापि सर्प ज्याप्रमाणें

एखाद्या पक्ष्याला आपल्या सामर्थ्यानें पूर्णपणें भारून टाकतो, इकडे का तिकडे अगदीं हालूं देत नाहीं, त्याप्रमाणें तिची स्थिति होऊन गेली.

शामराव आणखी ह्मणाले, " तारू, तुझें प्रेम संपादन करण्याकडे माझें सर्व लक्ष्य लागलेलें आहे. मला दुसरें कांहींच सुचत नाहीं. माझ्याप्रमाणें उत्कट, निःसीम प्रेम दुसरें कोणाचेंही नसेल. तुला वश करून घेण्याच्या कामीं मी अमुक एक करणार नाहीं, अगर अमूक एक करण्यास मी मागें घेईन, कचरेन, असें नाहीं. तारू, खरोखरच माझें तुझ्यावर प्रेम जडलें आहे. स्पष्टच सांगून टाकतों. यावर काय उत्तर देणार तें दे. "

तारेनें किंचित् त्यांच्याकडे पाहिलें. तिचा कोमल स्वभाव जागृत होऊन तिला त्यांची कींव आल्यासारखी दिसली.

" नाहीं नाहीं. तुम्ही ह्मणतां तसें होणें शक्य नाहीं. कधींच नाहीं." एवढेंच तारा बोलली.

शामराव किंचित निराश होऊन म्हणाले, " कधींच नाहीं ! म्हणजे! तुझें प्रेम माझ्यावर कधींच बसणार नाहीं, असें कां तुझें म्हणणें आहे ! छे, छे ! तसें मात्र ह्मणूं नकोस. कधींच नाहीं असें ह्मणूं नकोस. मी धीर सोडीत नाहीं. तूं मला नुसती आशा–आशेचा एक तंतु–जरी दाखविलास तरी तेवढ्यावर मी वर्षांचीं वर्षें वाट पहात राहीन. अगदीं अल्पस्वल्प कां होईना, माझ्यावर प्रेम करण्याचा तूं प्रयत्न तरी करून पहा. म्हणजे—"

तारा त्रासून मध्येंच ह्मणाली, " छे, छे ! शामराव, काय हें बोलतां ! प्रेम कुठें शिकून कां येत असतें ! अगदींच अशक्य. तुमच्या लक्षांत इतकें कसें येत नाहीं, कोण जाणे ! "

" तें कां ! माझ्या सर्व कांहीं लक्षांत आलें आहे. तुझें प्रेम दुसऱ्यानें हिरावून नेलें आहे. होय कीं नाहीं ! "

" ती पंचाईत तुह्मांस करण्याचें कारण ! "

" कारण हेंच कीं, तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे. तुझ्या मनास आवडत नसेल तर मी ती भाषाच काढीत नाहीं, मग तर झालें ना !

डोळे असून अंधळें होण्याची तुझी इच्छा असेल तर हो बापडी ! मी मात्र डोळेझांक करणार नाहीं. मी एकंदर स्थिति पाहिली आहे, सर्व गोष्टींचा विचार केला आहे आणि असा विचार करूनच तुला मी असें स्पष्ट सांगतों कीं, तुझ्या मनांत जी गोष्ट आहे, ती घडून येणें शक्य नाहीं; आणि ती घडूनही येऊं नये." शामराव दांत आंवळून बोलले.

"तुमचें बोलून झालें ना ? जातें मी आतां."

तारा संत्रस्त होऊन आंत जाण्याकारितां निघाली. पण शामराव तिच्या अगदीं वाटेवर उभे राहिले असल्यानें तिला जातां येईना.

शामरावः—"थांब, एक क्षणभर थांब, माझ्या बोलण्याचा तुला राग आला वाटतें. आला असेल. माझ्याकडूनच चुकलें. रागाच्या भरांत मी काय बोलतों याचें भान मला राहिलें नाहीं आणि कांहीं तरी वेड्यासारखें बोलुन गेलों. तारू, याबद्दल तूं मला क्षमा कर. कारण हा दोष माझ्याकडे येत नाहीं. तुझ्यावरील प्रेमातिशयाचा हा सर्व परिणाम आहे. एवढें लक्ष्यांत आणून मजवर रागावूं नकोस."

तारा कांहीं बोलणार तोंच शामराव पुढें ह्मणाले, "आतां जो प्रकार घडला तो जणूं कधींच झाला नाहीं असें धरून तूं चाल व मी जें काय बोललों तें सर्व तूं विसरून जा. इतःपर तुला राग येईल असें मी कधींच बोलणार नाहीं. तूं माझ्यावर रागावून मात्र जाऊं नकोस. तुझें वरचेवर दर्शन व्हावें, तुझ्याशीं दोन शब्द बोलण्याची मला नेहमीं संधि यावी, तुझी मधुर वाणी ऐकावयाला सांपडावी अशी माझी फार इच्छा आहे. तुझ्या काकांचा आणि माझा फार वर्षांचा स्नेह–ऋणानुबंध आहे त्यांत अंतर येऊं नये, एवढें माझें सांगणें आहे. मी आलों नाहीं तर त्यांना देखील चुकल्या चुकल्यासारखें होईल, चैन पडणार नाहीं. ह्मणून ह्मणतों, माझ्यावर राग करूं नकोस. तुझें माझ्यावर प्रेम नसलें तरी हरकत नाहीं. पण तुझ्या–माझ्यामध्यें स्नेहभाव तरी असूं दे."

"बरें तर," एवढेंच तारा अस्पष्ट बोलली.

पण तेवढ्यानें शामराव हरखून जाऊन ह्मणाले, "शाबास, तारू, तुझे मजवर अनंत उपकार आहेत. ते मी जन्मभर विसरणार नाहीं.

तुझ्या सहनशील स्वभावाची आठवण ह्मणून तूं दिलेलें हें गुलाबाचें फूल मी काळजीपूर्वक जपून ठेवतों. " असें ह्मणून तें फूल शामराव आपल्या कोटाच्या खिशांत घालूं लागले. इतक्यांत तारेनें पुढें हात करून म्हटलें, " छे, छे ! माझें फूल मला परत द्या. तुमच्या जवळ नको. मीं तुह्मांला दिलें तेव्हां माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. द्या, तें माझें मला परत द्या. "

शामराव गुळमुळ करूं लागले. पण तारा पुढें सरकून ह्मणाली, " मला तें पाहिजेच. द्या इकडे. दिल्याशिवाय भागायचें नाहीं. "

शामरावांना आतां मात्र राग आला. तिच्यापासून ते जरा लांब सरकून ह्मणाले, " पण तें फूल आतां माझें झालें. तूंच मला दिलेंस आणि परत कां मागतेस ! मी नाहीं देत. " असें ह्मणून त्यांनीं खिशांतील फूल काढून हातांत धरलें.

वरील शब्द शामरावांच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात, तोंच त्यांच्या हातातला एक हिसडा बसला. त्याबरोबर तें फूल खालीं पडलें आणि प्रभाकर रागानें मुसमुसत, संतत होऊन त्या दोघांच्या मध्यें येऊन उभा राहिला. तो मुठी आंवळून डोळे लाल करून, शामरावांना ह्मणाला, " देणार कीं नाहीं ! नाहीं ह्मणा पाहूं. " असें ह्मणून त्यानें जमिनीवर पडलेलें फूल पायानें चिरडून अगदीं चेंगरून टाकलें.

असलें सुकुमार व नयनमनोहर पुष्प पायांनीं चिरडून टाकलेलें पाहून शामरावांचें पित्त खवळलें व रागाच्या आवेशांत त्यांनीं प्रभाकराचा हात धरला. पण त्या मुलानें हिसका मारून आपला हात सोडवून घेतला व चवताळून त्यांना मारण्याकरितां आपला हात उगारला. त्याबरोबर विद्युत प्रकाशाप्रमाणें वकीलसाहेबांचा चेहरा बदलला. ओढून ताणून आणलेलें हास्य त्यांच्या ओष्ठद्वयावर विलसूं लागलें. त्यांनीं त्या मुलाच्या खांद्यावर हात टाकून ह्मटलें, " प्रभाकरा, अरे झालें तरी काय ! आहे काय हें ! "

शामरावांच्या वृत्तींत हा एकाएकीं पडलेला फरक पाहून तारेला परमावधीचें आश्चर्य वाटलें. ती स्तिमित नेत्रांनीं सर्व प्रकार पहात उभी राहिली. प्रभाकर ह्मणाला, " फूल आपल्याजवळ ठेवून का घेत होता ! तिला का देत नव्हता ! "

त्याबरोबर शामराव अंमळ हंसून बोलले, " हं, हं, असें काय ? आतां आलें ध्यानांत. तरी म्हटलें इतकी एकाएकीं वीज कां कडकडली ? तूं त्या खिडकींतून पहात होतास वाटतें ? तरीच ! आमचा चाललेला थट्टेचा प्रकार तुला खरा वाटला. वेडा रे वेडा, किती उतावळा हा तुझा स्वभाव ? "

प्रभाकरानें तारेच्या आनत वदनाकडे पाहून म्हटलें, " ताई, हे ह्मणतात तें खरें काय ? "

शामराव तिरस्कारपूर्वक बोलले " अरे, तिला काय विचारतोस त्यांत ? मी सांगतों ना ? हें तुझें वर्तन उद्धटपणाचें नव्हे काय ? तथापि मी तुला त्याबद्दल क्षमा करतों. तूं माझ्यावर जो एकाएकीं चवताळून आलास तो तारूच्या संरक्षणार्थ आलास हें लक्ष्यांत घेऊन मी तुला माफी करतों. चल, आतां ये इकडे आणि माझें फूल मला दे. जा. तोडून एक फूल आण जा. पण आमची तुमची बडी दोस्ती जमलीच समज. होय कीं नाहीं ? "

प्रभाकर त्यांच्या हातांतून निसटून संशयित मुद्रेनें त्यांच्या तोंडाकडे पहात उभा राहिला, तेव्हां शामराव पुनः ह्मणाले, " तूं फूल आणीत नाहींस ? अजून हा खरोखरीचाच प्रकार आहे असें तुला वाटतें कीं काय ? बरें, तर मग, मीच जाऊन एक फूल तोडून आणतों. आणूं का ? " शामराव तारेकडे पहात ह्मणाले.

तारेनें संमतिदर्शक मान हालविली. शामरावांनीं बागेंत जाऊन एक पिंवळ्या गुलाबाचें फूल तोडलें व आपल्या छातीवर खोंवून दिलें. नंतर दुसरें एक फूल तोडून त्यांनीं तें तारेच्या पुढें करून हांसत म्हटलें, " ह्या वेड्या मुलानें तुझें फूल नासून टाकलें. त्याऐवजीं हें घे तुला. " तारेनें तें फूल घेण्याचें नाकारलें असतें. परंतु प्रभाकराचे पश्चात्तापपूर्ण डोळे तिच्याकडे लागलेले पाहून तिनें तें मोठ्या नाखुषीनें कां होईना, पण घेतलें. त्याबरोबर शामरावांचे डोळे विजयानंदानें चमकूं लागले. प्रभाकराच्या खांद्यावर हात ठेऊन ते मृदु व गंभीर स्वरानें ह्मणाले, " माझ्या प्रिय प्रभाकरा, तूं आपला हा उतावळा व रागीट स्वभाव जरा

आंवरला पाहिजेस. कारण हल्लींच्या परिस्थितींत एखादे दिवशीं तूं कोणाला तरी मारशील, दुखापत करशील आणि मग तुझ्यावर फिर्याद होऊन तुला न्यायकोर्टापुढें उभें राहण्याची पाळी येईल व एखाद्या चोराप्रमाणें अगर खोटा दस्त करणाऱ्याप्रमाणें कित्येक महिन्यांची कैद तुला भोगावी लागेल. ह्मणून ह्मणतों; तूं जरा जपून वाग."

वरील निंदाव्यंजक शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतांच प्रभाकरानें एकदम अंग चोरलें त्याचा चेहरा लागलीच उतरला. त्याची ती अवस्था पाहून शामराव बोलले, "आतां तुला वाईट वाटतें होय? आपण हें थट्टेनें केलें असें आतां तरी ह्मण. तुझ्या मनांत काय आहे हें तुझ्या चेहऱ्यावरून मीं लगेच ओळखलें. तुझ्या मनांत माझी क्षमा मागायची असेल तर माग लवकर. मी ती करण्यास तयार आहें."

प्रभाकर खिन्न मुद्रेनें, "मी—मी तुमची क्षमा मागतों—" असें बोलून मान खालीं घालून तेथून निघून गेला.

त्या मुलाकडे निष्ठुरतेनें व क्रूर दृष्टीनें पहात शामराव किंचित् स्मित करून ह्मणाले, "शाबास रे मुलगा! पहिल्यापासूनच तो मला आवडत होता आणि आजच्या प्रकारामुळें तर तो मला जास्तच आवडूं लागला आहे." नंतर तारेकडे पाहून ते ह्मणाले, "त्यानें हें केवळ तुझ्याकरितां केलेन्. फूल ठेवून घेण्याचा माझा उद्देश होता असें तुला तरी वाटलें नाहीं ना? नाहीं. तें मी तुलाच देणार होतों. असो. आतां हें फूल मी माझ्याजवळ जपून ठेवतों. म्हणजे, आपला परस्पर स्नेहभाव राहील, याबद्दल तूं दिलेल्या वचनाची मला सदोदित आठवण राहील."

तारेचा निरोप घेऊन शामराव निघून गेले.



# प्रकरण १६ वें.

—:o:—

## नाजुक कामगिरी.



प्रभाकर आणि तारा यांना पोंचवून शिवराव परत चंद्रगड किल्ल्याची चढण चढूं लागले. त्यांचें सर्व अंग पाण्यानें भिजून चिंब झालें होतें. तरी त्यांचें अंतर्याम प्रेमाच्या उष्णतेनें रसरसून गेलें होतें. तारेच्या तोडीची दुसरी स्त्रीच या अखिल पृथ्वीतलावर मिळायची नाहीं असें त्यांच्या मनानें ठाम घेतलें. तिला आतां लवकर आपलीशीं करून घेतली पाहिजे, दिवसगत करून उपयोगी नाहीं असा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. तारेसारख्या गरीब घराण्यांतील मुलीशीं लग्न करून घेण्यास आपण उद्युक्त झालों ही गोष्ट कळल्यास वडिलांचा आपणावर केवढा रोष होईल, आपल्या मातुःश्रीस किती वाईट वाटेल, कुमुदिनीला केवढें दुःख होईल, वाड्यांतील सर्व मंडळी आपल्यावर कशी गरम होतील, याचें चित्र डोळ्यासमोर दिसूं लागतांच शिवरावांना हासूं येऊं लागलें. ते स्वतःशीं पुटपुटले, " अंः ! आहे काय त्यांत ? कार्य एकदां पार पडलें ह्मणजे मग त्यांना तितकें वाटणार नाहीं. त्यांचें मन आपोआपच बदलूं लागेल. ती श्रीमंत व थोर घराण्यांतील नाहीं ही गोष्ट खरी. पण त्याची काय जरूरी आहे ? गुलाबाचें फुलझाड अगदीं खडकावर उगवलें तरी त्याच्या फुलाची किंमत व माधुरी कुठें कमी होत असते ? तिचें गरीब घराणें बाजूस ठेवलें तर आईबापांच्या मनांत आपणास जशी सून मिळावी असें असतें तशी ती आहे. त्यांत कांहीं कमी नाहीं. ठरलें तर मग. याप्रमाणें करतोंच. "

पण हें होणार कसें ? एवढाच प्रश्न होता. हा प्रश्न शिवराव आतां आपल्या मनाशीं सोडवूं लागले:--" कुठें जाऊन लग्न करून घ्यावें बरें ? खंद्या घोड्यावर तिला माझ्या शेजारीं बसवून घेऊन जावें, हें एका तऱ्हेनें बरें असें वाटतें. पण जायचें कुठें ! आसपास, या एवढ्या टापूंतील कोणत्याही गांवीं जाऊन उपयोगीं नाहीं. कारण आमची कुठें ओळख व माहिती नाहीं असें नाहींच. ही आमची जहागीरदारी मला जेथें तेथें नडणार. मग कोठें जावें ? " थोडासा विचार करून ते ह्मणाले, " खरेंच. मुंबईला जावें हें बरें. तेथें कोण कोणाची पंचाईत करीत नाहीं, व तशी कोणाला फुरसतही पण नसतें. जो तो आपल्या उद्योगांत चूर असणार. ठरलें. असेंच करावयाचें. " असें ह्मणत ते वाड्यांत येऊन पोहोंचले.

वाड्यांतील बहुतेक पाहुणे मंडळी आपआपल्या गांवीं निघून गेली होती. फक्त चंद्रिका व बापूसाहेब हे अद्यापि राहिले होते. चंद्रिकेनें एकदां दोनदां जाण्याबद्दल माईसाहेबांकडे निरोप मागितला, पण माईसाहेबांनीं आग्रह करून तिला ठेवून घेतलें. " चांद्रिके, तूं जाऊं नकोस बाई, रहा माझ्याजवळ. आतां आमची सारी भिस्त तुझ्यावरच आहे. " असें त्या ह्मणत. पण कशाकारितां एवढी भिस्त आहे हें माईसाहेबांनीं जरी स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी चंद्रिकेनें ओळखलें होतें. शिवरावांचा मुक्काम अजून येथेंच होता ह्मणून बापूसाहेबही राहिले होते.

शिवरावांची वागण्याची नेहमींची तऱ्हा ह्मटली ह्मणजे पाहिजे तेव्हां बाहेर जावें, मनास वाटेल त्या वेळीं घरीं परत यावें, कोणाबरोबर बोललें तर बोलावें, नाहीं तर मौनव्रत धरावें अशा प्रकारची होती. त्यांचा स्वभाव एककल्ली व किंचित् तुसड होता ह्मणून कोणीही त्यांच्या वाटेस जात नसत. चार मंडळी खेळत बसली आणि त्यांत शिवराव आपण येऊन मिसळले, तर त्या मंडळीला आनंद होई. पण शिवराव, तुह्मी खेळायला या, असें ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. ते कुठे बाहेर निघाले तर जाणार कुठें, येणार कधीं ? वगैरे विचारण्यास कोणीही धजत नसत. येतील तेव्हां येवोत, व जातील तेव्हां जावोत, पण त्यांच्यासमोर जाऊन त्यांना कांहीं विचारण्याचें धाडस कोणास होत नसे. इतका त्यांचा

धाक सर्व मंडळींना वाटत होता. खुद्द माईसाहेब देखील त्यांच्याशीं बोलावयाचें झालें तर बेताबेतानें बोलून हद्दत काढून घेत. शिवरावांचें अशा तऱ्हेचें वर्तन पाहून माईसाहेबांचें काळीज तिळतिळ तुटे. पण त्या फार समजूतदार असल्यानें हा सर्व प्रकार मोठ्या शांततेनें सहन करीत. शिवरावांच्या ह्या स्वैर वृत्तीला आळा घालूं पाहणें व्यर्थ आहे असें आत्याबाई ह्मणाल्या होत्या तेंच खरें, असें माईसाहेबांनाही वाटूं लागलें. तथापि आपल्या मुलाच्या वर्तनासंबंधानें त्यांना हा एक हृद्रोगच लागून राहिला.

अलीकडे अलीकडे तर शिवरावांची वृत्ति फारच चंचल झाली होती. त्यामुळें माईसाहेब वरचेवर घाबऱ्या होत; त्या एके दिवशीं सहज आत्याबाईस ह्मणाल्याः--" शिवरावांचें कांहीं तरी बिनसल्यासारखें दिसतें. कारण मात्र कांहीं समजत नाहीं. "

आत्याबाई:—" कसलें कारण आलें आहे ! त्याचें बिनसत नाहीं केव्हां ! कांहीं तरी वेडेचार करण्याचें मनांत आणलें असेल झालें. पण त्याची काळजी नको. येईल लवकरच ताळ्यावर. "

" पण येईल असें कशावरून ? " माईसाहेब सुस्कारा टाकून ह्मणाल्या.

" येईल असें मला तरी वाटतें. चंद्रिकेलासुद्धां तसेंच वाटत आहे. नाहीं तर ती येथें राहिली नसती, होय ना ग चंद्रिके ? "

चंद्रिका लाजली. आत्याबाई पुढें ह्मणाल्याः—" वहिनी, सर्व कांहीं लवकर सुव्यवस्थित होईल बरें. तुह्मी बिलकुल काळजी करूं नका. चंद्रिकेचा आणि शिवरावांचा जोडा मोठा छान दिसतो. त्या दोघांचें लवकर एकदां लग्न होऊन संसार थाटलेला पाहिला म्हणजे माझ्या डोळ्यांचें पारणें फिटेल. मुलेंबाळें झालीं म्हणजे मी आहेंच ह्मातारी त्यांना खेळवायला. आमचें आतां दुसरें काम काय ? "

आत्याबाईनीं इतका धीर देऊन समजूत घातली खरी, पण माईसाहेबांना विश्वास वाटेना. तथापि चंद्रिका अद्यापि राहिली आहे हें पाहून त्यांना थोडा आशातंतु दिसूं लागला. चंद्रिकेची आणि शामराव वकी-

लांची गांठ पडून त्या दोघांचें जें संभाषण झालें त्याची माईसाहेबांना यत्किंचित्ही वार्ता नव्हती.

शामरावाची गांठ पडल्यापासून चंद्रिकेच्या वृत्तीमध्यें बराच फरक पडला होता. शिवरावांवर तिचें खरोखर उत्कट प्रेम होतें, परंतु त्या प्रेमापासून सौख्य होण्याऐवजीं तिला संताप व दुःख मात्र होऊं लागलें. कारण शिवरावांकडून तिच्या प्रेमाचा मोबदला कांहींच मिळत नव्हता. तशांत त्या दिवशीं रात्रीं नदीच्या धरणाशेजारीं झाडाच्या आड लपून शिवराव दुसऱ्या एका कुमारिकेबरोबर कानगोष्टी करीत असल्याचें तिनें पाहिलें; इतकेंच नव्हे, तर त्या दोघांचा प्रेमसंवाद अस्पष्ट कां होईना तिच्या कानावर पडला. त्या वेळेपासून तर तिच्या संतापास व दुःखास सीमाच राहिली नाहीं. ती कुमारिका कोण तर एका यःकश्चित् भिकारी चित्रकाराची पुतणी–मुलगी देखील नव्हे. याचेंच तिला फार वाईट वाटूं लागलें. रात्रीच्या वेळीं त्या टोलेजंग वाड्यांत चहूंकडे सामसूम झालें असतां चंद्रिका आपल्या बिछान्यावर एकदां या कुशीवर व एकदां त्या कुशीवर अशी सारखी धडपडत राही. आपण रूपानें सुंदर, जणूं सौंदर्याची पुतळी आणि सर्वगुणसंपन्न असून ज्या पुरुषाचें दुसऱ्या स्त्रीवर प्रेम बसलें आहे अशा पुरुषावर आपलें प्रेम बसावें–इतकेंच नव्हे, तर त्या प्रेमशरानें आपण अगदीं विव्हल होऊन जावें ह्याच गोष्टीची तिला लज्जा वाटूं लागली व तिचें मन तिला खाऊं लागलें. तशांत झाडाच्या आड आपण चोरून उभे राहिलों असतां शामरावानें आपणास पहावें व त्या कावेबाज, कपटपटु हीन वकीलाच्या भाषणाला भुलून जाऊन त्याच्या कपट नाटकांत भाग घेण्याचें–त्यास मदत करण्याचें आपण कबूल करावें ही गोष्ट तिला अत्यंत तिरस्करणीय व अतोनात अपमानस्पद वाटूं लागली. तथापि अशी स्थिती झाली होती एवढी गोष्ट खरी. तिच्या मनांत जो हेतु साधावयाचा होता तो साधण्याकरितां शामरावापेक्षांही जास्त नीच व जास्त दगलबाज माणसाशीं संगनमत करण्याची तिची तयारी होती.

आपल्या मनांतील कपट शिवरावांच्या बिलकुल लक्षांत येऊं नये

ह्मणून चंद्रिकेनें फारच दक्षता ठेविली. आपण जो विचार मनांत आणला आहे त्याचा यत्किंचित् जरी संशय शिवरावांना आला तरी तेवढ्यानें ते सावध होतील व आपला बेत ढासळेल अशी तिला भीति होती, ह्मणून ती फारच बेतानें रहात असे. ती त्यांच्याशीं मोकळेपणानें लागेल तितकें बोलत बसे, त्यांच्याशीं हांसे, खेळे, थट्टामस्करी करी. सर्व कांहीं पूर्वींप्रमाणेंच चाललें होतें. तथापि मांजर ज्याप्रमाणें उंदरावर टपून बसतें, त्याप्रमाणें ती आपल्यावर टपून बसली आहे, आपलें कोणतेंही कृत्य अगर भाषण तिच्या नजरेंतून जात नाहीं ही गोष्ट शिवरावांच्या लक्षांत आली नाहीं. वाड्यांत नसल्या मुदतींत शिवराव कोठें वेळ घालवित हें तिनें धोरणानें ओळखलें होतें. ज्या कुमारिकेनें त्यांचें प्रेम हिरावून नेलें त्या कुमारीची ते भेट घेतात हें तिनें पूर्णपणें ताडलें. त्या भेटींत काय काय प्रकार होत असतील, ती काय बोलत असेल, त्यांच्याकडून काय उत्तर येत असेल, याचें चित्र सुद्धां चंद्रिका आपल्या मानस पटलावर रेखाटूं लागली. त्या बालिकेला पाहिल्यापासूनच तिच्या बद्दल चंद्रिकेच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला होता. तो अलीकडे जोरानें वाढूं लागला. पण त्याबरोबरच शिवरावांवर जडलेलें प्रेमही वाढूं लागलें. त्यांनीं आपलें अंतःकरण पूर्णपणें वेधून घेतलें, आपल्या मनावर त्यांनीं पूर्ण पगडा बसविला. आतां आपलें सर्व भावी सौख्य त्यांच्यावरच अवलंबून आहे असें तिला समजून चुकलें. त्या सौख्याचा लाभ करून घेण्याच्या उद्योगाला ती लागली. शामराव तिला मदत करणारे होतेच.

शिवराव वाड्यांत येऊन पोंचले त्या वेळीं पुढील चौकांत बापूसाहेब, चंद्रिका व आत्याबाई अशी मंडळी कारंज्याची शोभा पहात उभी होती. शिवरावांचे भिजलेले कपडे पाहून त्या सर्वांनाच फार आश्चर्य वाटलें. बापूसाहेबांनीं कारण विचारलें. त्यावर साबाजीचा मुलगा प्रभाकर हा नदींत आंघोळीस गेला असतां पाय निसरून पाण्यांत पडला, त्यास आपण बाहेर काढलें, इतकें सांगून ते तडक जिना चढून माडीवर गेले. चंद्रिकेला वाईट वाटण्याला हें एक जास्तच कारण झालें. प्रभाकर ह्मणजे तारेचा चुलत भाऊ. त्याचे प्राण शिवरावांनीं वांचाविलें ह्मणजे

तारेवर त्यांनीं हा एक मोठा उपकारच करून ठेविला. त्या दोघांचें अगोदरच परस्परांवर प्रेम होतें, त्या प्रेमांत ही आणखी एक भर पडली, असें वाटून चंद्रिका कष्टी झाली. पण आपलें दुःख दुसऱ्यांना दिसूं नये ह्मणून ती चटदिशीं आंत निघून गेली.

ती गेल्यानंतर आत्याबाई बापूसाहेबांना ह्मणाल्या, " खरेंच, चंद्रिकेचा व शिवरावांचा जोडा मोठा छान शोभतो. तिच्यासारखी दुसरी बायकोच त्याला मिळायची नाहीं. पण तो मनावर घेईल, तेव्हां खरें. बरें पण, बापूसाहेब, माडीवर जाऊन पहा बरें, शिवरायानें कपडे बदले कीं नाहीं तें. नाहींतर नादिष्ट पोर! इकडे तिकडे करीत ओलेताच बसायचा. थंडी झाली ह्मणजे तिकडून एक काळजी."

बापूसाहेब माडीवर जाऊन पहातात तर शिवराव कपडे बदलण्यांत अगदीं गढून गेले असून हुजऱ्याची सारखी तारांबळ उडून राहिली आहे. कपडे बदलण्याचें काम संपल्यानंतर हुजऱ्या बाहेर निघून गेला. तेव्हां बापूसाहेब खोलींत जाऊन ह्मणाले, " कां शिवराव? तुम्ही तर त्या बिचाऱ्यांची वेड्याच्या इस्पितळांतच रवानगी करणार असें दिसतें. तो किती थरथर कांपत होता! त्याची धांदल काय उडून गेली होती. आंतबाहेर करतां करतां त्याला पुरेवाट झाली. तो येथून गेला तेव्हां मोठ्या संकटांतून सुटलों असें त्याला वाटलें असेल!"

शिवराव हांसून ह्मणाले, " बापूसाहेब, तुम्हीं तर खूप मजा केलीत बोवा. त्याची तारांबळ उडाली खरी, पण मी त्याला काय करणार! एक एक कपडा आणायला किती उशीर लावीत होता तें तुह्मीं पाहिलें नाहीं! आणि मला तर एक क्षणाचाही विलंब करून उपयोग नाहीं."

बापूसाहेबः––" कां, कां बरें? आज इतकी गडबड करण्याचें कारण?"

" तुह्मांला सांगण्याचें माझ्या मनांत आहे. पण इतक्यांतच नाहीं सांगत."

" तेंही एका अर्थीं बरेंच. नकाच सांगूं. कांहीं तरी वेडेपणाची भान-

गड असेल. मला सांगितलेंत ह्मणजे मग त्या भानगडींत तुह्मी मला ओढणार. सांगत नाहीं तेंच बरें."

शिवराव हांसून बोलले, "नाहीं तरी तुह्मांला मी त्यांत ओढणारच आहें. तुमच्या मदतीशिवाय काय होणार? तुह्मी तर माझा उजवा हात. बापूसाहेब, तुमच्याशिवाय माझें कसें चालेल?" असें ह्मणून शिवरावांनीं बापूसाहेबांच्या गळ्यांत हात घालून त्यांना आपल्याजवळ ओढलें.

बापूसाहेबः—"पुरे, पुरे. शिवराव, ही तुमची लाडीगोडी माझ्या पूर्ण परिचयाची आहे. तुमच्या मनांत एखादी भलतीच गोष्ट करण्याचें आलें आणि त्या कामीं माझी मदत पाहिजे असली कीं, तुम्ही असें माझ्या गळीं पडतां; हें मला पक्कें माहीत आहे. ही तुमची लहापणापासूनची तऱ्हा आहे. पण मी आतां तुमचा पूर्वीचा लंगोटीयार राहिलों नाहीं हें खूप समजा. पूर्वींचा पोरकटपणा जाऊन मी आतां पोक्त झालों आहें. तुमच्या वेडेचारांत मी बिलकुल पडणार नाहीं, कीं तुह्मांला मदत करणार नाहीं. साफ सांगतों."

शिवराव मृदुलतेनें बोलले, "पण बापूसाहेब, यांत वेडेपणाचा कांहींही भाग नाहीं. अगदीं शहाणपणाची गोष्ट आहे. आजपर्यंत मीं इतकें समंजसपणाचें कृत्य केलें असेल कीं नसेल याची शंकाच आहे. मी मुंबईला निघालों आहें. माझी एक नाजुक कामगिरी आहे, तेवढी तुह्मी करा. एक पत्र देतों तेवढें जिकडच्या तिकडे पोंचतें करा ह्मणजे झालें."

बापूसाहेबः—"पण ही असली कामगिरी माझ्याकडे काय ह्मणून? तुमच्या वाड्यांत टोळधाडीप्रमाणें धान्याचा फडशा करणारे नोकरचाकर थोडे कां आहेत? त्यांच्याकडून ही कामगिरी करून घेण्यास कोणती हरकत आहे?"

शिवराव—"नाहीं, नाहीं! तुमच्याशिवाय भागावयाचें नाहीं. माझें पत्र ताबडतोब पोंचतें झालें पाहिजे. शिवाय ही गोष्ट षट्कर्णी होऊन उपयोगी नाहीं. तुह्मांला ठाऊक कीं मला ठाऊक."

बापूसाहेब साश्चर्य ह्मणाले, "अरे वाः! इतकी नाजुक कामगिरी

आहे, तर ती नाजुक ठिकाणचीच असली पाहिजे. मग येऊं का तुमच्या मदतीला? मला प्रणयपत्रिका चांगल्या लिहितां येतात. विशेषें करून दुसऱ्यांच्या पत्रिका मी फारच चांगल्या लिहितों."

पण त्यांच्या बोलण्याकडे शिवरावांचें लक्ष्य नव्हतें. कागद घेऊन त्यांनीं खालील मजकूर लिहिला.

"माझे प्रियतम प्रभाकर यांसः—

"या सोबत तारूच्या नांवचें एक पत्र आहे. तें तूं स्वतः तिला एकांतांत दे. मी आज मुंबईला जात आहें. उद्यां सकाळीं अकराच्या गाडीनें तुला बरोबर घेऊन मुंबईला येण्याबद्दल तिला मीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें तुम्ही उभयतां 'गिरगांव, चर्नी रस्ता घर नंबर २४' येथें यावें. मी स्टेशनावर येईन. नच आलों तर बिऱ्हाडांत तरी आहेच. आमचें रहस्य तुला माहीत आहेच. या कामीं तुझी पूर्ण मदत पाहिजे. विशेष मजकूर भेटीअंतीं. कोणास न कळवितां येणें. बहुत काय लिहिणें, लोभ असावा ही वि.

"शिवराव."

याप्रमाणें प्रभाकराच्या नांवचें पत्र लिहून झाल्यावर शिवरावांनीं दुसरा कागद घेतला आणि पत्र लिहिण्यास सुरवात केली. इतक्यांत त्याच्या मनांत कांहीं संशय उत्पन्न झाला. प्रभाकराला पत्र लिहिणें सोपें होतें. कारण विस्तवांतून तूं चालत जा, असें जरी शिवरावांनीं त्याला लिहिलें असतें तरी सुद्धां तो आगींतून चालत गेला असता. पण तारेसंबंधानें इतकी खात्री त्याना वाटत नव्हती. आपण पत्र लिहिलें आणि ती आली नाहीं तर? मग कसें करावें? हा विचार मनांत येतांच ते पत्र लिहिण्याचें टाकून उठले आणि खोलींतून इकडे तिकडे हिंडूं लागले. त्यांच्या भिंवया वक्र झाल्या व चेहऱ्यावर आनिश्चितपणाची छटा दिसूं लागली.

बापूसाहेबांनीं हा सर्व प्रकार पाहून विनोदानें म्हटलें, "शिवराव, एक पत्र लिहिलेंत तेवढें पुरे झालें. आणखी लिहिण्याच्या भरीस पडून उगीच डोक्याला त्रास कां देतां? शिवाय मला आणखी ओझें!"

शिवरावांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं. हांसत हांसत ते पुन्हां खुर्चीवर बसले आणि पत्र लिहूं लागले.

" माझे प्राणप्रिये,

" या पत्रांतील मजकूर वाचून तूं घाबरूं नकोस व आपलें मन चंचल होऊं देऊं नकोस. आपलें सौख्य तुझ्या दृढनिश्चयावर सर्वस्वीं अवलंबून आहे हें पक्कें ध्यानांत ठेव. मी आज मुंबईस जात आहें. उद्यां सकाळीं अकराच्या गाडीनें प्रभाकराला बरोबर घेऊन तूं मुंबईस ये. 'चर्नीरस्ता, घर नंबर २४' येथें मी वाट पहात बसतों. पुढें काय करावयाचें हें तूं ओळखलेंच असशील. उद्यां सायंकाळीं गोरज मुहूर्तावर आपला दोघांचा विवाह उरकून घेऊन आपल्या आयुष्यांतील सौख्यकारक प्रवासाला आपण सुरवात करूं या. तुला या गोष्टींचें भय वाटेल, तुझा निश्चय डळमळूं लागेल, हें सर्व मी ओळखून आहें. कारण तुझा स्वभावच तसा भित्रा आहे. पण आतां धैर्य धरलें पाहिजे. एकदां आपलें लग्न झालें, अक्षता पडल्या, म्हणजे मग कसलीच भीति नाहीं. सर्व कांहीं सुरळीत होऊन आनंदीआनंद होईल. मला आतां मुळींच धीर निघत नाहीं व वाट पहात बसणेंहि योग्य नाहीं. तुला संभाळून आणण्याबद्दल मीं प्रभाकराला वेगळें पत्र लिहिलें आहे. त्याच्यावर विश्वास ठेवून मनांतील सर्व भीति आणि शंका टाकून देऊन त्याजबरोबर तूं निघून ये. आपलें परस्पर प्रेम व सौख्य यांकडेच लक्ष दे. इतर गोष्टी मनांतच आणूं नकोस.

" तुझ्यावर सदैव प्रेम करणारा,

" शिवराव."

तारेचें पत्र लिहून झाल्यावर शिवरावांनीं तें एका पाकिटांत घालून पाकिट बंद केलें आणि तें पाकीट व प्रभाकराच्या नांवचें पण पत्र दुसऱ्या एका मोठ्या पाकिटांत घालून त्यावर प्रभाकराचा पत्ता लिहिला. पाकीट पुढें करून शिवराव बापूसाहेबांस ह्मणाले, " हं. हें घ्या पत्र. ताबडतोब पोंचतें करा. हीच तुमची कामगिरी."

बापूसाहेबांनीं पत्र हातांत घेऊन वरील पत्ता वाचला. त्याबरोबर ते मान हालवून ह्मणाले, "पाण्यांतून ज्या मुलाला तुह्मीं बाहेर काढलें, तो हाच मुलगा वाटतें ? पण त्याला पत्र काय ह्मणून ? आणि तें मीं कां पोंचवावें ? मी नाहीं जात. हें घ्या तुमचें पत्र ! तुह्मी जाणे आणि तुमचें पत्र जाणे !" असें ह्मणून बापूसाहेबांनीं तें पत्र शिवरावांच्या अंगावर फेंकलें.

# प्रकरण १७ वें.

## चंद्रिकेची हातचलाखी !



शिवरावांनीं तें पत्र पुनः बापूसाहेबांकडे करून आर्जवानें म्हटलें, "बापूसाहेब, एवढी कामगिरी कराच, नाहीं ह्मणूं नका. यापुढें मीं तुह्मांला, तुमची मर्जी नसेल तर, कोणतेंही काम सांगणार नाहीं; पण एवढें हें पत्र त्या मुलाकडे नेऊन द्या. साबाजीची झोपडी तुह्मांला माहीत आहेच. मुलगा अगदीं गोरा, दिसण्यांत अशक्त, केंस किंचित् कुरळे, डोकें राखलेलें. तुह्मी त्याला तेव्हांच ओळखाल."

पण बापूसाहेब गुळमुळ करूं लागले. नंतर हलक्या आवाजांत ते ह्मणाले, "शिवराव, ती मुलगी स्वभावानें फारच चांगली आहे. तिला तुह्मी नादीं लावून फशी पाडणार असें दिसतें."

शिवराव रागानें संतप्त झाले. ते ह्मणाले, "बापूसाहेब, दुसरें कोणी मला असें म्हटलें असतें, तर मीं त्याच्या श्रीमुखांत भडकाविली असती. कधीं सोडलें नसतें. तुह्मीं माझा उद्देश बरोबर समजून घेतला नाहीं. एक प्रकारें तुह्मी माझा उपमर्द करीत आहां."

शिवरावांची संतप्त मुद्रा व भयंकर डोळे पाहून ते खरोखरच रागावले आहेत, आपण या वेळीं थट्टा केली हें बरें झालें नाहीं, असें वाटून बापू-

साहेब ह्मणाले, " द्या तें पत्र इकडे. मी नेऊन पोंचतें करतों. बोलून कांहीं उपयोग होणार नाहीं हें मी समजलों; पण मी एवढें स्पष्ट सांगून ठेवतों कीं, तुह्मी करतां हें फारच वेडेपणाचें आहे. "

शिवरावः—" आणि मीही तुह्मांला सांगतों कीं, मी करतों हें अत्यंत शहाणपणाचें व दूरदर्शीपणाचें आहे. जा. हें पत्र पोंचतें करा. उद्यां मी कदाचित् तुह्मांला तार करीन. केलीच तर तुह्मी मुंबईला या. "

" ठीक आहे. जशी सरकारची आज्ञा. " असें विनोदानें बोलत बापूसाहेब तेथून निघाले.

इतक्यांत गाडी जोडून तयार आहे अशी नोकरानें वर्दी दिली. त्याबरोबर पोषाख करून शिवराव जिना उतरून खालच्या चौकांत आले. तेथें माईसाहेब उभ्या होत्या. त्यांनीं " कुठें जाणार ? " ह्मणून प्रश्न केला. मुंबईला जातों. कांहीं जरूरीचें काम आहे, लवकरच परत येईन. असें म्हणत मातुःश्रीचा निरोप घेऊन शिवराव बाहेर पडले व माईसाहेबांना काळजी वाटूं लागली. शिवराव पुष्कळ वेळां असे घरांतून निघून जात व मनास वाटेल तेव्हां परत येत; पण माईसाहेबांना विशेष काळजी वाटत नसे. मग आजच कां बरें त्यांना उद्विग्नता वाटूं लागली ? पुढें कांहीं तरी अरिष्ट येण्याचें हें चिन्ह तर नसेल ना ? कांहीं सांगतां येत नाहीं !

बापूसाहेब पोषाख करून पत्र पोंचविण्याकरितां आपल्या खोलींतून बाहेर पडलें. " शिवराव तर मुंबईला गेलेच आणि माझ्याकडे ही कामगिरी दिली. आतां थोडक्यांच वेळांत चोहोंकडून तुफान उठून गाराचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें वाड्यांतील सर्व मंडळी आपणावर गरम होतील व सर्व नाहीं तरी बराचसा दोष ते माझ्या माथीं मारतील ! पण मी त्यांना थोडाच जुमानणार आहें ! माझ्या शिवरावांची तेवढी मला काळजी. त्यांच्या इच्छेप्रमाणें मला केलें पाहिजे. पण पुढें सर्व कांहीं ठीक होईल ना ? "

ह्या प्रश्नाचा विचार करीत बापूसाहेब जिना उतरत असतां चंद्रिकेची

सुकुमार मूर्ति खालच्या बाजूस उभी असून आपल्याकडेच पहात आहे असें त्यांना दिसलें. शिवराव गाडींत बसून गेल्याचें तिनें खिडकींतून पाहिलें. तेवढ्यावरून ते इतक्या जरूरीनें मुंबईलाच गेले असले पाहिजेत असें तिनें ओळखलें. शिवरावांचें व बापूसाहेबांचें खोलींत कांहीं खलबत चाललें होतें ही बातमी तिला लागली होती. बापूसाहेबांची उतरलेली मुद्रा पाहून तर कांहीं तरी कमजास्त प्रकार खास झाला असला पाहिजे असें तिनें ताडलें; पण तिच्या चेहऱ्यावरून तिला इतकी कल्पना आली असावी असें बापूसाहेबांना वाटलें नाहीं; तथापि तिच्या दृष्टीस न पडणें बरें, नाहीं तर ती आपणास खोदून खोदून विचारून पुरे वाट करील, असें मनांत येऊन ते तसेच अर्ध्या जिन्यांतूनच परत फिरणार होते; पण चंद्रिकेनें तितक्यांत पुढें येऊन त्यांना गांठलेंच.

" बापूसाहेब, तुह्मीं इतका वेळ होतां कुठें ? केवढा वेळचे तुह्मांला तिकडे शोधताहेत; पण पत्ताच नाहीं. आपण बुद्धिबळें फार उत्तम खेळतां ह्मणे ! दिवाणखान्यांत डाव चालला आहे. कोणसें ह्मणालें, कीं बापूसाहेब आल पाहिजेत ह्मणजे खेळास रंग भरेल. चला तर मग, डाव टाकण्याची एकादी शिताफी तर पाहूं. " असें म्हणत आपल्या तीक्ष्ण नजरेनें ती बापूसाहेबांचा अजमास घेत उभी राहिली.

बापूसाहेब घोटाळ्यांत पडल्यासारखें दिसले. काय उत्तर द्यावें हें त्यांना सुचेना. शिवरावांनीं दिलेलें पत्र अद्यापि त्यांच्या खिशांत असून तें पोंचविल्याशिवाय त्यांच्या मनाला चैन नव्हतें. किंचित् विचार करून ते ह्मणाले, " बुद्धिबळांचा डाव टाकायला मला आतां वेळ नाहीं. एक पत्र पोस्टांत टाकावयाचें आहे. तें टाकून येतों अगोदर. "

समोर टांगलेल्या घड्याळाकडे पाहून चंद्रिका ह्मणाली, " येथून डाक संध्याकाळीं सात वाजतां जाते, अजून किती तरी अवकाश आहे ! एक डाव खेळून मग गेलें तर नाहीं का चालायचें ! "

बापूसाहेब गुळमुळत ह्मणाले, " चालेल तर काय झालें ! पण एक तारही करायची आहे. ह्मणून निघालों होतों. " आपण एक क्लृप्ति काढ-

लेली पचली नाहीं ह्मणून ही दुसरी क्लृप्ति काढून ती कशी काय रुचते हें पहात बापूसाहेब उभे राहिले.

पण चंद्रिका किती वस्ताद ? तिनें लागलीच म्हटलें:—

" मग त्याकरितां स्वतः हेलपाटा कशाला घालायला हवा ? एका कागदावर तार लिहून दिली म्हणजे शिपाई जाऊन करून येईल."

आपण कोणतीही सबब पुढें केली तरी अंगाशीं येते असें पाहून बापूसाहेब मनांतल्या मनांत अगदीं थिजल्यासारखे होऊन गेले. त्यांची चलविचल उडालेली पाहून चंद्रिकेनें तेव्हांच ताडलें, कीं, शिवरावांनीं त्यांजेजवळ कांहीं तरी नाजुक व महत्त्वाची कामगिरी सांगितली असावी. ह्मणून ती जास्त बारकाईनें त्यांच्याकडे पाहूं लागली. बापूसाहेबांचा स्वभाव सरळ व भोळसर होता. खाचखोच यांत कांहीं नव्हती. त्यांच्यासारखा सहज फसला जाणारा दुसरा क्वचितच असेल. त्यांची कावरीबावरी मुद्रा पाहून चंद्रिकेला हांसें येत होतें; पण बापूसाहेबांना वाटलें कीं, ही इतकी हांसत आहे त्याअर्थीं आपल्या खिशांतील पत्र तिला किंचित् दिसत असावें, ह्मणून त्यांनीं लागलीच खिशांत हात घालून तें पत्र खालीं दडपलें. कागदाचा आवाज ऐकतांच चंद्रिका मनांत ह्मणाली, " हं ! आतां आलें ध्यानांत. शिवरावांनीं पत्र दिलें असावें व तें तिला देण्याकरितां ही स्वारी तिकडे निघाली असावी." असा विचार मनांत येतांच तिच्या हृदयांत मत्सराग्नि प्रदीप्त होऊन त्याच्या ज्वाला तिच्या सर्वांगांत खेळूं लागल्या; तथापि वरोपकरणी हांसत ह्मणाली, " मग येणार ना खेळायला ? कां आणखी एखादी लोणकडी ठेवून द्यावयाचा विचार आहे ? "

आपली कांहीं मात्रा चालत नाहीं असें पाहून बापूसाहेबांनीं खेळावयास येण्याला आपली संमति दिली. त्याबरोबर, " चला तर मग-पलीकडच्या दिवाणखान्यांत मंडळी आपली सारखी वाट पहात आहेत, " असें म्हणत चंद्रिका चालूं लागली. बापूसाहेबही खिन्नमुद्रेनें तिच्या मागून चाललें. एक क्षणभरही त्यांना आपल्या दृष्टीच्या आड होऊं द्यायचें नाहीं अशी तिची जबरदस्त इच्छा होती. ह्मणून ते आपल्या मागून येत

आहेत कीं नाहींत हें समजण्याकरितां ती वरचेवर मागें वळून पहात त्यांना मंडळीकडे घेऊन गेली.

बापूसाहेबांचे अत्यंत आवडीचे खेळ म्हटलें ह्मणजे बुद्धिबळें व गंजीफा. या खेळांत ते अत्यंत तरबेज व निष्णात होते. ह्मणून ते येतांच मंडळीस अत्यानंद झाला. मांडलेला डाव भर्ररदिशीं विसकटून पुनः नवीन डाव सुरू झाला. बापूसाहेब खेळावयास बसले. बसते वेळेस त्यांनीं आपल्या खिशांत हात घालून पत्राची पुनः एकदां चापचणी केली. चंद्रिकेचें तिकडे लक्ष होतेंच.

खेळास सुरवात झाली. हा त्यांच्या आवडीचा खेळ असल्यानें बापूसाहेब खेळांत अगदीं गुंगून गेले. जोडीदारही पटाईत असल्यानें डाव रंगांत आला. तोडीस तोड चालली. मानसिक श्रम सुरू झाल्यानें बापूसाहेबांस उष्मा होऊं लागला. ह्मणून त्यांनीं अंगांतील कोट काढून खुंटीला नेऊन ठेवला व पुनः ते खेळांत रमून गेले.

चंद्रिकेची नजर त्यांच्या कोटाकडे होतीच. बापूसाहेब खेळांत गुंग झाले आहेत असें पाहून ती खुंटाळ्याजवळ गेली आणि खिडकीकडे तोंड करून बाहेर कांहीं पहात आहे असा बहाणा करून तेथें उभी राहिली. मोठ्या सावधपणानें तिनें एक हात हळूच त्या कोटाच्या खिशांत घालून त्यांतील पत्र किंचित् बाहेर काढलें व वरील पत्ता वाचून पुनः तें पत्र जेथल्या तेथें ठेवून दिलें. नंतर खिडकीजवळून निघून ती पुनः खेळ चालला होता तिकडे गेली व खेळ पाहूं लागली.

पण आतां मात्र तिचें मन अतिशय विव्हल झालें. प्रभाकराच्या नांवचें पत्र! बापूसाहेबासारख्या अगदीं जीवश्चकंठश्च माणसाच्या स्वाधीन केलेलें! शिवरावाचें एकाएकीं मुंबईला निघून जाणें, आपणास पाहून बापूसाहेबांची उडालेली तारांबळ, त्यांच्या बोलण्यांत दिसून आलेला घोंटाळा व गूढ प्रकार! हें काय गौडबंगाल आहे हें तिला समजेना. आतां अगदीं वेळ आली आहे, असें तिच्या मनानें घेतलें. ज्यामुळें शिवराव आतां आपल्या हातचे खास जाणार, आपण त्यांना कायमचे मुकणार, त्यांच्या प्राप्तीचा सर्व संभव नाहींसा होणार असें कांहीं तरी कारस्थान सुरू आहे अशी तिच्या मनाची बालंबाल खात्री होऊं लागली. तिचें

हृदय धडधडूं लागलें. पण बाह्यतः तिनें आपली आनंदी वृत्ति कायम राखिली.

इतक्यांत माईसाहेबही आंत चैन पडेना ह्मणून खेळ चालल्या ठिकाणीं आल्या व हुश्श करून एका कोचावर बसल्या. तें पाहून चंद्रिका त्यांच्याजवळ गेली व नेहमींच्या लडिवाळपणानें सुस्कारा टाकण्याचें कारण तिनें त्यांना विचारिलें. त्यावर माईसाहेब ह्मणाल्या, "कारण कसलें ? नेहमीचेंच आहे. शिवराव पुनः मुंबईला गेला ह्मणे. काय करावें बाई ! मुंबईला गेला, कीं कुठें दुसरीकडे गेला कोणास ठाऊक ! जाऊं दे. जाण्याबद्दल कांहीं नाहीं. वरचेवर जातो येतो, चाललेंच आहे. पण आज माझ्या मनाला इतकी हुरहुर कां लागली आहे कोण जाणे ! शिवरावांची व बापूसाहेबांची कांहीं तरी मसलत ठरल्यासारखी दिसते. त्याच्याकरितां ते काय पाहिजे तें करतील, भलतेंसलतें सुद्धां करायला मागें घेणार नाहींत याचीच भीति वाटते."

चंद्रिका सस्मित ह्मणाली, "मला देखील तसेंच वाटतें. पण काय प्रकार आहे हें काढून घ्यायला फारसे प्रयास पडणार नाहींत. बापूसाहेबांकडून तेव्हांच समजेल, त्यांना असेच इथें खेळांत गुंतवून आणखी थोडा वेळ ठेवावें. म्हणजे मी सर्व बित्तंबातमी काढून आणतें. त्याची नको काळजी. बापूसाहेब तसे लबाड आहेत. सहसा फसले जाणार नाहींत. पण मी देखील त्यांचें बारसें जेवलें आहें."

माईसाहेबांनीं तत्काळ रुकार दिला व त्या बापूसाहेबाजवळ जाऊन ह्मणाल्या, "बापूसाहेब, मी तुमचा खेळ पहायला आलें आहें. आजपर्यंत तुमची ख्याति ऐकत आलें पण कसें खेळतां हें प्रत्यक्ष पाहण्याची वेळ आली नव्हती, ती आज आली. शिवाय आंत अगदीं चैन पडेना. म्हटलें बाहेर मंडळी आहेत, कांहीं तरी करमणूक होईल आणि तितका वेळ जाईल. ह्मणून आलें."

अर्थातच बापूसाहेबांना खेळण्यास जास्तच हुरूप आला व ते मांडी ठोकून खेळांत चांगलेच रममाण झाले. खिशांतील पत्राची त्यांना पूर्ण विस्मृति झाली.

बापूसाहेबांचें सर्व लक्ष पुनः खेळण्यांत निमग्न झालें असें पाहून चंद्रिका खिडकीजवळ जाऊन उभी राहिली व पूर्वींप्रमाणेंच बाहेर पहात असल्याचा आविर्भाव दाखवून हळूच कोटाच्या खिशांतील पत्र तिनें बाहेर काढलें व तें पदराखालून आपल्या पोलक्याच्या खिशांत घालून ती चट्दिशीं आपल्या खोलींत गेली; दार बंद करून तिनें आंतून कडी लावून घेतली. नंतर खिशांतील पत्र तिनें बाहेर काढलें व जसा एखादा चोर, चोरून आणलेल्या पेटीकडे त्या पेटींत आपणास हवें असलेलें द्रव्य व दागदागीने सांपडतील ह्मणून उत्कंठित मुद्रेनें पहातो त्याप्रमाणें ती त्या पत्राकडे पाहूं लागली. त्या पाकिटाचा डिंकानें चिकटविलेला भाग पाण्यानें ओला करून तिनें तें पाकीट उघडलें व आंतील दुसरेंहि पत्र बाहेर काढून ती वाचूं लागली. पत्र वाचीत असतां तिचा चेहरा उतरला, डोळे निस्तेज झाले व कंठ सद्गदित झाला. त्या पत्रांतील प्रेमाचा प्रत्येक शब्द तिच्या अंतःकरणापर्यंत जाऊन झोंबला व तिला दुःखाचे उमाळे येऊं लागले.

ती स्वतःशीं पुटपुटली, " माझे प्राणप्रिये, माझे लाडके ! खरेंच, तिच्यावर ह्यांचें केवढें प्रेम आहे ! पण तें कांहीं नाहीं. ही गोष्ट कधींहि मी होऊं देणार नाहीं. मग काय पाहिजे तें होवो. ह्या मुलीशीं शिवरावांचें लग्न कध्धीं कध्धीं होणार नाहीं, ही काळ्या दगडावरील रेघ ! पण हें घडावें कसें ? ह्यांचें ठरलेलें लग्न कोण व कसें मोडणार ? " ह्या प्रश्नाचा ती विचार करूं लागली. तिचें मनन सुरू झालें. इतक्यांत तिला शामरावांची आठवण झाली. त्याबरोबर ती टाळी पिटून ह्मणाली, " समुद्रांत तुफान झालें असतां कोणतेंही बंदर असलें तरी चालतें. पाण्यांत बुडणारा मनुष्य लव्हाळ्याला सुद्धां बिलगतो. मग शामरावासारख्यांचा किती तरी उपयोग होईल. ठरलें, असेंच करायचें. " असें ह्मणून तिनें तें पत्र पुनः पाकिटांत घालून दोन्ही पाकिटें पूर्ववत् बंद केलीं. नंतर दऊतलेखणी घेऊन " आज रात्रीं आठ वाजतां घरणावर भेटा " असा मजकूर एका कागदावर लिहून तो कागद दुसऱ्या पाकिटांत घातला व त्यावर " शामराव वकील यांना देणें " असें लिहिलें. मग तीं दोन्ही पाकिटें खिशांत घालून ती बुद्धिबळांचा खेळ चालला होता त्या ठिकाणीं आली. खेळ

अद्यापि सुरू असून बापूसाहेब पूर्णपणें गढून गेले होतेच. चंद्रिकेनें पुनः खिडकीजवळ जाऊन पत्र जागच्याजागीं ठेविलें व थोडक्याच वेळांत तिनें तें एक ओळीचें पत्र शामरावाकडे रवाना केलें.

---

## प्रकरण १८ वें.

### प्रभाकराचें तारेशीं खलबत.

बापूसाहेब पत्र घेऊन साबाजीच्या झोंपडीकडे आले व प्रभाकराचा तपास करूं लागले. इतक्यांत प्रभाकर बाहेर येऊन ह्मणाला, "काय काम आहे ? माझेंच नांव प्रभाकर."

बापूसाहेब चोहोंकडे सावधगिरीनें पहात ह्मणाले, "तुला एक पत्र द्यायचें आहे."

त्याबरोबर प्रभाकराच्या पोटांत धस्स झालें. तो आश्चर्यानें ह्मणाला, "मला पत्र ?" त्याची मुद्रा उद्विग्न दिसूं लागली.

बापूसाहेबांना नवल वाटलें. ते ह्मणाले, "कां बरें ? तुला एवढी भीति कशाची वाटली ? माझे मित्र सरदार शिवराव यांनीं तुला एक पत्र दिलें आहे." असें ह्मणून बापूसाहेब खिशांतून पत्र काढूं लागले.

शिवरावांचें पत्र असें समजतांच प्रभाकराची मुद्रा पुनः पालटली व आतां तिजवर आनंदाची छटा दिसूं लागली. पत्र घेण्याकरितां त्यानें लागलींच आपला हात पुढें केला.

बापूसाहेबांनीं खिशांतून पत्र काढलें व उलटेंसुलटें करून पहात ते ह्मणाले, "पत्र जरा चुरमुडलें आहे. यापूर्वीच आणून द्यायला पाहिजे होतें; पण बुद्धिबळें खेळण्यांत गुंतलों ह्मणून उशीर झाला."

असें ह्मणून त्यांनीं तें पत्र प्रभाकराकडे दिलें व ते परत जाण्याकरितां निघाले. प्रभाकरानें त्यांना घरीं येऊन चहा घ्या, बाबांची गांठ पडेल, तारूचीही भेट होईल, ह्मणून आग्रह केला. पण बापूसाहेब ह्मणाले:— "मी आतां येत नाहीं. जातों. कांहीं जरूरीचें काम आहे, सबब वेळ नाहीं. पण तारूला सांग—" तारूचें नांव निघतांच बापूसाहेब जरा घोंटाळ्यांत पडले व हातांतील छत्री उघडून आंतील छाप कोणता आहे हें पहात क्षणमात्र उभे राहिले. नंतर ते ह्मणाले, " हं, हें पहा. तुला किंवा तारूला कांहीं मदत लागेल, कांहीं पाहिजे असेल, तर मला येऊन भेट. मी वाड्यांतच असतों. मला बापूसाहेब ह्मणतात, समजलें ? "

" ठीक आहे. " असें ह्मणून प्रभाकरानें त्यांच्याकडे कृतज्ञतापूर्ण दृष्टीनें पाहिलें. बापूसाहेब झोंपडीकडे नजर टाकीत तेथून परतले.

प्रभाकरानें पाकीट फोडून आंतील लहानसेंच पण अर्थप्रचुर पत्र वाचलें. त्याला अतिशय आनंद झाला. पत्र घेऊन तो तारेकडे जाण्याकरितां निघाला.

तारा हातांत विणकाम घेऊन बसली होती; पण तिचें चित्त आदलें दिवशीं घडलेल्या गोष्टींनीं व्यग्र झालें होतें. जवळच साबाजी आपलीं चित्रें रंगविण्यांत गुंग झाला होता. प्रभाकराला पाहून तारा कांहीं बोलणार तोंच प्रभाकरानें नाकावर एक बोट ठेवून चूप राहण्यास तिला खूण केली. नंतर नेत्रसंकेत करून त्यानें तिला बाहेर येण्यास खुणविलें. त्याबरोबर ती उठली. तीं बहीण-भावंडें बाहेर येऊन एका जाईच्या वेलाच्या जाळीआड गेलीं. यापैकीं साबाजीच्या लक्षांत कांहींच आलें नाहीं.

एकीकडे गेल्यावर तारा आश्चर्यानें ह्मणाली, " भाऊ, तुझ्या ह्या गुपचूपणाचा अर्थ काय ? "

" ताई, मी तुला एक गंमत देणार आहें. पण त्याबद्दल मला काय देशील, बोल. गंमत मोठी मजेची आहे. मला दुसरें तिसरें कांहीं नको. तूं एकदां हांस ह्मणजे झालें. तूं आज माझ्यावर रागावलेली दिसतेस."

तारा हांसत ह्मणाली, " एवढेंच का ? मग गंमत करूली आहे ? कांहीं तरी देऊन मला फसवायचें असेल झालें. "

" नाहीं, नाहीं. खरोखरच गंमत आहे. ही बघ." असें ह्मणून त्यानें खिशांतून पत्र काढून तिच्याजवळ दिलें. तारा तें पत्र वाचूं लागली.

तिनें तें पत्र सबंध वाचलें. पण मग मात्र तिचें मन अस्वस्थ झालें. तिचा चेहरा उतरला व डोळे चमत्कारिक दिसूं लागले. पत्र तसेंच हातांत घेऊन ती किती तरी वेळ त्याजकडे पहात राहिली.

प्रभाकरानें विचारिलें, " ताई, मग कसें काय ? "

ती सुस्कारा टाकून ह्मणाली, " छे, छे ! भाऊ, मला नाहीं तसें करतां येणार. खरेंच सांगतें. "

" पण मी ह्मणतों, कीं त्यांनीं लिहिल्याप्रमाणें करावें हें बरें. तुला कशाची भीति वाटते ? मी आहें तुझ्याबरोबर. तूं भिऊं नकोस. "

" तसें नव्हे. शिवरावांची मला भीति वाटते, असें का तुझें ह्मणणें ? छत् खुळा कुठला ? "

" नाहीं ग. मीं तरी तसें कधीं म्हटलें ? शिवरावांबद्दल मला पूर्ण भरंवसा आहे. ह्मणून ह्मणतों, कीं, त्यांनीं लिहिल्याप्रमाणें वागावें हें बरें. शिवराव तुला कधीं वाईट सांगणार नाहींत अशी माझी खात्री आहे. "

तारेचे डोळे विलक्षण तेजानें चमकूं लागले. ज्या पुरुषावर तिचें प्रेम होतें त्या पुरुषाची इतकी वाखाणणी—तरफदारी—प्रभाकर करीत असल्याचें पाहून तिचें अंतःकरण गुप्त आनंदानें स्फुरण पावूं लागलें. प्रभाकर पुढें ह्मणाला, " शिवाय, ताई, असें करण्यांत तुझें स्वतःचें—आह्मां सर्वांचेंच कल्याण होणार आहे. मग तूं कां गुळमुळतेस ? विचार कर. नीट विचार करून पहा. तूं ह्या चंद्रगडाच्या जहागिरीची मालकीण होशील. आमच्या बाबांना केवढा तरी आनंद होईल ! तूं मुळीं देखील भिऊं नकोस. एकदां अक्षता पडल्या, कीं, मग तुला कुणाची भीति नाहीं. "

" नाहीं तरी मला कुणाची भीति आहे ? "

प्रभाकर गुळमुळला. लागलीच त्याचा चेहरा संतप्त झाला. तो कठोर

आवाजानें बोलला, " तो आहे ना चांडाळ, शामराव वकील ? त्याला पाहिलें, नव्हे नुसती त्याची आठवण झाली, कीं माझें पित्त खवळतें, आणि पायाची आग मस्तकाला जाते. त्यांतून तुझ्याबरोबर लग्न करून घेण्याची त्याची खटपट सुरू आहे. ह्मणून तर मला त्याचा जास्तच राग येतो. "

तारा हळूच ह्मणाली, "मला देखील ते दृष्टीसमोर नकोत; तथापि मला त्यांची मुळींच भीति वाटत नाहीं. शिवरावांबरोबर माझें लग्न नाहीं झालें तरी सुद्धां त्यांच्यापासून मला भय नाहीं. "

" पण मला नाहीं तसें वाटत. एकदां लग्न लागलें, कीं मग मात्र भीति नाहीं खरी; कारण, ते तुझा नादच सोडून देतील. ह्मणून ह्मणतों कीं, शिवरावांच्या लिहिण्याप्रमाणें वाग. तूं गेल्यानें त्यांना किती आनंद वाटेल याचा विचार कर. नाहीं ह्मणूं नकोस. मग ठरलें ना ? "

आतां तारेला नाहीं ह्मणवेना. तिनें आपला रुकार दिला. तारेचा रुकार मिळतांच प्रभाकर ह्मणाला, " आतां पुढच्या तयारीला लागूं या. सामानसुमान बरोबर कांहीं घ्यायचें नाहीं. समजलें ? तूं एक लहानसें बोचकें घे. मी माझें तें छोटें पाकीट घेतों, ह्मणजे झालें. सकाळीं लवकर उठून तीं दोन्ही नेऊन बाहेर एका झुडुपाखालीं लपवून ठेवूं या. कारण, उद्यां सकाळीं तीं बोचकीं घेऊन आह्मी निघालों, कीं घरांतील बाईंना समजेल. मग त्यांनीं गांवभर डांगोरा पिटलाच समज. ह्या बाई ह्मणजे स्टेशनावरील घांटच आहेत. त्यांच्या तोंडांत कांहीं रहावयाचें नाहीं. ह्मणून ह्मणतों असें करूं या. सकाळीं लवकर जेवण होतेंच. जेवण झालें कीं घाटावर जाण्याचें मिष करून घरांतून बाहेर पडूं. पण तूं अशी घाबरूं नकोस." हे शेवटचे शब्द प्रभाकर तारेकडे पाहून ह्मणाला. कारण तिचा निश्चय डळमळूं पहात आहे असें त्याला वाटलें. " ताई, तूं माझ्यावर विश्वास टाकून स्वस्थ रहा. मी सर्व कांहीं व्यवस्था शिवरावांनीं लिहिल्याप्रमाणें करतों. तूं बिलकुल काळजी करूं नकोस."

तारा कांहीं वेळ विचारमग्न झाली. ज्या म्हाताऱ्यानें—साबाजीनें—संकट समयीं आपल्याला जवळ ठेवून घेतलें. प्रेम करून पोटच्या मुली-

प्रमाणें वागविलें, त्या म्हाताऱ्याला—आपल्या चुलत्याला—आपण आतां फसवून जाणार, हा उद्वेगजनक विचार मनांत येऊन ती फार कष्टी झाली. तिला कसेंसेंच वाटूं लागलें. प्रभाकराबरोबर जास्त न बोलतां ती घरांत निघून गेली.

अंधार पडत चालला होता. तरी साबाजी अद्यापि आपल्या चित्रांतच गुंग होता. त्याजकडे जाऊन तारा लडिवाळपणानें ह्मणाली, " काका, आतां चित्रें काढण्याचें पुरे करा. या, आपण बाहेर बागेंत जाऊन नदी-कांठचा सुंदर देखावा पहात बसूं. मी प्रथम येथें आलें त्या दिवशीं तुम्ही कसे सूर्यबिंबाकडे पहाण्यांत तल्लीन होऊन गेलां होतां ! आठवण आहे ना ! मी तुमच्याजवळ किती वेळ उभी राहिलें तरी तुम्हांला समजलें सुद्धां नाहीं. "

साबाजीनें लागलीच एक विडी पेटविली व धुराचे लोट सोडीत तो बागेंत आला आणि एका आराम खुर्चीवर पडून म्हणाला, " होय, बरें बाळ, मला त्या दिवसाची चांगली आठवण आहे. मी कधीं विसरणार नाहीं. तो दिवस मला मोठ्या सुखाचा वाटला. त्या दिवसापासून तुझ्या सहवासांत माझे दिवस फारच आनंदाचे व मजेचे गेले. तारू, तूं आतां माझ्याजवळून गेलीस तर मला फार वाईट वाटेल, बिलकुल चैन पडणार नाहीं. पण तुझ्याबरोबर प्रभाकर दिसत नाहीं तो ? "

" काका, भाऊ रस्त्यावर उभा आहे. त्याला हांक मारूं कां ? बोलाव-ल्याबरोबर आतां येईल. "

" येईल, खरेंच. तो आतां चांगला निवळला आहे. बाळे, हा तुझ्या सत्संगतीचा परिणाम बरें. मी तें पुरें ओळखून आहें. "

यावर तारा काय बोलणार ? तिचें हृदय जलद उडूं लागलें. तिच्या सत्संगतीचा परिणाम ! ती तर या वेळीं केवळ स्वतःकारितां त्या म्हाताऱ्या-ला—त्याच्या प्रत्यक्ष बापाला फसविण्याच्या कामीं त्याला मदत करणार होती ! हीच का आपली सत्संगति ! हा दुःखदायक विचार तिच्या मनाला वेदना देऊं लागला. ती पुटपुटलीः—" काका, तुमचें प्रेम जसें

माझ्यावर आहे तसेंच माझेंही तुमच्यावर आहे. ही गोष्ट पक्की लक्ष्यांत ठेवा. मग काय पाहिजे तें होवो. ”

कांहींही किंतु अगर संशय मनांत न येतां साबाजी मान हालवून हांसत ह्मणाला, “ काय पाहिजे तें ह्मणजे काय होणार आहे. ” असें विचारीत असतां त्याची दृष्टि शून्य व विचाररहित झाली. ताराही त्याच्या चेहऱ्याकडे पहात स्तब्ध झाली.

---

# प्रकरण १९ वें.

—:o:—

## शामरावांची करामत.

चंद्रिकेच्या सूचनेप्रमाणें नेमलेल्या वेळीं व स्थळीं शामराव बिनचूक येऊन दाखल झाले. तिकडून चंद्रिकाही आली. दोघांची दृष्टादृष्ट झाली. पण दोघेंही बोलेनात. चंद्रिकेचा स्वभाव मानी असल्यामुळें आपण प्रथम बोलणें सुरू करावें हें तिला योग्य वाटलें नाहीं. उलटपक्षीं शामरावाच्या मनांत चंद्रिकेनें निरोप पाठविला म्हणून आपण येथें आलों, तर तिनेंच प्रथम बोलावें असें असल्यामुळें तेही स्वस्थ उभे राहिले. शेवटीं चंद्रिकेनेंच पडती बाजू घेतली.

“ माझें पत्र पोंचलें ना ? ” तिनें विचारलें.

“ होय. ह्मणून तर मी आलों.” शामराव सस्मित बोलले.

चंद्रिका थोडा वेळ थांबून तिरस्कारयुक्त स्वरानें ह्मणाली, “तुह्मांला बोलावण्याचें कारण, मला एक बातमी समजली आहे, ती महत्त्वाची आहे असें

मला वाटतें. तुह्मांला कळविली तर तुमचा त्या कामीं कांहीं उपयोग होईल, ह्मणून बोलावलें. ”

शामरावांनीं नुसती मान हालविली. आपणास मुद्दाम रात्रीच्या वेळीं येथें बोलावण्याचें पुरतें कारण ती सांगू दे. मग आपणांस काय बोलावयाचें तें बोलूं, असा त्यांचा बेत होता. ह्मणून ते नुसते तिच्या तोंडाकडे पहात राहिले.

चंद्रिका पुढें ह्मणाली, “गेल्या खेपेस तुमची माझी गांठ पडली त्यावेळीं तुह्मी जे शब्द बोललां ते माझ्या चांगले ध्यानांत आहेत. कांहीं एक गोष्ट घडून न यावी ह्मणून शक्य ती खटपट करण्यास मी राजी आहें नव्हे, अगदीं तयार आहें असें तुह्मी ह्मणालां होतां, नव्हे ? ”

“ तारेच्या व शिवरावांच्या लग्नासंबंधानें तुह्मी बोलत असाल तर माझी आहे तयारी हरप्रयत्न करून तें लग्न होऊं द्यावयाचें नाहीं असा माझा कृतनिश्चय झाला आहे. ”

चंद्रिकाः—“ ज्या कुमारिकेची तुह्मांला इतकी काळजी आहे असें तुह्मी दाखवितां त्या कुमारिकेसंबंधानें—तारेसंबंधानें—एक बातमी मला समजली आहे ती तुह्मांला कळवावी ह्मणून मीं आज तुह्मांला इथें बोलावून आणलें. ”

तारा आपलें प्रियपात्र ! तिच्यासंबंधानें चंद्रिकेनें असें एकेरी बोलावें हें शामरावास आवडलें नाहीं. त्यांनीं म्हटलें, “ तिला सर्व लोक ताराबाई ह्मणतात. ”

चंद्रिका कपाळास आंठ्या घालून ह्मणाली, “ह्मणत असतील. त्याच्याशीं मला काय करायचें आहे. तुह्मीही तिला ताराबाई नाहीं तर वाटल्यास ताराबाईसाहेब म्हणा पाहिजे तर, पण मी तिला ताराच म्हणणार. समजलें ? ह्या ठिकाणीं आपणांला परवां जें जोडपें दिसलें त्या जोडप्याचें लग्न होऊं द्यायचें नाहीं, अशी तुमची इच्छा आहे व हा हेतु सिद्धीस नेण्याइतकें सामर्थ्यही तुमच्या अंगांत आहे, असें तुम्ही म्हणत होतां. होय कीं नाहीं ? तशी शक्ति, तसें सामर्थ्य, तुमच्या अंगांत खरोखर आहे

कीं नाहीं ह्याची परीक्षा पहाण्याची संधिही आली आहे. कारण शिवरावांच्या मनांत उद्यां अगर परवां तिच्याशीं लग्न करून घ्यावयाचें आहे."

" हें तुम्हांला कसें समजलें ? "

" मला समजण्याचें कारण त्यांनीं तिला एक पत्र पाठविलें, त्यांत तिनें कोठें यावें, केव्हां यावें, गुप्तपणानें लग्न कसें उरकून घ्यायचें वगैरे मजकूर लिहिलेला होता. "

" असेल. पण पत्र लिहिल्याचें तुम्हांला काय माहीत ? "

" काय माहीत म्हणजे ! मीं तें पत्रच पाहिलें मुळीं. " ती तिरस्कारपूर्वक म्हणाली.

शामरावः—" अरे वाः ! पत्रांत कशी कशी व्यवस्था लिहिली होती ? तिनें केव्हां, कुठें भेटावें म्हणून लिहिलें होतें. ? "

" उद्यां सकाळीं अकराच्या गाडीनें निघून तिनें मुंबईस चर्नी रस्ता घर नंबर २४ येथें यावें, आपण तेथें येऊन भेटूं , असा मजकूर शिवरावांनीं लिहिला होता. तिचा चुलतभाऊ प्रभाकर हाही तिच्याबरोबर जायचा आहे. "

" हुंः, त्या सर्पाच्या पिल्लाचा मी केव्हांच फडशा उडवून देईन." असें शामराव स्वतःशीं पुटपुटले. नंतर ते म्हणाले, " बरें, पुढें ? "

चंद्रिकेनें कपाळाला आंठ्या घालून तिरस्कार दर्शविला व धरणावरून धोधो आवाज करीत खालीं उडी घालून घेणाऱ्या जलसमूहाकडे पाहात ती म्हणाली, " मला नाहीं माहीत पुढें काय तें ? पण तो मुलगा बरोबर जाणार आहे; तेव्हां त्याच्याकडून वाङ्निश्चय करून लग्न लावून घेण्याचा त्यांचा बेत दिसतो. पण शिवरावांचा स्वभाव तुम्हांला माहीत आहेच. ते तिच्याशीं लग्न करतील. पण पुढें ते त्या बिचारीला फसवितील आणि दुसरीच कोणी तरी या जहागिरीची मालकीण होऊन बसेल."

शामरावः—" तर मग हें लग्न मोडून टाकलेंच पाहिजे व सुशील तारेची अब्रू राखून तिचें कल्याण केलें पाहिजे. आतां सुद्धां अगदीं ऐन घटकेला मी हें लग्न मोडीन, पण तुह्मी ही गोष्ट कोणाजवळ बोलणार नाहीं असें मला वचन द्या. तुह्मी कोणाजवळ बोलणार नाहीं, याची मला

खात्री आहे. कारण दुसऱ्याचीं पत्रें फोडून वाचण्याची करामत आपल्या अंगांत आहे ही गोष्ट सांगतांना तुह्मी मघांशीं किती गुळमुळला, तुह्मांला किती कठिण वाटलें तें मीं पाहिलें. ”

चंद्रिकाः--“ मी देतें वचन. पण तुह्मी हें लग्न कसें मोडणार तें सांगा मला अगोदर. ज्या मनुष्याच्या विरुद्ध तुह्मी खटपट करणार त्या मनुष्याच्या सामर्थ्याची तुह्मांला कल्पना नाहीं. त्यांच्यापासून फार जपून असलें पाहिजे. शिवराव ह्मणजे लहानसहान मनुष्य नव्हे, त्यांची चेष्टा करायला. ”

शामराव खोंचून बोललेः—“ शाबास ! तुह्मीं मला सूचना केली, मला बजाविलें हे मोठे उपकारच झाले ह्मणायचे. मी जाऊन शिवरावांच्या पाया पडेन, त्यांच्या चरणारविंदीं मिलिंदायमान होईन, असेंच तुह्मांला वाटत असेल नाहीं ? मला कांहीं अशा सूचना करण्याचें कारण नाहीं, समजलें ? मला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं; तिच्याशीं आहे. माझें मी पाहून घेईन.”

चंद्रिकाः—“ ठीक आहे. जातें तर मी. माझें आतां कांहीं काम दिसत नाहीं.” असें ह्मणून ती उठली.

शामराव उत्कंठेनें म्हणाले, “ थांबा, थांबा. तुम्ही कोणती कामगिरी बजवावयाची हें ठरवूं या. माझ्यापेक्षां तुमचेंच कल्याण यांत जास्त होणार आहे. तारेवर माझें जें प्रेम आहे, त्या प्रेमासाठींच फक्त मी या भानगडींत पडणार ! पण तुमची गोष्ट निराळी. प्रेम, संपत्ति, ऐश्वर्य, मानमरातब, अधिकार, कीं जेणेंकरून तुमच्यासारखें जिणें जीवनार्ह होईल अशा सर्वांकारितां तुह्मी यांत पडणार ! ”

चंद्रिकाः—“ ही तुमची भाषा मनाला लागणारी आहे. ”

“ असेल. पण मी स्पष्ट बोललों. प्रथम रोखठोक असावें म्हणजे मागून जिकीर उत्पन्न होत नाहीं. आधीं कडू मग गोड असा माझा स्वभाव आहे. पण यापुढें तुमच्या माझ्यामध्यें लपवालपवी अगर प्रतारणा बिलकुल राहणार नाहीं. शिवरावांच्या पत्राप्रमाणें बहुशः तीं दोघें उद्यां सकाळीं अकराच्या गाडीनें निघतील व बोरीबंदर स्टेशनवर ते यांची वाट

पहात राहतील. तीं दोघें अकराच्या गाडीनें निघालीं तरी हरकत नाहीं. पण बोरीबंदर स्टेशनावर त्यांनीं न उतरतां दुसऱ्या कोणत्या तरी स्टेशनावर उतरावें, अशी कांहीं तरी व्यवस्था झाली पाहिजे व ती व्यवस्था करणेंहि फारसें अवघड नाहीं. फक्त एक बनावट पत्र लिहिलें म्हणजे झालें. " शामराव म्हणाले.

चंद्रिका साश्चर्य ह्मणाली, " बनावट पत्र ? तें कशाला ? "

शामरावः—" होय. बनावट पत्र तयार केलें पाहिजे. शिवरावांनीं त्यांना पत्र लिहून केव्हां निघावयाचें, कुठें जावयाचें वगैरे सर्व बेतबात जर ठरविला आहे, तर तो बेत फिरवावयाचा झाल्यास पुन्हां शिवरावांचेंच पत्र पाहिजे. तुह्मी बोरीबंदर स्टेशनवर उतरण्याचें करूं नये. कारण पूर्वींचा बेत फिरला. आतां मसजीद स्टेशनावर उतरावें. तेथें एक मेण्याची गाडी उभी राहील. त्या गाडींतून चर्नीरस्त्यावरील बिऱ्हाडांत यावें. अशा मजकुराचें तें पत्र असलें पाहिजे. समजलें ? "

चंद्रिका जरा त्रासून ह्मणाली, " समजलें, सगळें समजलें. पण असलें पत्र कोण तयार करणार ?

शामराव तत्परतेनें म्हणाले, " तुमच्याखेरीज दुसऱ्याच्या हातून हें काम होण्याजोगें नाहीं. अक्षरासारखें अक्षर काढण्याच्या कामांत तुह्मी फार प्रवीण आहांत. शिवरावांचें हस्ताक्षर तुमच्या चांगल्या माहितीचें आहे. शिवाय त्यांच्या खोलींत त्यांच्या नांवचे कागद, पाकिटें आहेत. तींहि तुह्मांला मिळण्यास अडचण पडणार नाहींत. शाईहि तेथलीच घेऊन वाड्यांतील एखाद्या पट्टेवाल्याकडून पत्र पाठवून द्यावें म्हणजे झालें. "

चंद्रिका टकमका त्यांच्या तोंडाकडे पहात स्तब्ध राहिली. शामरावांचें कल्पना चातुर्य पाहून ती आश्चर्यानें अगदीं थक्क झाली. त्यांची कल्पकता व योजनाशक्ति यांची ती तारीफ करूं लागली. शामराव खरोखरच दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारे अगर दुसऱ्याच्या ताब्यांत राहणारे गृहस्थ नाहींत, त्यांच्या अंगांत कांहीं तरी करामत आहे, असें आतां तिला वाटूं लागलें.

आपण जुळविलेले बेतबात तिच्या डोक्यांत पूर्णपणें बिंबले असें पाहून

शामराव आणखी ह्मणाले, "समजलें? त्या नोकरानें तें पत्र अगदीं आयत्या वेळेस, गाडी स्टेशनावरून सुटण्याच्या सुमारास त्यांच्या डब्याजवळ पळत पळत जाऊन पोंचवावें अशी त्याला ताकीद देऊन ठेविली म्हणजे झालें. ही कामगिरी तुह्मीं अमलांत आणलीच पाहिजे."

"मी असें कांहीं करणार नाहीं. साफ सांगतें." तिनें उत्तर दिलें.

शामरावः—"ठीक आहे. तसें करा. मला आतां कांहीं तरी दुसरी युक्ति काढली पाहिजे. तारा शिवरावांची बायको होणार नाहीं हें जसें ठरलें आहे तसेंच प्रधानांची चंद्रिका म्हणविणारीही त्यांची बायको होणार नाहीं हें अगदीं खास समजा. उद्यां संध्याकाळीं त्यांचा सर्व बेत फसला जाऊन तो अगदीं रंजिस होत्साता त्याच्या डोळ्यादेखत तारेला मी घेऊन जात असतांना पाहील. तेव्हां त्याला अतोनात दुःख व त्रास होईल. अशा वेळीं त्याच्या मनाला किंचित् समाधान वाटावें ह्मणून ही तुमची चिठी मी त्यांच्याकडे देईन म्हणजे आपला भाग आपल्यापासून हिरावून नेण्याच्या कामीं तुमचें कितपत अंग आहे हें त्याला समजून येईल."

"इतकें धाडस तुमच्या हातून होणार नाहीं."

"धाडस? यांत कसलें आलें आहे धाडस! अहो बाईसाहेब, तुह्मी ज्या गृहस्थांशीं बोलत आहां त्या मनुष्याचा स्वभाव न ओळखतां वागाल तर माझ्याकडे कांहीं दोष नाहीं. तुह्मी माझ्याशीं कृतज्ञ राहून कोणतें-हि कृत्य कराल तर मी तुमच्या उपयोगी पडेन. तुह्मी मला सोडलेंत, माझ्याशीं प्रतारणा आरंभलीत तर मींही तुमच्या कामांत नाहीं नाहीं ते व्यत्यय आणून तुमचे सर्व बेत हाणून पाडीन. हं, सांगा आतां. कसें करणार तें. माझ्या ह्मणण्याप्रमाणें पत्र लिहून पाठविणार कीं नाहीं?"

"एवढेंच कीं आणखी कांहीं आहे?"

"बस् एवढेंच. यांत तुमचेंही कल्याण कसें होणार आहे तें पहा. शिवराव आपला सर्व बेत फसला असें पाहून अगदीं खिन्न व निराश होऊन घरीं परत येतील. तेव्हां त्यांच्या मनाला कांहीं तरी समाधान वाटण्यासारखें केलें पाहिजे. तुह्मी त्यांच्या मनाचें सांत्वन करा म्हणजे झालें. थोडक्याच दिवसांत त्यांच्यावर तुह्मी आपली पूर्ण छाप बसवाल,

कुत्र्याप्रमाणें तुमच्या मागें मागें त्याला तुह्मी हिंडवायला लावाल, याची मला अगदीं खात्री आहे. तुमची करामतच तशी आहे. मी उगीच नाहीं वाखाणणी करीत."

"इतकेंच, कीं आणखी कांहीं सांगायचें आहे!"

शामरावः—"इतकेंच. आतां जास्त सांगायचें राहिलें नाहीं. आतां तुमच्यावरच माझा सर्व भरंवसा आहे. आमचे उभयतांचे हितसंबंध एकच असून ते एकमेकांशीं बद्ध झालेले आहेत. चंद्रिकाबाई, आतां पुनः तुमची आमची गांठ पडेल त्या वेळीं आपण अगदीं अपरिचितपणानें-एकमेकांशीं कोणाची ओळख देखील नाहीं असें वागूं. गत गोष्टीची आठवण आमच्या मनांतून पार धुवून टाकूं या. आपलें सर्व जीवित थोडक्याच काळांत पूर्णपणें बदलून जाणार. चित्रकार साबाजीची पुतणी तारा इचा मी स्वयंवर पति होईन आणि तुह्मी सरदार शिवराव यांच्या राणीसाहेब-चंद्रगड जहागीरीच्या मालकीणबाई व्हाल. मी निरर्थक विधान कधींच करीत नसतों. तरी पण आतां मी जसें अगदीं खात्रीपूर्वक छातीस हात लावून सांगत आहे तितक्या खात्रीनें मी पूर्वीं कधीं कांहीं सांगितलें नसेल. येतों आतां." असें ह्मणून ते तिचा निरोप घेऊन निघालें. तिनें कांहींच प्रत्युत्तर त्यांना दिलें नाहीं. ते गेल्यानंतर तीहि हळू हळू पावलें टाकीत झाडांच्या सावलींत दिसेनाशी झाली.

# प्रकरण २० वें.

—:o:—

## फसवणूक.

त्या रात्रीं तारेला बिलकुल झोंप लागली नाहीं. तो महत्वाचा उद्यांचा दिवस तिच्या डोळ्यासमोर दिसूं लागला. एकदां तिला भीति—कसली कोणास ठाऊक वाटावी. एकदां तितक्याच अवर्णनीय आनंदानें तिचें सर्वांग भरून जावें अशा स्थितींतच तिची ती रात्र गेली. मोठ्या पहाटे प्रभाकर जागा झाला व तिला हळूच "जागी झालीस काय?" ह्मणून त्यानें विचारिलें. त्याबरोबर, "मी केव्हांची जागी आहें! ही पहा उठलें." असें ह्मणून तारा चट्दिशीं उठून उभी राहिली. नंतर प्रभाकरानें आपलें पाकीट व तारेचें बोचकें त्या अंधारांत बाहेर जाऊन एका झाडाखालीं ठेवलें. सकाळ झाली. साबाजी उठून आपलीं चित्रें काढण्याच्या कामांत गुंतला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहतांच तारेच्या डोळ्यांत अश्रु आले. आज शिवरावाबरोबर तिचें लग्न होण्याचें ठरलें होतें. वास्तविक पहातां साबाजीच्या हातूनच तिचें कन्यादान होऊन अखेर त्याच्याकडून "अष्टपुत्रासौभाग्यवती भव" असा खऱ्या प्रेमाचा व कळकळीचा आशीर्वाद तिला मिळावयास पाहिजे होता. परंतु असा प्रकार होण्याऐवजीं त्याला न कळवितां, कांहीं समजूं न देतां, चोरून निघून जाण्याचा प्रसंग यावा अं! तिच्या सौख्यांतील हें एक व्यंगच होतें. हा एक कमीपणा तिला दिसला व याबद्दलच तिला वाईट वाटूं लागलें.

सकाळीं दहा वाजतां सगळ्यांचीं जेवणें झालीं. जेवतांना कोणीच

कांहीं बोललें नाहीं. म्हातारबाबा नेहमींप्रमाणें आपल्या कसल्या तरी विचारांत गर्क होते. तीं दोन मुलें आपल्या चौरकर्मरूपी ओझ्याच्या भारानें इतकीं दबून गेलीं होतीं. त्यांच्या तोंडांतून शब्दच निघेना स्वयंपाकीणबाईची मात्र मधून मधून चर्पटपंजरी चालली होती.

जेवण झाल्याबरोबर प्रभाकर तारेला एकीकडे बोलावून म्हणाला, " तो शामराव देखील काल मुंबईला गेला ह्मणे. मला आतांच समजलें. तो अगदीं आयत्या वेळीं पुढें येऊन कांहीं तरी बिघाड आणील अशी मला भीति वाटत होती. परंतु त्या दिगंबर बोवांच्या गड्यानें मला सांगितलें कीं, मुंबईहून कांहीं जरूरीचें पत्र आलें ह्मणून वकीलसाहेब निघून गेले. तेव्हां हें एक त्यांतल्यात्यांत बरेंच झालें म्हणायचें." नंतर थोडें थांबून तो म्हणाला, " ताई, आपण दोघांनीं एकदम बाहेर पडूं नये हें बरें. मी अगोदर जातों आणि मागाहून तूं ये. पण ह्या बाईला मात्र कांहीं समजूं देऊं नकोस. तिची नजर कशी कावळ्यासारखी इकडे तिकडे करीत असते. सुतानें स्वर्गाला जाणारी ही बाई आहे. ह्मणून म्हणतों तूं अगदीं जपून रहा. थोडासा जरी संशय आला तरी ती आकाशपाताळ एक करून टाकील."

नंतर आपणास कोणी पहात नाहीं अशी खात्री करून घेऊन तो घरांतून बाहेर पडला. आतां तारा मागें एकटीच राहिली. तिचें अंतःकरण वेगानें उडूं लागलें. घरांतून तिचा पाय बाहेर निघेना. साबाजीस न विचारतां, त्याची संमति न घेतां जाणें तिच्या अगदीं जिवावर आलें. ती त्याच्या शेजारीं जाऊन मुकाट्यानें उभी राहिली. तिची म्लान मुद्रा पाहून साबाजी ह्मणाला, " तारू, बाळ, तुझा चेहरा आज फार कोमेजलेला दिसत आहे. तोंडावर तजेला अगर हुषारी दिसत नाहीं. कपाळ दुखत असेल तर बाहेर जाऊन बागेंत, नदीकांठीं जरा हिंडून ये. बाहेरची हवा लागली ह्मणजे थोडें बरें वाटेल."

इतकी पडत्या फळाची आज्ञा मिळाल्याबरोबर तारा झट्दिशीं आपली शाल अंगावर घेऊन बाहेर पडली. प्रभाकर थोड्या अंतरावर तिची वाट पहात रस्त्यावर उभा होताच.

तारा आल्याबरोबर प्रभाकरानें तीं दोन बोचकीं दोन्ही हातांत घेतलीं. व " हं आतां वेळ नाहीं. " असें ह्मणून तो चालूं लागला; परंतु सरलस्वभावा तारा क्षणभर उभी राहिली व कष्टी अंतःकरणानें तिनें एकवार मागें वळून पाहिलें. तिच्यानें पुढें पाऊल टाकवेना. प्रभाकरानें मागें फिरून तिच्या हातास धरून चालावयास लाविलें. तेव्हां ती चालूं लागली. कसें बसें त्यांनीं एकदाचें स्टेशन गांठलें. प्रभाकर तिकिटें काढून घेऊन आला. बोचकीं एका बाकावर ठेवून कोणी ओळखीचें भेटतें कीं काय अशी भीति वाटून प्रभाकर चहूंकडे पहात होता. परंतु त्याच्या ओळखीचें त्याला कोणी दिसलें नाहीं. इतक्यांत मुंबईस जाणारी गाडीही आली. ती पाहून त्या दोघांना बरें वाटलें. तारेला एका डब्यांत चांगलीशी जागा पाहून प्रभाकरानें बसविलें व आपण गाडी सुरू होण्याची वाट पहात दरवाजांत उभा राहिला. शिवरावांच्या पत्राप्रमाणें आपण कामगिरी बजाविली, आतां कोणाचें भय राहिलें नाहीं. दोन तीन तासांचा अवकाश कीं, शिवरावांची गांठ पडून सर्व कांहीं व्यवस्थित होईल, अशा मनोराज्यांत तो गर्क असतां गाडी चालूं लागली, ह्मणून तोही डब्यांत चढूं लागला. इतक्यांत एक पट्टेवाला शिपाई पळत पळत त्याच्या डब्याजवळ येऊन मोठ्यानें ह्मणाला, " परबाकरपंत चितारी तुह्मीच काय ? "

प्रभाकरानें त्याजकडे पाहून " मीच तो. " असें ह्मणतांच त्या शिपायानें एक बंद केलेलें पाकीट त्याजकडे देऊन म्हटलें, " बापूसाहेबांनीं दिले आहे. " तो इतकें म्हणतो तोंच गाडी वेगानें चालूं लागली. प्रभाकरानें पाकीट फोडून आंतील पत्र वाचलें. नंतर तो हलक्या स्वरानें तारेला ह्मणाला, "ताई, शिवरावांकडून पत्र आलें आहे. ते लिहितात कीं, बोरीबंदर स्टेशनावर न उतरतां अलीकडील स्टेशनावर ह्मणजे मसजीद स्टेशनावर उतरावें. त्यांनीं आपला पूर्वीचा बेत किंचित् फिरविला आहे, हें पहा. " असें ह्मणून त्यानें तें पत्र तारेला दिलें.

पत्राच्या शिरोभागीं डाव्या बाजूस चंद्रगड जहागिरीचा छाप असून पत्राचें अक्षर शिवरावांच्या अक्षरासारखें होतें. शिवाय पट्टेवाला शिपाई वाड्यांतीलच होता. सबब पत्राच्या खरेपणाबद्दल तिला यत्किंचित्ही संशय

आला नाहीं. तरी पण ती साशंकपणें ह्मणाली, " पण भाऊ, शिवराव मुंबईला गेले आहेत ना ? "

प्रभाकरः—" होय, पण त्यांनीं हें पत्र मुंबईला जाते वेळीं बापूसाहेबांकडे दिलें असावें अगर मुंबईहून मुद्दाम मनुष्याबरोबर पाठवून दिलें असावें असें वाटतें. त्यासंबंधानें खर्च किती आला तरी त्याची ते पर्वा करणारे नाहींत आणि त्यांचें धोरण किती तें पहा. ' पत्र वाचल्याबरोबर फाडून टाकावें. ' असें त्यांनीं खालीं लिहिलें आहे. ताई, टाक फाडून तें पत्र आणि तुकडे दे खिडकीच्या बाहेर फेंकून. "

परंतु पत्र फाडून टाकण्याचें तारेच्या मनांत नव्हतें; तथापि फाडून टाकण्याबद्दल लिहिलेला मजकूर व प्रभाकराचा आग्रह पाहून तिनें तें पत्र पुनः एकवार वाचलें व नंतर मोठ्या नाखुषीनें तिनें पत्राचे तुकडे करून बाहेर टाकून दिले.

त्या दोघांनाही हा आगगाडीचा प्रवास फारच लांबलचक व कंटाळवाणा वाटला. प्रभाकर मुंबई एकदां केव्हां येईल ह्मणून फारच उतावळा झाला होता व तारा परस्पर विरुद्ध अशा उत्कट मनोवृत्तींच्या भोंवऱ्यामध्यें सांपडली होती. शेवटीं एकदांचें मसजीद स्टेशन आलें व गाडी उभी राहिली. प्रभाकर गाडींतून उतरला व इकडे तिकडे पाहूं लागला. इतक्यांत एक कृश व चमत्कारिक चेहऱ्याचा वृद्ध गाडीवाला त्यांच्याजवळ येऊन ह्मणाला, " प्रभाकर चितारी तुम्हीच काय ? "

प्रभाकरानें ' होय ' म्हणून उत्तर दिलें.

" ठीक, चला तर मग. गाडी तयार आहे. " असें तो वृद्ध गृहस्थ आनंदयुक्त मुद्रेनें म्हणाला.

प्रभाकरानें तारेस खूण केली. त्याबरोबर ती खालीं उतरली. म्हाताऱ्यानें त्यांचीं दोन्हीं बोचकीं उचलून हातांत घेतलीं व " या माझ्या मागून " असें म्हणत तो गाडीकडे निघाला.

तारा प्रभाकरास डिंवचून म्हणाली, " अरे, पण त्याला विचार तरी. " तिच्या मनांत कांहीं संशय आला अगर भीति उत्पन्न झाली हें सांगतां येत नाहीं; पण दोहोंचेंही मिश्रण त्यांत असावें असें दिसलें.

तिच्या म्हणण्याचा भावार्थ ओळखून प्रभाकर त्या गाडीवाल्याला म्हणाला, " अरे थांब जरा. तुला पाठविलें तें त्या—"

गाडीवाला चोहोंकडे धूर्तपणानें पाहून बोलला, " नांव न घेणें बरें."

" मी हुकुमाप्रमाणें आलों आहें. गाडी बाहेर उभी आहे." त्याचें उत्तर ऐकून प्रभाकर तारेस म्हणाला, " ताई, यांत कांहीं भानगड दिसत नाहीं. त्याला माझें नांव देखील माहीत आहे. तो इतका जपून वागतो हेंच बरें. "

नंतर तीं तिघेंजण गाडी उभी होती त्या ठिकाणीं आलीं. म्हाताऱ्यानें बोचकीं गाडींत टाकलीं व गाडीचें दार उघडलें. तारेच्या मनांत पुन्हां संशय उत्पन्न झाला. म्हणून ती किंचित् थबकली. हें पाहून प्रभाकर हळूंच पुटपुटला, " हं चल लवकर. " त्याबरोबर तारा गाडींत चढली, नंतर प्रभाकरही आंत जाऊन बसला.

म्हातारा गाडीचें दार बंद करून पुढच्या बाजूस जाऊन बसला व गाडी चालूं लागली. " कुठें जायचें माहीत आहे ना ? " असें प्रभाकरानें त्यास म्हटलें.

" व्हय जी मला सर्व माहीत आहे. " असें म्हाताऱ्यानें तत्परतेनें उत्तर दिलें.

अर्धा पाऊण तास गाडी हांकल्यावर एका उंच व लांबलचक इमारतीसमोर आणून त्यानें गाडी उभी केली व खालीं उतरून मागील दार उघडलें. तेव्हां " चर्नीरस्ता हाच काय ? " असा प्रभाकरानें प्रश्न केला.

" हाच. येथेंच उतरायचें. " असें म्हाताऱ्यानें उत्तर दिलें.

प्रभाकर खालीं उतरला व त्या इमारतीकडे पाहून त्यानें साश्चर्य ह्मटलें, " अरे पण येथें ह्या सॉलिसिटर्स लोकांच्या पाट्या दिसतात. हीं त्यांचीं ऑफिसें आहेत वाटतें ? "

" बरोबर. अगदीं बरोबर. ह्या जिन्यानें वरती जा. वाट पहात बसले असतील. " ह्माताऱ्यानें शांतपणें उत्तर दिलें.

" कोण बसले असतील ह्मणतोस ? "

" सरदार शिवराव. " ह्मातारा चटकन् ह्मणाला. तेव्हां प्रभाकर

तारेकडे वळून हळूंच पुटपुटला, " जुळलें सगळें. आतां कसली काळजी नाहीं. "

नंतर तारा गाडींतून खालीं उतरली. म्हातारा तीं दोन बोचकीं हातांत घेऊन जिना चढूं लागला. त्याच्या मागोमाग तीं दोघेंजण चाललीं. म्हातारा जिना चढून वर गेला व एका खोलीच्या दारासमोर बोंचकीं ठेऊन उभा राहिला. त्या दरवाजावर पाटी लावलेली होती. परंतु वरती कागद लावला होता म्हणून अक्षरें स्पष्ट दिसत नव्हतीं तथापि तारेनें अगर प्रभाकरानें लक्ष्यपूर्वक बारकाईनें पाहिलें असतें तर " शामराव वकील " हीं अक्षरें त्यांस ओळखतां आलीं असतीं व मग तसेंच मागच्या पावलीं त्या दोघांनाही तेथून परततां आलें असतें. परंतु त्यांच्या मनांत कांहींच शंका उरली नसल्यामुळें तीं स्वस्थ उभीं राहिलीं. इतक्यांत आंतून एका मनुष्यानें येऊन तीं बोचकीं उचललीं व 'या इकडे' असें म्हणून तो पुढें निघाला. त्याच्या मागून प्रभाकर व तारा अशीं दोघें चाललीं. तो वृद्ध गाडीवाला केव्हांच निघून गेला होता. पुढील दरवाजाहि बंद झाला.

आंतील एका खोलचिं दार उघडून भुजंग म्हणाला:—" तुम्ही येथें बसा. मी जाऊन साहेबांना कळवितों. "

तारा एका कोचावर बसली. प्रभाकर खिडकींत जाऊन बाहेर पहात उभा राहिला. थोड्या वेळानें तो तारेकडे येऊन म्हणाला, " शिवराव कुठें आहेत कोण जाणे? अजून कां बाहेर येत नाहींत? आम्हांला येऊन किती तरी वेळ झाला ! " असें बोलत बोलत तो तेथें एका कोंपऱ्यांत असलेल्या टेबलाजवळ गेला व त्यावरील एक कागद घेऊन त्यानें पाहिलें तर त्यावर "शामराव वकील" अशीं मोठीं अक्षरें छापलेलीं त्याला दिसलीं. त्याबरोबर विंचवानें नांगी मारावी त्याप्रमानें वेदना होऊन त्यानें तो कागद झट्‌दिशीं खालीं टाकून दिला व तारेकडे पाहून तो म्हणाला, " ताई, आपण जाळ्यांत सांपडलों ग सांपडलों. आपणाला येथें फसवून आणलें, चल लवकर, जाऊं या येथून. " असें म्हणून तो जलदीनें दरवाजाकडे निघाला ताराही त्याच्या मागोमाग चालली.

एकदोन पावलें तीं गेलीं असतील नसतील इतक्यांत दरवाजा खाड्कन् उघडला व शामराव वकीलांची स्वारी त्यांच्या समोर येऊन उभी राहिली

## प्रकरण २१ वें.

—:o:—

### प्रेमाची भाकडकथा.

आंत येतांच शामरावांनीं दरवाजा बंद करून घेतला व ते त्या दोघांसमोर जाऊन उभे राहिले. त्यांचा चेहरा उतरलेलां दिसत होता. ओंठ आंवळून धरलेले होते, आणि तोंडावर निश्चयाची व हेकेखोरपणाची छाया दिसत होती.

ही त्यांची मुद्रा तारेनें अनेक वेळां पाहिली होती. परंतु आज तिला ती अरिष्टसूचक अशी दिसली. पण ती त्यांच्या समोर तशीच धिटाईनें उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर भीतीचें कांहींच चिन्ह दिसत नव्हतें. तिनें स्पष्ट पण रागीट शब्दांनीं ह्मटलें, “शामराव, याचा अर्थ काय !”

शामराव कांहीं उत्तर देणार तोंच प्रभाकर पुढें आला व संतापून लाल होऊन ह्मणाला, “काय हो शामराव, याचा अर्थ काय ? तुह्मीं आह्मांला येथें कशाकरितां—असें फसवून आणलेंत ?”

शामरावांनीं त्याजकडे तिरस्कारयुक्त दृष्टीनें पाहिलें. नंतर ते तारेकडे पाहून ह्मणाले, “तुझ्या इच्छेविरुद्ध माझ्याकडून वर्तन झालें हें मी ओळखून आहें.”

ह्या त्यांच्या बोलण्याचें तारेला अत्यंत आश्चर्य वाटलें व तितकाच संतापही आला. ती क्रोधाविष्ट होऊन बोलली—

" इच्छेविरुद्ध वर्तन झालें ह्मणे ! शामराव, यांत इच्छेचा प्रश्न काय आहे ? तुह्मीं हा माझा मोठा उपमर्द केला, उपमर्द ! "

शामराव गंभीरतेनें ह्मणाले:—" मीं तुझा उपमर्द केला नाहीं व करण्याचा माझा उद्देशही नाहीं. माझ्या हुकुमावरून तुला येथें आणलें आहे ही गोष्ट मी नाकबूल करीत नाहीं, समजलें ? "

प्रभाकर मध्येंच रागानें ह्मणाला, " समजलें, सगळें समजलें. ही सर्व तुमचीच चेष्टा आहे, हें आह्मीं पूर्णपणें ओळखलें. त्याबद्दल जास्त व्याख्यान अगर शब्दपांडित्य करण्याची गरज नाहीं. तुह्मीं असें कां केलें ? एवढ्याच प्रश्नाचें मला उत्तर द्या. तुह्मीं तेवढें उत्तर दिलें कीं आह्मी येथून निघून जातों. मग एक क्षणभरही थांबत नाहीं. उत्तर देण्याची तुमची इच्छा नसेल तर आह्मी तशींच जाऊं. तुमच्या-कडून आह्मांस येथें आणण्याचें कारण समजून घेण्याची आह्मांला तितकी जरूरही नाहीं. जातों तर आह्मी. तुमच्या कडून खुलासा करून घेण्याचें काम दुसऱ्याकडे सोपवावें हें बरें. मग ते आहेत आणि तुह्मी आहांत. "

शामराव तारेकडे पाहून ह्मणाले, " तुझ्याजवळ सर्व खुलासा कर-ण्यास माझी तयारी आहे. "

" सांगा तर मग लवकर. जास्त पाल्हाळ लावूं नका. आह्मी वाट पहातों आहों सांगा." प्रभाकर ह्मट्दिशीं बोलला.

शामराव:—" तारू, तुझ्याजवळ खुलासा करीन असें मीं ह्मटलें. माझें ह्मणणें तूं एकटीनें ऐकावेंस हें बरें. "

" काय ? " प्रभाकर मोठ्यानें ओरडला.

" तारूनें माझें ह्मणणें एकटीनें ऐकावें असें मी ह्मणतों. ह्मणजे तिला मला, सर्वांनाच चांगलें. " शामराव शांतपणें बोलले.

प्रभाकर मोठ्यानें ह्मणाला, " पण मला नाहीं तें कबूल. मी तिचा पाठीराख्या ह्मणून आलों आहें. एक क्षणभर सुद्धां मी तिला एकटीला तुमच्याजवळ राहूं देणार नाहीं, तुम्ही मोठे बिलंदर अट्टल भामटे दिसतां. तिचा जीव घेण्याला सुद्धां तुम्ही कमी करणार नाहीं. "

प्रभाकरानें तारेबरोबर येण्याचें खरें कारण आतां शामरावांच्या लक्ष्यांत आलें. ते किंचित् हांसून तारेला ह्मणाले, "मी तुझ्या जिवाला कांहीं अपाय करीन अशी तारू, तुला भीति वाटते काय ?"

तारा संतप्त होऊन बोलली, "ज्यांचा मी तिरस्कार करतें त्यांची मला मुळींच कधीं भीति वाटत नाहीं. भाऊ, त्यांचें तसें ह्मणणें आहे तर तूं जा बाहेर. हांक मारीन तेव्हां ये ह्मणजे झालें. सांगूं देत काय सांगायचें आहे तें."

प्रभाकर आर्जवानें म्हणाला, "पण ताई, मी नाहीं येथून जात. हा गृहस्थ कोणतेंही नीच, बेकायदेशीर कृत्य करण्यास मागें घेणारा नाहीं, हें त्यानें आपल्या कृतीनेंच दाखविलें आहे. कारण कोणालाही फसवून अटकेंत ठेवणें हा गुन्हा आहे व आम्हांला येथें आणून तसा गुन्हा त्यानें केला आहे. म्हणून म्हणतों, मी नाहीं बाहेर जात. तुझ्या संरक्षणाची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे. हें तुला ठाऊक आहे ना?"

तारा प्रभाकराजवळ जाऊन हळूंच ह्मणाली, "मला ठाऊक आहे. पण मला वाटतें कीं, त्यांचें ह्मणणें काय आहे तें एकदां ऐकावें हें बरें. सध्यां आमची स्थिति कशी आहे पहा. आम्ही त्यांच्या पूर्णपणें ताब्यांत आहोंत. किंबहुना आम्ही त्यांचे कैदीच आहोंत, असें म्हटलें तरी चालेल व त्यांचें म्हणणें मीं ऐकून घेतलें नाहीं तर ते आह्मांला येथून जाऊं देणार नाहींत. ह्मणून म्हणतें त्यांच्या म्हणण्याप्रमाणें कबूल करणें हें जास्त शहाणपणाचें आहे; कोणीकडून तरी दगडाखालीं सांपडलेला हात काढून घेतला पाहिजे. भाऊ, तूं विचार कर, आपणाला इकडे जितका जास्त वेळ लागेल तितका वेळ शिवराव तिकडे वाट पहात बसतील."

प्रभाकराच्या मनाचीही खात्री झाल्यासारखी दिसली. तो म्हणाला, "बरें तर, माझी जरूर लागल्याबरोबर मला हांक मार आणि तो जर उद्धटपणा अगर चवळपणा करूं लागला तर ताबडतोब ओरड म्हणजे येऊन त्याच्या नरडीचा घोटच घेतों." असें म्हणून तो दरवाजाकडे निघाला. पण जातां जातां जितका म्हणून तिरस्कार व द्वेष दाखवितां

येईल तितका दाखवून तो शामरावास म्हणाला, " मी आतां जातों, पण ताई मला जा म्हणते म्हणून जातों, तुमच्या सांगण्यावरून जातों असें नाहीं हें लक्ष्यांत ठेवा. तिला जें काय सांगावयाचें असेल तें लवकर सांगा आणि नीट सभ्यपणानें सांगा. नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे. समजलें का ? "

असें खोंचून बोलत प्रभाकर खोलींतून बाहेर पडला व डोक्यांत कांहीं तरी कल्पना येऊन तो बाहेर दरवाजाकडे निघाला. आतां असेंच चर्नी रस्त्यावर जाऊन सरदार शिवरावांना घेऊन यावें असा विचार करून तो दरवाजा उघडूं लागला. पण तेथें भुजंग होता तो म्हणाला, " दरवाजा बंद आहे जी, ताळा लावला आहे. "

" म्हणजे ? उघड तर लवकर. मला बाहेर जावयाचें आहे. " प्रभाकर रागानें म्हणाला.

भुजंगः—" आम्हांला चाकर माणसाला काय जी ? मालकाचा जसा हुकूम होईल तसें वागलें पाहिजे. त्यांनीं ताळा लावण्यास सांगितलें म्हणून मीं लावला. काढ म्हटलें तर काढूं. " असें म्हणून तो आपल्या उद्योगास लागला. प्रभाकरानें त्याला पुष्कळ सांगितलें, विनवण्या केल्या, पैसे देखील देऊं केले, शेवटीं धमकी सुद्धां दिली पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

प्रभाकर बाहेर जातांच शामरावांनीं खोलीचें दार बंद करून घेतलें व आपण टेबलाजवळ उभा राहून तारेला कोचावर बसावयास त्यांनीं सांगितलें. परंतु कांहीं न बोलतां ती किंचित् मागें सरकली व कोचास टेकून उभी राहिली. तिजकडे पाहून शामराव म्हणाले, " तारू, मीं हा जो प्रकार केला आहे–किंबहुना करणें मला भाग पडलें आहे–त्या प्रकारामुळें तुला जितकें वाईट वाटत आहे व त्रास झाला आहे, तितकेंच वाईट मलाही वाटत आहे आणि तितकाच त्रासही होत आहे, हें तूं पक्कें लक्षांत ठेव."

ती भिंवया चढवून म्हणाली, " तुम्हांला काय वाटतें व कसें वाटतें याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं, मला तें ऐकून करायचें आहे काय?"

शामराव पुढें म्हणाले:--" याबद्दल मला फार फार वाईट वाटत आहे. तुझ्याविषयीं माझ्या मनांत जी पूज्यबुद्धि, जें प्रेम वास करीत आहे तें तुला माहीत आहेच. हें नव्यानें सांगण्याची कांहीं गरज नाहीं--"

ती रागानें फुणफुणत म्हणाली—" मला नाहीं हें ऐकवत. "

शामराव:--" तरी पण मला सांगितलेंच पाहिजे. कारण तुझ्याशीं मीं जें एक वर्तन केलें त्याचें तें एक कारण आहे. तुझ्यावरील माझें प्रेम कमी उत्कट असतें, माझी निष्ठा कमी प्रतीची असती, तुझ्यासंबंधानें मला इतकी कळकळ वाटत नसती, तर तूं हल्लीं ज्या मार्गानें चालली आहेस त्या मार्गानें मीं तुला खुशाल जाऊं दिलें असतें व तुझा नाश होऊं दिला असतां. तूं कोठें निघाली होतीस, तुमचा काय बेत झाला होता हें मला सर्व माहीत आहे. मी तुझ्यापासून चोरून ठेवीत नाहीं. "

ती त्वेषानें बोलली, " तर मग तुम्ही गुप्तहेराचें काम करीत होता? "

" नाहीं. मीं संरक्षकाचें काम केलें असें म्हण. जी आपल्या प्रेमाचा विषय तिचें जीवित अगदीं धोक्यांत आहे अशी स्थिति असतां जें प्रेम स्वस्थ राहतें, कांहीं प्रयत्न, हालचाल सुद्धां करीत नाहीं, तें कसलें प्रेम ह्मणावयाचें ? तें प्रेम फारच कनिष्ट प्रतीचें, अत्यंत कमी दर्जाचें म्हटलें पाहिजे. "

त्यांनीं जास्त बोलूं नये ह्मणून तारा पुढें हात करून म्हणाली, "शामराव, तुमचीं हीं सुंदर सुंदर वाक्यें ऐकण्याचें मला कारण नाहीं. तीं ऐकल्यानें माझें मन मुळीं देखील द्रवणार नाहीं अगर माझ्या मनावर कांहींच परिणाम होणार नाहीं, हें तुह्मी खूप लक्षांत ठेवा. तुमच्या प्रेमासंबंधानें किंवा तुमच्या पूज्यबुद्धीसंबंधानें मी अगदीं उदासीन आहें. मला त्यांपैकीं कशाचीही गरज नाहीं. तुह्मीं आह्मांला या ठिकाणीं कां आणलेंत, या प्रश्नाचा काय खुलासा करावयाचा असेल तो करा. त्याचीच मी वाट पहात आहें. तुह्मांला खुलासा करायचा नसेल तर ही मी निघालें. " असें ह्मणून ती चालूं लागली.

" थांब तारू, जाऊं नकोस. माझी एवढी विनंति, एवढा उपदेश ऐक. " शामरावांचें हें आर्जवाचें भाषण ऐकून तारा थांबली.

शामराव पुढें म्हणाले, " माझें बोलणें पुरतें ऐकून घे. मीं जें कांहीं केलें आहे त्याला मुख्य कारण म्हटलें म्हणजे माझें तुझ्यावरील दृढ व निःसीम प्रेम होय. पण त्याचा उल्लेख देखील तूं मला करूं देत नाहींस. ठीक आहे, नाहीं तर नाहीं. मीही त्या संबंधानें बोलून त्रास देत नाहीं. तथापि तुझ्या स्वतःच्या संबंधानें व ज्यानें तुझ्या नाशाचा व्यूह रचला आहे त्या मनुष्यासंबंधानें–म्हणजे सरदार शिवरावासंबंधानें–मला कांहीं सांगायचें आहे. शिवरावांनीं तुला चर्नी रस्त्यावरील बिऱ्हाडांत आपली गांठ घेण्यासंबंधानें पत्र लिहिलें होतें, होय कीं नाहीं ? तसेंच तुझ्याशीं लग्न करून तुला आपली पट्टराणी करूं असें त्यांनीं तुला आश्वासन दिलें आहे हें खरें ना ? "

" होय. मग तुमचें ह्मणणें काय तें सर्व खोटें आहे ? तुमचें सांगणें मीं खरें मानावें आणि त्यांचें खोटें मानावें असाच तुमच्या ह्मणण्याचा अर्थ ना ? " असें ती किंचित् हांसून बोलली. पण त्या योगानें शामरावांच्या मानी मनाला चाबकाच्या फटक्याप्रमाणें वेदना झाल्या.

ते ह्मणालेः—" नाहीं, माझें ह्मणणें तसें नाहीं. त्यांचें सांगणें खरें असेल, खरें असणें संभवनीय आहे. तथापि तुझ्या मजवर होणाऱ्या रागाला न जुमानतां, त्याहूनही भयंकर अशा तिरस्काराची पर्वा न करितां मीं त्यांना कसें ठकविलें आहे पहा."

ताराः—"खरेंच तुम्ही त्यांना थोडा वेळ, कांहीं वेळ ठकविलें एवढें खरें. पण ह्या तुमच्या फसवणूकीबद्दल शिवराव तुमच्याकडे भरपाई, भरपूर भरपाई, मागतील ती देण्याला मात्र तुमची तयारी असूं द्या म्हणजे झालें."

" मला नाहीं त्याची भीति वाटत. शिवरावांना अगर दुसऱ्या कोणालाही मी भिणारा मनुष्य नाहीं. तुझ्या हिताहिताचा जेथें संबंध आहे तेथें फक्त तुझीच मला भीति वाटते. "

तारा त्वेषानें म्हणालीः—" मग मीं मागितलेला खुलासा करणार कीं नाहीं ? मला बाकीची भानगड नको आहे."

शामराव पूर्वीप्रमाणेंच गंभिरतेनें म्हणालेः—" शिवरावरूपी व्याघ्र व त्याचें भक्ष्य या दोहोंच्या मध्यें मी मुद्दाम आलों आहें, कारण, तुला वि-

चार करण्यास थोडी फुरसत मिळाली--मग ती अगदीं आयत्या वेळीं कां असेना—तर तुझ्यापुढें आ करून जें संकट उभें आहे तें तुला दिसेल व तूं माघार घेशील, पुढें पाऊल टाकणार नाहींस, असें मला वाटलें. ”

ती तिरस्कारानें म्हणालीः—“ वाः ! तर मग तुमचे माझ्यावर मोठेच उपकार आहेत म्हणायचे. हाच खुलासा ना ? केलात बरें झालें. आतां मेहेरबानी करून तेवढा दरवाजा उघडा, म्हणजे मी निघून जातें.”

“ थांब, थोडा वेळ थांब. तारू, माझी एवढी विनंति ऐक. ” शामरावाचा आवाज कांपूं लागला. त्यांच्या मनांत जो खरा विचार होता तो आतां दृग्गोचर होऊं लागला. तूं निघून जाणार तर जा. माझें कांहीं म्हणणें नाहीं. पण गेल्यानें तुझ्यावर कोणतें अरिष्ट गुदरेल त्याचा विचार कर. चोरून, गुप्तपणें तुझ्याशीं लग्न करून घेण्याचा शिवरावांचा विचार आहे; जणूं तूं त्यांची बायको होण्याला अगदींच नालायक, आपल्या पायाखालची धूळ असें तुला ते समजतात. अशा चोरट्या लग्नापासून, अशा लज्जास्पद शरीरसंबंधापासून कधीं तरी कल्याण होईल असें तुला वाटतें काय ? तारू, विचार कर. नीट विचार करून पहा. तुझ्यासारख्या गरीब घराण्यांतील मुलीशीं लग्न करण्याची त्यांना लाज वाटत आहे. शिवराव चंद्रगडचे भावी जहागीरदार, तुला जगासमोर आपली पत्नी म्हणून दाखविण्याला लाजत आहेत, तुझ्याशीं गुप्तपणें विवाहविधि उरकून आपला हेतु ते साधून घेणार आणि तुला कमीपणा आणणार. त्यांत तुझा अपमान होणार आहे. माझ्या प्रेमाशीं तुलना केली तर त्यांचें प्रेम माझ्या पासंगाला तरी पुरेल काय ? ”

तारा व्यथित झाली. तिचें हृदय जलद उडूं लागलें. ती मोठ्यानें म्हणालीः—“ पुरे, पुरे, ही प्रेमाची भाकडकथा—नव्हे हा चघळपणा पुरे करा. मजसारख्या दीन व निराश्रित बालिकेला या ठिकाणीं फसवून आणून तुम्हीं असलें बोलणें मला ऐकायला लाविलें आहे अं ! यांत तुम्हांला मोठा शूरपणा वाटत असेल नाहीं ! पण मला वाटतें कीं, तुम्ही अगदीं भ्याड, भितरे, भागूबाई आहांत. या तुमच्या प्रेमाच्या कहाण्या

मीं माझ्या कानांनीं ऐकल्या हें मला फारच लज्जास्पद वाटत आहे. मला तें कमीपणा आणणार, माझा अपमान करणार असें तुम्ही म्हणाला नाहीं का ? ऐका तर मग, एकदांच–शेवटचेंच तुम्हांला सांगून टाकतें कीं, शिवरावांच्या हातून जर माझा असा अपमान व्हायचा असेल, माझ्या नांवाला बट्टा लागायचा असेल, तर खुशाल लागूं दे. तुम्ही जो मला बहुमान देऊं शकाल, तसल्या हजार बहुमानापेक्षां मला तो बट्टा–कालिमाच बरा वाटतो. तो मी अगदीं आनंदानें स्वीकारीन. माझें अकल्याण होईल, माझें सर्वस्वीं नुकसान होईल असें तुम्ही ह्मणतां, नव्हे का ? होऊं द्या. तुम्ही स्वस्थ बसावें, जास्त बोलून मला त्रास देऊं नये ह्मणून मी हें सर्व–तुमचें ह्मणणें–तुमचा प्रत्येक शब्द–कबूल करतें. पण तुमच्यासारख्या दुष्टाच्या सहवासांत सौख्य व बहुमान उपभोगण्यापेक्षां त्यांच्या संगतींत होणारे दुःख व अपमान मी मोठ्या आमंदानें सहन करीन. आतां तरी मी पुरतें स्पष्टपणानें बोललें ना ? ”

इतकें बोलून अत्यंत तिरस्कारानें तिनें त्याच्यांकडे पाहिलें. त्या तिरस्कारामुळें त्यांचा चेहरा अगदीं उतरून गेला, व त्यांची जीभ टाळ्यांत अडकून बसली. त्यायोगें त्यांना बोलतां देखील येईना. तिचा प्रत्येक शब्द चाबकाप्रमाणें त्यांना चटके देत असून त्यांच्या हृदयाला सुरीप्रमाणें चरचर कापीत होता. सरते शेवटीं घोगऱ्या आवाजांत ते ह्मणाले:—“ तारू, मीं तुझें रक्षण करण्याचा प्रयत्न केला. आतां तू माझे प्राण रक्षण कर. ”

“ तुम्हीं माझे प्राण वांचविण्याची खटपट केली अं ? ती कशी बरें ?” तिरस्कारपूर्वक हांसून तिनें म्हटलें.

आपल्या वाळून गेलेल्या ओंठांस जिभेनें ओलावा आणून ते बोलले, “ होय. तुझीं समजूत पडावी ह्मणून मीं पुष्कळ युक्तिवाद केला. तुझी विनवणी देखील केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां तूं मला माझ्या सामर्थ्याचा उपयोग करावयास लावणार, त्याशिवाय भागत नाहीं असें दिसतें. ”

आपल्या शरीरसामर्थ्याचा उपयोग ते करणार नाहींत असें जरी तिला अंतःप्रेरणेनें वाटलें, तरी तिनें भीतिपूर्ण दृष्टीनें एकवार दरवाजा-

कडे नजर टाकली. ते पुढें ह्मणाले, " ह्या शेवटच्या मार्गाचें अवलंबन केल्याशिवाय मीं तुला जाऊं दिलें असतें; परंतु ज्यांच्यावर तुझी ममता आहे अशीं दुसरीही माणसें आहेत. त्यांची बेअब्रु होणें ह्मणजे तुला मरणापेक्षांही पलीकडे होणार ! "

तिरस्कारपूर्ण साशंक वृत्तीनें तिनें त्यांजकडे पाहिलें. त्यांच्या ह्या मोघम धमकीच्या भाषणापैकीं एक शब्दही तिला खरा वाटेना.

शामरावांनीं आपलें चऱ्हाट सुरू केलें:—" माझें सांगणें खरें मानून नीट लक्ष्यांत ठेव. तुझ्या ममतेचीं जीं माणसें आहेत त्या माणसांच्या डोक्यावर एखादी तीक्ष्ण धारेची प्राणघातक तरवार लटकत रहावी त्याप्रमाणें भयंकर व घातक अशी बेअब्रु त्यांच्या माथीं आदळूं पहात आहे. ही बेअब्रुरूपी तलवार एका नाजुकशा दोऱ्यानें लटकावलेली आहे. तो दोरा तुटला कीं कपाळमोक्ष झालाच ह्मणून समजावें. तो दोरा तोडणें अगर न तोडणें केवळ माझ्या स्वाधीन आहे. माझ्या ह्मणण्याला तूं होय म्हण, कीं तो बेअब्रुचा प्रसंग टळला असें समज. तूं माझा धिक्कार करून शिवरावांचा आश्रय केलास तर दोरा लागलीच तुटून तलवार तुझ्या माणसांच्या डोक्यावर पडलीच असें पक्कें समज. "

तारा तुच्छतापूर्वक हास्य करून बोलली:—" शामराम, तुह्मी वकीलीच्या धंद्यांत पडला ही मोठी चूक झाली, अशी माझी समजूत आहे. नाटकांत गेला असतां तर बरें झालें असतें असें वाटतें. तेथें तुमच्या ह्या अभिनयाचा चांगला उपयोग तरी झाला असता. असूं दे. त्याची वाटाघाट मला कशाला हवी ? तुमची कर्तबगारी ऐकत बसायला मला आतां जास्त वेळ नाहीं. याबद्दल मला दिलगिरी वाटते. मला जाण्याला मोकळीक द्या. "

शामराव:—" जा, खुशाल जा. तुझ्या मायेच्या माणसांवर जर कांहीं अरिष्ट गुदरलें तर त्याचा सर्व दोष तुझ्याकडेच आहे. कारण, घाव घालणारी तूंच. मी नव्हे. जा, जा. पण माझें सांगणें लक्ष्यांत ठेव. ज्या गृहस्थानें तुला भूलथाप देऊन मुंबईस आणलें, त्या गृहस्थाच्या घरीं तूं जाऊन पोंचण्यापूर्वींच तो बेअब्रुचा प्रसंग येऊन गुदरलाच असें समज.

तो प्रसंग इतका भयंकर व कटुतम असेल कीं, तुझ्यामध्यें व त्यांच्यामध्यें एक मोठें खिंडारच उत्पन्न होईल. मग तें कधींही आक्रमण करितां येणें शक्य नाहीं. "

" खोटें, अगदीं खोटें. यांत कांहीं खरेपणा नाहीं. " असें ती निश्वास टाकून ह्मणाली.

शामरावः—" नाहीं. खोटें नाहीं. खरें, अगदीं खरें आहे. फार लज्जास्पद, लांछनाची गोष्ट आहे. थोडा वेळ उभी रहा आणि स्वस्थपणानें ऐक. ह्मणजे सर्व सांगतों."

ताराः—" मी आतां फार वेळ थांबणार नाहीं. फक्त पांचच मिनिटें थांबेन. तेवढ्या वेळांत तुह्मांला काय सांगायचें असेल तें सांगून टाका. पण मी तुह्मांला स्पष्टपणें बजावतें कीं, ह्या तुमच्या असत्य कल्पनेबद्दल तुह्मांला जें प्रायश्चित अगर जी शिक्षा भोगावी लागेल, त्या शिक्षेपासून तुमचा बचाव करण्याच्याकामीं मी एका शब्दानें सुद्धां मदत करणार नाहीं."

" कबूल, कबूल." एवढेंच शामराव बोलले. पण त्यांच्या त्या शब्दांत भावी यशःप्राप्तीची घमेंड दिसत होती. तीच तिच्या अंतःकरणाला जाऊन झोंबली.

---

# प्रकरण २२ वें.

—:o:—

## मन बदललें.



"पांचच मिनिटें बरें का ? पांचच ! " असें घड्याळाकडे पाहून तारेनें शामरावास पुन्हां बजाविलें.

शामरावः—" तेवढीं पुष्कळ झालीं. मला जी हकीकत सांगावयाची आहे ती थोडीच आहे. वडील आणि चिरंजीव

यांची गोष्ट मी सांगतों. तेवढी शेवटपर्यंत तूं नीटपणें लक्ष्य देऊन ऐक. मी कोणाचीं नांवें घेत नाहीं. हकीकत ऐकलीस म्हणजे तुझीं तुलाच तीं ओळखतां येतील."

चंद्रगडचे जहागिरदार रामदेवराव व त्यांचे चिरंजीव शिवराव यांचीच हकीकत शामराव सांगणार आहेत, असें तारेला वाटलें; तथापि ठरल्याप्रमाणें पांच मिनिटें संपेपर्यंत त्यांची हकीकत शांतपणें ऐकावयाची, व नंतर कांहींही न बोलतां, चकारशब्द न काढतां तेथून निघून जावयाचें असा तिनें निश्चय केला व ती स्वस्थ उभी राहिली.

शामरावांनीं सुरवात केली:—" बाप एक सुप्रसिद्ध चित्रकार होता. बुद्धि तरतरीत, मन थोर व उदार, अंगांत कसबही चांगलें होतें. अल्पवयांतच त्याच्या गुणाची जिकडे तिकडे वाहवा होत चालली. थोरामोठ्यांकडून त्याला वरचेवर बोलावणीं येऊं लागलीं. चित्रकलेंत अगदीं गढून गेल्यामुळें त्यानें लग्नही लवकर करून घेतलें नाहीं. चित्राशिवाय इतर गोष्टींकडे त्याचें बिलकुल लक्ष्य नव्हतें. पुढें तो बराच प्रौढ झाल्यावर त्याच्या मित्र मंडळींनीं त्याचें लग्न करून टाकिलें. बायको रूपानें सुंदर, थोर घराण्यांतील पण सुधारक वागणुकीची होती. त्याच्या स्वभावाला जुनी पद्धत आवडत असल्यामुळें, बायकोची वागण्याची ही तऱ्हा त्याला पसंत पडेना. अर्थातच त्या दोघांमध्यें वरचेवर खटका उडे; त्यामुळें तीं दोघेंही लवकरच विवाह सौख्यास अंतरलीं. बायकोचें वर्तन तर त्याला पुढें पुढें इतकें नापसंत झालें कीं, त्याचें मन अगदीं वैतागून गेलें व सरतेशेवटीं त्यानें सर्व संसार सोडून देऊन आपला चित्रकलेचा धंदाही टाकला. त्याचा पूर्वीचा सर्व आयुष्यक्रम बदलून एखाद्या बैराग्याप्रमाणें तो विरक्त व एकांतवासांत कालक्रमण करूं लागला. ज्या बायकोनें त्याच्याशीं अशा तऱ्हेचें वर्तन केलें व त्याच्या संसाराची राखरांगोळी केली त्या बायकोपासून त्याला एक मुलगा सुद्धां झाला होता. त्या मुलासही टाकून देऊन तो दूर एका खेडे गांवांत जाऊन आयुष्याचे दिवस कसे बसे कंठूं लागला. ज्याची चित्रकलेबद्दल जगभर इतकी प्रसिद्धी झाली होती त्याचा आतां जगाला विसर पडत चालला. जो मुलगा लहानपणीं त्याला आपला जीव

कीं प्राण वाटे त्या मुलाचें तोंड सुद्धां पाहणें आतां त्याला बरें वाटेना. तथापि त्यानें आपलें कर्तव्य सोडलें नाहीं. मुलाच्या खाण्यापिण्याची व शिक्षणाची चांगली व्यवस्था व्हावी ह्मणून त्यानें एक ट्रस्टी ऊर्फ पालक नेमला व त्याच्या स्वाधीन बरीच मोठी रक्कम केली. त्या गृहस्थानें त्या मुलाचा मराठी अभ्यास करवून त्याला इंग्रजी शाळेंत घातलें. परंतु आई-बापांची देखरेख त्या मुलावर राहिली नाहीं. मुलगा रूपानें देखणा असून स्वभावानें मोठा गोड होता. यामुळें त्याच्या भोंवतीं पुष्कळ मित्रमंडळी जमा होऊं लागली. अशा मुलांना नेहमीं अशी मंडळी मिळतातच. मुलाला आतां अडपतेंदडपतें कोणी राहिलें नाहीं. तो स्वैर वृत्तीनें वागूं लागला व वाईट मित्र मंडळीच्या संगतीला लागून बिघडत चालला. त्याचे मूर्खपणाचे–नव्हे दुर्व्यसनाचे चाळे सुरू झाले. आणि अखेरीस अविचाराच्या भरांत त्यानें भयंकर अपराध केला—"

तारेचा चेहरा उतरला. तिचे श्वास जड येऊं लागले. ती ह्मणाली, "हें सारें खोटें!"

शामराव तसेंच पुढें ह्मणाले, "भयंकर अपराध केला. समजूनउमजून, बुद्धिपुरःसर केला नाहीं; पण केला एवढें खरें. तो सुधारणें आतां दुरापास्त आहे. त्या अपराधाला कायद्यांत शिक्षाही मोठी जाडी सांगितलेली असून आतां त्याचें बाकीचें सारें आयुष्य तुरुंगांत कैदी ह्मणवून जाणार. तारू, तूं विचार करून पहा. चांगल्या घराण्यांत जन्मलेला, देखणा, बुद्धिवान्, थोर मनाचा, असा जो मुलगा त्याला कैद्याची, गुन्हेगाराची स्थिति यावी ही किती दुःखदायक गोष्ट बरें? पायांत बेड्या घातलेल्या अंगांवर काळें कांबळें घेतलेला; सर्वांकडून धिक्! धिक्! ह्मणवून घेणारा खडीच्या; पाट्या उचलून नेणारा; असें त्याचें चित्र तूं आपल्या डोळ्यापुढें आण ह्मणजे—"

तारेच्या मनाला लाज वाटून तिनें मान खालीं घातली. "खोटें. अगदीं खोटें!" असें ती पुटपुटली; पण तिला अंतर्यामीं वाटलें कीं, ही हकीकत खरी असावी.

"अशा ह्या भयंकर शिक्षेपासून त्याची सुटका करण्याकरितां ज्याला

तूं आपल्या तिरस्काररूपी चाबकाचे फटके लगावलेस तो गृहस्थ पुढें सरसावला—"

" ह्मणजे ? तुह्मीं का त्याची सुटका केलीत ? " तिनें त्यांच्याकडे पाहून साश्चर्य म्हटलें.

शामरावः—" होय. मीं–मीं त्याची सुटका केली. मी पुढें झालों नसतों तर कायद्याच्या दृष्टीनें तो अपराधी ठरून या वेळीं तुरुंगामध्यें शिक्षा भोगीत रखडत पडला असता."

तारेचे डोळे भयानें विस्तृत झाले. ती अस्पष्ट बोलली, " आणि त्याला ही हकीकत माहीत आहे ? "

शामरावः—" नाहीं. त्याला माहीत नाहीं. अजून देखील त्याला ही हकीकत माहीत नाहीं."

तारेनें एक दीर्घ निश्वास टाकला. ज्यानें प्रभाकरास भयंकर कैदेच्या शिक्षेपासून वांचविलें त्या गृहस्थाशीं–शामरावांशीं तो किती उद्दामपणानें वागला, त्याचा तिरस्कार करून अपमानास्पद शब्द बोलला या गोष्टीची आठवण होतांच तिचें सर्वांग कंपित झालें. " ही हकीकत त्याला माहीत नाहीं ह्मणूनच त्याच्या हातून असा प्रकार घडला व तुह्मांला तो बोलूं नये तें बोलला. सबब तुम्ही त्याला क्षमा करा. " असें तारा आर्जवानें ह्मणाली.

शामरावः—" अंः ! त्या मुलाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं व त्याला क्षमा करण्याजोगेंही कांहीं नाहीं. त्या पोरावर राग कसला आणि क्षमा तरी कसली ? अंगाला डास चावला ह्मणून त्याच्यावर कोणी राग करीत नाहीं. त्याला वाटलें तर तो डास झाडून टाकतो अगर अंगावर राहूं देतो. त्याच्या मर्जीची गोष्ट. त्याचप्रमाणें या मुलाची गोष्ट आहे. मी त्याला अगदीं कस्पटाप्रमाणें समजतों. त्याचाच फक्त संबंध असतां तर त्याला केव्हांच शिक्षा झाली असती. मी मुळींच मध्यें पडलों नसतों. मीं त्याला वांचाविलें तें त्याच्याकरितां नव्हे; दुसऱ्याकरितां वांचविलें."

तारा दाराला टेंकून उभी राहिली. आपणास चोहोंकडून गच्च आंवळून

पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय
स्थापना
संग्रहालय शाखा

टाकणाऱ्या जाळ्याचे धागे क्षणोक्षणीं जास्त घट्ट होत आहेत असा तिला भास होऊं लागला.

शामराव पुढें म्हणाले, “ केवळ दुसऱ्याकरितां—म्हणजे तुझ्याकरितांच मीं त्याला वांचविलें. समजलें ! ”

तारा पुटपुटली, “ तर मग मी तुमची फार आभारी आहें.”

शामरावः—“ मीं पण तुझ्या आभाराची अपेक्षा केली नाहीं. अगर मीं जें काय केलें तें तुला समजावें अशी सुद्धां माझी इच्छा नव्हती. आतां जो हा प्रकार घडला तो घडला नसता, तर तुला किंवा त्याला देखील ही हकीकत समजली नसती. ती तशीच माझ्या मनांत मी मरेपर्यंत गुप्त राहिली असती. तूं माझ्यावर प्रेम करण्याचें जरी नाकारलें असतेंस, तरी ज्याला तूं आपलें अंतःकरण अर्पण केलेंस तो गृहस्थ जर तुझ्या योग्यतेचा असता, तरी देखील ही गोष्ट अगदीं गुप्त ठेवली असती. ” त्याबरोबर तारेचा चेहरा संतप्त झाला व तिचे डोळे लाल झाले. तथापि त्यांनीं केलेल्या सर्व कृत्यांची—उपकारांची तिला आठवण झाली. त्याबरोबर तिनें त्याच्याकडे पाहण्याचें टाळलें व खालीं मान घालून ती स्वस्थ उभी राहिली.

शामराव पुढें ह्मणाले, “ जर तो गृहस्थ तुला सुख लागू देणारा असता तर मी या भानगडींत मुळींच पडलों नसतों. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, तशी स्थिति नाहीं. हा मनुष्य—सरदार शिवराव असा आहे कीं, तो तुझी दुर्दशा उडवून देईल; इतकेंच नव्हे, तर तुझा सत्यनाश करून टाकील. तेव्हां त्याच्यापासून तुझें मला संरक्षण केलें पाहिजे व मी करणार ! माझी गुप्त गोष्ट उघडकीस आणण्यास या गृहस्थानेंच भाग पाडलें आहे.”

“ खरोखरच मी तुमची फार आभारी आहें.” इतकेंच तारा ह्मणाली. त्यांचे आपणावर व आपल्या प्रेमाच्या माणसांवर काय वजन आहे याची कल्पना तिला अजून झाली नव्हती. ती पुढें ह्मणाली, “ तुह्मीं माझ्याकरितां जें काय केलें तें आतां माझ्या लक्षांत आलें.

मला भारी राग आला होता ह्मणून मी तुह्मांला अतिशय टाकून बोललें, नाहीं नाहीं तें बोललें, याबद्दल मला फार वाईट वाटत आहें."

शामरावः—" तुला राग आला खरा. पण माझ्यानें राहवेना. तुझा पूर्ण नाश होत असतांना मीं स्वस्थ पहात रहावें ही गोष्ट माझ्या हातून झाली असती काय ? "

ती संत्रस्त होऊन ह्मणाली, " पण मी म्हणतें, माझा नाश कधींच झाला नसता व पुढेंही होणार नाहीं. त्याची तुह्मांला मुळींदेखील भीति नको. सरदार शिवरावांचा स्वभाव तुह्मांला चांगला माहीत नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. पण–पण—" ती मध्येंच ह्मणाली. " ती भाषाच काढूं नये हें बरें. मी जातें आतां. खरोखरच मी तुमची फार फार आभारी आहें. आमच्या हातून झालेल्या सर्व चुका माफ करा, एवढेंच तुह्मांला माझें सांगणें आहे."

शामरावः—" माफी करीन. सर्व अपराधांची तुला–तुम्हां सर्वांना क्षमा करीन. पण केव्हां ? तूं येथून परत घरीं जाशील व शिवरावांनीं ज्यासाठीं येथें बोलावून आणलें ती गोष्ट न करण्याचें मला वचन देशील तर ! काय ? ही गोष्ट तुला कबूल नाहीं ? ठीक आहे. तुला कबूल करावयास भाग पाडलें पाहिजे असेंच दिसतें. तारे, तुला पुन्हां एकवार निक्षून सांगतों कीं, 'तुझें शिवरावाबरोबर लग्न कदापि होऊं देणार नाहीं !' अशी मीं प्रतिज्ञा केली आहे. ती माझी प्रतिज्ञा मला पाळलीच पाहिजे. समजलें ? "

ताराः—" नाहीं. तुमच्या हातून आमच्या लग्नाला हरकत होणें शक्य नाहीं, एवढेंच मी सांगतें. "

शामरावः—" पण मीं म्हणतों कीं, मी हरकत करूं शकेन. मी त्या मुलाला कायद्याच्या कचाट्यांतून वांचविलें आहे. तथापि अजूनही त्याच्या नाश मला करतां येईल. तुला शंका येते होय ? तर मग हें पहा. " असें ह्मणून त्यांनीं आपल्या खिशांतून एक कागद काढला. " हा कागद पहा. हा बनावट दस्त तुझ्या भावानें तयार केला आहे. कायद्याच्या दृष्टीनें हा मोठा गुन्हा आहे व याबद्दल कडक शिक्षा सांगितली आहे.

बोल आतां; त्याचा बचाव अगर नुकसान करण्याचें माझ्या हातांत आहे कीं नाहीं सांग. ही तीक्ष्ण धारेची तलवार मी त्याच्या डोकीवर धरलेली आहे. ती खालीं टाकावी किंवा न टाकावी हें ठरविणें सर्वस्वीं तुझ्याकडे आहे. ”

ती सद्गदित कंठानें ह्मणाली, “ नका, नका. त्याला एवढें जीवदान द्या. त्याला वांचवा.”

शामरावः—“ वांचवीन. त्याला व तुला दोघांनाही वांचवीन. पण मी सांगतों त्याप्रमाणें ऐकशील तर वांचवीन. ‘शामराव, मी तुमच्याशीं लग्न करण्यास कबूल आहें’ एवढे शब्द बोल. मग त्याच्या जिवाला मुळींच अपाय होणार नाहीं ही खात्रीच! ”

ताराः—“ नाहीं. तसें होणें नाहीं. ”

शामरावः—“ कां बरें ? तूं माझा द्वेष करतेस कीं काय ? द्वेष कर, तिरस्कार कर, काय पाहिजे तें कर. मी माझा इरादा पार पाडल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. तुला सांगून ठेवतों. माझ्यासारख्याचें प्रेम विनाकारण कधींच कोणावर जडत नाहीं. त्या प्रेमाचा जोर इतका आहे कीं, त्या प्रेमानें प्रेम जिंकलेंच पाहिजे. तूं आतां माझा तिरस्कार करतेस. पण कालांतरानें—तुझें माझ्याशीं लग्न झाल्यानंतर—तूं अशी कांपू नकोस. तूं माझीच होणार व झालीच पाहिजेस—माझी तुझ्याविषयींची निष्ठा आणि प्रेम तुला कळूं लागेल व मग आपोआपच तूं—”

ती कंपित स्वरानें बोलली, “ नाहीं. तसें व्हावयाचें नाहीं. ”

शामराव संतापून म्हणाले, “ अजूनही तूं कबूल करीत नाहींस ! ठीक आहे. नको करूंस. पण लक्ष्यांत ठेव बरें ! ह्या शब्दांनीं तूं त्या मुलाचा नाश निश्चित करीत आहेस, त्याच्या डोकीवर तरवार टाकीत आहेस. एका वयोवृद्ध सद्गृहस्थाच्या आयुष्याचे राहिलेले दिवस कलंकानें काळे करीत आहेस—”

त्यावरोबर तिचा चेहरा उतरला. ती पट्दिशीं खालीं बसली व दीनवाण्या मुद्रेनें त्यांजकडे पाहूं लागली. शामराव तिच्याकडे पाहून ह्मणाले, “ हा पहा टेलिफोन. माझी सूचना जाण्याचा अवकाश कीं, पोलिस

शिपाई येऊन त्यांनीं ह्या मुलाला कैद करून नेलेंच म्हणून समज. हा खोटा दस्तऐवज त्यांच्या एकदां हातांत गेला, कीं, मग मात्र त्याची सुटका होणें अशक्य आहे. कारण पुरावाच तसा भरपूर आहे. असें म्हणून शामराव टेलिफोनकडे निघाले.

तारा उठून काकुळतीनें म्हणाली, " थांबा, थांबा. पोलिसांना सूचना देऊं नका. "

" तर मग माझें म्हणणें तूं कबूल करतेस ? "

तिनें हळूच उत्तर केलें, " मीं काय करावें म्हणतां ? त्यांचा बचाव करण्याला मीं काय केलें पाहिजे तें सांगा. "

तिच्या केविलवाण्या स्थितीनें शामराव कळवळले. तथापि त्यांनीं बाहेर तसें दाखविलें नाहीं. पण त्यांनीं आपला दुराग्रही सोडला नाहीं. ते म्हणाले, " अं: ! तें सांगायला काय उशीर ! मी तुमची अर्धांगी होण्यास कबूल आहें, असें म्हण म्हणजे झालें. उलटपक्षीं मीही तुला अभिवचन देतों कीं, तूं ज्या दिवशीं माझी भार्या होशील त्याच दिवशीं नव्हे त्या घटकेला हा कागद मी तुझ्या स्वाधीन करीन. ह्या कागदावर त्या मुलाचें भवितव्य अवलंबून आहे. हा कागद नष्ट करून टाकला कीं मग त्याला कसलीही भीति नाहीं. "

" मी तसें करतें तर ! " ती करोपकरणी बोलली. त्याबरोबर शामरावांच्या चेहऱ्यावर गुलाबी लाली चढली. " तारू, माझे प्रियतम तारू, मला–" असें म्हणून त्यांनीं आपले हात पुढें केले.

त्या बरोबर तारा घाबरून म्हणाली, " हां. माझ्या अंगाला हात लावूं नका. नाहीं तर मग माझ्याकडे कांहीं राहणार नाहीं. "

शामराव मागें सरून म्हणाले, " कबूल. कबूल. तूं मला वचन दिलें आहे तें तूं मोडणार नाहींस याची मला खात्री आहे. मी तेवढ्यानें संतुष्ट आहे. कालांतरानें–पण मी आतां जास्त बोलत नाहीं. "

नंतर त्यांनीं भुजंगास हाक मारली. त्याबरोबर भुजंग व त्याचे मागोमाग प्रभाकर असे दोघेही आंत आले. भुजंगास बाजूस ढकलून प्रभाकर संतापानें लाल होऊन शामरावाच्या पुढें उभा राहिला.

क्रोधातिशयानें त्याला बोलतां सुद्धां येईना. तो शेवटीं मुसमुसत म्हणाला, " शामराव, तुम्हीं हें काय आरंभिलें आहे? मला कशाकारितां कोंडून ठेविलें सांगा, सांगा अगोदर. "

शामराव शांतपणें पण तिरस्कारपूर्वक हांसून बोलले, " बाळ प्रभाकर, मी आतां नाहीं तुला कोंडून ठेवीत. "

पण त्यांच्या हांसण्यानें प्रभाकर जास्तच चिडला, " हांसायला आणखी लाज नाहीं वाटत? " असें म्हणून त्यानें आपली छडी उगारली. शामराव तसेच उभे होते. त्यांनीं छडीचा मार चुकविण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाहीं. छडीचा तडाखा त्यांच्या पाठीवर बसणार, इतक्यांत तारेनें जलदी करून त्याचा हात धरला व त्यास मागें ओढून ह्मटलें, " भाऊ, अरे भाऊ, शांत हो. माझें ऐक. शामरावांकडे चूक नाहीं. त्यांनीं केलें तें सर्व आमच्या बऱ्या करितांच केलें आहे. आपण परत घरीं जाऊं या. "

प्रभाकराला खरें वाटेना. "घरीं जाऊं या? म्हणजे? शिवरावांकडे नाहीं जायचें? ताई, तूं म्हणतेस तरी काय? तुझें तुला तरी कळतें काय? "

तारा किंचित् हांसून म्हणाली, " भाऊ, मला सर्व कळतें. तूं माझें आधीं नीट ऐकून घे. "

" काय ऐकून घे! ह्या दुष्ट लांडग्याचें–हरामखोराचें–कसायाचें ऐकून शिवरावांशीं बेइमानीपणा करायचा असेंच तुझें म्हणणें कीं नाहीं? छे, छे! ती गोष्ट होणें शक्य नाहीं. तुझ्या हातून असला नीचपणाचा प्रकार कधींही होणार नाहीं व तो होऊंही नये. "

तारेच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा चालल्या. तिनें शामरावांस म्हटलें, " एवढी दया करा आणि याला येथून बाहेर पाठवा. "

शामराव प्रभाकराजवळ जाऊन त्याचा हात धरूं लागले. पण प्रभाकर त्यांना झिडकारून मागें सरकून उभा राहिला–जणूं शामराव म्हणजे एक हिडिस, ओंगळ प्राणी आहे असें त्याला वाटलें.

शामराव म्हणाले, "अशा वर्तनानें तूं आपल्या बहिणीला जास्तच दुःख देत आहेस. ती म्हणते त्याप्रमाणें स्थिति आहे. तिचें मन बदललें आहे."

प्रभाकर कर्कश स्वरानें ओरडला, "खोटें, खोटें. सपशेल खोटें. तुम्हीं तिला भीति घालून व त्रास देऊन असें बोलण्यास लावलें असावें. पण तुमचा हा हेतु सिद्धीस जाणार नाहीं हें खूप समजा. तिच्यासारख्या अबलेला फसवून आणून भीति घालणें तुम्हांला सोपें गेलें खरें, पण शिव-रावांजवळ तुम्ही निराळ्याच प्रकारचें गीत गाल. तुमची कशी त्रेधा उडेल ती मी पाहीन. ताई, तूं चल माझ्याबरोबर. चल, आपण शिव-रावांच्या बिऱ्हाडीं जाऊं."

"तिकडे जाण्याची कांहीं गरज नाहीं. शिवरावच आतां इतक्यांत येथें येतील." शामराव शांतपणें म्हणाले.

तें ऐकून तारा दचकली. "छे, छे! आपण जाऊयाच." असें म्हणून ती दरवाजाकडे निघाली.

प्रभाकर तिला अडवून शामरावांस म्हणाला, "तुम्ही म्हणतां हें खरें ना? कीं खोटें! खरें असेल तर मग आम्ही येथेंच बसतों. येऊं द्या त्यांना. ते आले म्हणजे मग पहातो तुमची टकळी कशी काय चालते ती."

तथापि तारेच्या मनांत तेथें राहण्याचें नव्हतें. शामरावांच्या घरीं आपणांस शिवरावांनीं पाहूं नये असें तिला फार फार वाटत होतें. म्हणून ती जाण्याची गडबड करूं लागली. पण शामराव तिला म्हणाले, "तूं माझ्यावर विश्वास ठेवून येथेंच रहा. मी तुझ्या केंसाला सुद्धां धक्का लागूं देणार नाहीं. शिवरावांना येथें येऊन तुझ्या तोंडून सर्व हकीकत ऐकूं दे म्हणजे बरें."

"बरें तर," असें म्हणून तारा प्रभाकरास घेऊन खालीं बसली. प्रभाकर रागानें मुसमुसत होता. तो वरचेवर उसळी मारून शामरावांच्या अंगावर जाण्यास धांवे, पण तारा त्याला थांबवून त्याची समजूत घाल-ण्याचा प्रयत्न करी.

इतक्यांत जिन्यांतून कोणी धाड्धाड् करीत येत असल्याचा व रागानें कांहीं विचारीत असल्याचा शब्द त्यांच्या कानीं पडला. लागलीच खोलीचें दार खाड्कन् उघडलें व सरदार शिवरावांची स्वारी तेथें दाखल झाली.



# प्रकरण २३ वें.

—:०:—

## शिवरावांची निराशा.



शामरावांकडे बिलकुल न पाहतां शिवराव एकदम तारेजवळ जाऊन म्हणाले, "तारू, तूं येथें कां आलीस? मीं तुला बोरीबंदर स्टेशनावर उतरण्यास लिहिलें होतें. त्याप्रमाणें कां केलें नाहींस? आणि मला बोलावणें कां पाठविलेंस?"

पण तारा कांहींच बोलली नाहीं. ती दुःखपूर्ण व विवंचनायुक्त अशा डोळ्यांनीं त्यांच्या तोंडाकडे टकमका पाहूं लागली. तिची ती केविलवाणी मुद्रा पाहून शिवरावांस फारच आश्चर्य वाटलें.

उत्तरादाखल शामराव ह्मणाले, "शिवराव, तुम्हांला बोलावणें मीं पाठविलें होतें."

शिवरावांनीं एकवार त्यांजकडे पाहिलें. नंतर पुनः तारेकडे वळून ते म्हणाले, "तारू, तूं येथें कां आलीस? घरीं कांहीं कमीजास्त नाहीं ना? काकांची तब्येत कशी काय आहे? काय ग? तूं बोलत कां नाहींस?"

शामराव पुनः त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, "बाबाजीची प्रकृति चांगली आहे."

शिवरावः—"तारू, तुझ्याकारितां हे गृहस्थ का उत्तर देत आहेत? वकीलसाहेब, मीं आपणास कांहीं विचारलें नाहीं."

शामरावांचे बारिक डोळे द्वेषानें व मत्सरानें चमकूं लागले. ते ह्मणाले,

"मी जाणून आहें. पण ज्याअर्थी तुमच्या प्रश्नापासून तिला उघड उघड त्रास व दुःक होत आहे, त्याअर्थी उत्तर देण्याचें मी मजकडे घेत आहें."

शामरावाची स्वाभिमानपूर्ण मुद्रा पाहून शिवरावांना हंसूं आलें. त्यांनीं उत्तर केलें:—"तुम्ही तुमच्याकडे घेत आहां हें दिसतेंच आहे. पण मेहेरबानी करून गप्प बसाल तर फार उत्तम ! "

शामराव खट्टू झाले. लागलीच ते ह्मणाले:—" सरदारसाहेब, आपण माझ्या घरीं आहांत, एवढें लक्ष्यांत ठेवा."

" हें कबूल करण्याला मला फार वाईट वाटत आहे. त्यांतून ही बालिका येथें असावी याबद्दल तर मला अत्यंत खेद होतो आहे. " इतकें बोलून तारेस शिवराव ह्मणाले:—" चल, तारू, चल माझ्याबरोबर आणि काय हकीकत आहे ती सर्व मला सांग. "

ती दीनवाण्या मुद्रेनें ह्मणाली, " मला आपल्याबरोबर येतां येत नाहीं. आपण मला बोलावूं नका. "

" येतां येत नाहीं ! कां बरें ! " शिवराव साश्चर्य ह्मणाले. " मला —मला नाहीं तूं सांगत ! "

"आपण मला विचारूं नये हें बरें. आपण येथून निघून जा, एवढेंच माझें सांगणें आहे." तारा आर्जवानें बोलली.

शिवरावांना कांहींच उमज पडेना. ते नंतर प्रभाकराकडे पाहूं लागले. पण तो ह्मणाला:—" सरदारसाहेब, माझ्याकडे पाहून कांहीं उपयोग नाहीं. मला यांतील कांहीं सुद्धां माहिती नाहीं. तुमच्या पत्राप्रमाणें मी वागलों. मसजिद स्टेशनावर उतरा असें तुह्मीं लिहिलें होतें त्याप्रमाणें आह्मी त्या स्टेशनावर उतरलों. "

शिवरावः—" पण मीं कुठें त्या स्टेशनावर उतरण्यास लिहिलें होतें ! मुळींच नाहीं. बोरीबंदर स्टेशनावर उतरा, ह्मणून माझें पत्र होतें. त्याप्रमाणें मी वाट पहात तेथें उभा होतों; पण तुह्मी दिसला नाहीं तेव्हां मला वाटलें तुह्मी माझ्या बिऱ्हाडीं आला असाल ह्मणून तिकडे गेलों तर तेथेंही तुमचा पत्ता नाहीं. इतक्यांत एक इसम तेथें आला आणि त्यानें

सांगितलें कीं, तुह्मी दोघेंही येथें आहांत. ह्मणून मी इकडे आलों. पण तुह्मी येथें कां आलां ?"

प्रभाकर त्वेषानें शामरावाकडे बोट करून ह्मणालाः—"यांना विचारा त्याचा खुलासा."

शिवराव शामरावाकडे पाहून बोललेः—"काय हो, वकीलसाहेब, हें काय गौडबंगाल आहे ? ह्या मुलीला फसवून, भुलथाप देऊन, तिच्या इच्छेविरुद्ध तुह्मीं तिला येथें आणलें असेंच गृहीत धरावें ना ?"

शामरावः—"वाटेल तें गृहीत धरण्यास तुह्मांला मोकळीक आहे. मला विचाराल तर मी सांगतों कीं, तुह्मीं तिच्याकरितां जो बेत रचिला होता तो तिला मोडायला लावण्याच्या कामीं माझेंच अंग आहे. तिच्या चुलत्याचा स्नेही व हितचिंतक या नात्यानें तुह्मी ज्या मार्गाला तिला फसवून नेणार होता त्या मार्गांत असलेलें संकट तिला दाखवून द्यावें ह्मणून मीं तिला येथें आणलें आणि तुमच्या इच्छेप्रमाणें करणें अगदीं अशक्य आहे असें मीं तिला स्पष्ट दाखवून दिलें. तुह्मीं तिच्याशीं जो कार्यक्रम ठरविला होता, नव्हे तिच्यावर जो कार्यक्रम लादणार होतां, तो पाळण्याचें ती साफ नाकारीत आहे. तुमच्याबरोबर येण्याची तिची खुषी नाहीं. ती—"

शिवराव दरडावून बोललेः—"पुरे पुरे. तुमची चर्पटमंजरी पुरे झाली." नंतर तारेला त्यांनीं विचारलें, "हे सांगतात हें खरें काय ?"

किंचित् वर पाहून ती अस्पष्ट पुटपुटलीः—"होय. मला–मला आपल्याबरोबर येतां यत नाहीं."

आपण स्वप्नांत आहोंत, कीं जागें आहों अशी शंका वाटून शिवराव भ्रमिष्टासारखें चोहोंकडे पाहूं लागले. थोड्या वेळानें ते म्हणालेः—"हा काय प्रकार आहे, याचा उलगडा करून सांग. तारू, माझी स्थिति आतां कशी झाली याचा विचार कर. तुझी उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत मी बसलों होतों, हें तुला पूर्णपणें माहीत आहेच. असें असतां तुला ह्या घरीं मीं पहावीं व तुझ्याच तोंडून पूर्वीं ठरलेला बेत बदलल्याचें ऐकावें म्हणजे काय ? बरें, तेंही अगदीं एकाएकीं आणि एवढें सुद्धां कारण नसतां—"

तारा दीर्घ निश्वास टाकीत म्हणालीः—" तें सगळें खरें. पण तशी स्थिति झाली आहे खरी. आपण आतां येथून जाल आणि मला येथें राहूं द्याल तर बरें होईल. एवढी मेहेरबानी माझ्यावर करा ! "

त्याबरोबर शिवरावांचा चेहरा उतरला. ते प्रभाकराकडे वळून सद्गदित कंठानें म्हणालेः—" बाळ प्रभाकर, तूं तरी मला सोडून जाऊं नकोस. माझ्या घरीं चल. त्याबरोबर प्रभाकर हळू हळू बाहेर आला. नंतर शिवराव शामरावांस म्हणाले, " वकीलसाहेब, तुमच्या बोलण्यावरून मला असें वाटतें कीं, या सर्व घोटाळ्याचें बीज तुमच्याजवळ आहे. तेव्हां आतां सर्व फोड करून काय हकीकत आहे ती मला सांगा. यांत गुपचुप कांहीं नको. प्रतारणा अगर थट्टा मला खपणार नाहीं. काय असेल तें स्पष्ट सांगा. "

शामरावांनीं आपलें ओंठ चावले, " मीं पूर्वीं तुम्हांला जी हकीगत सांगितली त्यापेक्षां विशेष कांहीं नाहीं. थोडीशी सांगावयाची आहे तेवढी सांगून टाकतों. मग तारूच त्याच्या खरेखोटेपणाचें समर्थन करील. ती तुमच्या पत्राप्रमाणें व अटकळीप्रमाणें तुमच्या बिऱ्हाडीं न येतां माझ्याकडे आली याचेंच कारण तुह्मांला पाहिजे आहे; होय कीं नाहीं ? ऐका तर मग. या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. तें हेंच कीं, ती माझी भावी वाङ्निश्चित भार्या आहे ह्मणून ! "

ह्या उत्तरानें शिवराव चिडून बेफाम होतील असें शामरावांस वाटत होतें. पण त्याची निराशा झाली. शिवराव शांतवृत्तीनें त्यांजकडे पाहून बोलले, " शामराव, तुह्मी फार हुषार वकील आहांत असें लोक बोलतात आणि या घटकेपर्यंत मला त्याबद्दल शंका वाटत नव्हती. पण आतां मात्र वाटूं लागली आहे. तुमचें म्हणणें मी कबूल करीन असें तुह्मांला वाटत असेल तर मग तुह्मी अगदीं मूर्ख—बेअक्कल आहांत असेंच मी समजतों. "

ह्या शब्दांनीं—वाक्प्रहारांनीं—शामरावांच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचली व त्यांचा चेहरा संतापानें लाल भडक झाला. ते गुरगुरत ह्मणाले, " तारूला विचारा पाहिजे तर आणि खात्री करून घ्या."

" ठीक आहे. " नंतर तारूकडे वळून ते ह्मणाले, " तारू, हे ह्मणतात तर मी तुलाच विचारतों. सांग, ही गोष्ट खरी आहे काय ? "

" होय. खरीच आहे." ती कष्टानें ह्मणाली.

आतां मात्र शिवरावांची पूर्ण निराशा झाली. त्यांचा चेहरा निस्तेज दिसूं लागला. ते सारखे तारेकडे निश्चल दृष्टीनें पहात राहिले. थोड्या वेळानें ते ह्मणाले, " तारू, माझ्याकडे एकवार पहा. मी तुझें संरक्षण करण्यासाठीं येथें आलों आहें, हें तूं लक्ष्यांत घे. हे वेडेपणाचे उद्गार तुझ्या तोंडांतून काढण्याकरितां या गृहस्थानें कांहींही केलें असलें तरी मी त्याचें उसनें फेडून घेईन. तारू, तारूग ! मला वेड लागावें, माझें माथें फिरावें, अशी तुझी खरोखर इच्छा नसेल तर माझ्याकडे एकदा पहा आणि हें सर्व खोटें आहे असें म्हण. "

त्यांच्याकडे उद्विग्नतेनें व कष्टानें पाहून तारा ह्मणाली, " खोटें नाहीं. खरें आहे."

" तूं अगदीं आपखुषीनें हें सांगतेस ? मला नाहीं वाटत."

शेवटचा घाव घालण्याला पुरेल इतकें धैर्य यावें ह्मणून तिनें आपल्या हातांनीं डोळे घट्ट झांकून घेतले. नंतर ती बारीक आवाजांत ह्मणाली, " होय. मी आपखुषीनेंच सांगतें."

शिवराव तिच्या तोंडाकडे टकामका पहात राहिले. त्यांचें देहभान नाहींसें झालें. शामरावांच्या पुढील भाषणानें ते शुद्धीवर आले.

शामराव तिरस्कारानें ह्मणाले, " सरदारसाहेब, या आतां इकडे. तुमच्या प्रश्नाचें उत्तर तुह्मांला मिळालें व तुमच्या शंकेचेंहि निवारण झालें. आपण ह्या बालेला आतांपर्यंत दुःख व त्रास दिला तेवढा पुरे. याउपर तरी तुह्मी तिला सुखानें राहूं द्या, असें मी तिचा भावी पति या नात्यानें तुह्मांला सांगतों."

परंतु शामरावांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां शिवराव तारेला ह्मणाले, " तारू, मी आतां तुला अगदीं शेवटचें विचारतों. अगदीं शेवटचें हं ! हें सर्व खरें ना ? ह्या गृहस्थाच्या नादीं लागून तूं माझ्याशीं बेइमानपण

केलास ना ? मला फसविलेंस काय ? त्याच्याशीं लग्न करण्याचें तूं कबूल केलेंस काय ? ”

“ होय होय. खरेंच माझें त्यांच्याशीं लग्न होणार आहे.” असें बारीक व स्पष्ट आवाजांत उत्तर आलें.

शिवरावः—“ बस् झालें. आपल्या राजीखुषीनेंच सर्व ठरलें, असें तूं मला सांगतेस; पण मला नाहीं हें खरें वाटत. ह्या गृहस्थाचा तुझ्यावर कांहीं तरी दाब आहे असें मी समजतों. पण त्याची कल्पना मला होत नाहीं. तो दाब कोणत्या प्रकारचा आहे हें तूं मला सांगत नाहींस. बरें, त्यांना विचारावें तर ते कांहीं भलतेंच सांगतील. खरें सांगणार नाहींत; पण इतका वेळ झालें तेवढें बस्स् आहे. तारू, तूं मला फसविलेंस. तूं ही गोष्ट माझ्यापासून चोरून ठेविलीस. ठीक आहे. ठेव. ईश्वर तुला क्षमा करील. मला नाहीं क्षमा करवत. इतःपर तुझें नांव घेणें नको.”

इतकें बोलून शिवराव खोलींतून बाहेर पडून खालीं जाण्याकरितां निघालें. प्रभाकर त्यांना अडविण्याकारितां पुढें झाला. व ‘ शिवराव, शिव-राव ’ असें ह्मणाला. तें ऐकून शिवराव क्षणमात्र उभे राहिले व प्रभाक-राच्या खांद्यावर हात ठेवून ह्मणाले, “ वा ! प्रभाकरा. तूं तिच्याकडे जा. ती माझ्याशीं खोटें बोलली. तिच्या व त्या गृहस्थाच्या दरम्यान कांहीं तरी गुप्त प्रकार—भानगड आहे. मी आतां पुनः तिचें तोंड पहाणार नाहीं. ” इतकें बोलून त्यांनीं प्रभाकरास बाजूला ढकलून दिलें व ते जिना उतरूं लागले. प्रभाकर त्यांचें आर्जव करणार होता; पण त्याला तशी संधिच मिळाली नाहीं.

# प्रकरण २४ वें.

——:o:——

## संकटांत मदत.

शिवराव निघून गेल्यानंतर दरवाजा बंद झाला. तेव्हां मात्र तारेला जी थोडी आशा वाटत होती तीहि नष्ट झाली. तिचें अंतःकरण दुःखभारानें जणूं गळून पडत आहे असें तिला वाटलें व आपलें आतां पुढें काय होणार हें बहुतेक ठरल्यासारखेंच आहे, तें बदलणें दुरापास्त आहे, अशी तिच्या मनाची खात्री होऊं लागली. तिनें नंतर धीर धरून शामरावास म्हटलें, "तुह्मी तर आपल्या इच्छेप्रमाणें माझ्याकडून वदवायला लावलें. आतां मी व भाऊ परत घरीं जातों, पण तेथें गेल्यावर काका काय ह्मणतील, बाई काय म्हणतील याचीच मला भीति वाटते." त्यावर शामरावांनीं उत्तर दिलें कीं, "त्यासंबंधानें बिलकुल काळजी करण्याचें कारण नाहीं. मी साबाजीस पत्र पाठवून त्यांत तुह्मी व प्रभाकराची वाटेंत नदीकिनारीं गांठ पडली व त्यांना तसेंच मी मुंबईस घेऊन आलों, उद्यां परत येतो कांहीं काळजी करूं नये, वगैरे मजकूर लिहिला आहे." तें ऐकून तारेचें मन किंचित् स्वस्थ झालें. नंतर शामरावांनीं जेवणाची तयारी करविली व त्या दोघांस त्यांनीं जेवावयास बसविलें. पण त्यांना मुळींच जेवण जाईना. तथापि शामरावांच्या आग्रहास्तव त्यांनीं अळेंबळें चार घास खाल्ले; नंतर शामराव त्या दोघांस बरोबर घेऊन चंद्रगडास येण्याकरितां सकाळच्या गाडीनें निघाले. तारा जी एका कोपऱ्यांत जाऊन खालीं मान घालून बसली ती त्यांचें उतर-

ण्याचें स्टेशन येईपर्यंत बिलकुल बोलली नाहीं, कीं जाग्यावरून हालली नाहीं. प्रभाकरहि रागानें व संतापानें फुणफुणत होताच. शामरावांनीं त्याला कांहींच हकीकत कळूं दिली नव्हती ह्मणून तो जास्तच चिडला होता. अर्थातच तोहि कांहीं बोलला नाहीं. अशा स्थितींत तीं तिघेजण आगगाडींतून चंद्रगडास येऊन पोंचलीं.

तारेला पाहतांच साबाजीस अत्यानंद झाला. त्यानें तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हटलें, "बाळ, तारू, तुह्मी दोघेंही घरीं न सांगतां निघून गेला. आह्मी किती काळजींत होतों. पण तूं अशी काळवंडलेली व थकलेली कां दिसतेस ?"

शामराव पुढें होऊन ह्मणाले, "माझ्याकडेच चूक आहे. त्या दोघांकडे कांहीं नाहीं. मी नदीकिनाऱ्यावरून मुंबईला जाण्याकरितां स्टेशनाकडे निघालों होतों. हीं दोघें फुलें तोडीत असल्याचें दिसलें. तसेंच त्यांना टांग्यांत बसवून मुंबईला घेऊन गेलों. म्हटलें दोन दिवस तेथील प्रदर्शन यांना दाखवून आणावें. मीं पत्रांत सर्व हकीकत लिहून कळविलीच आहे. याबद्दल माफी असावी." नंतर तारेजवळ आपण लग्नाची गोष्ट काढली, तिनें रुकारही दिला वगैरे मजकूर त्यांनीं साबाजीस सांगितला. तें ऐकून म्हाताऱ्यास फार आनंद झाला व त्यानें तारूच्या हनवटीस हात लावून म्हटलें, "खरें कीं काय?" पण ती कांहींच बोलली नाहीं. ती मान खालीं घालून उभी राहिली. साबाजीस वाटलें ती लाजून कांहीं बोलत नसावी. तेव्हां तो ह्मणाला, "अरे वा: ! इतकें लाजायला कशाला हवें ! फार चांगली गोष्ट आहे. तुमचें एकमेकांवर प्रेम आहे तर मी कशाला नाहीं ह्मणूं ? तारू, ईश्वर तुला सुखी राखो. शामराव, तुमचें नशीब चांगलें, ह्मणून तारूसारखी सुशील, सुलक्षणी व सुस्वरूप बायको तुह्मांला मिळाली. तुह्मां दोघांना देव उदंड आयुष्य देवो."

शामरावांची मुद्रा हर्षभरानें प्रफुल्लित झाली व त्यांचे डोळे आनंदानें चमकूं लागले. तारूला आपण फुलासारखी वागवूं, तिला जीव कीं प्राण करूं, तिला काडीमात्र दुःख देणार नाहीं, वगैरे अश्वासनें देऊन शामराव भावी सुखाचें मनोराज्य करीत तेथून निघून गेले.

तिकडे शिवराव जिना उतरून खालीं आले व रस्त्यानें चालले. पण दारू पिऊन झिंगलेल्या मनुष्याप्रमाणें त्यांच्या चालण्यांत मेळ नव्हता. एकदां ह्या बाजूस यावें, एकदां त्या बाजूस वळावें, वरचेवर कशाला तरी ठेंचळावें, असें करीत ते निघाले. कोणकिडे जावयाचें हें न ठरवितां ते किती तरी वेळ तसेच रस्त्यानें चालले व शेवटीं एकदांचे आपल्या बिऱ्हाडीं येऊन पोंचले. तेथें गेल्याबरोबर त्यांना तारेची आठवण झाली व तारा आतां आपल्या हातची खास गेली, असें वाटून त्यांचें अंतःकरण दुःखभरानें विव्हल झालें. त्यांनीं एका आराम खुर्चीवर अंग टाकलें व 'हुश्श' करून एक दीर्घ निश्वास सोडला. अनेक विचारांनीं त्यांचें डोकें भणभणून गेलें. शेवटीं त्यांनीं असा सिद्धांत काढला कीं, तारा कांहीं कां ह्मणेना, तिनें आपणावरून मन काढलें यांत तिचा कांहीं तरी निराळा अंतस्थ हेतु असावा. कारण शामरावावर तिचें प्रेम खास नाहीं, हें ते पूर्णपणें जाणून होते. मग तिनें असें कां सांगितलें, याचा उलगडा त्यांना होईना. हें गूढ उकलण्यास कांहीं तरी साधन मिळावें ह्मणून ते विचार करीत किती तरी वेळ तसेच आरामखुर्चीवर पडून राहिले. पण तसें साधन त्यांना मिळेना. त्यांच्या बरोबरीच्या एकाद्या गृहस्थानें तिला आपल्यापासून हिरावून नेलें असतें तर ती गोष्ट त्यांना एक वेळ सहन झाली असती. पण शामरावासारख्या कसायाच्या हातांत ती दीन गाय पडावी, याचेंच त्यांना मनस्वी वाईट वाटलें. सरते शेवटीं ते खुर्चीवरून गडबडीनें उठले. त्यांचा कांहीं तरी ठाम विचार झाला असावा असें दिसलें. मुंबईत राहून आतां आपणास चैन पडणार नाहीं. सबब कोठें तरी बाहेर गांवीं जाऊन रहावें म्हणजे तितका विसर पडेल, असें त्यांना वाटलें. त्याबरोबर ते किंचित् हांसले. आपल्या छातीवर निश्चितपणें विश्रांति घेणारें तें सुंदर व नयन मनोहर मुख, आपल्या डोळ्यांमध्यें प्रेमप्रकाशाचें सिंचन करणारे ते अनुपम रम्य डोळे, आपल्या कर्णपुटांत प्रेमाची कबुली देणारा तो मंजुळ व सुकुमार आवाज, या सर्वांचा आपणांस कधीं तरी विसर पडणें शक्य आहे काय, असें मनांत येऊन त्यांचें त्यांनाच हांसूं आलें. नंतर ते आपल्या बिऱ्हाडांतून बाहेर व एका

व्हिक्टोरियांत बसून बोरीबंदर स्टेशनावर गेले व तेथून आगगाडीनें चंद्रगडला येऊन पोंचलें.

ती संध्याकाळची वेळ असल्यानें हवा खाण्याकरितां वाड्यांतील बायकामंडळी सज्जावर येऊन बसली होती. त्यांतच शिवरावांच्या मातुःश्री—माईसाहेब व चंद्रिका ह्याही होत्या. चंद्रिकेच्या गालावर किंचित् स्मित झळकत होतें. पण तिच्या काळ्याभोर व विशाळ डोळ्यांमध्यें एक प्रकारची खिन्नता दिसत होती. तथापि एकंदर चर्या शांत व प्रसन्न अशी होती. याच्या अगदीं उलट माईसाहेब दिसत होत्या. त्यांची मुद्रा काळजीनें काळवंडलेली, फिकट व चिंतातुर अशी होती. त्या जवळच्या बायकांच्या प्रश्नास उत्तरें देत, तरी त्यांची नजर वाड्याच्या आसमंतात् भागाकडे लागलेली होती. गाडीच्या चाकांचा अगर घोड्याच्या टापांचा आवाज ऐकला कीं, त्या दचकून उठत व टक लावून पहात. शिवराव आले नाहींत असें समजतांच त्या खिन्न होऊन सुस्कारा टाकीत व पुनः खालीं बसत. चंद्रिका जवळच असून हा सर्व प्रकार किंचित् मंद हास्य करून पहात होती. माईसाहेबांप्रमाणें तिच्याहि मनाला स्वस्थता वाटत नव्हती. तथापि तिला सर्व हकीकत माहीत होती. तिला थोडी भीति वाटे तरी किंचित् आशाही वाटे. पण माईसाहेबांना कांहींच प्रकार माहीत नव्हता. ह्मणून त्यांना सर्वच गोष्टींचें भय वाटत होतें. चंद्रिका त्यांच्याजवळ येऊन लडिवाळपणें ह्मणाली:—" म्हटलें, विचारूं का ? आज चेहरा इतका म्लान कां दिसतो आहे ? कसली तरी काळजी असावी असें दिसतें."

माईसाहेब:—"काय सांगूं बाई ? मला कांहीं समजत नाहीं. अंधारांत सांपडल्याप्रमाणें माझी स्थिति झाली आहे. कांहीं तरी बरावाईट प्रकार झाला असावा अगर लवकरच होणार आहे असें माझ्या मनाला वाटत आहे. शिवराव परवां एकाएकींच निघून गेला. त्याचेंच मला भय वाटतें. कधीं परत येतो कुणास ठाऊक ? "

" मग त्याबद्दल इतकी कशाला काळजी करायची ? येतील आज संध्याकाळपर्यंत. " चंद्रिका हांसून बोलली.

माईसाहेब:—" तूं असें कशावरून म्हणतेस ? "

चंद्रिका आपल्या कोंपरांतील वांकीची फिरकी बसवीत म्हणाली, " ते आज तिनीसांजपर्यंत येतील, असें माझ्या कानांत कोणसें कुजबुजल्यासारखें वाटलें. माझें ह्मणणें खोटें व्हायचें नाहीं, पहावें पाहिजे तर. तिकडे पाहिलें का ? " असें ह्मणून तिनें खालच्या दरवाजाकडे हात केला. तर खरोखरच शिवराव येत असल्याचें माईसाहेबांना दिसलें.

शिवरावांची मुद्रा नेहमींप्रमाणें आनंदी व टवटवीत नसून म्लान दिसत होती. त्यावरून कांहीं तरी कमजास्त प्रकार झाला असावा असें माईसाहेबांनीं ओळखलें व त्यांच्या मनाला एक प्रकारचा धक्का बसला.

शिवराव वाड्यांत आले. पण इकडे तिकडे न पाहतां व कोणाशींही न बोलतां थेट जिना चढून माडीवरील आपल्या खोलींत गेले आणि हुजऱ्यास हाक मारून, मला रात्रीच्या गाडीनें पुनः जायचें आहे, सबब ट्रंक, वळकटी तयार करून ठेव असा त्यांनीं हुकूम केला.

नंतर खोलीचें दार बंद करून घेऊन इकडून तिकडे ते खेपा घालूं लागले. तारेची व त्यांची प्रथम बकुल वृक्षाखालीं गांठ पडली. त्या रात्रीं ते या खोलींत आले तेव्हां भिंतीवर टांगलेली मेनकेची तसबीर त्यांना तारेच्या सौंदर्यापुढें किती तरी कमी प्रतीची वाटली होती. पण तीच तसबीर त्या तारेनें आपला असा विश्वासघात केला ह्मणून आपणास आतां हिणवीत आहे असा त्यांना भास होऊं लागला. टेबलावरील सुंदर पेल्यांत तारेनें तोडलेलीं गुलाबाचीं, मधुमालतीचीं वगैरे अनेक जातीचीं सुंदर फुलें ठेवलेलीं होतीं. तीं त्यांनीं तेथून काढून खिडकीच्या बाहेर फेंकून दिलीं. इतक्यांत त्यांच्या कानावर तिसऱ्या मजल्यावरील मधुर स्वरमिश्रित पेटीचा मंजुल आवाज पडला. त्याबरोबर ते दचकले. त्यांची प्रिय भगिनी कुमुदिनी इचा तो आवाज ! त्यांना अत्यंत दुःख व त्रास झाला असल्यामुळें तिची आठवण त्यांना इतका वेळ झाली नव्हती, पण तो कर्णमधुर ध्वनि ऐकल्याबरोबर ते गडबडीनें तिजकडे निघून गेले.

शिवरावांची कष्टी मुद्रा व खोल गेलेले डोळे पाहून कुमुदिनीनें पेटी

बंद केली व घाबरून म्हटलें, " दादा, तूं असा कां दिसतोस ? काय हकीकत आहे ? तुला झालें तरी काय ? "

" कांहीं नाहीं. तूं आपली पेटी वाजीव." इतकेंच शिवराव बोलले. त्यांचा दाटलेला आवाज ऐकून कुसुदिनीला सखेदाश्चर्य वाटलें. पण कांहीं न बोलतां ती पेटी वाजवूं लागली. थोडक्याच वेळानंतर शिवराव दोन्ही हातांनीं डोळे घट्ट धरून हुंदके देत आहेत, असें तिला दिसलें. त्याबरोबर ती पेटीवरून उठून त्यांच्याजवळ गेली व काकुळतीस येऊन ह्मणाली, " दादा, अरे दादा, हें तूं काय आरंभिलें आहेस ? काय झालें तें आतां तरी सांग. "

शिवरावांचा कंठ दाटून आला. ते सद्गदित होऊन ह्मणाले, " ताई, काय सांगावचें त्यांत ? हा प्रकार कांहीं नवीन नाहीं. पूर्वींपासून चालत आला आहे. पुराणांत सुद्धां अशा गोष्टी पुष्कळ आहेत. प्रेम करून मी फसलों. त्या प्रेमाकरितां मी आपलें सर्व सौख्य व मनाची शांतता देण्यास तयार झालों आणि शेवटीं हरलों. त्यामुळें माझ्या मनाला जबरदस्त धक्का बसला आहे आणि साहजिकच मला त्याबद्दल कांहीं वेळ वाईट वाटणार. "

" दादा, मला असें मोघम, उडवाउडवीचें सांगूं नकोस. खरें असेल तें अगदीं अंतःकरण मोकळें करून सांग. "

" पण ताई, अंतःकरण असलें तर तें मोकळें करून सांगायचें ना ? माझें अंतःकरणच नाहींसें झालें आहे. कधीं नाहींसें झालें, त्याला किती महिने झाले कीं वर्षें झालीं, हें देखील मला सांगतां येत नाहीं. त्यांत विशेष आश्चर्याची व दुःखाची गोष्ट ही कीं, जिला मी पावित्र्याची पुतळी, सज्जनपणाची मूर्ति व प्रेमळपणाची खाण समजत होतों तिनेंच त्या माझ्या अंतःकरणास मातींत फेंकून दिलें ! पायाखालीं तुडवून त्याची विटंबना केली! शिव ! शिव ! ताई, मी आतां जगाला तोंड तरी कसें दाखवूं ? " शिवरावांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा चालल्या.

" दादा, असा नकोस कष्टी होऊंस. तुझ्या ह्या बोलण्यानें माझ्या हृदयाला घरें पडत आहेत. तूं कुणासंबंधानें बोलत आहेस हें ? "

" ताई, ह्या साऱ्या जगांत ती एकटीच आहे. दुसऱ्या तिसऱ्या स्त्री-संबंधानें मी कशाला बोलूं ? "

" चंद्रिकेची का ही हकीकत ? " कुमुदिनी शंकित वृत्तीनें ह्मणाली.

" छे, छे ! ताई, चंद्रिकेची नव्हे. मी तारेसंबंधीं बोलत आहें. "

" तारूनें काय केलें, दादा ? "

" ताई, तिनें काय केलें हें सर्व मी तुला सांगत बसत नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, तिचें माझ्याशीं आज संध्याकाळच्या गोरज मुहूर्तावर लग्न होण्याचें ठरलें होतें आणि त्याऐवजीं मी हा येथें असा दुःखी कष्टी होऊन बसलों आहें ! "

कुमुदिनीस अतिशय आश्चर्य वाटलें. " तारूशीं तुझें लग्न ? त्या साबाजीच्या तारूशीं तूं लग्न करून घेणार होतास ? दादा, हें तुला चांगलें कां ? बरीच बायको हुडकून काढलीस ह्मणायची ! आणि आह्मांला कुणाला न कळवितां तूं लग्न करून घेणार होतास ना ? हा तुझा शहाणपणा वाटतें ? "

शिवराव खोंचून बोलले, " शहाणपणाशीं मला काय करावयाचें आहे ? माझें तिच्यावर निरतिशय प्रेम बसलें आहे एवढें खरें. तूं याला वेडेपणा ह्मण, अविचार ह्मण, काय पाहिजे तें ह्मण ! अजून देखील–तिनें मला झिडकारलें आहे तरी सुद्धां माझें तिच्यावरचें प्रेम कायम आहे. अतिशय वाईट तें हेंच ! माझें सर्व जिणें आतां फुकट गेलें असें मी समजतों. एखादें जहाज समुद्रांतून मजेनें जात असतां मध्येंच एकाएकीं खडकावर आपटून त्याचे सहस्रशः तुकडे व्हावेत त्याप्रमाणें आजपर्यंत आनंदांत गेलेल्या माझ्या सर्व आयुष्याच्या चिंधड्या उडाल्या. आतां माझा सर्व ग्रंथ आटपला. "

थोडा वेळ दोघेंही स्वस्थ बसलीं. नंतर कुमुदिनी ह्मणाली, "पण दादा, तिची पुढें वाट काय ? "

" वाट कसली ! ती खुशाल आहे. तिला काय झालें आहे ? बायकांची उपजच तशी केलेली असते. तूं तेवढी ह्या नियमाला अपवाद आहेस." असें शिवराव तिजकडे प्रेमानें पाहून ह्मणाले.

कुमुदिनी कष्टी होऊन ह्मणाली, " पण–पण–दादा, तिचें तुझ्यावर खरोखरीच भारी प्रेम होतें. मला मागचें सारें आठवतें. तुझें नांव निघालें कीं, तिचा चेहरा कसा प्रफुल्लित होई, तिचे डोळे कसे चकाकत, लाजून ती कसे मुरके मारी, हें सर्व मला चांगलें आठवतें. खरेंच दादा, तिचें तुझ्यावर प्रेम होतें. "

" असेल कदाचित्. आणि हल्लीं नाहीं कीं काय ? आतां सुद्धां तिचें माझ्यावर इतकें प्रेम आहे कीं, ज्या दिवशीं तिचा व माझा विवाहसमारंभ व्हावयाचा त्याच दिवशीं भलताच एक गृहस्थ मध्यें घुसला व त्याचें तिच्याशीं लग्न ठरलें आणि तेंही तिच्या कबूलीनें ? "

" भलताच गृहस्थ ? ह्मणजे कोण दादा ? " कुमुदिनीनें साश्चर्य विचारिलें.

" आहे एक शामराव ह्मणून. तो वकीलीचा धंदा करतो. पण सभ्यपणाची व त्याची मुळी ओळख देखील दिसत नाहीं. ताई, जिच्याशीं माझें लग्न व्हावयाचें ठरलें ती ह्या शामरावाच्या घरांत बसलेली ! आणि मी तेथें जातों तर मला कळलें कीं, आमचा पूर्वीं ठरलेला सर्व बेत फिसकटून त्या शामरावाशीं तिचें लग्न ठरलें आणि हें सर्व तिनें आपल्या तोंडानें कबूल केलें ! "

" पण याचें कारण ? "

" कारण कांहीं नाहीं. " शिवराव आवेशानें उठून खोलींतून इकडून तिकडे खेपा घालूं लागले. " आणि मीही विचारण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. प्रत्यक्षच सर्व प्रकार पाहिला मग आणखी कारण कशाला विचारीत बसूं ? "

थोड्या वेळानें ती ह्मणाली, " अरेरे ! भोळी बिचारी ! शामराव तेथें होते ह्मणून ती असें बोलली असेल. पण खरोखरी—"

" समजलों. समजलों. तूं काय ह्मणणार आहेस तें. पण मी आतां तिचा नादच सोडून देणार. शामरावांच्या धाकामुळें ती असें बोलली असेल असें तुझें ह्मणणें होय कीं नाहीं ? पण जी दुसऱ्याच्या पूर्णपणें आधीन होऊन मला दिलेलें वचन मोडण्यास तयार झाली, त्याचा स्वी-

कार करून मला झिडकारून देण्यास उद्युक्त झाली. जिनें माझा हिरमोड केला त्या स्त्रीशीं मी आतां कधींतरी लग्न करूं शकेन काय ? छे, छे ! तूं ती गोष्ट मनांत सुद्धां आणूं नकोस. जाणे आणि तो शामराव जाणे, तुह्मी दोघें काय पाहिजे तें करा असें ह्मणून मी तेथून निघून तुझा निरोप घ्यावा ह्मणून इकडे आलों."

"माझा निरोप घ्यायला! ह्मणजे तूं कुठें जाणार आहेस कीं काय!" कुमुदिनीनें आश्चर्यानें विचारिलें.

"होय, मी जाणार आहें. पण कुठें जायचें हें मलाही माहीत नाहीं व मी त्याची काळजीही करीत नाहीं. जातों झालें कुठें तरी! जिकडे वाट दिसेल तिकडे येतों तर, ताई." असें ह्मणून शिवराव निघाले.

त्यांच्या कोटाचें टोंक धरून कुमुदिनी ह्मणाली, "दादा, माझें ऐक, तूं जाऊं नकोस. तूं गेलास ह्मणजे आम्हां सर्वांना किती काळजी लागून रहाते तें तुला माहीत नाहीं. तूं असलास म्हणजे मला किती बरें वाटतें. माझा वेळ कसा आनंदांत जातो. तूं नको जाऊंस." असें ह्मणून ती पुष्कळ गयावया करूं लागली. पण शिवरावांचा एकदां निश्चय झाला तो कायमच झाला. तिच्या हातून आपले कपडे कसेबसे सोडवून घेऊन ते खोलींतून बाहेर पडले.

कुमुदिनीला फार दुःख झालें. ती ओक्साबोकशीं रडूं लागली. थोडक्यांच वेळांत तिनें आपलें रडें आवरलें व ती उठून उभी राहिली. तिच्या मनांत कांहीं विचार आल्यासारखें दिसलें. "असें रडत बसून कांहीं उपयोग नाहीं, नुसत्या रडण्यापेक्षां कांहीं तरी जास्त केलें पाहिजे, दादानें अशा संकटांत पडावें आणि आपण स्वस्थ बसावें हें कांहीं बरें नव्हे. माझी तब्येत चांगली असती तर किती बहार झाली असती. पण त्याला असा कितीसा वेळ लागणार ? फार झालें तर एक तासाची कथा—तेवढ्यानें माझ्या तब्येतीला काय होतें ? तें कांहीं नाहीं, जायचेंच" असें ह्मणून तिनें मंजुळेला हाक मारली.

मंजुळा ही तिची लहानपणाची दासी असून तिला तिचें सर्व प्रकृतीचें मान कळलेलें होतें. कुमुदिनीची म्लान मुद्रा व अश्रुपूर्ण डोळे

पाहून ती जवळ येऊन ह्मणाली, “ ताईसाहेब, मला का हांक मारलीत ! आणि तुम्ही अशा रडत कां बसलां आहांत ! ”

“ मंजुळे, दादा मोठ्या संकटांत पडला आहेग. त्याला मदत केली पाहिजे. ” असें ह्मणून कुमुदिनीनें भीतियुक्त मुद्रेनें व कांपत कांपत आपण ठरावलेला बेत मंजुळेस कळविला. मंजुळेला फार भय वाटलें तरी तिनें लवकरच रुकार दिला व आपल्या प्रिय धनिणीचा हुकूम बजावण्याकरितां ती गडबडीनें खालीं निघून गेली.

## प्रकरण २५ वें.

:o:

### मी आहें आणि माझें नशीब आहे !



सा बाजीजवळ लग्नाची गोष्ट काढून व त्यांची संमत्ति मिळवून शामराव निघून गेले. लग्नसमारंभाच्या विचारांत साबाजी अगदीं गर्क होऊन गेला व आराम खूर्चीवर पडून त्यानें मनसोक्त धूम्रपान सुरू केलें. प्रभाकरास फार त्रास झाला असल्यामुळें तो लवकरच निजावयास गेला. काकूबाईही घरांतील कामधाम आटोपून निद्रावश झाल्या. जिकडे तिकडे सामसूम झालें; पण त्या स्वच्छ चंद्रप्रकाशांत चंद्रगड किल्ल्यांतील वाड्याची ती शोभिवंत इमारत तारेच्या नजरेस पडतांच तिचें मन अस्वस्थ झालें. तिला कांहीं केल्या झोंप येईना. ती घरांतून उठून बागेंत आली व फाटकाच्या दाराशीं टेंकून उभी राहिली. वाड्यांतील शिवरावांची खोली तिला तेथून दिसत होती. थोड्या वेळापूर्वी त्या खोलीचें नव्हे, सर्व वाड्याचे मालक शिवराव तिचे होते पण आतां ते तिला अगदीं पारखे झाले! त्या वेळेंत आणि या वेळेंत केवढें तरी अंतर पडलें ! हा विचार मनांत येऊन ती अत्यंत कष्टी

झाली व तिच्या तोंडांतून 'शिवराव, अहो शिवराव!' असे उद्गार आपो-आपच बाहेर पडले.

तिच्या ह्या हांकेस उत्तर ह्मणूनच कीं काय, एक बारीक व कंपित ध्वनि "तारू!" असा तिच्या कानावर पडला. त्याबरोबर तिनें आसपास वळून पाहिलें तर कुमुदिनी आपल्या दासीच्या खांद्यावर हात टेंकून रस्त्यावर उभी असल्याचें तिला दिसलें.

त्या दोघीजणी थोडा वेळ एकमेकींकडे पहात उभ्या राहिल्या. नंतर तारा कुमुदिनीजवळ येऊन ह्मणाली, "मी ह्मटलें कोण बोललें! ताई-साहेब, इतक्या रात्रींसें येणें केलें? तब्येतही अजून चांगली नाहीं!"

कुमुदिनी डोळ्यांत अश्रु आणून बोलली, "तारू, मी आलें खरी बाई, मला राहवेना ह्मणून आलें. पण तूं रागावूं नकोस हो. मीं—मीं ऐकलें आहे कीं—"

ताराः—"तुमची आणि त्यांची गांठ पडली वाटतें? त्यांनींच तुह्मांला साँगितलें असेल, होय ना?"

कुमुदिनीः—"होय. दादानेंच मला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून तारू, मला बाई फार आश्चर्य वाटलें. असें कसें व्हावें याचें मला मोठें कोडेंच पडलें आहे. त्याचें तुझ्यावर केवढें प्रेम आहे याची अटकळ तुला नसावी असें वाटतें. खरेंच, इतकें शुद्ध, इतकें उत्कट, खरें खरें प्रेम कोणींही कधींच पाहिलें नसेल."

तारेच्या फिक्कट चेहऱ्यावर किंचित् रक्तिमा आली. ती ह्मणाली, "मला सगळें ठाऊक आहे. हें का सांगायला तुह्मी आला.? माझें केवढें नुकसान झालें हें मला कळत नाहीं असें का तुह्मी समजता?"

"नाहीं, तारू, तूं तशी शहाणी व समजूतदार आहेस; पण याचें कारण काय हें एकदां तुझ्या, खुद्द तुझ्या तोंडून ऐकावें एवढ्याचरितां मी आलें. माझ्या बोलण्याकडे जरा लक्ष दे. तो माझा एकुलताएक भाऊ. मी त्याची एकुलतीएक बहीण. आमचें बहीणभावंडांचें एकमेकांवर निःसीम प्रेम आहे. एकाला कांटा बोचला तर दुसऱ्याला रक्त यावें अशा तऱ्हेचें तें प्रेम आहे. त्याची कष्टी मुद्रा पाहून माझें अंतःकरण कसें

तिळतिळ तुटत आहे, हेंच सांगण्याकरितां, त्याच्यासंबंधानें तुझ्याशीं मध्यस्थी—तुझी विनवणी करण्याकरितां, तुझें स्वतःचें हित कशांत आहे हें तुला नीट दाखवून देण्याकरितां मी एवढ्या रात्रीं, माझी प्रकृति बरी नसतांही तुझ्याकडे आलें. माझ्या सांगण्याकडे दुर्लक्ष्य करूं नको. अशानें त्याचें अंतःकरण दुभंगून जाईल !" कुमुदिनीचा कंठ सद्गदित झाला.

एखादें जखमी झालेलें जनावर आपल्या जिवावर उदार होऊन पारध्याच्या अंगावर उलटून तुटून पडावें त्याप्रमाणें तारा आवेशानें ह्मणाली, "पण मी म्हणतें ताईसाहेब, मला हें समजत नाहीं कीं काय ? त्यांचें दुःख पाहून माझ्या अंतःकरणाला देखील कसा पीळ पडत आहे ! केवळ माझ्या सुखदुःखाकरितांच मला वाईट वाटत नाहीं. मी इतकी नीच, स्वार्थदृष्टीची नाहीं. माझ्या एकटीच्या हिताबद्दल मीं विचार करीत राहावें अशी मी कोण लागून राहिलें आहें? मी ह्मणजे अगदीं कःपदार्थ, गरीबाची मुलगी ! त्यांनीं माझ्यावर प्रेम करून मजवर अनुग्रह केला हा त्यांचाच मोठेपणा आहे. त्यांच्या प्रेमानें मला असें स्वरूप प्राप्त झालें आहे. एरव्हीं मी अगदीं कस्पटासमान आहें. त्यांना सुख व्हावें ह्मणून माझे प्राण जरी खर्चीं पडायला पाहिजे असले तरी देखील मी तयार आहें. ताईसाहेब, माझ्या खऱ्या स्वभावाची परीक्षा तुह्मांला झाली नाहीं. नाहीं तर—"

तारेच्या ह्या आवेशयुक्त व खोंचदार भाषणानें अगोदरच दुःखत्रस्त झालेली कुमुदिनी भेदरून गेली.

"खरेंच तुझें दादावर इतकें प्रेम आहे ?" ती ह्मणाली.

"होय, आहे. पण त्या प्रेमाची मी पुनः कधीं ही गोष्ट काढणार नाहीं. कधींच नाहीं. कारण आह्मां उभयतांमध्यें सध्यां एक भलें मोठें खिंडार पडलें आहे. त्या खिंडाराचें आक्रमण करतां येणें शक्य नाहीं."

कुमुदिनीः—"तारू, असें निर्वाणीचें बोलूं नकोस."

तारा किंचित् हांसून बोलली, "ताईसाहेब, आतां आलें माझ्या ध्यानांत, तुह्मी एवढ्या रात्रीं इकडे कां आला तें. तुह्मांला वाटत असेल कीं,

हा आपला आमच्या प्रेमांतला नेहमींचा प्रेमकलह असेल, एका शब्दानें सर्व कांहीं जुळेल. होय कीं नाहीं ? तसें असेल तर मग तुम्हांला माझा स्वभाव अगर शिवरावांचा स्वभाव मुळींच समजला नाहीं, असें मी स्पष्ट म्हणतें. आमचें दोघांचें कधींच भांडण झालें नसतें हें तुह्मी खूप समजा. कोणी झालें तरी स्वतःबरोबर कसें भांडेल ? ते व मी अगदीं एकरूप झालों आहोंत. इतकें आमचें एकमेकांवर प्रेम आहे. आमची दोघांची ताटातूट ज्या अपरिहार्य अडचणीमुळें झाली ती अडचण मी कधींच कोणाला सांगणार नाहीं. तरी पण तुम्हांला सांगतें. कारण मग तुह्मी ज्या उद्देशानें येथें आला तो उद्देश सफल होणें किती कठीण आहे हें तुम्हांला समजून येईल. तुह्मी आज मला इतक्या काकुळतीस येऊन सांगत आहांत. पण मीं तुमचें ऐकून त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला व मी त्यांच्याशीं विवाह करण्यास तयार झालें, तर पुढें जेव्हां सर्व प्रकार उघडकीस येईल तेव्हां तुह्मीच मला नांवें ठेवूं लागाल. हिनें केवळ स्वार्थाकडे पाहून अगदीं नीचपणाचें वर्तन केलें असें तुम्ही म्हणाल. कारण तुम्हीही जातीनें स्त्री आहांत व आपल्या ममतेच्या माणसाकरितां स्वार्थत्याग करणें हें प्रत्येक स्त्रीचें कर्तव्य आहे हें तुम्ही जाणतां. आतां तरी माझ्या म्हणण्याचा अर्थ बरोबर कळला का ? "

कुमुदिनीचा चेहरा उतरला, " खरें कीं काय ? " असें ती साश्चर्य म्हणाली.

ताराः—" होय हो. ताईसाहेब, मी म्हणतें तें अगदीं खरें आहे. आमची ताटातूट होण्याचें कारण मीं जर तुम्हांला सांगितलें तर तुम्ही एक शब्दही न बोलतां मुकाट्यानें येथून निघून जाल. नव्हे, आतां जो माझा निश्चय झाला तोच कायम राख असें तुम्ही मला अगदीं आर्जवानें सांगाल. "

तारेच्या भाषणांत इतकी कांहीं निराशा भरली होती कीं, कुमुदिनीची अगदीं खात्रीच होऊं लागली. तिचे डोळे अश्रूंनीं भरले व गळा दाटून आला. तारूच्या गळ्यास मिठी मारून ती स्फुंदत स्फुंदत ह्मणाली, " तारू, तारू तूं उदार अंतःकरणाची, मनाची थोर आहेस असें

दादा नेहमीं म्हणत असतो. तें आतां माझ्या चांगलें अनुभवास आलें. तूं म्हणतेस तें बरोबर आहे असें आतां मला वाटूं लागलें आहे. पण त्याच्या मनाचें जेणेंकरून समाधान होईल, त्याला बरें वाटेल असा एक शब्द तरी बोल. "

तारा सुस्कारा टाकून ह्मणाली, " काय सांगूं ताईसाहेब, आणि त्यांना निरोप तरी कसला पाठवूं ? एवढेंच त्यांना कळवा कीं माझ्याकरितां त्यांनीं कोणतीही खटपट करूं नये. त्यापासून फायदा न होतां उलट मला दुप्पट त्रास मात्र होईल. आमची दोघांची पुनः गांठ पडूं नये. एवढीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे. एवढा निरोप त्यांना कळवा. "

कुमुदिनीः—" मला असें कसें बरें सांगतां येईल ? मी नाहीं सांगणार ! "

तारा खिन्न होऊन ह्मणाली, " माझी अत्युत्कट इच्छा अशी आहे व त्यापासून माझें व त्यांचें दोघांचेंही कल्याण होईल. आमची दोघांची पुन्हां कधीं गांठ पडूं नये एवढेंच माझें ईश्वराजवळ हात जोडून मागणें आहे. "

त्या दोघीजणी कुमुदिनीची गाडी उभी होती तेथपर्यंत गेल्या. कुमुदिनी गाडींत बसूं लागली तरी त्यांच्या एकमेकींच्या गळ्यांतील हात निघेना. शेवटीं कसे बसे दोघींनीं आपले हात काढून घेतले व गाडी निघून गेली.

थोडक्याच वेळांत गाडी किल्ल्यांत जाऊन पोंचली व कुमुदिनी शिवरावांच्या खोलीकडे गेली. तिला पाहतांच शिवरावांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें व इतक्या रात्रीं आपणाकडे येण्याचें कारण त्यांनीं विचारिलें. तेव्हां सर्व हकीकत सांगून ती ह्मणाली, " दादा, मी तिच्याकडे जाऊन आलें; पण कांहीं आशा दिसत नाहीं. तुम्हां दोघांनाही नशीब अनुकूल नाहीं असें वाटतें. "

शिवरावांचा चेहरा अगदींच काळवंडला. " ताई, खरेंच का आशा नाहीं ? तूं तिचें आर्जव करून पाहिलेंच असशील. आतां एक मनुष्य राहिला त्याच्यासंबंधानें खटपट करून पाहतों. "

कुमुदिनीः—" नको, नको. दादा, तेवढें करूं नकोस. तशानें तिचें

दुःख मात्र दुणावेल व तिला जास्त त्रास होईल. त्याला तूं कांहीं कम-जास्त केलेंस तर तिला वेदना होतील. त्याला घाव घातलास कीं तिला लागेल. "

शिवरावः—" तिनें तुला असें सांगितलें. "

" होय. शब्दांनीं तिनें तसें सांगितलें व तिच्या मुद्रेवरून सुद्धां तसें दिसलें. खरेंच दादा, आतां अगदीं आशा दिसत नाहीं. तूं कोणताही प्रयत्न केलास तरी आपणास त्रास होणार; तुझी आपली पुनः कधीं गांठ पडूं नये एवढेंच ईश्वराजवळ तिनें मागणें मागितलें. " थोडा वेळ थांबून ती ह्मणाली, " दादा, यांतील खरें कारण मला देखील अजून चांगलेंसें कळलें नाहीं. तरी पण तिचें ह्मणणें बरोबर आहे एवढें मला समजतें. "

शिवराव कांहीं वेळ स्तिमित दृष्टीनें तिच्या तोंडाकडे पाहून ह्मणाले, " ताई, ठीक आहे. तूं नीज जा आतां. एवढ्या रात्रीं तिच्याकडे जाऊन आलीस. तुला काय ह्मणावें ! आतां जा. मी आहें आणि माझें नशीब आहे. "

---

# प्रकरण २६ वें.

—:o:—

## तारेची भवितव्यता.



तारेसंबंधानें आतां कांहीं आशा राहिली नाहीं असें पाहून शिवरावांना फार वाईट वाटलें. त्यांना वाड्यांत चैन पडेना व दुसरीकडे कोठें जावें हेंही समजेना. ह्मणून ते पुनः मुंबईलाच गेले. तेथें ज्या चैनी व विलास नेहमीं तयार असतात त्यांत लवकरच गुंग होऊन गेले. घोड्याच्या शर्यतीमध्यें व जुगार खेळण्यांत त्यांचे अतोनात पैसे खर्च होऊं लागले. अत्यंत व्यसनी व हलकट लोकांचा घोळका त्यांच्या भोंवतीं

जमूं लागला. आतां शिवराव अगदीं बिघडले. त्यांची धडगत दिसत नाहीं असें पुष्कळांनीं भाविष्य वर्तविलें. ह्या गोष्टी चंद्रगड किल्ल्यांतही जाऊन पोंचल्या. रामदेवराव व माईसाहेब यांना मुलाचें हें वर्तन पाहून अत्यंत वाईट वाटलें. तीं दोघेंही मनांतल्या मनांत झुरूं लागलीं. कुमुदिनीच्या कानांवर मात्र ही हकीकत गेली नव्हती. नाहीं तर मुंबई सोडून दुसरीकडे कोठें जाऊन राहण्याबद्दल तिनें शिवरावांचें मन वळविलें असतें. पण त्या रात्रीं तारेची गांठ घेऊन आल्यानंतर तिची तब्येत जास्तच बिघडली व जेणेंकरून तिच्या मनाला त्रास होईल अगर अस्वस्थता वाटेल अशी कोणतीही गोष्ट तिला न सांगण्याबद्दल डॉक्टरांनीं घरांतील सर्व मंडळीस ताकीद दिली होती. अर्थातच शिवरावांच्या स्वैर वर्तनासंबंधानें तिला कांहींच माहिती लागली नव्हती. बापूसाहेब शिवरावांना ताळ्यावर आणण्यासाठीं आपल्याकडून शिकस्त करीत होते. पण व्यर्थ ! शिवराव कांहीं केल्या मुंबई सोडीनात. महिनेच्या महिने लोटलें. उन्हाळा संपून पावसाळा सुरू झाला, तरी शिवराव मुंबईतून बिऱ्हाड हालवीनात.

तिकडे साबाजीच्या झोपडींत कांहीं कमजास्त दिसून आलें नाहीं. सर्व कांहीं पूर्वींप्रमाणेंच चाललें होतें. फक्त तारेचें शामरावापाशीं लग्न व्हावयाचें निश्चित झालें असल्यामुळें, वकीलसाहेबांच्या मात्र दररोज झोपडीकडे खेपा होऊं लागल्या एवढाच काय तो फरक पडला होता. पण हा केवढा मोठा फरक ! शिवराव निघून गेले आणि त्यांच्या जागीं ज्या गृहस्थाचा ती मनापासून तिटकारा करी तो गृहस्थ येऊन उभा राहिला.

तथापि तिनें ह्या प्रसंगाला मोठ्या धैर्यानें टक्कर दिली. तिच्या मायेचीं जीं दोन माणसें—साबाजी व प्रभाकर—त्या दोघांच्या हिताकारितां तिनें स्वार्थत्याग करून—आपल्या स्वतःच्या सुखावर लाथ मारून शामरावांबरोबर जो करार केला होता त्या करारांतील आपला भाग बिनहरकत तडीस नेण्याचा ती आपणाकडून प्रयत्न करूं लागली. तिची मुद्रा पूर्वींप्रमाणें आनंदी दिसत नव्हती, तरी पण एकंदरींत पाहतां ती कधीं

त्रासलेली दिसत नव्हती. पूर्वीप्रमाणें मोकळ्या मनानें व उल्हसित वृत्तीनें नसलीं तरी पण ती कधीं कधीं हांसे व त्या हांसण्यांत पूर्वीचा मजेदार-पणा नसला तरी तें हास्य मोठें गोड दिसे.

साबाजीच्या लक्षांतही तारेची वृत्ति कांहीं कमजास्त असल्याचें आलें नसले. तारा अलीकडे फारशी हांसत नाहीं, याचें कारण तिचें आतां लग्न व्हावयाचें ह्मणून ती लाजत असावी असें त्याला वाटे. तो नेहमीं चित्रें काढण्यांत गर्क असावयाचा. इतर गोष्टींकडे त्याचें बिलकुल लक्षच जात नसे. आपल्या मुलाच्या हातून जो अपराध घडला होता, त्याबद्दल त्याच्या मनाला पुष्कळ खंती वाटत होती ह्मणून चित्रांशिवाय दुसरीकडे तो लक्षच देत नसे.

तारेपेक्षां प्रभाकराच्या वृत्तींत आणि प्रकृतींत अधिक फरक पडलेला दिसत होता. यंदा मॅट्रिकच्या परीक्षेस बसण्याचा त्याचा विचार होता. पण दिवसानुदिवस तो अधिकाधिक कृश होऊं लागला. तशांत खोकला देखील उत्पन्न झाला. तेव्हां तूर्त परीक्षेला जाण्याचा बेत रहित करावा लागला. अभ्यासाची दगदग उपयोगी नाहीं, असें डॉक्टरांचें म्हणणें पडल्यावरून परिक्षेस जाण्याचा बेत तूर्त तहकूब करावा लागला.

प्रभाकराची तब्येत इतकी बिघडण्यास मुख्य कारण म्हणजे त्याची स्वतःच्या प्रकृतीबद्दल अनास्था हेंच होय. तो आपल्या अजारासंबंधानें मुळींच काळजी घेत नसे. त्याची ती खंगत चाललेली प्रकृति पाहून तारा एक दिवस त्याला ह्मणाली, " भाऊ, तुझी तब्येत चांगली दिसत नाहीं. मला तुझ्या प्रकृतीसंबंधानें भय वाटतें."

त्यावर प्रभाकरानें उत्तर दिलें, " कां बरें ? मी दररोज औषध घेतों तर खरें. डॉक्टर जें जें ह्मणून औषध पाठवून देतात तें तें मी वेळच्या वेळीं व बिनतक्रार घेत असतों. मला कांहीं त्यापासून गुण दिसत नाहीं. तरी पण तुला, बाबांना व डॉक्टरांना समाधान वाटतें कीं नाहीं ? झालें तर मग. कोणिकडून सगळ्यांना बरें वाटलें म्हणजे झालें."

संध्याकाळची वेळ होती ह्मणून या वेळीं प्रभाकर बागेच्या दाराला टेकून उभा होता. त्याची सर्व दृष्टि चंद्रगड किल्ल्यांतील वाड्याकडे

लागली होती. एकाएकीं कायसें मनांत येऊन तो तारेला ह्मणाला, " बरें पण ताई, शिवरावांचें नांव सुद्धां घ्यायचें नाहीं असें जरी आमचें ठरलें असलें, तरी पण विचारतोंच. ते हल्लीं कोठें आहेत, काय करीत असतात, वगैरे कांहीं बातमी ? त्यांची ती खोली दिसली ह्मणून आठवण झाली. "

ती थोडा वेळ थांबून ह्मणाली, " मला कांहींच माहीत नाहीं. ते जिवंत तरी आहेत का नाहींत हें देखील मला ठाऊक नाहीं. पण भाऊ, तूं आंत जा. येथें थंडी-वाऱ्यांत उभें राहून तुझा खोकला अधिक नाहीं का होणार ? चल, आंत जाऊं या."

असें ह्मणून तीं दोघेंहि आंत जाण्याकरितां निघालीं. इतक्यांत ओळखीच्या पावलांचा आवाज ऐकूं येऊं लागला ह्मणून प्रभाकर चालतां चालतां उभा राहिला आणि लांबवर पाहून म्हणाला, " ताई, ते पहा, शामराव येत आहेत. मला वाटलेंच तसें." असें म्हणून तो आंत निघून गेला. तारेला संध्याकाळच्या धुपारतींकरितां फुलें तोडावयाचीं होतीं, म्हणून ती बागेंत फुलें तोडीत उभी राहिली.

शामराव नेहमींप्रमाणें झपाझप् पण चोरटीं पावलें टाकीत आले व तारेस पाहून ह्मणाले, " येथें थंडी वाऱ्यांत उभें राहून कपाळ नाहीं का दुखायचें ? "

" माझें नाहीं कपाळ दुखायचें. मला कधींच कांहीं होत नाहीं. भाऊ मात्र येथें होता त्याला मीं आंत लावून दिलें. आतांशा त्याचा खोकला जरा जास्त आहे. पूर्वींसारखी शक्तिही नाहीं. काय होणार आहे कोण जाणे ! "

" उंः ! त्याच्या तब्येतीला काय झालें ? तूं त्याच्यासंबंधानें विनाकारण इतकी काळजी करतेस ? त्याची प्रकृति छान आहे. थोडी थंडी झाली आहे झालें. जाईल आतां लवकरच—"

" जाईल खरी. पण केव्हां ! डॉक्टरांचें औषध तर आज कित्येक दिवस सुरू आहे. तें कांहीं बंद होत नाहीं. "

" कदाचित् तो डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणें खाण्यापिण्यामध्यें बेतानें

वागत नसेल. मूल स्वभाव आहे. मुलें कधीं कोठें आपल्या प्रकृतीची काळजी घेत असतात ! त्यांचें असेंच चालायचें. तें असो. तारू, मी केव्हांही आलों म्हणजे तूं आपली प्रभाकराच्या प्रकृतीची रडकथा सांगत असतेस, दुसरा विषयच नाहीं कीं काय ? आज तसें नाहीं करायचें. आपल्या लग्नासंबंधानें कांहीं तरी ठरविलें पाहिजे."

"बरें तर !" तारा अति नम्रपणें ह्मणाली.

"तारू, आपलें लग्न आतां लवकर उरकून घ्यावें असें मला वाटतें. महिनेच्या महिने होऊन गेले तरी तूं कांहीं गोष्टच काढीत नाहींस. पण मला आतां धीर निघत नाहीं. मग काय ? बोल लवकर. तुझा रुकार आहे ना ?"

तारा कांहींच बोलली नाहीं. कांहीं वेळ थांबून शामराव पुनः ह्मणाले, "कां बोलत नाहींस ? होय ह्मणायचें नसलें तर निदान नाहीं ह्मणून तरी उत्तर दे. तेंच तूं देणार ! बहुतेक मी ओळखून आहें."

ती उदास होऊन ह्मणाली, "मी नाहीं तसें उत्तर देणार. आपले झालेले करारमदार पुरे करून मागण्याचा तुह्मांला हक्कच आहे."

ह्या मर्मभेदक बोलण्यानें शामरावांस राग आला. "तारू, तुला असलें बोलणें शोभतें का ? तुझें माझ्यावर कधींच प्रेम बसणार नाहीं काय ? तूं मागची सर्व हकीकत अजून देखील विसरत नाहींस अं ?"

तारा कंपित स्वरानें ह्मणाली, "मला नका तें विचारूं. मागची सर्व हकीकत विसरून जाण्याचा व तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्याचा मी माझ्याकडून सदोदित प्रयत्न करीत असतें, खरोखरीच करीत असतें."

शामराव किंचित् घोगऱ्या आवाजानें ह्मणाले, "तारू, माझ्या प्रेमाबद्दल तुला अद्यापि शंका आहे असें वाटतें. माझ्यापेक्षां दुसरा कोणीहि तुझ्यावर जास्त प्रेम करील असें तुला वाटतें का ? माझें प्रेम ह्मणजे कांहींच नाहीं असें कां तुला वाटतें ?"

तारा उद्विग्नपणें हळूच बोलली, "होय, तसेंच तसेंच मला वाटतें. पण मी म्हणतें आपण आतां ह्या प्रेमाच्या गोष्टी कशाला काढता ?

अमुक एक गोष्ट तूं केली पाहिजेस असें मला सांगा, कीं मी ती करण्यास तयार आहें. परंतु प्रेमाची गोष्ट मात्र काढूं नका. "

शामरावांनीं आपले ओंठ चावले. आपण हें कशाला बोललों असें त्यांना वाटलें. " बरें तर. नाहीं काढीत. तुझें अंतःकरण अजून वळत नाहीं असें दिसतें. न वळूं दे. पण तशी वेळ आज नाहीं उद्यां केव्हां तरी येईलच. माझ्या प्रेमासारख्या प्रेमापुढें तुझा कितीसा टिकाव लागेल तें पाहतों ! मग काय ? लग्नाचा मुहूर्त लवकरच धरायचा ना ? "

" हो, " एवढेंच ती ह्मणाली. तिच्या अंगावर शहारे आले. पण तिनें तें बाहेर दिसूं दिलें नाहीं.

शामराव आनंदानें ह्मणाले, " ठीक आहे. तर मग उद्यांच्या मार्गशीर्ष शुद्धांतलाच मुहूर्त धरतों. आपलें एकदां लग्न लागलें म्हणजे मजवर प्रेम करण्याला मी तुला शिकवीन. "

तारेनें एकवार त्यांच्या तोंडाकडे पाहिलें. तिच्या फिक्कट चेहऱ्यावर निराशापूर्ण असें एक स्मित चमकलें. प्रेम करावयाला शामराव तिला शिकविणार ! जणूं प्रेम शिकवून येण्यापैकीं आहे !

तारा चेष्टेनें हांसली असें वाटून शामराव ह्मणाले, " तूं हांसतेस ! हांस ! पण तुझें हृदय जरी वज्रासारखें कठिण असलें तरी तुझ्याकडून माझ्या प्रेमाला प्रतिरोध होणें शक्य नाहीं हें खूप लक्षांत ठेव. "

" नाहीं, मी त्याकरितां हांसलें नाहीं. " एवढेंच तारा ह्मणाली व आंत निघून गेली. शामरावही तिच्या मागून आंत गेले. साबाजी विडीचा धूर सोडीत विचारमग्न अशा स्थितींत—ही त्याची नेहमींचीच तऱ्हा असे—आपल्या खोलींत इकडून तिकडे खेपा घालीत होता. प्रभाकर अंथरुणावर पडला होता. तो फारच अशक्त झाला होता. त्याला पाहून शामराव जवळ गेले व त्याच्या पाठीवरून हात फिरवून " तब्येत कशी काय आहे ? " ह्मणून त्यांनीं त्यास विचारिलें. परंतु प्रभाकराला हा प्रकार आवडला नाहीं. शामरावांचा आपल्या अंगाला स्पर्श व्हावा, हें त्याला पसंत नव्हतें ह्मणून त्याला राग आला व उत्तरादाखल कायसें पुटपुटत त्यानें आपली मान फिरविली. याची तब्येत अजून चांगली

नाहीं, याला थोडा हवाफेर करायला पाहिजे. तेव्हां येथून याला घेऊन सर्वच मंडळी कोठें तरी चांगल्या हवाशीर ठिकाणीं जाऊं या, अशी शामरावांनीं साबाजीस सूचना केली. परंतु साबाजीनें स्वतः जाण्याचें कबूल केलें नाहीं. " माझा धंदा चित्रें काढण्याचा. येथल्यासारख्या नदीकाठच्या मनोहर प्रदेशांतच चित्रें काढण्यास चांगली मदत होते, देखावे चांगले असतात, मन सुप्रसन्न असतें; तेव्हां मी कांहीं येत नाहीं. शिवाय माझ्यासारख्या ह्यातार्‍याला आतां प्रवासाची दगदग व त्रास सोसणार नाहीं, " असें ह्मणून साबाजीनें जाण्याचें नाकारलें. तथापि प्रभाकराची दिवसानुदिवस क्षीण होत चाललेली प्रकृति पाहून त्याला कोठें तरी मोकळ्या हवेच्या ठिकाणीं ठेवून कांहीं गुण येतो का पहावें असें साबाजीसही वाटलें व प्रभाकरास आणि त्याजबरोबर त्याची शुश्रूषा करण्याकरितां तारेला पाठवून देण्याचें साबाजीनें कबूल केलें. नंतर शामरावांनीं " आपण सर्वजण माहीमला जाऊं या. कारण, तेथील हवा स्वच्छ व कोरडी असून समशीतोष्ण आहे. " अशी सूचना केली व ती सर्वानुमतें पास झाली. नंतर तिकडे जावयाचें तर दोन दिवसांतच गेलें पाहिजे, दीनावधी करून उपयोग नाहीं, प्रकृतीला गुण लवकर येईल तितकें चांगलें, असें ह्मणून केव्हां निघावयाचें तो दिवस सुद्धां शामरावांनीं ठरविला; नंतर निरोप घेऊन ते घरीं जाण्याकरितां निघाले. जातांजतां शामराव साबाजीस ह्मणाले, " ठरलें तर मग! उद्यांच्या रविवारीं आम्ही सर्व मंडळी घेऊन माहीमला जातों. तिकडे महिना दीड महिना लागेल. दरम्यान तुम्ही चार दिवसांच्या सवडीनें यालच. तुमचें कारण लागेल. "

साबाजीनें साश्चर्य विचारिलें, " कां बरें ? "

" कां बरें ह्मणजे ? तेथेंच आमचें लग्नही उरकून घ्यावें ह्मणतों. आणखी दुसरीतिसरीकडे कशाला उगीच जावयाचें ? "

साबाजी आनंदानें ह्मणाला, " अरे वाः! फार उत्तम. अलबत् येईन बरें. माहीमला लग्न करण्याची ही कल्पना तारूची दिसते. मुलींची हौस मोठी चमत्कारिक असते ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. बरें आहे. लग्नसमारंभ बेताबेतानेंच करा. उगाच रिकामा डामडौल फार नको. "

यात्रमाणें तारेची भवितव्यता ठरली गेली. तो लग्नाचा—नव्हे मरणाचा दिवस भयंकर 'आ' पसरून आपल्या भक्ष्याची वाट पाहूं लागला.

---

# प्रकरण २७ वें.

—:o:—

## कायमचा निरोप.

शिवरावांसारखा मोहरा कुसंगतीनें बिघडत चालला, आतां त्याच्या जन्माचें मातेरें होणार हें पाहून बापूसाहेबांना पराकाष्ठेचें वाईट वाटत होतें व शिवरावांनीं आपलें वर्तन सुधारावें ह्मणून दररोज बापूसाहेब त्यांची कान उघडणी करीत होते. शेवटीं बापूसाहेबांच्या प्रयन्यास यश आलें व शिवरावांनीं मुंबई सोडून दुसरीकडे कोठें तरी जाऊन राहण्याचें ठरविलें. शिवराव आपल्या मर्जींतील लहानपणापासूनच्या हुजऱ्यास घेऊन मुंबईत राहिले होते. त्यानेंहि बापूसाहेबांना सांगितलें कीं, शिवरावांची प्रकृति मुंबईत आल्यापासून फारच खराब झाली आहे तेव्हां लवकर मुक्काम हालविणें जरूर आहे. तो ह्मणाला, " पैसे किती का खर्च होईनात. त्याची काळजी नाहीं. पण त्यांची तब्येत तरी चांगली राहिली पाहिजे. पण पहातों तों दिवसानुदिवस ते जास्तच खंगत चालले आहेत. घराकडे कांहीं तरी कमजास्त झालें असलें पाहिजे व त्यामुळें त्यांचें मन अस्वस्थ असावें. " बापूसाहेबांनाही शिवरावांनीं दिलेल्या पत्राची व झोंपडींतील मुलीची—तारेची आठवण झाली व असाच कांहीं तरी गूढ प्रकार असावा असें त्यांना वाटलें. मुंबईत येऊन बरेच दिवस झाल्याकारणानें आपणाला येथें राहण्याचा आतां कंटाळा आला आहे, असें शिवरावही ह्मणूं लागले. बापूसाहेबांना

तेंच पाहिजे होतें. त्यांनीं लागलीच मुंबई सोडण्याचा विचार ठरविला व दुसरे दिवशींच ते शिवरावांना घेऊन मुंबईहून निघून ठाण्यास उतरले; तेथून पाय वाटेनें प्रवास करीत निश्चित ठिकाणीं येऊन पोंचले. ही जागा एका उंच टेकडीवर लोक वस्तीपासून लांब अशी होती. येथील हवा स्वच्छ व कोरडी असून पाणी फार पाचक व मधुर होतें. रोज सकाळ-संध्याकाळ चार दोन मैल फिरून यावें, आसपासची अपूर्व वनश्री अवलोकन करावी, नाकझरीचें अमृतोपम पाणी प्राशन करावें, नाना प्रकारचीं फळें मुळें खावींत, अशा रीतीनें ते दोघे मित्र मठवासी ऋषींप्रमाणें तेथें कालक्रमणा करूं लागले. बरेच दिवस झाले. परंतु शिवरावांच्या वृत्तींत कांहीं फरक दिसेना. त्यांच्या चेहऱ्यावर जी म्लानता आली होती ती ह्या डोंगरी हवेनें व आसपासच्या सृष्टिसौंदर्यानें नाहींशी झाली नाहीं. कोणत्या तरी गोष्टीचा ते विचार करीत आहेत व त्यामुळें ते झुरत आहेत असें दिसे. आपण येथें आलों खरे, परंतु शिवरावांची प्रकृति सुधारावी व त्यांच्या मनाला हुषारी वाटावी हा जो आपला हेतु तो कांहीं सिद्धीला जात नाहीं असें पाहून बापूसाहेब मोठ्या काळजींत पडले.

एके रात्रीं जेवण झाल्यानंतर गप्पागोष्टी चालल्या असतां बापूसाहेब ह्मणाले, " शिवराव, घरच्या मंडळींकडून अलीकडे कांहीं पत्र वगैरे ? तिकडील कांहींच समाचार कळला नाहीं. "

शिवराव उदासीनपणानें ह्मणाले, " माझ्या घरच्या मंडळींकडून ? कांहीं नाहीं. असतील कोठें तरी. आमच्या एसाजीला माहीत असेल. त्याला तिकडून पत्रें येत असतात. त्याचें आणि आपल्या ताईची दासी मंजुळा इचें लग्न होण्याचें ठरलें आहे. "

बापूसाहेबः—" शिवराव, येथला कंटाळा आला नाहीं ना ? "

शिवरावः—" नाहीं. मुळींच नाहीं. वाटेल तितके दिवस मी येथें राहण्यास तयार आहें. तुह्मांला कंटाळा आला असेल तर मात्र कुठें तरी दुसरीकडे जाऊं या. बापूसाहेब, तुह्मांला ही एक प्रकारें शिक्षाच ह्मणायाची? माझ्यासारख्या जिवाला त्रासून गेलेल्या, दुःखी कष्टी अशा माणसाबरोबर

राहण्याचा तुह्मांला प्रसंग आला आहे ! माझें सर्व सौख्य नष्ट झालें आहे व तोच मला हृद्रोग लागला आहे. तो कांहीं केल्या जात नाहीं. "

बापूसाहेबः--" मी तें जाणून आहें. तुह्मी मला कांहीं सांगत नाहीं तरी मीं तें केव्हांच ओळखलें आहे. पण त्यांत मला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. तिच्या सौंदर्याचा विचार केला तर पुरुषाच्या मनांत भरेल अशीच ती आहे. दोस्त, तुझी स्थिति पाहून मला फार वाईट वाटत आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें योग जुळवून येण्याचा कांहींच संभव नाहीं काय ? "

शिवराव खिन्न होऊन ह्मणाले, " बिलकुल नाहीं ! आणि असें असून मी पहा कसा मूर्खासारखा तिला मनांत घट्ट धरून बसलों आहें ! पण मी तरी काय करूं ? एकदां प्रेम केलें कीं सदोदित प्रेम करावेंसें आपोआपच वाटतें, अशा प्रकारचीच ती आहे. मी माझ्या मनाशीं पुष्कळ प्रकारांनीं ताळा घालतों. पण कांहीं उपयोग होत नाहीं. "

बापूसाहेबः—" कोणीं तरी दुसऱ्या मनुष्यानें तिचें मन भारलें असावें खास. त्याशिवाय असें व्हावयाचेंच नाहीं. त्या माणसाची हड्डी नरम व्हावी असें नाहीं का तुमच्या मनांत येत ? शामराव वकिलांची ही जर चेष्टा असेल तर मग मी तरी निदान स्वस्थ बसलों नसतों. "

शिवरावांनीं नकारार्थी मान हालवून ह्मटलें, " छे, छे, छे ! आमच्या सारख्यांना असें करणें बरें नव्हे. यांत कांहीं आशा दिसत नाहीं. चला, आतां जाऊन निजूं या. उद्यां सकाळचा काय बेत ? " असें ह्मणत शिवरावांनीं एक सुस्कारा टाकला व ते उठले.

बापूसाहेबः—" बेत कसला ? उद्यां आपण पाहिजे तर घोड्यावरून लांब कोठें तरी जाऊन येऊं. भल्या मोठ्या पहाटेस उठूं या. "

" ठीक आहे. " असें ह्मणून शिवराव निजावयास गेले. नंतर बापूसाहेबांनीं एसाजीस हाक मारून शिवरावांची मंडळी हल्लीं कोठें आहेत, त्याला अलीकडे तिकडून पत्र वगैरे आलें आहे काय ह्मणून विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, " ती मंडळी हल्लीं येथून दहा पंधरा कोसांवर त्यांचें जहागीरीचें एक गांव आहे तेथील मळ्यांत—गांवांपासून लांब—येऊन रा-

हिलीं आहेत. मला नुकतेंच पत्र आलें आहे." असें ह्मणून त्यानें एक पत्र पुढें केलें. त्यावर "ठीक आहे, उद्यां घोड्यावरून तिकडेच जाऊं या. शिवरावांची आणि त्यांच्या मंडळींची एकदां गांठ तरी घालूं या. चंद्रिकाही तेथेंच आहे. पाहूं कसें काय होतें तें. पण शिवरावांजवळ ह्यासंबंधानें चकार शब्दही काढूं नकोस" असें त्यास बजावून बापूसाहेब आपल्या पुढील बेताचा विचार करीत किंचित् हांसत निजावयास गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं बापूसाहेब व शिवराव घोड्यावर बसून निघाले. कोणत्या रस्त्यानें जावयाचें, कोठें जावयाचें याबद्दल शिवराव पूर्णपणें बेफिकीर होते. बापूसाहेब जिकडे जातील, तिकडे त्यांच्या मागून मुकाट्यानें ते निघाले. बराच वेळ झाला. ऊनही लागूं लागलें. तेव्हां शिवरावांनीं म्हटलें, "बापूसाहेब, आतां असेंच कोठपर्यंत जावयाचें ?"

पण बापूसाहेबांनीं निश्चित उत्तर दिलें नाहीं. "जाऊं कोठें तरी. आपणांला काय ? या जवळच्या गांवांत एखादें विश्रांतिगृह असेलच. तेथें जाऊन जेवण करूं आणि पुढें जाऊं." यावर शिवरावांनीं जास्त एक अक्षरही विचारलें नाहीं.

ते दोघे त्या गांवांत जाऊन एका खाणावळींत उतरले व जेवण करून त्यांनीं थोडी वामकुक्षि केली. नंतर पुनः ते घोड्यावर बसून निघाले. संध्याकाळ होत आली तेव्हां शिवरावांनीं म्हटलें, "बापूसाहेब, आतां रात्रीची सोय कोठें पाहिलीत ?"

तेव्हां बापूसाहेब हांसून ह्मणाले, "त्याची काळजी नको. येथें जवळच एक मळा आहे, तेथें माझ्या माहितीचे एक गृहस्थ रहात असतात. तिकडेच जाऊं या ह्मणजे झालें."

शिवराव हांसून ह्मणाले, "बापूसाहेब, लबाडी बाहेर पडली बरें का ! तेथें जाण्याचा तुमचा पहिल्यापासूनच बेत होता खास. होय कीं नाहीं!"

बापूसाहेबही हांसूं लागले, "होय. तसा बेत होता खरा. कांहीं हरकत नाहीं ना ?"

शिवरावः—"कांहीं नाहीं. हरकत कसली त्यांत ! जिकडे तुह्मी तिकडे आह्मी. आह्मांला ती मंडळी स्वस्थपणें निजूं देऊं देत ह्मणजे झालें.

तुह्मी जाणें आणि तुमचे पाहुणे जाणे. पाहुणचार घेत बसा आपले स्वस्थ! तुह्मी त्यांना सांगा कीं, तुह्मी एक वेडा बरोबर आणला आहे; ह्मणजे मग ते माझें बिलकुल नांव काढणार नाहींत. पण उद्यां सकाळीं लवकर निघालें पाहिजे हो ! नाहीं तर बसाल पाहुणचारांत गर्क होऊन येथेंच आठन् आठ दिवस ! ”

“ छे, छे, मोठ्या पहांटेस उठतों पहा पाहिजे तर. तुह्मी उठाल कीं नाहीं याची मला शंका येते. ” असें बापूसाहेब गालांतल्या गालांत हांसत ह्मणाले.

नंतर ते त्या मळ्यांत गेले. तेथें एक बंगला होता. त्या बंगल्याच्या आगाशींत जातांच तेथील नोकरांनीं येऊन त्यांचे घोडे धरले. मग ते दोघेही आपआपल्या घोड्यावरून उतरून बंगल्यांत जाण्याकरितां निघाले.

पायऱ्या चढतां चढतां शिवराव एकदम थबकले. जवळच्या खिडकींतून एक आकृति बाहेर तोंड काढून त्यांच्याकडे पाहूं लागली. चेहरा एका सुंदर स्त्रीचा असून तिचा घनदाट केशकलाप व अस्मानी रंगाच्या जरीकांठी पातळाचा जरतारी पदर तिला फारच शोभा देत होता. तिचा चेहरा त्यांना स्पष्टपणें दिसेना, तथापि त्यांनीं तिला ओळखलें. त्याबरोबर त्यांना किंचित् राग आला व ते मागें वळून बापूसाहेबांना कांहीं विचारण्याकरितां पाहूं लागले. पण बापूसाहेब किती वस्ताद ! शिवराव पायऱ्या चढूं लागतांच मोतद्दाराला कायसें सांगण्याकरितां ह्मणून ते तिकडे केव्हांच निघून गेले होते.

पायऱ्या चढून बंगल्यांत कोण येत आहे हें पहात चंद्रिका तशीच खिडकीशी उभी होती. शिवरावांची प्रकृति पुष्कळ खराब झाली होती. प्रवासामुळें पोषाखही अस्ताव्यस्त झाला होता. त्यांतून संध्याकाळची वेळ असल्यामुळें बाहेर चांगला प्रकाशही नव्हता. ह्मणून तिनें शिवरावांना प्रथम ओळखलें नाहीं. तिला वाटलें कोणी तरी परके गृहस्थ सहज इकडे आले असावेत. परंतु ते जवळ आल्यावर मात्र तिनें त्यांना पूर्णपणें ओळखलें. त्याबरोबर ती खिडकीजवळून निघून पुढें दरवाजांत आली व “ अगबाई, शिवराव आले ! ” असें ह्मणून आनंदातिशयानें ती घरांत माई-

साहेबांना ही आनंदाची बातमी कळविण्याकरितां निघाली, पण त्या गडबडींत तिचा पाय मुरडला; ती खालीं पडणार, इतक्यांत शिवरावांनीं जलदी करून तिला सांवरून धरलें.

चंद्रिकेचे डोळे क्षणमात्र मिटले व तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. लवकरच ती शुद्धीवर आली व आपले विशाळ डोळे उघडून तिनें शिवरावांच्या तोंडाकडे पाहिलें तेव्हां शिवराव ह्मणाले, "चंद्रिके, पाय मुरगळला कीं काय ?" त्यांचा शब्द ऐकतांच चंद्रिका झट्दिशीं उठून उभी राहिली व जरा दूर सरकून ह्मणाली, "ही तुमचीच चूक आहे. तुह्मी अशा करकरीत तिन्हीसांजच्या वेळीं एखाद्या चोराप्रमाणें लपून छपून कां यावें? तुह्मी भुतासारखे मला एकाएकीं ध्यानीं मनीं नसतां, दिसला ह्मणून मी भ्यालें." असें ह्मणून ती आपले विसकटलेले केश व पदर सावरीत तेथेंच उभी राहिली.

शिवराव स्तिमित दृष्टीनें तिच्याकडे पहात होते. त्यांचे लालस डोळे तिच्या सौंदर्याकडे लागून राहिले. तिचें प्रेम आपल्यावर आहे हें ते पूर्णपणें ओळखून होते. ते ह्मणाले, " मला माहीत नाहीं. बापूसाहेब मला इकडे घेऊन आले. ह्या बंगल्यांत आणखी कोण कोण मंडळी आहेत ?"

चंद्रिका खालीं पहात ह्मणाली, " माईसाहेब आहेत, सरकार स्वारी आहे; सर्व मंडळी आतांशा महिनाभर येथेंच आहेत. मी आंत जाऊन माईसाहेबांना कळवितें. नाहीं तर माझ्याप्रमाणें त्याही भितील !" असें हांसत हांसत बोलत चंद्रिका आंत निघून गेली.

शिवराव तेथेंच उभे राहिले. त्यांचे दोन्ही हात कोटाच्या खिशांत खुपसले असून डोळे जमिनीकडे लागलेले होते. ते कसल्या तरी विचारांत निमग्न आहेत असें दिसलें. चंद्रिका रूपानें अत्यंत सुंदर असून तिचें प्रेमही आपल्यावर आहे, तर मग तिचा स्वीकार करून तिला सुखी कां करूं नये ? तिला एकटीलाच नव्हे, तर आपल्या मातुःश्रीला, कुमुदिनीला वाडिलांना सगळ्यांनाच त्यापासून बरें वाटणार व आनंद होणार, तेव्हां तिचा स्वीकार करावा काय ? आपलें प्रीतिपात्र जी तारा ती आपणास मुकल्यानें आपण खऱ्या सौख्यास कायमचेच आंचवलों आहोंत. तथापि

आपल्या स्वतःच्या सौख्याचा विचार बाजूस ठेवून आपल्या मातुःश्रीस, वडिलांस, भगिनीस व वाड्यांतील सर्व मंडळीस जेणेंकरून सुख व आनंद होईल ती गोष्ट करणें आपलें कर्तव्य आहे. शिवाय ही चंद्रिका इतर स्त्रियांपेक्षां सर्वतोपरि श्रेष्ठ आहे व आपली प्रियतमा आपल्यास मुकलीच आहे, तर मग तिलाच आतां आपलीशी कां करूं नये ? " इत्यादि विचारांत शिवराव गर्क होऊन गेले होते.

इतक्यांत " शिवराव, " असे त्यांच्या मातुश्रींचे शब्द त्यांच्या कानांवर पडले. त्यांनीं वर पाहिलें, तों माईसाहेबांची स्वारी माजघराच्या दारांत उभी असलेली त्यांना दिसली. शिवरावांनीं जाऊन मातुःश्रीला नमस्कार केला. माईसाहेबांनीं प्रेमानें त्यांना जवळ घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरविला. त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले व कंठ सद्गदित झाला. " आलास बाळा, ये. " एवढें त्या ह्मणाल्या. त्यांच्यानें पुढें बोलवेना. आपण घरांतून निघून गेल्यामुळें माईसाहेबांना किती दुःख झालें होतें व आपण आतां भेटल्यामुळें त्यांना किती आनंद झाला हें शिवरावांनीं त्यांच्या कंपित स्वरावरून ओळखलें. प्रेमाचा पहिला उमाळा येऊन गेल्यानंतर त्यांच्या तोंडाकडे पाहून " शिवराया, तूं आजारी का होतास ? तुझी तब्येत बरी दिसत नाहीं. " असें माईसाहेब हळूच ह्मणाल्या. शिवरावांची मुद्रा व कृश शरीरयष्टि पाहून माईसाहेबांचें हृदय कळवळलें.

शिवराव हांसत बोलले, " आजारी ? छे ! मी आजारी का दिसतो?"

" होय. तसें दिसतें खरें. ये, आंत ये. " असें ह्मणून माईसाहेब आंत गेल्या. त्यांच्या मागून शिवरावही आंत निघाले. जातां जातां दरवाजांत ते किंचित् थांबले व बाहेर त्या किर्र रात्रीकडे त्यांनीं एकवार नजर टाकली. तेव्हां ताटातुट झालेल्या प्रियतमेची मूर्ति आपल्यासमोर उभी आहे असें त्यांना वाटलें. तिचा चेहरा फिकट व डोळे तिरस्कारपूर्ण सवतीमत्सरदर्शक दिसत होते. चमत्कारिक व निराशापरिप्लुव असे हातवारे करून ते पुटपुटले, " माझे प्राणप्रिये तारू, मी आतां तुझा कायमचाच निरोप घेतों. तूं वाटेल तिकडे जा. "

# प्रकरण २८ वें.

——:o:——

## मुहूर्त निश्चय.

शिवराव घरीं आल्याची बातमी यजमानांस कळविण्याकरितां माईसाहेब दिवाणखान्यांत गेल्या. रामदेवरावांना ती ऐकून साहजिकच आनंद झाला. पण आजपर्यंतचें शिवरावांचें स्वैर वर्तन, त्यांनीं केलेला द्रव्यनाश वगैरे गोष्टी लक्ष्यांत येतांच त्यांना अतिशय राग आला व शिवरावांची एकदां चांगली कानउघाडणी करावी ह्मणून ते खालीं येण्याकरितां निघाले. पण माईसाहेबांनीं त्यांची समजूत घातली. "शिवरावाची प्रकृति बरी दिसत नाहीं, तो फारच रोड व अशक्त झाला आहे, त्याला आतां बोलल्यास पुनः डोकींत राख घालून तो आणखी कोठें तरी निघून जाईल, मग हाताला लागणें कठीण, तेव्हां त्याला कांहीं न बोलणें चांगलें.' असें माईसाहेब आर्जवानें ह्मणाल्या. त्यावरून रामदेवरावांनीं आवरतें घेतलें व शिवरावास विशेष कांहीं न बोलतां, "तब्येत बरी दिसत नाहीं. आतां येथें चांगलें औषध घे." एवढेंच सांगून ते निघून गेले. नंतर शिवरावांनीं कुमुदिनीची गांठ घेतली. तिची तब्येत अद्यापि चांगली नव्हतीच. तशांत शिवराव कष्टी होऊन घरांतून निघून गेल्यापासून तर तिची तब्येत जास्तच क्षीण होत चालली होती. शिवरावांस पाहतांच तिला अत्यानंद झाला व तीं दोघें बहीणभावंडें पुष्कळ वेळ

बोलत बसलीं. शेवटीं पुनः घरांतून न जाण्याबद्दल कुमुदिनीनें शिवरावास कळकळीनें सांगितलें व त्यांनींहि त्याप्रमाणें कबूल केलें. नंतर तिनें तारेसंबंधींची हकीकत विचारली, परंतु शिवरावांच्या मनांत त्या बाबतींत कांहीं बोलावयाचें नव्हतें ह्मणून, " त्याचें काय आतां ? झाली गोष्ट होऊन गेली. " असें ह्मणून ते जेवण्याकारितां खालीं निघून आले.

येथपर्यंत बापूसाहेबांनीं रचलेला लहानसा व्यूह त्यांच्या अगदीं अटकळीबाहेर फलद्रूप झाला. त्यांनीं त्या चंगीभंगी बनलेल्या शिवरावांना त्यांच्या घरच्या मंडळींकडे परत आणून सोडलें. बापूसाहेबांनीं पुष्कळ प्रयत्न करून, व पुष्कळ हाल सोसून शिवरावांस ताळ्यावर आणलें याबद्दल रामदेवराव व माईसाहेब या दोघांनींहि बापूसाहेबांची फारच तारीफ केली व त्यांचे शतशः आभार मानले. बंगल्यांतील सर्व मंडळीस आनंदीआनंद झाला.

चार आठ दिवस गेले. इतक्या मुदतींत शिवरावांच्या वृत्तींत व प्रकृतींत बरीच सुधारणा दिसूं लागली. ते आतां वाड्यांतील मंडळींशीं मिळूनमिसळून वागूं लागले; त्यांचा पूर्वींचा हेकड स्वभाव आस्ते आस्ते कमी होऊं लागला व त्यांची मुद्रा आनंदी व प्रफुल्लित दिसूं लागली. चंद्रिकेशींहि त्यांचें वर्तन प्रेमळपणाचें व अगत्याचें दिसूं लागलें.

एके दिवशीं शिवराव आणि चंद्रिका अशीं दोघेंजण संध्याकाळच्या वेळीं तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर हवा खात बसलीं होतीं. इकडच्या गोष्टी बोलतां बोलतां ओघाओघानें शिवरावांनीं ते व बापूसाहेब प्रथम ज्या दिवशीं या बंगल्यांत आले त्या दिवसापर्यंत हकीकत आणून भिडविली. नंतर किंचित् थांबून शिवराव ह्मणाले, " चंद्रिके, मी तुला एक प्रश्न विचारतों. त्याचें उत्तर देशील ना ? "

" हो, खुशाल विचारा. " ती सानंद मुद्रेनें बोलली.

शिवरावः—" तूं त्या दिवशीं संध्याकाळीं मला आंत येतांना पाहतांच, अगबाई, शिवराव आले. असें ह्मणून किती दचकलीस ? मी आल्यामुळें तुला आनंद झाला हेंच ना त्याचें कारण ? "

ती थोडा वेळ स्तब्ध राहिली. नंतर " होय, खरोखरीच मला आनंद झाला होता. " असें ती पुटपुटली.

शिवराव थोडा वेळ स्तब्ध राहिले. नंतर ते ह्मणाले:—" चंद्रिके, तुला मागची सर्व आठवण असेलच. आतांहि मी येथें आल्यापासून आईची मला सारखी टुमणी लागली आहे कीं, चंद्रिकेशीं तूं लग्न करून घे. याकरितां तुला विचारतों, तुझें प्रेम माझ्यावर आहे का ? काय असेल तें स्पष्ट सांग. "

चंद्रिकेनें खालीं मान घातली व सुस्कारा टाकून म्हटलें, " त्यांत काय सांगायचें ? खरेंच आपल्यावर माझें प्रेम आहे. "

चंद्रिकेच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच शिवरावांचें हृदय जलद उडूं लागलें व चित्त भ्रमण करूं लागलें. कारण त्या वेळीं सुद्धां त्या दुसऱ्या प्राणप्रियेची आठवण होऊन त्यांचें हृदय कष्टी झालें. त्या रात्रीची—घरणावरील आणभाकेची—आठवण होऊन त्यांनीं विचारलें, " माझ्यावर तुझें प्रेम आहे ? चंद्रिके, हें खरें ना ? "

चंद्रिका प्रांजळपणें ह्मणाली, " खरोखरीच माझें प्रेम तुमच्यावर आहे. तुह्मांला ठाऊक नाहीं कीं काय ? सगळें ठाऊक आहे. "

त्याबरोबर शिवराव सद्गदित होऊन ह्मणाले, " ईश्वर मला क्षमा करो."

अशा वेळीं असे भलतेसलते उद्गार ऐकून चंद्रिकेस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. " असें कां बोलतां ? " असें तिनें त्यांच्याकडे पाहून विचारलें. त्यांची मुद्रा फारच म्लान व उदास अशी तिला दिसली. प्रेमी पुरुषाप्रमाणें त्यांचा चेहरा तिला दिसला नाहीं. ते उत्तरादाखल ह्मणाले, " चंद्रिके, तूं अगदीं अनुपम सुंदर, सर्वगुणसंपन्न अशी; आणि मी अगदीं नालायक, तुला अगदीं अयोग्य, असें असून मीं तुझें प्रेम संपादन करावें हें अगदीं विलक्षण नव्हे काय ? "

शिवरावांच्या तोंडचे हे उद्गार ऐकतांच चंद्रिकेचें अंग एक प्रकारच्या भीतीनें कंपित झालें. आपणास वश करून घेण्याकरितां हिनें केवढी भयंकर गोष्ट केली होती हें त्यांना कळलें तर ! वास्तविक म्हटलें तर आपणच अगदीं नालायक, अयोग्य आहों असें तिला वाटलें. पण तिनें

ती भीति बाजूस सारली, तिनें त्यांना वश करून घेतलें होतें व त्यांना आपल्या कह्यांत ठेवण्याइतकी शक्ति आपल्या अंगांत आहे अशी तिला खात्री वाटत होती.

ती लडिवाळपणानें ह्मणाली, "शिवराव, तुह्मी अयोग्य, नालायक असें कां ह्मणतां बरें ? आह्मां दोघांनाही जगाचा चांगला अनुभव आला असून खरें प्रेम ह्मणजे काय, त्याची किंमत किती असते हें आह्मांला समजूं लागलें आहे. खरेंच पूर्वीपासून तुमच्यावर माझें प्रेम आहेहो." आतां तर शिवरावांच्या मनाची पूर्ण खात्री झाली व त्यांनीं तिला दृढालिंगन दिलें. तथापि त्या समयीं सुद्धां त्यांच्या अंतःकरणांत एक गुप्त वेदना उत्पन्न झाली व आपण जणूं कांहीं तरी बेइमानपणाचें कृत्य करीत आहोंत असें त्यांना वाटलें.

त्या दोघांचें जें बोलणें झालें तें आस्ते आस्ते घरांतील सर्व मंडळीस कळलें. तें ऐकतांच सर्वांना अत्यानंद झाला. बंगल्यांत चोहोंकडे एकच गर्दी उडून गेली व जो तो लग्नाच्याच गोष्टी बोलूं लागला. बापूसाहेबांना आपण रचलेला व्यूह आतां लवकरच सिद्धीला जाणार, हें पाहून अतिशय समाधान वाटलें व इतकी सुंदर, सुग्रण बायको मिळाल्याबद्दल त्यांनीं शिवरावांचें अभिनंदन केलें. माईसाहेबांचा आनंद त्रिभुवनांत मावेना. अपार संपत्ति, एकुलत्या एक मुलाचें लग्न, तशांत मनाजोगी सून मिळणार, मग माईसाहेबांच्या आनंदाला काय पारावार राहणार ! रामदेवरावांनाही फार हर्ष झाला व आतां होतां होईल तितक्या लवकर लग्न समारंभ उरकून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. कुमुदिनीच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हां तिलाहि बरें वाटलें. तिनें शिवरावांस हाक मारून ह्मटलें, "दादा, तूं मोठा भाग्याचा ह्मणून चंद्रिकेसारखी बायको तुला मिळाली. तिच्यापासून तुला पुष्कळ सुख मिळेल, आतां मागील गोष्टीचा तुला विसर पडेल."

शिवराव 'होय' ह्मणाले, पण त्यांच्या बोलण्यांत उदासीनता भासत होती. तो गोड व प्रेमळ चेहरा आपल्या पुढें मधुर हास्य करीत जात

आहे असें त्यांना वाटलें. त्यांचें शरीर बर्फासारखें थंड होतें. त्यांत खऱ्या प्रेमाची ऊब नव्हती. "

शिवरावांकडून इतक्या लवकर लग्नाचें बोलणें निघेल अशी चांद्रिकेची बिलकुल कल्पना नव्हती. ह्मणून तिला अत्यंत आश्चर्य वाटलें. जें अंतिम साध्य संपादन करण्याकरितां तिचे आजपर्यंत अटोकाट प्रयत्न चालले होते तें साध्य तिला आतां प्राप्त झालें व तिचा यशोरूपी प्याला कांठाबरोबर भरून अगदीं सांडण्याच्या बेतांत आला. आपली इच्छा कशी व कां सफल झाली हें ती पूर्णपणें समजून होती. एखादें पुस्तत वाचावें त्याप्रमाणें तिनें शिवरावांचें हृद्गत ओळखलें होतें. त्यांनीं जरी आतां आपल्याजवळ लग्नाची गोष्ट काढली आहे, तरी त्या काळ्याभोर डोळ्याच्या व कुरळ्या केशकलापाच्या मुलीला—तारेला—चिताऱ्याच्या पुतणीला ते अद्यापि विसरले नाहींत हें ती पूर्णपणें ओळखून होती.

तिच्या अंतःकरणास तीव्र वेदना देणारा हा एक हृद्रोगच होता. तिच्या यशाच्या पेल्यांत विरघळत जाणारा हा एक मिठाचा खडा होता. तथापि तिनें ही परिस्थिति स्वीकारली. शामराव तारेला ह्मणाले त्याप्रमाणें ती शिवरावांसंबंधानें ह्मणूं लागलीः—" मी त्यांना मजवर प्रेम करायला लावीन. मी त्यांच्याशीं इतक्या लडिवाळपणाणें व प्रेमानें वागेन कीं, तारेसंबंधाचे विचार आपल्या मनांत कां आले याचें त्यांना आश्चर्य वाटूं लागेल व असे विचार मनांत आल्याबद्दल ते स्वतःस दोष लावून घेतील अशीहि वेळ येईल. "

आणि खरोखरच तिनें त्याप्रमाणें आपलें आचरणहि प्रसंगास योग्य असेंच ठेविलें. ती फार शांत वृत्तीनें व गंभीरपणानें वागूं लागली. शिवरावांच्या मागणीनें आपणास केवढा आनंद झाला हें तिनें बाहेर दिसूं दिलें नाहीं. शिवरावांशीं तिचें वर्तन तर फारच चाणाक्षपणाचें व मनोवेधक होतें. त्यांचें मन आकर्षून घेण्याचा ती प्रयत्न करी. पण आपण असा प्रयत्न करीत आहों ही गोष्ट सुद्धां ती त्यांच्या अगर कोणाच्याच लक्ष्यांत येऊं देत नसे. शिवरावांची वृत्ति अद्यापि विशेषशी बदललेली नव्हती. ते आपला बहुतेक वेळ पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे वाचण्यांत

अगर आसपासची सृष्टिशोभा अवलोकन करण्याकरितां रानावनांतून हिंडण्यांत घालवीत असत. तथापि त्यांनीं संधि साधून आपलें लग्न लवकरच म्हणजे पुढच्या महिन्यांत उरकून घ्यावें व तेंहि मुंबईत अगर चंद्रगड येथील आपल्या वाड्यांत न करितां, कोठें तरी रम्य व निवांत अशा स्थळीं करावें असें चंद्रिकेशीं ठरवून त्याप्रमाणें घरांत कळविलें व मुहूर्तनिश्चयहि केला. पण त्यामुळें माईसाहेबांचा मोठा हिरमोड झाला. केवढ्या थाटानें, कडाक्यानें व समारंभानें आपल्या एकुलत्या एक मुलाचें लग्न करण्याचा त्यांचा विचार होता; त्यावर विरजण पडलें. शिवरावांच्या हेकड स्वभावापुढें त्यांचें कांहीं चालेना. रामदेवरावहि फारसे मनावर घेईनात. कोणीकडून एकदां शिवरावाचें लग्न होऊन तो आपला संसार करावयाला लागूं दे, त्याशिवाय तो ताळ्यावर येणार नाहीं, असें रामदेवरावांना वाटत होतें. ह्मणून लग्न अमुकच ठिकाणीं करावयाचें असा आग्रह त्यांनीं धरला नाहीं.

---

# प्रकरण २९ वें.

—:o:—

## कड्यावरील द्वंद्व-युद्ध.



"शामराव, हें मासलेवाईक ठिकाण कोठून शोधून काढलेंत ? येथलीं हीं कौंबळ्याचीं घरें, लंगोट्या घातलेले पुरुष, कास आवळलेल्या बायका पाहिल्या ह्मणजे हे लोक जगाच्या शंभर वर्षें मागें आहेत, असें म्हणावें लागतें. यापेक्षां चंद्रगड काय वाईट होतें ! मला म्हाताऱ्याला ह्या असल्या रुक्ष ठिकाणीं येण्याची कशाला दगदग पाडलीत ! " साबाजीनें विचारलें.

शामराव, साबाजी व तारा अशीं तिघेजण माहीम येथील समुद्रकांठच्या एका खडकावर बसलीं असून त्यांच्या इकडच्या तिकडच्या गप्पा चालल्या होत्या. समोरच थोडक्या अंतरावर एक टेकडी असून तिचा कडा तुटलेला होता. त्या खालीं समुद्राच्या लाटा त्या कड्याच्या कठीण शिलातलावर आदळून कर्कश आवाज निघत होता. शामरावांनीं उत्तर दिलें, " मीं तर हें ठिकाण प्रत्यक्ष असें कुठें पाहिलें होतें ? कोणींसें सांगितलें, कीं माहीम येथील हवा चांगली व वनश्री उत्तमोत्तम ह्मणून येथें आलों झालें. पण आजारी माणसाला पाहिजे असेंच हें स्थान आहे. प्रभाकराची तब्येत येथें आल्यापासून पुष्कळ सुधारली आहे. आतां लवकरच त्याला कशी भराभर शक्ति येईल. तारूला देखील हें ठिकाण फारच आवडलें आहे. होय कीं नाहीं ? " शामराव तारेकडे वळून सस्मित ह्मणाले.

तारा निश्चल दृष्टीनें समुद्राकडे पहात होती. ती शांतपणानें ह्मणाली, " खरेंच, मला ही जागा फार आवडते."

साबाजी तिच्याकडे प्रेमळपणानें पहात म्हणाला, " आमच्या तारूला गांवांतील गोंगाटापासून लांब एकांतवासाची अशी जागा मिळाली ह्मणजे झालें. मग ती कुठेंही असो. पण तारू, तुझ्या तोंडावर पूर्वीचें तेज अजून दिसत नाहीं. असें कां ? "

तारा उदासीनपणें ह्मणाली, " मला काय झालें आहे ? चांगली धडधाकट दिसतें तर खरी. भाऊ मात्र फार अशक्त झाला आहे. त्याला चांगलें औषध दिलें पाहिजे. "

" खरेंच. बिचारा फारच रोड व फिकट झाला आहे. " साबाजी गंभीरपणानें म्हणाला. त्या मुलाचें नांव निघालें, कीं साबाजीची नेहमींच अशी गंभीर मुद्रा होई.

तारेनें सुस्कारा टाकला. इतक्यांत विषय बदलण्याच्या हेतूनें शामराव मध्येंच ह्मणाले, " साबाजी, तुम्हीं तो कडा पाहिला काय ? त्या कड्यावर थोडीशी सपाट जागा आहे. येथून आसपासचा देखावा फारच सुंदर दिसतो. तुम्ही त्याची तसबीर काढा. फारच मनोहर दिसेल. "

साबाजी डोळ्यांवरील चष्मा कपाळावर ठेवून व त्या कड्याकडे नजर टाकून म्हणाला, " पण ती जागा फारच अडचणीची दिसते. तेथें जाणें धोक्याचें आहे. "

" होय. धोक्याचें तर खरेंच. तारूला मी हेंच किती तरी वेळां सांगितलें. पण ती आपली नेहमीं त्या कड्यावर जाऊन बसते. ती जागा आपल्याला फार आवडते असें ती ह्मणते. पण ती कडा चढून वर जाऊं लागली ह्मणजे मला फार भीति वाटते व माझ्या सर्वांगास कंप सुटतो. "

" तुम्हांला लागली का तिची काळजी ! ठीकच आहे. " असें थट्टेनें बोलत साबाजी तेथून उठला व थोडक्याच वेळांत तीं तिघेजण बिऱ्हाडीं येऊन पोंचलीं. काकूबाईनीं चहा तयार करून ठेविला होता तो घेत असतां साबाजी प्रभाकरास पाहून म्हणाला, " प्रभाकर, तुझी तब्येत कशी काय आहे ? "

प्रभाकरः——" बाबा, माझ्या तब्येतीला काय झालें आहे ? उद्यां पहा मी कसा सजतो तो ! "

साबाजीनें हा विचार केला खरा; पण त्यामुळें तारेच्या मनाला अतिशय वाईट वाटलें. अस्ताचलास मंदगतीनें चाललेल्या त्या सूर्यबिंबाकडे निश्चल दृष्टीनें पहात ती स्तब्ध बसली होती. ' उद्यां ' हा शब्द तिच्या कानांत घुमूं लागला. "आजचा दिवस तेवढा माझा, आज माझी मी स्वतंत्र आहें; पण उद्यां व त्यापुढचे सर्व दिवस आपले नव्हेत; कारण आपलें शामरावांशीं लग्न होऊन आपण सर्वस्वी त्यांच्या अधीन होणार," असें तिला वाटलें. आजपर्यंतचे दिवस सुखांत गेले. त्या दिवसांची, त्या प्रेमाची व त्या सौख्याची तिला आठवण झाली. तो सौख्याचा व आशेचा काल नाहींसा झाला व आतां उद्यां आपण बहुल्यावर उभें राहणार, शामराव वकिलाची पत्नी होणार, हे विचार मनांत येऊन ती अत्यंत कष्टी झाली. हा सर्व प्रकार खरा आहे कीं हें सारें स्वप्न आहे याचा तिला संशय पडला. ह्या विचारांनीं तिचें मस्तक भणभणून गेलें; तिला अत्यंत तीव्र मानसिक वेदना होऊं लागल्या. तेव्हां घरांत फार उष्मा होतो आहे, थोडी बाहेरून फिरून येतें, असें सांगून

ती घरांतून बाहेर पडली व कड्यावरील पठाराकडे जाण्याकरितां टेकडी चढूं लागली. ‘ उद्यां ’ ‘ उद्यां ’ हे शब्द तिच्या कानांत गुणगुणत होतेच. या ‘ उद्यांच्या ’ कचाट्यांतून सुटून जाण्याचा कांहींच उपाय नाहीं काय, अशा विचारांतच ती कड्यावर जाऊन पोंचली. तिनें खालीं एकवार नजर टाकली. अफाट समुद्राच्या पर्वतप्राय लाटा त्या कड्याच्या खालच्या बाजूच्या शिलातलावर जोरानें आदळून कर्कश शब्द करीत होत्या. त्या लाटांत उडी घ्यावी ह्मणजे आपण या सर्व यातनांतून व जाचांतून सुटूं व आपणाला कायमचें विश्रांतिस्थान मिळेल असें तिला वाटलें. ती थोडा वेळ तशीच स्वस्थ बसली. नंतर तिचा निश्चय झाल्यासारखें दिसलें; ती एकदम उठून उभी राहिली. मनांत विचार आला होता तो तडीस नेण्याचा तिचा बेत होता. ह्मणून तिनें किंचित् डोळे मिटले व आतां खालीं उडी टाकून ती जलसमाधि घेणार इतक्यांत आपल्या मागून कोणी येत आहे असा तिला भास झाला. शामराव येत असावेत असें वाटून ती थबकली. त्यांनीं विचारलेंच तर हवा खाण्याकरितां मी येथें आलें आहे, असें सांगावयाचें असा मनांत निश्चय करून कपाळावर वाऱ्यानें आलेले केंस मागें सारीत ती तिकडे पहात उभी राहिली.

परंतु ते शामराव नव्हते. ती उंच व बांधेसूद मूर्ति शिवरावांची आहे हें तिनें लागलीच ओळखलें व “ अगबाई, शिवराव ! ” असें हळूच व अस्पष्ट बोलत ती पुनः कड्यास टेकून त्यांच्याकडे पहात उभी राहिली. शिवराव तिच्याकडे पाठ करून व आपला सर्व भार हातांतील काठीवर घालून निश्चल अशा स्थितींत समुद्राकडे पहात कांहीं वेळ उभे राहिले. त्या ठिकाणीं कोणी आसपास मनुष्य असावें अशी त्यांची कल्पनाही नव्हती व ताराही त्यांना दिसत नव्हती. थोडा वेळ उभें राहिल्यानंतर त्यांनीं एक दगड घेतला व तो कड्याखालीं समुद्रांत फेंकून दिला. कशाकरितां कोणास ठाऊक ? नंतर एक मोठा सुस्कारा टाकून ते परत कड्याखालीं निघाले. ते कांहीं बोलले नाहींत. तथापि ते तिच्या इतकेजवळ आलेले पाहून तिला अतिशय आनंद वाटला. तिच्या सर्वांगावर हर्षानें रोमांच उभे राहिलें व तिनें मनांत जो विचार आणला होता तो हळू

हळू नाहींसा होऊन त्यांचें पुनः एकदां दर्शन घ्यावें ह्मणून ती निश्चल दृष्टीने त्यांच्याकडे पाहूं लागली. त्यांची मूर्ति दृष्टीआड होतांच तिला अतिशय वाईट वाटलें व जमिनीवर अंग टाकून ती शोक करूं लागली. " प्राणनाथ, प्राणनाथ, मला सोडून जाऊं नका. मला घेऊन चला. " असे शब्द तिच्या तोंडांतून एकाएकीं बाहेर पडले.

दुःखातिशयानें बेफाम होऊन ती ताडकन् उठली व कड्याखालीं जाण्याकरितां निघाली. शिवरावांची गांठ घेऊन त्यांना आपलें हृद्गत कळवावें असा विचार तिच्या मनांत आला असावा. ती कडा उतरून खालीं गेली. पायथ्याला दोन रस्ते फुटलेले असून एक गांवांत गेला होता आणि दुसरा गांवचे पूर्वेस असलेल्या मैदानाकडे गेला होता. गांवांत जाणाऱ्या रस्त्यानें तारा निघाली. पण शिवराव दुसऱ्या रस्त्यानें गेले असल्यामुळें त्यांची व तिची गांठ पडली नाहीं.

डावीकडील रस्त्यानें जाण्याऐवजीं ती उजवीकडच्या रस्त्यानें गेली असती तर केवढा अनर्थ टळला असता ! पण होणार तें चुकत नाहीं ह्मणतात तें कसें खोटें होईल ? ती धापा टाकीत लगबगीनें डावीकडील रस्त्यानें निघाली. यामुळें शिवरावांची आणि तिची चुकामूक झाली व शामराव तिची वाट पहात रस्त्यावरच उभे असलेले तिला दिसले.

तिची चित्तवृत्ति जाग्यावर नव्हती. " ते कोणीकडे गेले ? मला त्यांच्याकडे जावयाचें आहे. कुठें आहेत ते ? " ती बेसावधपणें ह्मणाली.

शामराव आश्चर्यचकित होऊन तिजकडे पहात म्हणाले, " तुझी त्यांची गांठ पडली वाटतें ? नाहीं ह्मणूं नकोस."

त्यांचा तिरस्कारपूर्ण कर्कश शब्द ऐकतांच ती किंचित् शुद्धीवर येऊन ह्मणाली, " होय. मीं त्यांना पाहिलें. नाहीं कशाला ह्मणूं ? "

" तूं त्याच्या पाठीस लागून निघाली होतीस आणि मीं तुला आडविलें, हेंहि तूं नाकबूल करणार नाहींस ? ही गोष्ट तुला कबूल आहे, होय ना ? "

ती शांतपणें ह्मणाली, " होय. मी त्यांच्या मागून निघालें होतें."

हे तिच्या तोंडचे शब्द ऐकतांच शामरावांची मुद्रा खरकन् उतरली

व त्यांचें हृदय धडधडूं लागलें. ते घोगऱ्या आवाजांत म्हणाले, " तुझ्या-सारखी निर्लज्ज स्त्री दुसरी कोणी नसेल. आजची ही वेळ किती महत्त्वाची आहे हें तरी तुला समजायला पाहिजे होतें. आजच आपल्या लग्नाची वरात निघणार आहे हें आहे ना तुझ्या लक्षांत ! "

त्याबरोबर तिचें सर्वांग कंपित झालें व दोन्ही हात डोळ्यांवर ठेवून ती उभी राहिली.

कपाळाला आंठ्या घालून शामराव जोरानें ह्मणाले, " या भेटीची जुळवाजुळव तूं आधींपासूनच ठरवून ठेवली; होतीस वाटतें ! ठीक. फार चांगलें केलेंस ! त्यांच्या बाहुपाशांत मी तुला पाहिलें नाहीं हें माझें सुदैवच ह्मणावयाचें ! असेंच कीं नाहीं ? मरो तो तुझा शिव-राव ! माझी त्याची नुकतीच गांठ पडली. त्याच वेळीं त्याला ठार मारून टाकलें असतें तर फार उत्तम झालें असतें ! "

त्याबरोबर तारेच्या अंगांतील पूर्वींचा मानीपणा व धैर्य जागृत झालें. तिरस्कारपूर्ण हास्य करून ती ह्मणाली, " तुह्मी ! "

हा एकच शब्द ती बोलली. परंतु तेवढ्यानें जणूं संताप चढून शामराव वेडे झाले. त्यांचा श्वासोच्छ्वास देखील बंद झाला. त्यांचा क्रोध व दुःख पाहून तारेचें अंतःकरण विदीर्ण झालें. तिची चर्या पाल-टली. ती करुणस्वरानें ह्मणाली, " शामराव, मजवर एवढी दया करा. तुह्मी त्यांना विनाकारण दोष देत आहांत. ते मला भेटायला आले नव्हते. मी येथें होतें हें त्यांना माहीतही नव्हतें. तुह्मी समजतां त्याप्रमणें माझें त्यांचें मुळींच बोलणें झालें नाहीं. परंतु मीं त्यांच्याकडे जेव्हां निरखून पाहिलें तेव्हां त्यांच्या प्रकृतींत व वृत्तींत किती फरक पडला आहे, हें मला दिसलें. त्यांनीं दुःखानें सुस्कारे टाकलेले मला ऐकूं आले. तेव्हां मात्र मला ते अद्यापि विसरले नाहींत अशी माझी खात्री झाली आणि माझें सर्व लक्ष—सर्व अंतःकरण त्यांजकडे लागलें. त्यांच्याबरोबर बोलावें, त्यांच्या मागून जावें, असा माझा बिलकुल इरादा नव्हता. पण मी तरी काय करूं ? मला अगदीं राहवेना. शामराव, तुमच्याशीं माझें लग्न होणें हें अगदीं अशक्य आहे, हें तुह्मांलाही दिसून आलेंच असेल. मजवर एवढी मेहे-

रवानी करून मला एकदांची मुक्त करा. मी माझ्या घरीं जातें. त्यांत तुमचेंही हितच आहे. मजबरोबर लग्न करून तुह्मांला कसलें सुख मिळणार ? मुळीं देखील मिळायचें नाहीं. तुमच्यावर प्रेम करावें ह्मणून मी कित्ती कित्ती खटपट करतें. पण व्यर्थ ! माझ्या हातून ती गोष्ट होत नाहीं त्याला मी काय करूं ? माझें सर्व जीवित मीं शिवरावांना अर्पण केलें आहे. सोडा मला. मी जातें."

शामराव रोषभरानें मुसमुसुं लागले. रागाच्या सपाट्यांत "त्यांनीं तिला एक जोराचा धक्का देऊन दूर लोटली. पुन्हां कायसें मनांत येऊन ते ह्मणाले, " छे, छे ! मी अशा रीतीनें तुला नाहीं जाऊं देणार. तुला एकदांच, अखेरचें सांगतों कीं, मी तुला अशा रीतीनें जाऊं देणार नाहीं. तूं मला चीड येण्याजोगी गोष्ट केली आहेस. आतां संभाळून रहा, हा सर्व प्रकार न समजण्याइतका मी अंध व बुद्धिहीन् झालों असें तुला वाटतें काय ? एखाद्या पोराशीं मी खेळत आहें असें तुला वाटत असेल नाहीं ? आजपर्यंत तूं मला हुलकावण्या दाखवीत आलीस · आणि आतां स्पष्ट ' नाहीं ' ह्मणून सांगतेस ! एक महिन्याच्या मागें असें सांगण्याला तुझी छाती झाली असती काय ? नसती झाली. कारण त्यावेळीं प्रभाकराच्या प्रकृतीसंबंधानें तुह्मांला थोडी आशा वाटत होती. पण आतां तो फार दिवस जगणार नाहीं, अशी तुमची खात्री झाली आहे; आणि ह्मणून माझें सामर्थ्य संपुष्टांत आलें असें तुला वाटत असावें. "

तारेला भीति वाटली. ती ह्मणाली, " छे, छे ! शामराम, माझ्या भाऊसंबंधानें असें नका हो बोलूं. देव त्याला उदंड आयुष्य देवो; केवळ, मला भीति दाखविण्याकरितां तुह्मी असें ह्मणाला, होय ना ? " असें ह्मणून ती करुणार्द्रदृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागली.

शामराव भिंवया चढवून ह्मणाले, " अरे वारेवा ! तारू, तुला चांगली बतावणी करतां येते. एखाद्या नाटकांत तूं आपला पार्ट चांगला करशील. पण मी तुझ्या ह्या नाटकी सोंगाला फसणार नाहीं बरें ! तो मुलगा एकदां मेला, ह्मणजे मग माझ्याशीं केलेल्या करारापासून आपण मुक्त होऊं असें तुला वाटत असेल, तर तूं साफ चुकतेस. करार ज्या

वेळेस झाला त्या वेळेपासून तो करार तुला सुखकर वाटावा, तुझें प्रेम माझ्यावर बसावें ह्मणून मीं अटोकाट प्रयत्न चालविले आहेत. कारण माझें प्रेम तुझ्यावर आहे. पण आतां तें प्रेम नाहींसें झालें तरी पण मी तुला अशी मोकळी जाऊं देणार नाहीं. प्रेम उडालें इतकेंच नाहीं, तर तुझ्याविषयीं मला आज द्वेष वाटत आहे. तरीपण मी तुला नाहीं जाऊं देणार. ऐक. " नंतर खिशांतून एक कागद काढून ते ह्मणाले, " उद्यां मी हा कागद तू माझी पत्नी ह्मणून तरी तुझ्या हातांत देईन एक, किंवा येथील माजिस्ट्रेट कोर्टांत तरी हजर करीन एक ! प्रभाकर आतां जगत नाहीं हें ठरलेंच आहे. पण त्याला घरांत सुखानें मरण येतें, कीं तुरुंगामध्यें हालअपेष्टांत मरण येतें, हें तुझ्या वर्तनावर अवलंबून आहे. " असें ह्मणत त्यांनीं तो कागद पुन्हां घडी करून खिशामध्यें ठेविला. नंतर ते ह्मणाले, " मग काय? आतां तरी माझ्या बरोबर येणार, कीं, येथेंच राहून पुढें काय करावयाचें हें ठरविणार? "

ह्या प्रश्नानें ती देहभानावर आली व आपण वाटेंतच बोलत उभें आहोंत हें तिच्या आतां लक्ष्यांत आलें. ती किंचित् मागें सरकली व मंद पावलें टाकीत बिऱ्हाडाकडे चालली. शामराव कांहीं पावलें तिच्या मागून चालले, नंतर वळून ते कड्यावर जाण्यासाठीं निघाले.

ते कड्यावर जाऊन पोंचतात, तों त्यांच्यां समोर एक कृश व अशक्त झालेली आकृति उभी असल्याचें त्यांना दिसलें. त्यांनीं कठोरपणानें ह्मटलें, " अरे, तूं रे कां इथें ! तुला काय पाहिजे आहे ! "

कडा चढून गेल्यामुळें प्रभाकराला दम लागला होता. तो धापा टाकीत ह्मणाला, " शामराव, मला तुमच्याशीं थोडें बोलावयाचें आहे. मी तारूला शोधण्याकरितां येत होतों. वाटेंत तुम्ही तिच्याशीं बोलत होतां तें मीं पाहिलें व तुमचें सर्व बोलणें मीं आडून एकलें. तो बनावट कागद कोठें ठेवला आहे तो माझा मला परत द्या आणि तारूची सुटका करा."

शामराव त्याजकडे पहात तिरस्कारपूर्वक हांसून ह्मणाले, " अरे मूर्ख पोरा, तुला कागद पाहिजे आहे का ? ठीक आहे. उद्यां मी तो कागद तारूच्या हातीं देईन अगर तुझ्यावर बनावट दस्त केल्याबद्दल फिर्याद

करून तुला कोर्टात उभें केलें म्हणजे मी तेथें तो कागद तुला दाखवीन. समजलास ? तोंपर्यंत तो कागद तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं हें खास समज. ”

वरील शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात, तोंच प्रभाकर उसळून त्यांच्या अंगावर गेला व आपल्या लांब हातांनीं त्यांच्या गळ्याला त्यानें घट्ट मिठी मारली. “ द्या तो कागद. देतां कीं नाहीं ? बोला, द्या. कागद, कागद ! ” असें ह्मणत त्यानें शामरावांचा गळा घट्ट दाबून धरला, एखाद्या पोलादी पट्टीनें आपला गळा जणूं आंवळला जात आहे असें शामरावांना वाटलें. जागा अगोदरच आकुंचित, तशांत प्रभाकर अगदीं बेफाम झाला होता. त्याची व शामरावाची हिसकाहिसकी चालली. प्रभाकराची मगरमिठी सोडविण्याची ते खटपट करूं लागले. प्रभाकरही आपली सर्व शक्ति एकत्रित करून त्यांना मागें खेचूं लागला. येईल तितकें बळ आणून त्यांनीं प्रभाकराची मिठी कशीबशी सोडून घेतली. त्यास मागें ढकललें. पण असें करतांना तोल जाऊन त्यांचा पाय घसरून ते खालीं पडले. ती संधि साधून प्रभाकरानें त्यांच्या अंगावर उडी घेतली व त्यांच्या कोटाच्या खिशांत जोरानें हात खुपसून तो कागद बाहेर काढला. शामराव त्याच्या हातांतून कागद काढून घेण्याकरितां उठूं लागले. पण प्रभाकरानें त्यांच्या छातींत एक जोराचा ठोसा दिला. त्याबरोबर शामराव मागें कड्याच्या कांठावर पडले व तेथून गडगडत खालीं समुद्रांत जाऊन आदळले. शामरावांनीं एक कर्कश व भेसुर किंकाळी फोडली. तिचा आवाज खालीं उसळत असलेल्या लाटांच्या आवाजांत मिसळून गेला व सर्व सामसूम झालें.



# प्रकरण ३० वें.

—:o:—

## शेवट गोड झाला.

शिवराव माहीमला एकटे आले होते. घरांतून निघतांना, मी एकदोन दिवस परगांवीं जाणार आहें, एवढेंच सांगून ते बाहेर पडले होते. गेले कांहीं दिवस ते असे एकटेच फिरावयास जात व मनास वाटेल तेव्हां परत येत. बापूसाहेब त्यांचे अगदीं जिवश्च कंठश्च स्नेही ! पण त्यांना सुद्धां ते बरोबर नेत नसत. सारांश, अलीकडे त्यांना एकांतवास फार आवडूं लागला होता. त्यांची ती तऱ्हा पाहून माईसाहेब वरचेवर घाबऱ्या होत. त्यांना वाटे शिवरावाला वेड लागल कीं काय कोणास ठाऊक ? तो माथेफिरूसारखा कां करतो कोण जाणे, पण आत्याबाई त्यांची समजूत घालीत. त्या म्हणत, " वहिनी, तुम्ही मुळीं देखील काळजी करूं नका. ज्याप्रमाणें एखादा पिंजऱ्यांत घातलेला पक्षी आपली स्वतंत्रता जवळ आल्याचें पाहून साहजिक पंख फडफड करूं लागतो. त्याप्रमाणें शिवरावांना वाटत आहे. " तेव्हां माईसाहेब स्वस्थ रहात. ह्याप्रमाणें शिवरावांच्या स्वैर वर्तनाला कांहींच आळा बसला नव्हता. तथापि त्यांच्या लग्नसमारंभाची तयारी मात्र जारीन सुरूं होती. कापडवाले, मोतीवाले, जवाहिरे, वाणी वगैरे सर्व प्रकारचे दुकानदार आपआपला माल घेऊन वाड्यांत खेपांवरखेपा घालूं लागले व त्यांच्या आपआपसांतील भांडणानें सर्व इमारत गर्जूं लागली. सोनार बसवून नवीन दागदागिने घडविण्यांत माईसाहेब अगदीं चूर होऊन गेल्या.

शिवराव माहिमला कोणत्या उद्देशानें आले होते तें कांहीं सांगतां येत नाहीं. खुद्द त्यांना देखील माहीत नव्हतें. इतकेंच नव्हे, तर आपण आलों त्या गांवचे नांव ' माहीम ' आहे हें देखील त्यांना ठाऊक नव्हतें. तेथें आल्यानंतर ते एका चहाकाफीच्या दुकानांत गेले. तेथें थोडा उपहार करून व वामकुक्षि करून ते संध्याकाळच्या वेळीं भटकत कड्यावर गेले होते व तेथेंच त्यांना तारेनें पाहिलें होतें. तिकडून परत येऊन ते पुनः त्या दुकानांत येऊन मालकाशीं गप्पागोष्टी करीत बसले होते. त्यांच्या गप्पा अगदीं ऐन रंगांत आल्या असतां दुकानाचा मालक एकदम मध्येंच ह्मणाला, " ऐका, ऐका, कोणसें आता ओरडलें. " असें ह्मणून तो जिकडून आवाज ऐकूं आला त्या दिशेकडे पाहूं लागला.

शिवरावांनींहि तिकडे पाहिलें. तों त्या कड्यावरून कोणसें गडगडत खालीं पाण्यांत पडत असल्याचें त्यांना दिसलें. त्याबरोबर ते दोघेहि उठून किनाऱ्याकडे धांवत गेले व चटकन् एका होडींत बसून शामराव ज्या ठिकाणीं पडले होते तिकडे निघाले. शक्य तितक्या जलदीनें त्यांनीं होडी चालविली व लवकरच शामरावांचें रक्तबंबाळ झालेलें शरीर पाण्यामध्यें गटंगळ्या खात असलेलें त्यांना दिसलें. शिवरावांनीं ताबडतोब आपल्या हाताचा आश्रय देऊन शामरावांना होडींत घेतलें. परंतु त्यांना जबर मार बसला होता. यामुळें होडींत येतांच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. शिवरावांस फार आश्चर्य वाटलें व दुःखहि झालें. तें मृत शरीर घेऊन ते किनाऱ्यावर येतात, तों तेथून कांहीं अंतरावर बरेच लोक जमले असून मध्यें कोणसें निजलें आहे असें त्यांना दिसलें. होडींतून उतरून शिवराव तिकडे गडबडीनें जाऊन पाहतात तर प्रभाकराचें निस्तेज व प्रेतवत् शरीर त्यांच्या दृष्टीस पडलें.

शिवराव होडींत बसून निघाले त्याच वेळेस सात आठ माणसें धांवत धांवत कड्यावर गेलीं व श्रमानें अगदीं मूर्छित झालेल्या प्रभाकराला घेऊन खालीं आलीं. त्या मुलाचा चेहरा अगदीं काळवंडला होता, डोळे आंत ओढले होते, चलनवलन बंद झालें होतें. फक्त छातींत मात्र थोडीशी धुगधुगी होती. शिवरावांनीं त्या माणसांकडून ताबडतोब प्रभा-

कराला चहा काफीच्या दुकानाकडे नेलें व डॉक्टरांचा तपास करून त्यांना आणविलें. चौकशीकरितां प्रभाकर आपला बाप साबाजी यासह हवा पालटण्याकरितां या गांवांत येऊन राहिला असल्याचें शिवरावांना कळलें. ते कोठें राहतात वगैरे चौकशी करून व डॉक्टरांना प्रभाकराजवळ बसवून साबाजीस बातमी कळविण्याकरितां ते त्याच्या बिऱ्हाडाकडे निघाले.

परंतु साबाजीच्या घरांत ही बातमी अगोदरच कळली होती. शिवरावजवळ येतात तों एक कृश, निस्तेज, वैराग्ययुक्त अशी बालिका घरांतून बाहेर येत असलेली त्यांना दिसली. ही तारा आहे असें त्यांनीं ओळखलें. परंतु तिला हकीकत सांगावी कीं न सांगावी अशी शंका मनांत येऊन त्यांची वृत्ति विचलित झाली. ते स्तब्ध उभे राहिले. पण तारेच्या मनांत त्या वेळीं दुसरा तिसरा कसलाच विचार नव्हता. तिचें सर्व लक्ष्य प्रभाकराकडे लागलें होतें. त्याचें काय झालें असेल, तो सुखरूप असेल ना, त्याची तोंडभेट तरी होईल कीं नाहीं, वगैरे विचारांत तिचें चित्त भ्रमण करीत होतें. ती शिवरावांना एकदम ह्मणालीः—" शिवराव, भाऊ कुठें आहे हो ? त्याला काय झालें ? " तिची ती केविलवाणी मुद्रा पाहून शिवरावांचें अंतःकरण दुभंग झालें. ते ह्मणाले, " तारू, अशी घाबरी होऊं नकोस थोडा धीर धर. "

पण तारेला धीर निघेना. ती हुंदके देत ह्मणाली, " मला चालवत नाहीं हो. माझे हात पाय गळले. तुह्मी मला त्याच्याकडे घेऊन चला. "

शिवराव तिचा हात धरून तिला दुकानाकडे घेऊन गेले. प्रभाकर बिछान्यावर पडलेला असून मृत्युपंथास लागला होता. तारा त्याच्याजवळ जाऊन बसली व त्याला प्रेमानें कुरवाळून ह्मणाली, " भाऊ, अरे भाऊ, काय रे तुझी अवस्था झाली ही ! "

शिवरावांना पहातांच प्रभाकरानें आपला अशक्त हात उचलून त्यांना जवळ येण्याबद्दल सूण केली. त्याबरोबर शिवराव जवळ जाऊन ह्मणालेः—

" बाळ प्रभाकर, तुझ्या मनांत मला कांहीं सांगायचें आहे होय ? हा पहा मी आलों. "

प्रभाकर आपल्या जड झालेल्या पापण्या वर करून व येईल तितकी शक्ति आणून ह्मणाला, " शिवराव, मी–मी–तुह्माला एक जिन्नस–देतों. काय आहे तें मग तुह्मांला समजेल. याच जादूनें ताईला त्या दुष्ट शामरावानें जखड आंवळून टाकलें होतें. ती जादू मीं आतां मोडून काढली. केवळ माझ्याकरितां तिनें आजपर्यंत त्याचें ऐकलें. मला ही गोष्ट माहीत देखील नव्हती. हा घ्या तो जिन्नस. " असें ह्मणून प्रभाकरानें आपल्या खिशांतून तो बनावट कागद काढला व तो शिवरावाकडे देऊन ह्मटलें, " तुह्मांला माहीत नाहीं. तो कागद मींच लिहिला. ही गोष्ट शामरावांना कशी कळली कोण जाणे. त्यानें ह्या गोष्टीचा फायदा घेऊन ताईला पूर्णपणें पेंचांत आणलें एवढें मात्र खरें. तिच्या मानेवर त्यानें ही सुरीच धरली. शिवराव, तुह्मीं मला नदींतून बाहेर काढून माझा प्राण वांचविला त्याचा मोबदला ह्मणून माझ्या प्राणापेक्षांहि प्रिय अशी माझी ताई मी तुमच्या स्वाधीन करतों. " त्याचे ओंठ कांपूं लागले. त्याचा अंतकाल जवळ येत चालला आहे असें दिसूं लागलें. तथापि शेवटचा प्रयत्न करून तो बोलला, " शिवराव, मी आतां मरतों. माझ्या मनांत होतें तसें झालें. मला फार आनंद झाला. आतां मी जगूं इच्छित नाहीं. "

" भाऊ, अरे काय बोलतोस हें ? " तारा कष्टी होऊन ह्मणाली. तिच्या नेत्रांतून घळघळ अश्रुधारा चालल्या.

तिजकडे पाहून प्रभाकर ह्मणाला, " ताई, तूं रडूं नको. मी जिवंत असेपर्यंत त्यानें तुला सोडलें नसतें. मी आतां मरतों—" पुढें त्याला बोलतां येईना. त्यानें डोळे मिटले तथापि त्याचे ओंठ हालत होते. ह्मणून तारा त्याच्या तोंडाजवळ कान नेऊन ऐकूं लागली. तों, " मला क्षमा कर, मला क्षमा कर, " असे शब्द तिच्या कानावर पडले.

झालें. लवकरच प्रभाकराचें शरीर थंडगार झालें व तो प्रेत होऊन पडला. तारेनें शोकाकुल होऊन हंबरडा फोडला. आई मुलाला घट्ट पोटाशीं कवटाळून धरते त्याप्रमाणें तिनें त्याला मिठी मारली व लवकरच तिची शुद्धि उडाली.

यानंतर सुमारें एका प्रहरानें शिवराव समुद्रकिनाऱ्यावरील वाळवंटांत इकडून तिकडे खेपा घालीत होते. त्यांचें चित्त परस्पर विरुद्ध अशा विचारांच्या काहुरानें खळबळून गेलें. तारेचें आपल्या ठिकाणीं निरतिशय प्रेम आहे ही गोष्ट त्यांना नुकतीच समजून चुकली होती. कारण, प्रभाकराचें देहावसान झाल्यानंतर तारेला घेऊन शिवराव तिच्या बिऱ्हाडीं जात असतां, शामराव वकिलांनीं आपणास कसें पेंचांत आणलें, आपणाकडून त्यांनीं कसें वचन घेतलें, वगैरे हकीकत तारेनें आपल्या तोंडानें सांगितली. ती ऐकून शिवरावांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. तथापि आतां तारा स्वतंत्र झाली खरी; पण ते स्वतंत्र नव्हते. चंद्रिकेशीं त्यांचें वचन गुंतलें होतें. तें त्यांना मोडतां येईना. याला उपाय काय ? वगैरे विचारामध्यें त्यांचें मन गुंग होऊन गेलें होतें. बराच वेळ त्या वाळवंटांतून खेपा घातल्यानंतर त्यांचा निश्चय झाला व लागलीच तेथून निघून ते चहाकाफीच्या दुकानांत आले व मालकाकडून लिहिण्याचें सामान मागून घेऊन त्यांनीं सविस्तर हकीकतीचें एक पत्र चंद्रिकेला पाठविलें. शामरावांचा मृत्यु व त्यापासून कोणकोणत्या गोष्टी उघडकीस आल्या, वगैरे हकीकत त्यांनीं त्या पत्रांत लिहून शेवटीं, " तूं जरी या जगांत अनुपम सुंदर व सर्वगुणसंपन्न अशी आहेस, तथापि तारेच्या ठिकाणींच माझें खरें प्रेम जडलें आहे. तें तेथून कांहीं केल्या निघत नाहीं. तेव्हां मेहरबानी करून मला माझ्या वचनांतून मुक्त कर. एवढेंच माझें तुला आर्जवाचें सांगणें आहे. " अशी त्यांनीं चंद्रिकेला विनंति केली. पत्र लिहून झाल्यानंतर त्यांनीं तें टपालांत टाकलें; व उत्तराची मार्ग प्रतीक्षा करीत ते तेथेंच राहिले.

त्या रात्रीं त्यांना बिलकुल झोंप लागली नाहीं. ते बिछान्यावर सारखे ह्या कुशीवरून त्या कुशीवर, त्या कुशीवरून ह्या कुशिवर असें करीत पडले होते. ज्या दोन बालिकांनीं त्यांच्या आयुष्यांतील इतका महत्त्वाचा भाग घेतला व इतकें महत्त्वाचें कार्य घडवून आणलें—जिच्यावर त्यांचें खरें निःसीम प्रेम होतें ती एक व जिला त्यांनीं अभिवचन दिलें होतें ती एक—त्या दोन बालिकांच्यासंबंधाचें नानाविध विचार त्यांच्या मनांत

येऊन त्यांची चित्तवृत्ति खळबळून गेली. अशा स्थितींतच रात्र संपून गेली. उजाडलें. दुसरा सबंध दिवस व रात्रही याप्रमाणेंच गेली. तिसरे दिवशीं सकाळीं ते बाहेर येतात तों पोस्टाकडील शिपायानें एक पत्र त्यांच्या पुढें टाकलें. शिवरावांनीं अत्यंत औत्सुक्यानें तें पत्र फोडून आंतील मजकूर वाचला:—" आपलें पत्र पावलें; मजकूर समजला. आपल्या ह्मणण्याप्रमाणें मीं माझ्या वचनांतून तुह्मांला मुक्त केलें आहे. तुह्मांला सौख्य लागावें अशी माझी फार फार इच्छा आहे. माईसाहेबांना हकीकत कळवून त्यांची सर्व कांहीं समजूत घालण्यांत येईल. काळजी करूं नये. "

" आपली चंद्रिका. "

याप्रमाणें शेवटीं चंद्रिकेनें मोठेपणा मिळविला. सर्व लोक तिच्या थोर स्वभावाची तारीफ करूं लागले. शिवरावांचें मन तारेपासून काढून घेण्याकरितां तिनें अटोकाट प्रयत्न केले. आणि शेवटीं तिनें त्यांना तिच्याकडेच परत दिलें. कदाचित् शिवरावांबद्दल तिला खात्री वाटत नसावी आणि मी तुझ्याबद्दल मुळींच फिकीर करीत नाहीं, असें जेव्हां शिवरावांनीं तिला स्पष्टच सांगितलें तेव्हां आतां शिवरावांची आशा करणें व्यर्थ आहे असेंहि तिला वाटूं लागलें. तिजकडून आलेलें उत्तर पाहून शिवरावांनीं तिची तारीफ केली. पुढें केव्हांही तिची गांठ पडली तरी शिवराव तिला फारच अगत्यानें व बहुमानानें वागवीत असत.

× × ×

प्रभाकरास मरून एक महिना होऊन गेल्यानंतर शिवरावांचें व तारेचें लग्न मोठ्या व समारंभानें झालें. ज्या माहिम गांवांत व ज्या मंडपांत तारेचें आणि शामरावाचें लग्न होण्याचें ठरलें होतें त्याच मंडपांत शिवराव व तारा ह्यांचा विवाह झाला. हा एक विलक्षण योगायोगच ह्मणावयाचा !

× × ×

आतां चंद्रिका आपली सून होत नाहीं, असें समजतांच माईसाहेबांना

व रामदेवरावांनाही प्रथम प्रथम बरें वाटलें नाहीं. चंद्रिकेचें सौंदर्य, तिची तरतरी व अपार संपत्ति वगैरे गोष्टींनीं त्यांचें मन मोहित होऊन गेल्यामुळें तिला आपली सून करून घेण्याचा त्या दोघांचा विचार केव्हांच ठरलेला होता. अर्थातच त्यांना फार वाईट वाटलें. तथापि माहिम येथील लग्नसमारंभ आटपून जेव्हां शिवराव तारेला शेजारीं बसवून हत्तीच्या अंबारींतून मिरवीत मिरवीत घरीं आले व गृहप्रवेश होऊन लक्ष्मीपूजनाकरितां तें नूतन जोडपें बसलेलें जेव्हां माईसाहेबांनीं व रामदेवरावांनीं पाहिलें तेव्हां त्या उभयतांना पराकाष्ठेचें सौख्य व कौतुक वाटलें. तारेची मोहकता व विनयशीलता पाहून त्यांना फारच संतोष झाला. खरोखरच आज आपल्या घरीं लक्ष्मी आली असें त्यांना वाटूं लागलें. जिनें आपल्या मुलाला सुखी करून चांगल्या मार्गाला आणलें त्या सुनेवर—तारेवर लवकरच त्या सासूसासऱ्यांचें प्रेम बसून तिला तीं दोघेंही आपल्या पोटच्या मुलीप्रमाणें प्रेमानें वागवूं लागलीं. कुमुदिनीला तर तारा पहिल्यापासून आवडत होतीच. अर्थातच त्या सख्ख्या बहिणींप्रमाणें एकमेकींवर प्रेम करूं लागल्या.

\+ \+ \+

संपलें. आतां जास्त कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. लग्न झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं शिवराव तारेस घेऊन मुंबईस आले व एक सुंदरसा बंगला घेऊन त्यांत राहिले. तरी पण त्यांना चंद्रगड येथील आपल्या स्वतःच्या वाड्यांतच जास्त सौख्य वाटे. ह्मणून ते वरचेवर चंद्रगडास येत असत. त्यांची दोघांची प्रथम याच ठिकाणीं भेट झाली होती. ह्मणून हेंच ठिकाण त्यांना जास्त प्रिय वाटत असे.

संपूर्ण.

# रोगग्रस्तांना एक आशेचा किरण !

मस्तकशूल सूचक वायू, आखडलेले संधि, संधिवात वगैरे व्याधींनीं त्रासल्यामुळें हताश होऊन बसलेल्यांकरितां

# अमृतांजन—[ रजिष्टर्ड. ]




एक रामबाण इलाज आहे. शुद्ध वनस्पति द्रव्याचें बनविलें असून सर्व प्रकारच्या कळांवर याचा आश्चर्यकारक उपयोग होतो. एक वेळ अनुभव घेऊन पहा.

किंमत प्रत्येक डबीस ८ आणे.

## गजकर्णाचें मलम.

सर्व प्रकारचें गजकर्ण अगर खरूज हें मलम तीन वेळ लावल्यानें खात्रीनें बरें होतें. गुण न आल्यास पैसे परत मिळतील. प्रत्येक डबीची किंमत **फक्त ६ आणे.**

## दंतमंजन.

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात. रक्त वाहणें थांबतें, हिरड्या मजबूत होतात व वास मधुर येतो. प्रत्येक डबीची किंमत **फक्त २ आणे.**

सर्व दुकानदारांकडे अगर

**अमृतांजन डेपो,** १०९ फ्रीयर रोड, मुंबई.

ॐ नमः श्रीरामचंद्राय.

# आर्यमहौषधालय मु. पो. आंजर्ले.

## मदनविलासामृतसंजीवनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह-बुद्धिकांतिवर्धक व पूर्ण धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक-मौक्तिक कस्तुरी–प्रवालादिमिश्र **अपूर्व गुटिका,**

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग, संततीस अपाय करणारे गर्भाशयस्थ विकार, संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग ताबडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साह, बुद्धि आणि कांति वाढते व अंगांत परिपूर्ण शक्ति येते. शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्त धातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्वप्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्यमान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय, यामुळें यांचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत, एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून ज्यास्त घेणारास टपाल खर्च माफ. त्याच्या आंत घेणारांस ट० ख० वेगळा ०४ आणे पडेल. ३२ गो० १ रु० ७० गो० २ रु०; १६० गो० ४ रु०; २६० गो० ६ रु० आणि ५२० गो० १० रुपये.

**थंडगार नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु काच इ० डाळ्यांचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार रहाते. ड० १॥ रुपया.

**कर्णस्रावनाशक अप्रतिम तेल**—यानें कानाचे सर्व प्रकारचे व्रण व तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बा० १ रु

**परम्यावर अपूर्व मिश्रण**—हें कसलाही नवा किंवा जुना परमा त्याच्या सर्व विकारांवर अगदीं जलद बरा करण्याचें कामीं रामबाण आहे. बा० १ रुपया.

**दंतरक्षक पूड**— ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार

तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड० ६ आणे.

**गजकर्ण, खरूज, नायटे**—इ० विकार तीन दिवसांत खास बरे होतात ड० ६ आणे.

**स्वर्णधात्री तैल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं तत्वें आणि उपयुक्त तैलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलेलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ. रोगांस जलद आराम पडतो. केसांस चोळिल्यानें केश काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक, लांब व मृदु होऊन मेंदू शांत आणि रोगरहित बनतो. मस्तकाचें टक्कल जातें. हे अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो! खरूज, शिबें, गजकर्ण वगैरे त्वचेचे कोणतेहि विकार होत नसून ते जडलेले असतील तर जलद नाहींसे होतात. तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा. १। रु.


**सुरंगी, मालती, कल्हार,** राजविलास, **लक्ष्मीविलास**—इ. बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधि अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं विकत मिळतील.

**सूचना**—वरील औषधें वगैरे माल पूर्ण खात्रीचा असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला असून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही० पी० नें पाठवूं प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावा.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.**

मु० पो० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

# कुंतल सौंदर्य.




स्त्रियांचें सौंदर्य कसांवर अवलंबून असतें. आणि केंसांना सुंदरपणा प्रासकरुन देण्यास का मि नि आ ऑईल [रजिस्टर्ड] नामक सुगंधी तेलाची आवश्यकता असते. केंसांचें संरक्षण करून केंस स्वच्छ, तुळतुळीत काळेभोर, कुरळे, आणि रेशमाप्रमाणें नरम बनण्यास कामिनिआ आईलचाच उपयोग केला पाहिजे.

किंमत १ बाटलीस १ रु०, पोष्ट खर्च ०४. ३ बाटल्यांस २रु१०, ट.ह.०७

धी अँग्लो इंडियन ड्रग अँड केमिकल कंपनी, मुंबई.